म. ग्रं. सं. ठाणे.
विषय ... निबंध
सं. क्र. 3044,



अलकची पळवाट

सौ. माधुरी (प्रधान) ताम्हणे

REFBK-0024596

2 1 MAY 1989
मराठी ग्रं संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या रखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नि क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

7 JUL 1985
28 JUL 1985
11 SEP 1985
18 SEP 1985
13 OCT 1985
24 NOV 1985
15 JAN 1986
12 FEB 1986
20 APR 1986
16 JAN 1991

18 MAY 1986
21 MAY 1986
21 MAY 1986
18 JUN 1986
25 JUN 1986
26 JUL 19
(क्र. मा. पहा)
५०००-३-८४
19 APR 1989

संदर्भ निबंध
३०९६
पश्चाद्भाग
२४५९६६



JAN 1991
20 JUL 1986
11 NOV 1987

उमेदीचे, बुद्धीचे, प्रतिभेचे गरुडपंख
लाभलेल्या आणि त्या जोरावर
अनोळखी पाऊलवाटांवर
मार्गदर्शक पाऊलखुणा उमटवणाऱ्या
कर्तृत्ववान महिलांच्या मुलाखती

सौ. माधुरी (प्रधान) ताम्हणे

REFBK-0024596

मेनका प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड

मेनका प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड

प्रकाशन क्र. ३४६
आवृत्ती पहिली : फेब्रुवारी १९८५
© १९८५ सौ. माधुरी (प्रधान) ताम्हणे
कर्मयोग, बी–३, पेपरमिटवाला एस्टेट,
भांडुप, मुंबई–४०००७८

प्रकाशक : पु. वि. बेहेरे,
मेनका प्रकाशन प्रा. लि.,
५६० नारायण पेठ,
पुणे–४११०३०

मुद्रक : पु. वि. बेहेरे,
मेनका मुद्रणालय,
५६० नारायण पेठ,
पुणे–४११०३०

मूल्य ४० रुपये

आयुष्याच्या
अनोळखी पाऊलवाटेवरील
माझे विश्रामस्थान
ती. आईस
सादर समर्पण !

प्रास्ताविक

'अनोळखी पाऊलवाटा' हे सदर 'माहेर' मासिकातून १९८१ ला सुरू झाले आणि १९८५ पर्यंत ते अत्यंत यशस्वीपणे चालू राहिले ह्याचा मला मनापासून आनंद वाटतो. अजूनही ही पाऊलवाट थांबलेली नाही. फक्त काही काळ थबकलेली आहे. थोडा आजवरच्या वाटचालीचा मागोवा घ्यायला, थोडा पुढील हालचालींचा अंदाज घ्यायला. जोवर माणसाच्या मनात नित्य नव्याच्या शोधाची आस जिवंत आहे, तोवर नव्या व्यवसायांचा शोधही जारी राहील आणि जोवर ते व्यवसाय अंगिकारण्याची स्त्रीची जिद्द जिवंत राहील, तोवर ही अनोळखी पाऊलवाट निश्चितपणे पुढे सरकत राहील.

आजवर ह्या सदरात पंचवीस मुलाखती प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यात प्रमिला दातार, सई परांजपे, देवयानी चौबळ, सुहासिनी मुळगावकर ह्यांच्यासारख्या विख्यात, प्रथितयश स्त्रिया होत्या, तसेच लष्करी अधिकारी–नीला पंडित, बँकेच्या डायरेक्टर–कला पंत, कुष्ठ-रोग्यांसाठी 'आनंदग्राम' उभारणाऱ्या डॉ. इंदुताई पटवर्धन आणि उद्योगपती माणिक वांद्रेकर ह्यांच्यासारख्या उच्च दर्जाचे काम करणाऱ्या परंतु ज्यांचे कार्य सामान्यांना फारसे परिचयाचे नाही अशाही स्त्रिया होत्या. त्याचबरोबर अगदी वेगळ्याच व्यवसायाची वाट चोखाळणाऱ्या आणि त्यातले अनोळखी पण थरारक अनुभव मोकळेपणाने सांगणाऱ्या स्टंट गर्ल रेश्मा, सर्कससुंदरी स्विटी थॉमस, मत्स्य-व्यवसायातील मंगला वागळे अशांसारख्याही स्त्रिया होत्या.

ह्या सदरातील व्यक्तींची निवड ही सर्वस्वी व्यवसायाधिष्ठित होती. त्यामुळेच त्यात शास्त्रज्ञ कमला सोहनींची उपस्थिती होती, तशीच पोस्टवुमन कलावती साळवे आणि आशालता तळेकर, जादूगार मधुगंधा इंद्रजीत व स्त्रीपुरोहितांचीही उपस्थिती होती.

मुलाखतींसाठी निवडलेल्या स्त्रियांचे व्यवसाय जसे भिन्न होते तसेच ह्या सर्वच स्त्रियांचा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक दर्जाही वेगवेगळा होता. त्यातील बहुतेक मराठीभाषिक असल्या तरी गुजराथी, पंजाबी, ख्रिश्चन मुस्लीम स्त्रियांचाही ह्यांत अंतर्भाव होता.

ह्या सर्व मुलाखतींतून काही समान सूत्रे दृष्टोत्पतीस आली. ज्या स्त्रिया प्रतिष्ठित व्यवसाय करीत आहेत, उच्चपदस्थ आहेत, त्या सर्वचजणी उच्च मध्यमवर्गातून आलेल्या आहेत. ह्याचा अर्थ आर्थिक,

शैक्षणिक, सांस्कृतिक वारसा त्यांच्याकडे मागील पिढीतून चालत आलेला आहे आणि मागच्या पिढीच्या एक पाऊल फक्त त्यांनी पुढे टाकलेले आहे म्हणून त्या अपवादाच्या गटात सामील झालेल्या आहेत. त्या उलट अपरिहार्यता, अगतिकता ह्यातून स्वीकारला गेलेला वेगळा पण तुलनेने कमी प्रतिष्ठित असा व्यवसाय पोस्टवुमन, सर्कस-सुंदरी, स्टंटगर्ल ह्यांच्या वाटचाला आलेला आहे. त्याबद्दल त्यांना खंत, वैफल्य अथवा मत्सर आहे असे मुळीच नाही. परंतु त्यांनी त्यांचे भागधेय न कुरकुरता स्वीकारलेले आहे, इतकेच !

डायरेक्टर कला पंत, न्यायमूर्ती सुजाता मनोहर व पोलीस इन्स्पेक्टर शांता भट ह्यांच्यासारख्या फार थोडया स्त्रियांनी, जाणूनबुजून वेगळचा व्यवसायांची ही अंधारातली उडी घेतलेली आहे बाकी बहुतेकजणी अपघातानेच ह्या वेगवेगळचा व्यवसायांकडे वळलेल्या आहेत. विशेषत: लीलाताई रेळे, माणिक वांद्रेकर, देवयानी चौबळ, शीतल राव, आरती गुप्ता, मंगळा वागळे ह्यांना तर पुढील वळणावर काय वाढून ठेवलेय ह्याचा पत्ताही नव्हता. नियतीनेच त्यांचे बोट धरून त्यांना ह्या वळणावर आणून सोडलेय आणि सुरुवातीचा संभ्रम वगळता पुढे सर्वचजणी मोठचा आत्मविश्वासाने पुढे चालू लागलेल्या आहेत.

ह्या सर्वांना जवळून पाहताना, अनुभवताना, केवळ दोन–तीन तासांच्या आणि एका ठराविक दृष्टिकोनातून केलेल्या गप्पागोष्टींतून त्यांचे संपूर्ण व्यक्तिमत्व जाणले असा दावा मी मुळीच करणार नाही. परंतु तेवढचा गप्पांतून त्यांची समृद्ध आणि गुंतागुंतीची स्वभाव-वैशिष्टचे व गुणवैशिष्टचे निश्चितपणे सामोरी येतात.

ह्या सर्वच स्त्रिया आत्मविश्वासाने व उत्साहाने तळपणाऱ्या, एकाग्र वृत्तीच्या, तसेच त्यांच्या कामाच्या, व्यवसायाच्या बाबतीत अत्यंत प्रामाणिक अशा आढळल्या. स्त्रीमध्ये सहनशीलता, सोशिक-पणा हे गुण जात्याच आढळतात, पण त्या इतक्या पराकोटीच्या जिद्दी असतात की त्यांचा सोशिकपणासुद्धा अशा वेळी तीव्रतम होतो. डॉ. इंदुताई पटवर्धन ह्यांनी वसवलेले आनंदग्राम पाहिले की ह्याची कल्पना येते. त्यासाठी त्यांनी आपल्या कुटुंबाशी, समाजाशी जो तीव्र संघर्ष केला, त्याला तोड नाही. अशावेळी पारंपरिक रीतीरिवाज, रूढी आणि प्रस्थापितांविरुद्ध त्यांनी केलेला द्रोह हे सगळे धगधगत्या

 संघर्षाला, उद्रेकाला आमंत्रण देणारे ठरले. तरीही त्याला त्या डगमगल्या नाहीत. माणिक वांद्रेकरांचा शुद्ध ब्राह्मणी घरातला चामड्याच्या वस्तू बनवण्याचा उद्योग, डॉ. इंदुताईंचा राजघराण्याची विसंगत असा कुष्ठधामाचा उद्योग, रेश्माचा जिवावर बेतणारा, धाडसी व काहीसा बदनाम झालेला स्टंटगर्लचा व्यवसाय, घरंदाज, सुखवस्तू गृहिणीपदाला रामराम ठोकून रंगमंचावर सुरांचे साम्राज्य उभारणाऱ्या प्रमिला दातारांचा ऑर्केस्ट्राचा व्यवसाय ही अशीच 'चौकटी'ची मोडतोड करणारी, परिघाबाहेर मोठ्या जिद्दीने पाऊल टाकणारी काही उदाहरणे !

अर्थात त्यातल्या सर्वांनीच जी पावले उचलली, वेगळ्या वळणावर टाकली ती केवळ स्वत:च्या जिवावर टाकली असे म्हणता येणार नाही. कुठेतरी कौटुंबिक, सामाजिक पाठबळ त्यांना निश्चितच लाभलेले होते. म्हणून तर आरती गुप्ता मॉडेलींगकडे वळतेय म्हटल्यावर अलम हिंदुस्थानातले तिचे नातेवाईक जेव्हा गोळा झाले, तेव्हा त्यांचा सामूहिक हल्ला तिच्या कॅप्टन वडिलांनीच परतवला–आपल्या लेकीवर उदंड विश्वास दर्शवून ! प्रमिला दातार गावोगावी ऑर्केस्ट्राचा काफिला घेऊन फिरत असताना त्यांच्या संसाराचा सूर बदसूर होऊ नये ह्याचे भान त्यांच्या सासूबाई, मुली आणि पती ठेवतात. अगदी शोभा किलाचंद आपल्या नियतकालिकासाठी मुलाखत घ्यायला जातात तेव्हा त्यांची चिमुरडी मुले, मुलाखत चालू असताना दंगा न करता चित्रकलेत, खेळात स्वत.चे मन रमवत आपणहून बसतात. कुटुंबियांचा असा समंजसपणा, आत्मियता ही अशा स्त्रियांना पुढे पाऊल टाकताना हिमालयाएवढे बळ देते, ही गोष्ट अगदी खरी आहे.

त्याबरोबरच स्वत:चे स्वप्न साकार करण्यासाठी पत्नीला घराबाहेर काढूनही तिच्यावर स्वत:चा दबाव ठवणारा, एकाच व्यवसायात असल्यावर पत्नीला जास्त प्रसिद्धी लाभलेली पाहताच उसळी मारणाऱ्या द्वेषाला थोपवू न शकणारा किंवा सतत समव्यावसायिक पुरुषांच्या बरोबरीने वावरणाऱ्या आपल्या पत्नीकडे काहीशा संशयित नजरेने पाहणारा नवरा, त्याचप्रमाणे आई नसत्या उद्योगात स्वत:ला गुंतवून आपल्याकडे दुर्लक्ष करते असे वाटून घेणारी आणि त्यांच्यासाठी करिअरमधल्या दुर्मिळ संधीकडे पाठ फिरवूनही आईविषयी निष्कारण अढी बाळगणारी वाढत्या वयातली मुले हे चित्रसुद्धा

काही मुलाखतींतून दिसले, हे आवर्जून सांगायला हवे.

नीला पंडित, जया राठोड, रेश्मा, शांता भट, देवयानी चौबळ ह्यांनी वैवाहिक बंधन स्वीकारले नसल्याने त्यांनी निःसंकोचपणे, निर्ममतेने अशा व्यवसायात स्वतःला झोकून दिले. असे असले तरीही कौटुंबिक सुखाच्या कमतरतेची सल त्यांच्या मनात सतत डाचतेय, ही गोष्ट त्यांच्याशी बोलताना जाणवत राहते. शेवटी काय, उंबरठ्याबाहेरचे, जगाचे आव्हान, ते पेलण्याच्या कुवतीचा आलेला अंदाज आणि संसाराचे–मुलाबाळांचे त्या निमंत्रणाचा अव्हेर करायला लावणारे रेशीमपाश ह्यांच्या कात्रीत आजची सुशिक्षित, व्यावसायिक स्त्री सापडली आहे हे निश्चित ! व्यक्तिमत्वविकास महत्त्वाचा की कौटुंबिक स्वास्थ्य, सुरक्षितता महत्त्वाची हा तिच्या मनातला संभ्रम अजूनही मिटलेला नाही.

फिरतीची नोकरी असलेली, सरकारी सेवेतील एक उच्चपदस्थ स्त्री नवऱ्याच्या साध्याशा, कायम नोकरीसाठी, स्वतःच्या चॅलेंजिंग करिअरवर पाणी सोडायला, स्पर्धा परीक्षेतले आपले नेत्रदीपक यश पुसून टाकायला तयार आहे, हे माझ्या दृष्टोत्पत्तीस आलेले एकच उदाहरण त्या बाबतीत पुरेसे बोलके आहे.

अर्थात स्त्रीच्या पायात मातृत्वाची बेडी निसर्गानेच अडकवल्याने, त्यासोबत समाजानेही लादलेली इतर बंधने अगतिकतेने स्वीकारण्यावाचून तिला दुसरा पर्यायच नाही. स्त्री–मुक्तीचा कितीही पुरस्कार करणारी स्त्री असो, आर्थिक– सामाजिकदृष्ट्या ती कितीही स्वतंत्र असो, शेवटी ती चौकटीतलेच स्वातंत्र्य अपेक्षिते, उपभोगते. निखळ, मुक्त स्वातंत्र्य तिला पेलवत नाही, आवडत नाही आणि झेपतही नाही.

अनोळखी पाऊलवाटेवर भेटलेल्या व्यक्तिमत्वांचे विश्लेषण करताना एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे की ह्या सर्वच मुलाखती व्यवसायनिष्ठ होत्या, व्यक्तिनिष्ठ नव्हत्या. ह्या मुलाखतींवर अनेक वाचकांची मला सतत पत्रे येत होती. त्यातली अभिनंदनाची, वेगळ्या वाटा दाखवून मार्गदर्शन केलेत अशी आभाराची पत्रे सोडली तर काही पत्रे मला स्वतःला मार्गदर्शक व उपयुक्त ठरतील अशी होती. वाचकांनी उपस्थित केलेले प्रश्न, विचारलेल्या शंका ह्यांनी माझ्या विचारांना चालना मिळत होती. काही वाचकांची एखाद्या व्यक्तीच्या व्यसनाला अथवा चारित्र्याला आक्षेप घेणारीही पत्रे आली. अशा

प्रास्ताविक पत्रांपैकी एका पत्राला मी जे उत्तर दिले ते, ह्या मुलाखतींबाबत माझी भूमिका पुरेशी स्पष्ट करणारे होते. मी त्यांना लिहिले होते–

" आपण काही व्यावहारिक संकेतांची गुलामगिरी एवढ्या प्रमाणात मानतो की त्यांना किंचितही धक्का लागलेला आपल्या नजरेला सोसवत नाही. समर्पित जीवन जगणाऱ्यांनी ब्रह्मचर्य पाळावे, आत्मसंयम राखावा हे आपल्या मनात एवढे रुजलेले असते की तीसुद्धा हाडामांसाची माणसेच असतात, त्यांनाही विकार–विचार असतात हे आपण साफ दृष्टिआड करतो. सामान्य संकेतांना झुगारून देणारी माणसेच असामान्य कर्तृत्व गाजवू शकतात. कोणतेही व्यसन त्याज्यच ! त्याचे समर्थन मला करायचे नाही. पण ते करतानाचे कृतीतलाच स्वच्छपणा व धैर्य हे लाखमोलाचे ! व्यसनाधीनता कोणाच्याही आभाळाएवढ्या कार्याचे महत्त्व उणावू शकत नाही. अनोळखी पाऊलवाटांतून मी अनोळखी व्यवसायांचे स्क्रिनिंग करत असते. त्यात व्यवसाय प्रथम, व्यक्तिमत्त्व दुय्यम असते. त्या अनुषंगाने त्या व्यक्तीचे अंतर्बाह्य रूप स्पष्ट होत जाते. ते करत असताना कॅमेऱ्याप्रमाणे नजरेस पडेल ते टिपणे, शब्दांतून, कृतींतून त्या व्यक्तिमत्वाला जाणून घेणे हे मी महत्त्वाचे मानते आणि व्यक्तिचित्र रंगवते. त्यांचे अवघे व्यक्तिमत्व बोलके करून जाणारी एखादी लकब, एखादा हावभाव मी आवर्जून चितारते. अर्थात त्यात काही अधिकउणे राहून जात असेलही ! पण ती माझ्या लेखणीची मर्यादा ठरावी !

" वाचकांच्या मनात त्या विशिष्ट व्यवसायासंबंधी निर्माण होणारे प्रश्न उपस्थित करताना संबंधित व्यक्तीचे चारित्र्य, त्यांचे खाजगी जीवन, त्यांची व्यसने हे दुय्यम ठरत होते. त्यांचे व्यावसायिक व्यक्तिमत्व हे प्रधान होते. मुळातच आपण माणसाच्या व्यक्तिमत्वाचे उदात्तीकरण न करता त्याला माणूस म्हणून जाणावे, असा दृष्टिकोन ठेवल्याने तदनुषंगिक प्रश्नांना आपोआप बगल दिली जात होती. "

शेवटी ' अनोळखी पाऊलवाटा 'ची फलश्रुती काय ?–तर ह्या निमित्ताने प्रत्यक्ष अनुभवांवर बेतलेली निवेदने वाचकांना वाचायला मिळाली. त्या त्या व्यवसायांचे अनोळखीपण संपले. एवढ्या जुजबी ओळखीवर एखाद्या स्त्रीने खरोखर ह्या व्यवसायात उतरायचे ठरवले, तरी ह्या मुलाखतींचे उद्दिष्ट सफळ, संपूर्ण आले असे म्हणायला हरकत नाही.

ह्या सदरात वाचकभगिनींना खूपच रस निर्माण झाला होता.

पत्रांद्वारे, प्रत्यक्ष भेटीतून तर त्यांनी मला हे कळवलेच, पण काही मान्यवर महिलामंडळांनी ह्या विषयावर पुन्हा माझीच मुलाखत घेण्याचे कार्यक्रम केले. त्यामुळे पत्रांपेक्षाही प्रत्यक्ष भेटीतून त्यांच्या औत्सुक्यपूर्ण प्रश्नांना मला अधिक चांगला न्याय देता आला.

'अनोळखी पाऊलवाटे'वरून ही वाटचाल करायला मला सर्वस्वी भाग पाडले ते 'माहेर'चे संपादक श्री. पु. वि. बेहेरे ह्यांनी ! ध्यानीमनी नसताना त्यांनी हा प्रस्ताव मांडला आणि पाहता-पाहता ह्या उपक्रमाला एक ठाशीव आकार येत गेला. त्यांचे मार्गदर्शन, प्रोत्साहन ह्यामुळे ही वाटचाल सुरू झाली. मुलाखतीत तोचतोचपणा येतोय असे आढळल्यावर मी त्या थांबवायचा निर्णय घेतला तेव्हा माझ्या नैराश्यावर त्यांनी दिलासा देऊन ही वाटचाल सुरूच ठेवण्याची उमेद दिली, त्यात खंड पडू दिला नाही.

'अनोळखी पाऊलवाटा' ह्या सदरात पुढे पुढे इतरांनाच इतके स्वारस्य वाटायला लागले की 'माहेर'चे वाचक, माझ्या मैत्रिणी, स्नेही हे सगळे आवर्जून मला वेगवेगळ्या व्यावसायिकांचे पत्ते देऊ लागले. कोणत्याही तांत्रिक अडचणी उपस्थित होताच त्याचे निवारण करू लागले.

सौ. सुहासिनी मुळगावकर ह्यांनी अशा मुलाखती मिळवून देण्यात, वेगवेगळ्या विषयांवर चर्चा करून माझे विचारधन वाढवण्यास खूपच मदत केली. पोलीस इन्स्पेक्टर श्री. शिराळकर, 'श्री' साप्ताहिकाचे संपादक श्री. दीपक खेडकर, आकाशवाणी कलावंत श्रीमती विमल जोशी, तसेच माझ्या मैत्रिणी सौ. आशा, जया व शीला, त्यांची छत्रछाया नसती तर ही पाऊलवाट खूपच अवघड झाली असती, त्याची मला कल्पना आहे.

मुलाखतींच्या ह्या अनोळखी पाऊलवाटेवर सुमारे दहा वर्षांपूर्वी मला आणून सोडणारे, वेळोवेळी मला उत्तेजन व आशीर्वाद देणारे आकाशवाणीवरील कुटुंबकल्याण विभागाचे विस्तार अधिकारी श्री. बी. ए. सनदी ह्यांचे माझ्यावरील ऋण कितीही मोठे असले तरी त्यातून मुक्त व्हावे असे मला वाटत नाही.

शेवटची आणि महत्त्वाची व्यक्ती म्हणजे माझी आई– श्रीमती मालती प्रधान ! ती माझी लेखणी आहे, साहाय्यिका आहे आणि कठोर टीकाकार आहे. माझे प्रत्येक लिखाण वाचून, त्यावर संस्करण करून, सूचना देऊन परखड परीक्षण करणे हे काम तिने आजवर अत्यंत जिवा-

 भावाने केलेले आहे. अजूनही करते आहे, त्याशिवाय माझे आणि माझ्या लिखाणाचे अस्तित्व शून्यवत होईल ह्याची मला जाणीव आहे.

गेल्या चार वर्षांतले 'गेले ते दिवस' सार्थकी लागले. त्यांनी खऱ्या अर्थाने जगण्याचे समाधान मला दिले. माझ्या चौकटीतले जग विस्तारले. ह्यांचे संपूर्ण श्रेय 'अनोळखी पाऊलवाटे'लाच आहे.

सौ. माधुरी (प्रधान) ताम्हणे

'अनोळखी पाऊलवाटे'च्या मानकरी

- सौ. सुहासिनी मुळगावकर (९)
- सौ. प्रमिला दातार (३३)
- सई परांजपे (४८)
- सौ. सुजाता मनोहर (६३)
- रेश्मा (७४)
- देवयानी चौबळ (९१)
- शोभा किलाचंद (१०९)
- सौ. माणिक वांद्रेकर (१२४)
- डॉ. इंदु पटवर्धन (१४२)
- स्विटी थॉमस (१६०)
- नमिता व मेघा (१७३)



एक प्रसन्न सदाफुली

सुहासिनी मुळगावकर

बुधवारची एक संध्याकाळ. घडयाळाचा काटा साडेसहाकडे झुकत असतो. घराघरांतील गृहिणींनी, आपल्या रोजच्या कामाच्या वेळापत्रकात थोडासा फेरफार करून अर्ध्या तासासाठी स्वतःला सर्व जबाबदारीतून मुक्त करून घेतलेलं असतं. कारण दूरदर्शनवर थोडयाच वेळात त्यांच्यासाठी त्यांचा कार्यक्रम होणार असतो. 'सुंदर माझं घर !' हे 'सुंदर माझं घर' पुष्परचनेचा छंद, गृहशोभा ह्यासारखे कार्यक्रम करून कधी घराला सुंदर करू पाहतं, कधी आरोग्याचे धडे देऊन तन सुंदर करू पाहतं, कधी धार्मिक–सामाजिक आशयाच्या कार्यक्रमांतून मन सुंदर करू पाहतं तर कधी 'आम्ही दोघी बहिणी जोडीच्या', 'मंगल दिनी तन मन धन' सारख्या स्पर्धांमधून घराघरांतील माणसांना अधिक निकट आणू पाहतं.

रोजच्यासारखाच एखादा दिवस असतो. पण त्या दिवशी घराघरांतून जितेंद्र अभिषेकी, प्रकाश घांग्रेकर, आशा खाडिलकर ह्यांचे सूर घुमत असतात. नाटय-संगीताची मैफल रंगात आलेली असते. रसिकांच्या भावना हेलावून जात असतात.

तशाच चेहऱ्यामोहऱ्याचा आणखी एखादा दिवस असतो. कालीदास अथवा भवभूती आपल्या अवघ्या प्रतिभेचा सुवर्णखजिना प्रेक्षकांसाठी लुटत असतो. ते सुवर्णकण वेचत असताना, मधूनच एक देखणा चेहरा, संस्कृतवरील आपलं प्रभुत्व सिद्ध करणारं रसाळ भाष्य आपल्या निवेदनातून करत असतो. ते निवेदन एवढं उत्कट, एवढं काव्यमय असतं की कालिदासाची प्रतिमाही रोमांचित होऊन जावी !

कधी शनिवारची घाईगर्दीची सकाळ असते. हात कामं उरकत असतात आणि कान रेडिओवरील कार्यक्रमांचे वेध घेत असतात. 'भावसरगम'मध्ये कवीचं निवेदन चाललेलं असतं. कवितेतील आशय कवी पोटतिडिकीनं प्रेक्षकांसमोर पेश

करीत असतो. निवेदन संपतं आणि एका उत्कट स्वराच्या फुंकरीनं कवितेचा अवघा आशय सहजगत्या सजीव होऊन जातो. उगवत्या सकाळीला स्वरमय अर्थ लाभतो.

दिवस उलटतो. रविवारची सुस्त, सैलावलेली सकाळ उगवते. क्वचित् उदास हुरहुरीत. रविवारचा 'मुंबई सकाळ' चाळत असतानाच अष्टांगांनी फुललेली दळदार 'सदाफुली' दृष्टीस पडते आणि तिच्या सदाबहार फुलण्यानं मनाची सगळी मरगळ दूर होते. पुढे येणाऱ्या आठवड्याला सामोरं जायला मन उत्साही, ताजंतवानं होतं.

ह्या आणि अशा बहुविध भावनावस्थांमध्ये स्वतः भिजणाऱ्या आणि आपल्यालाही चिंब भिजवणाऱ्या चैतन्यसरितेचं नाव आहे सौ. सुहासिनी मुळगावकर. एकाच वेळी गायन, वादन, साहित्य, अभिनय अशा बहुविध कलांमधील त्यांचं प्राविण्य पाहून आपण थक्क होतो ! पण त्यात काही नवल नाही. कारण हाडाच्या कलावंताच्या उर्मीच एवढ्या प्रखर असतात की कारंज्याच्या नाना छिद्रांमधून पाण्याचा फवारा उसळावा, तशा जीवनाच्या विविध अंगांतून त्या प्रकट होऊ पाहतात. त्यांना थोपवणं, बांध घालणं हे मग त्या कलावंतांच्याही हातात उरत नाही. मग त्याची प्रतिभा कधी शब्दांतून वा सुरांतून, कुंचल्यातून वा लेखणीतून, वाणीतून अथवा वचनातून, कृतीतून अथवा उक्तीतून सतत प्रकट होत जाते. अस्सल कला लोकमान्यतेच्या प्रकाशात हिऱ्यासारखी लखलखून जाते आणि त्या कलावंताचंच नव्हे तर त्याच्या चाहत्यांचीही मनं उजळवते. सौ. सुहासिनी मुळगावकर ह्या अशाच प्रतिभावान कलावंतांपैकी एक !

त्यांच्या व्यक्तिमत्वात काय नाही ? पुस्तकांच्या बाबतीतला काटेकोरपणा आहे, तसाच निवेदिकेपासून, कपड्यांपर्यंत निवड करण्यातला चोखंदळपणाही आहे. टेबलावरील फुलांना अलवारपणे कुरवाळणारी ऋजुता आहे, तशीच पाडगावकरांची कविता असो की मी नेसलेली गर्द टोमॅटो रंगाची साडी असो, कोणत्याही सुंदर गोष्टीला नकळत दाद देऊन जाणारी रसिकता आहे. आणि ही उत्कट रसिकता निर्मळ आणि निकोप मनोवृत्तीतून जन्मलेली आहे, हेच विशेष !

हसतखेळत, वेगवेगळ्या मूड्समधून जात मारलेल्या तास-दोन तासांच्या गप्पांमधून, सर्वार्थानं आयुष्य उपभोगलेल्या अशा ह्या रसरंगीत सदाबहार व्यक्तिमत्त्वाचा संपूर्ण शोध घेतल्याचा दावा मी करणार नाही. पण जे रूप जसं दिसलं, भावलं ते तसंच्या तसं शब्दांतून रेखाटण्याचा मी फक्त प्रयत्न केलाय.

"सुहासिनीताई, तुमच्या कलागुणांविषयी अनेक लोकांकडून मी खूप ऐकलंय. तुमच्यातल्या ह्या कलागुणांचा विकास कसकसा होत गेला हे मला तुमच्याकडून जाणून घेण्याची फार उत्सुकता लागलीय !"

"माझ्यातल्या कलागुणांचा विकास होण्यात माझ्या आईवडिलांचा फार मोठा वाटा आहे. माझे आईवडील फार सुसंस्कृत आणि रसिक ! आई त्या काळा-

तली डॉक्टर, वडील चांगले एम. ए. झालेले. दोघांचा त्या काळातला म्हणजे सत्तावीस-अठ्ठावीस सालांतला आंतरजातीय विवाह. आई क्षत्रिय, वडील देशस्थ ब्राह्मण. आईचं कुटुंबच फार प्रगतीशील आणि पुरोगामी ! त्यामुळे घरातलं वातावरणच फार निराळं आणि मोकळं ! त्यात आम्ही दोघीच बहिणी ! त्यामुळे लहानपणापासून मुलांना वाढवतात तस्सं आम्ही वाढलो. रायडींग, बोटींग, स्विमिंग सगळे छंद पुरवले गेले आमचे ! एखाद्या राजकन्यांप्रमाणे आम्ही वाढलो. पण तरीही श्रीमंतीचे कुसंस्कार आमच्यावर कधी झाले नाहीत. कारण आम्ही श्रीमंत नव्हतो, सधन होतो. त्याकाळी अशी खूप सुसंस्कृत कुटुंबं मुंबईत होती."

"तुमच्या संगीतसाधनेला सुरुवात साधारण केव्हा झाली ?"

"लहानपणापासून नाटक आणि गाणं माझ्या घरातच ! माझे वडील स्वतः अब्दुलकरीम खाँसाहेबांकडे शिकले होते सहा वर्षं. मला तरी असं वाटतं की गाणं असं कधी येत नाही ग ! पुढे अठरा आणि विसाव्या वर्षी शिकून ते कधी येत नाही. त्याला घरातच गाणं असावं लागतं. एखाद्याच्या घरात नसेल गाणं तर मग समजा एखाद्या देवळाच्या बाजूला तुमचं घर आहे, मग तिथली काकड आरती-भजनं-कीर्तनं सतत तुमच्या कानी पडत असतात. ते संस्कार होतात. गाण्याचे संस्कार असे नेहमीच प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे घडावे लागतात."

"मग तुमचे गाण्याचे गुरु कोण ?"

"शंकरराव देशपांडे. म्हणजे माझे वडीलच ग ! त्यांच्याकडे मी सर्वात प्रथम शिकले. नंतर वामनराव सडोलीकर, मंजिदखाँ, त्याचप्रमाणे मोगुबाई कुर्डीकर, कमल तांबे, किशोरी आमोणकर यांच्याकडे शिकले मी ! पुढे गव्हर्मेंटची कल्चरल स्कॉलरशिपसुद्धा मिळाली मला. जयपूर घराण्याची गायकी शिकले मी ! नाट्यसंगीत मात्र हिराबाई बडोदेकर आणि कृष्णराव चोणकरांकडे शिकले मी !"

"म्हणजे नाट्यसंगीताचं पद्धतशीर शिक्षण आणि नाट्यकलेची आवड ह्या दोहोंच्या संगमातून पुढे 'एकपात्री अभिनया'चं विश्व उभारलं का ?"

"हो ना ! मला पहिल्यापासून आवड होती नाटकाची आणि गाण्याची. पण माझ्या साडेपाच फुटी उंचीभुळे मला स्टेजवर काम करायला कधी वाव मिळाला नाही. उंच हिरोज मिळायचे नाहीत ना तेवढे ! त्यामुळे जरा त्यावेळी त्रास झाला."

"ह्या एकपात्री अभिनयाचं दिग्दर्शन तुम्हाला कोणी व्यक्तिशः केलं की एन्. एस्. डी. सारख्या संस्थेत तुम्ही आधी प्रशिक्षण घेतलं होतं ?"

"छे ! दोन्हीही नाही. मला कुणी दिग्दर्शनही केलं नाही. आणि संस्थेत मी ट्रेनिंगही घेतलं नाही. तरीही मी एकपात्री प्रयोग यशस्वी केलेत. आत्मश्लाघा म्हणून सांगत नाही मी, पण एकपात्री प्रयोगासाठी गुणसमुच्चय असावा लागतो, त्या माणसाकडे. मुख्य म्हणजे साहित्याची आवड पाहिजे. अभिनयाची उत्तम जाणीव पाहिजे. स्मरणशक्ती तल्लख हवी. आणि संगीतात तुम्ही तयार पाहिजे. कारण

ही जी मराठीतील जुनी संगीत नाटकं आहेत, त्यातल्या कोणत्याही नाटकासाठी नायिका किंवा नायक म्हणून उभं राहताना तुम्ही आधी उत्तम गायक असायला हवं. नाहीतर तुमच्यानं सौभद्र, मानापमान, विद्याहरण, स्वयंवर, एकच प्याला ही नाटकं पेलायचीच नाहीत.

"त्याशिवाय पाच अंकी एकपात्रीचा प्रयोग करायला स्टॅमिना पाहिजे. आकर्षक व्यक्तिमत्व पाहिजे. कारण एका माणसानं चार-साडेचार तास प्रेक्षकांना गुंगवणं म्हणजे सोपी गोष्ट नाहीय ती ! विशेष म्हणजे एकपात्रीचे प्रयोग आयोजित करण्यापासून सादर करण्यापर्यंत सगळं मी स्वतः केलंय. अगदी खऱ्या अर्थानं 'एकपात्री !' जो माणूस स्वतः मार्ग काढतो ना तो खरा कर्तृत्ववान ! मग पुढे त्या रुळलेल्या वाटेवरून चालायला खूप लोक येतात."

"एकपात्रीचा पहिला प्रयोग मुंबईत कुठे केलात तुम्ही ?"

"आश्चर्य वाटेल तुला माधुरी, पण एकपात्रीचा जन्म दिल्लीत झाला. मुंबईत नाही. साधारण वीस वर्षांपूर्वी, म्हणजे ३१ जानेवारी १९६० ला मी एकपात्री अभिनयाचा पहिला प्रयोग केला. त्याला माधव गडकरी ('मुंबई सकाळ'चे संपादक), पु. ल. देशपांडे, अनंत वर्तक, गजेंद्रगडकर (सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश) हे सगळे हजर होते. म्हणजे त्याचं काय झालं, संस्कृतमध्ये मी एम्. ए. केलं. गोल्डमेडालिस्ट आहे हं मी संस्कृतची ! त्यानंतर ५७ ते ५९ पर्यंत मी भारतीय विद्याभवनच्या बाजूच्या भवन्स कॉलेजमध्ये लेक्चरर होते. त्याच सुमारास म्हणजे ५८ साली माझं लग्न झालं. ५९ मध्ये मिस्टरांची बदली झाली दिल्लीला. कॅल्टेक्समध्ये इंजिनियर होते ते तेव्हा ! मग मी ही नोकरी सोडली आणि दिल्लीला गेले. तिथे काही मी नोकरी करत नव्हते. तेव्हा संध्याकाळची ह्यांना सगळी नाटकं करून दाखवायची. ही नाटकाची आवड मला मुळातच हं ! खूप नाटकं लहानपणापातून पाहिलेली, वाचलेली. नाटकांची पुस्तकंच एवढी होती घरात ! अगदी शेक्सपिअरन् क्लासिक्स वगैरे सगळं घरातच. त्यामुळे बेस् तयार झालेलाच. त्यात मिस्टरांनाही खूप इंटरेस्ट ! मग काय ? दिल्लीला एक वर्षच होतो आम्ही, पण तिथून येताना बरोबर हे एकपात्रीचे प्रयोग आणले मी !"

"तरी तुम्ही किती प्रयोग केले असतील साधारण ?"

"मी काही तेवढी नोंद ठेवली नाही, पण पाच-सहाशे सहज केले असतील. एकपात्री पाच-सहाशे म्हणजे तू एक धैर्यधर, एक लक्ष्मीधर, एक भामिनी असे प्रयोग मोज. अग एकेक भूमिका करून माणसांची दमछाक होते आणि ते विंगमध्ये येऊन बसतात धापा टाकत. आणि इथे तर वेगवेगळ्या भूमिकांतलं गाणं, अभिनय सर्व काही-म्हणजे इतरांचे पंचवीस प्रयोग तो माझा एक एकपात्री प्रयोग असा हिशोब कर ! असं मी संपूर्ण सौभद्र केलं. संपूर्ण मानापमान, संपूर्ण स्वयंवर करून दाखवलं. नंतर मात्र 'त्रिवेणी' नावाचा एक प्रयोग केला. ह्यात सौभद्रातलं थोडं,

स्वयंवरातलं थोडं आणि मानापमानातलं थोडं होतं. आणि हे प्रयोग एखाद–दोन वर्षं नव्हे, सतत दहा वर्षं केले. साठ ते सत्तर ह्या काळात. विलायतेलासुद्धा त्याचे प्रयोग केले मी !"

"कमाल आहे तुमची ! पण काय हो एवढे प्रयोग करताना अडचणी पण तेवढ्याच पुढे उभ्या राहत असतील ना ?"

"राहतातच ! तिथेच तर कसोटी लागते माणसाची. पण एक सांगते, रंगदेवता प्रसन्न असली ना, की काहीही चमत्कार घडू शकतात. एक प्रसंगच सांगते तुला. असाच एक प्रयोग लावला आणि आवाज अगदी चिप्प बसला. काही केल्या सुटेना. आदल्या रात्री गोविंदराव पटवर्धन, वसंता आचरेकर, अनंतराव लिमये–वारले ते पुढे–ही सगळी मंडळी असायची ना साथीला. ती काय काय सांगत होती मला–'अग सुहास, उद्या कसं व्हायचं तुझं ? तू असं कर, व्हिक्स लाव. गरम पाणी घे.' मी उपाय करत होते. पण आवाज काही सुटत नव्हता. तशा स्थितीत मी स्टेजवर उभी राहिले, आणि काय सांगू तुला, 'नमुनी इशचरणा'चा वरचा षडज् लावला मात्र, आवाज आपोआप सुटला. अस्सा रंगला तो प्रयोग ! गोविंदराव पटवर्धनांच्या डोळ्यांत पाणी आलं. म्हणाले, 'अग, काय ग ही जादू सुहास ? कसा लागला तुझा आवाज ?' मी म्हटलं, 'हे असंच आहे बाबा ! स्टेजवर गेलं की सगळं विसरायला होतं. काही कळत नाही बघ.' खरं सांगते माधुरी, प्रेक्षकांची प्रेरणा ही अद्‌भुत गोष्ट आहे ! जनशक्ती ही कलाकाराची फार मोठी जीवनशक्ती आहे."

"तुमच्या एकेक आठवणी, एकेक अनुभव एवढे रोमांचक आहेत ! खरोखर तुमचं अनुभवविश्व केवढं सखोल, समृद्ध झालं असेल !"

"स्वाभाविक आहे ते ! खूप काही अनुभवलेली, खूप हिंडलेली बाई आहे मी ! माझी क्षितिजं फार रुंदावलेली आहेत. मला नेहमी वाटतं, माणसाला दोनच गोष्टींमुळे ज्ञान प्राप्त होतं– एक तर पुस्तकं वाचून आणि भरपूर हिंडल्यानं. प्रवासानं ज्ञान प्राप्त होतं. अग, नुसतं कर्जत ते चर्चगेट प्रवास करणारी बाई असते ना, तीसुद्धा कितीतरी ज्ञानी असते. कारण पावलोपावली निर्णय घ्यावे लागतात ना तिला !"

"जर कर्जत ते चर्चगेट प्रवास करणारी बाई तुमच्या मतानं ज्ञानी असते, तर डोळसपणे आणि कलासक्त वृत्तीनं जगभर प्रवास करणाऱ्या तुमच्यासारख्या स्त्रीचं काय ?"

"म्हणूनच मी मघाशी म्हटलं ना, माझी क्षितिजं फार रुंदावलेली आहेत. फार प्रवास माझ्या वाट्याला आलाय. माझ्या आईवडिलांना प्रवासाची फार आवड ! दर मे महिन्यात बाहेर जायचो आम्ही ! वयाच्या दहाव्या वर्षीच मी काश्मीरला गेले होते. १९५५–५६ साली मुंबई विद्यापीठाकडून मी चीनला गेले

होते. दहा विद्यापीठांतून प्रत्येकी दोन विद्यार्थी मागवले होते. त्यात मुंबई विद्यापीठानं मला पाठवलं होतं. सीनियर एम. ए. करीत होते मी तेव्हा ! त्यानंतर सत्तर साली विलायतेला गेले. चौऱ्याहत्तर साली टी. व्ही.च्या प्रशिक्षणासाठी स्कॉटलंडला गेले आणि एकोणऐंशी साली तर एकपात्री प्रयोग करायला अमेरिकेलाही जाऊन आले."

"पण तुम्ही परदेशात प्रयोग कसे आयोजित केले ?"

"सगळं केलंय मी ! महाराष्ट्र मंडळांना पत्रं लिहिली त्यांना हवंच होतं नाटक ! सगळी सोय केली. खूप हिंडले. सगळे देश पाहून आले. आणि विशेष म्हणजे, एकटीनं परदेशप्रवास केला दर वेळी. नवऱ्याबरोबर नाही. एकटं हिंडण्यात केवढं थ्रिल असतं ! आता रात्री साडेअकरा वाजता बसची वेळ संपली. आता काय करायचं ? जायचं कसं ? कोणाबरोबर गेलं की सगळं सोप्पं असतं !"

"मग तुम्ही काय करत होता अशा वेळी ?"

"केलं खरं ! त्या त्या क्षणी जे जे काय सुचलं ते ते केलं. माणसं चांगली भेटली. मदत केली खूपजणांनी ! आपण घाबरलेलं दिसलं नाही की लोकं सगळी मदत करतात."

"पण अगदी आयुष्यभर स्मरणात राहील असा प्रसंग कधी घडला ?"

"कित्तीतरी वेळा ! अमेरिकेत लॉस एंजेलिसला मी उतरले होते. एकदा मी कोणाची तरी वाट पाहत थांबले होते ! आणि दोन-तीन निग्रोज आले माझ्याकडे. चल म्हणाले, आपण जाऊ या कुठंतरी ! पण अशा प्रसंगात घाबरून काय होणार ? तशीच एकदा मी लंडनला असतानाची गोष्ट ! राहत होते सबर्बमधे. पिकॅडलीमध्ये नाटक पाहिलं, तोपर्यंत रात्रीचे साडेअकरा वाजले. मी रस्ता साफ विसरून गेलेली. पण सुदैवानं एक भारतीय बस कंडक्टर भेटला. त्यानं मला गाडीतून सुखरूप नेऊन सोडलं. आणि ही सत्तर सालची गोष्ट ! म्हणजे तशी मी तरुणच होते तेव्हा !"

"तशा अजूनही तुम्ही तरुणच दिसता की ! ही आधुनिक वेशभूषा ! आकर्षक व्यक्तिमत्त्व ! कोण म्हणेल तुमची चाळिशी उलटलीय म्हणून ?"

"तशी मी कायम तरुणच राहणार आहे अनिलांच्या कवितेतल्यासारखी- 'अजून यौवनात मी' म्हणणार कायम ! अग, परवाच जब्बार पटेलनं मला फार मोठं कॉम्प्लीमेंट दिलंय बघ. तो म्हणाला, 'ह्या बाईला मी गेली वीस वर्षं पाहतोय, ही आहे तशी आहे काय घुटिका-च्यवनप्राश काय घेता काय तुम्ही ?' पण तुला सांगते माधुरी, चिरतरुण राहणं, तारुण्य टिकवणं ही तुमची मानसिक अवस्था असते. फक्त शारीरिक अवस्था नसते ती !"

"म्हणूनच मला प्रश्न पडलाय की, ह्या वयातही तुम्ही तुमचं तारुण्य, आकर्षक रूप टिकवून आहात मग तरुणपणी म्हणजे, साठ ते सत्तर या काळात एकपात्री प्रयोगांमुळे कीर्तीच्या शिखरावर असताना तुम्ही ते मध्येच कसं सोडून

दिलंत ? रंगभूमीवर टिकून कशा राहिल्या नाहीत तुम्ही ?"

"तोही आयुष्यातला एक योगायोगच म्हणावा लागेल. खरं तर एकपात्री प्रयोगात पैसा चांगला मिळत होता, कीर्ती चांगली मिळत होती, भविष्य उज्ज्वल होतं. तरीही मला एकपात्री प्रयोग सोडावे लागले. त्याचं असं झालं की, १९७१ मध्ये माझं पोटाचं मेजर ऑपरेशन झालं. जवळ जवळ तीन महिने त्या काळात मी घरी झोपून होते. त्यावेळी डॉक्टरांनी बजावलं होतं की, आता इंटस्टाईनवर ताण येईल असं काही करू नका. एकपात्री प्रयोग म्हणजे मोठाच ताण ! त्यामुळे ते प्रथम बंद पडले."

"त्या काळात एकपात्री तुमचं अवघं मनोविश्वच व्यापून राहिले असतील नाही ? आणि तेच दार असं अचानक बंद झाल्यावर केवढं नैराश्य आलं असेल तुम्हाला ? "

"नैराश्य ? आणि मला ? छे ! मी आयुष्यात कधीच निराश होत नाही. माझे एकपात्री प्रयोग बंद झाले खरे, पण मी 'बाई एके बाई' ही संगीतिका काढली ना ! "

"आजारपणाच्या काळात तुम्ही ती काढलीत ? कमाल आहे ! "

"हो ! आजारपणाच्या काळात मी स्वतः ती लिहिली आणि सादर केली. १९७२ च्या जानेवारीत 'आविष्कार'नं त्याचा पहिला प्रयोग केला ना, तेव्हा चक्क पोटाला पट्टा वगैरे बांधून मी त्याचं निवेदन केलं. पुढे पंधरा-सोळा प्रयोग केले आम्ही त्याचे ! म्हणजे त्यात किनई मी स्त्रीच्या निरनिराळ्या अवस्थांचं चित्रण केलं होतं. त्याला समर्पक अशी भावगीतं, काही प्रेमगीतं निवडली होती. प्रथम श्रेणीच्या कवींच्या त्या सगळ्या कविता होत्या. कवी अनिल, बा. भ. बोरकर, ना. घ. देशपांड, कुसुमाग्रज, पाडगावकर, पद्मा लोकूर, शांताबाई शेळके, वसंत बापट, विंदा करंदीकर अशा सगळ्यांच्या कविता एका सूत्रात गुंफल्या होत्या. मध्ये-मध्ये काही विनोदी चुटके टाकले होते. आनंदा नांदोस्कर, आशा दंडवते, पद्मजा बर्वे, श्रीकांत दादरकर, माणिक भिडे ही सगळी मंडळी होती माझ्याकडे गायला. आणि नुसता गाण्यांचा कार्यक्रम नव्हता तो ! त्यात प्रकाशयोजना, नेपथ्य सगळं-सगळं होतं. हो, आणि एक सांगायचं राहिलंच की, ह्या सगळ्या गाण्यांना मी स्वतः चाली लावल्या होत्या. त्या संपूर्ण संगीतिकेचं संगीत माझं होतं. मी आकाशवाणीची मान्यताप्राप्त गायक कलाकार आहे हं ! तिथली ऑडिशन टेस्ट मी पास झालेली आहे. रेडिओला माझी गाणी आहेत. भावसरगमला नेहमी लागतात गाणी माझी ! "

"हो, ऐकलीत ना मी ! मग पुढे काय झालं ? "

"हं, तर काय सांगत होते, दहा वर्षं एकपात्री केले. आव्हान होतं ते पेललं. भरपूर कीर्ती, भरपूर यश मिळालं. सन्मान, पैसा सगळं मिळालं. आता काय

नवीन ? नवीन काहीतरी केलं पाहिजे, ही उर्मी तर जबरदस्त ! आणि तेवढी कल्पकता, प्रतिभाही होती भरपूर ! तसंच अनेक क्षेत्रांची आवड असल्याकारणानं एका क्षेत्रात जीव रमवायचा नाही जास्त वेळ हे एक आणि दुसरं म्हणजे पुढे पुढे एकपात्रीचा ताण खूप जाणवायला लागला. मला नाही वाटत की पुढे आणखी दहा वर्षं मी एकपात्री करत राहिले असते. पु. ल. देशपांडे बघ ! सोडून दिलं त्यांनी-सुद्धा ! तब्येतीला झेपत नाही ते पुढे पुढे ! साडेचार तास, वरखाली आवाजात एक माणूस तुमच्याशी किती बोलेल ? पाच-पाच, सहा-सहा सुरात गात असे मी एकपात्रीमध्ये ! आणि त्यासाठी तब्येत किती निरोगी, तंदुरुस्त हवी सांग ! आज काय बाबा, एक धैर्यधर आजारी पडला तर दुसरा धैर्यधर उभा केला, तसं इथं कुठं शक्य आहे ? तुम्ही प्रयोग लावला की तो केलाच पाहिजे. अंगात दोन-तीन-पर्यंत ताप असताना मी हे केलंय. त्यामुळे एकपात्री पुढे पुढे कमीच होत गेलं असतं. त्यात आजारपणाचं निमित्त झालं इतकंच. अर्थात माझ्यासारख्या धडपड्या बाईला घरी बसून राहणं शक्यच नव्हतं. पण आजारी पडले. एकपात्रीचं दार बंद झालं आणि अचानक टी. व्ही. चं ताट समोर आलं. ७३ साली मी टी. व्ही. ला आले, त्यानंतर मात्र पुन्हा रंगभूमीकडे मी वळूनही पाहिलं नाही. कारण हा एक नवीनच व्यवसाय होता त्यावेळी. 'बाई एके बाई' चे प्रयोग चालू होते हं माझे. साधारण एप्रिलमध्ये ह्या पदाची जाहिरात आली. मी रीतसर अर्ज केला. टेस्ट इथं मुंबईत झाली. निवड होऊन १० जुलै १९७२ ला मी टी. व्ही. ला दाखल झाले ती थेट दिल्लीला ट्रेनिंगसाठीच रवाना झाले. त्यानंतर डिसेंबरपर्यंत दिल्लीतच होते मी ! "

"याचा अर्थ टी. व्ही. ची करियर तुम्हाला अगदी अनपेक्षितपणे मिळून गेली तर ! "

"हो, अनपेक्षितपणे मिळाली हे खरं ! पण अनाहूतपणे मिळून गेली असं मात्र मी म्हणणार नाही कारण दूरदर्शनच्या निर्मात्याला आवश्यक असणारं चौफेर ज्ञान माझ्या ठायी होतं. म्हणूनच मला 'निर्माती' होण्याची संधी मिळाली. निर्मात्याला साधारणतः नृत्य, संगीत, साहित्य, शिल्पकला, चित्रकला, सर्वच कलांची माहिती हवी आणि काय आहे, ह्या सगळ्या कला एकमेकींशी संलग्न आहेत. म्हणजे जो संगीतकार असतो ना, त्याला नृत्याचीही माहिती असू शकते. ह्या सगळ्या कलांची मला पहिल्यापासून आवडही होती आणि माहितीही होती."

"तरीही टी. व्ही. वर प्रोड्यूसर म्हणून काम करणं केवढं अभिमानास्पद आहे ! टी. व्ही. नं तुम्हाला ही संधी दिली हे खरोखरच तुमचं भाग्य ! "

"का नाही मला संधी देणार टेलिव्हिजन ? काय कमी होतं माझ्यात ? बी. ए. ला मला फर्स्ट क्लास मिळालाय. संस्कृतची मी एम. ए. गोल्ड मेडलिस्ट ! दक्षिणा फेलोशिप मला कॉलेजमध्ये मिळालेली. मी चांगली गायिका ! अभिनयाचं

वरदान लाभलेलं. रंगभूमी गाजवलेली. दिसायला स्मार्ट. शिवाय पत्रकारितेचं ज्ञान! 'आलमगीर' मध्ये मी लेखन करीत असे. 'मयूरपंख' ह्या सदराखाली 'मराठ्या'त मी स्तंभलेखन करीत असे. ६७ आणि ६८ दोन वर्षं मी ते सदर चालवलं आणि तू म्हणतेस टी. व्ही. नं मला संधी कशी दिली? का नाही देणार? संगीत, साहित्य, विद्या, कला, व्यक्तिमत्व इतके सारे संगम तुम्हाला किती लोकांमध्ये मिळणार आहेत? परमेश्वरी किमयाच आहे ही! टी. व्ही. ला अभिमान वाटला पाहिजे मी त्यांच्याकडे आहे म्हणून!"

"मग एवढे सगळे कलागुण विकसित झालेले असतानाही निवड झाल्यावर तुम्हाला दिल्लीला का पाठवलं? त्या ट्रेनिंगचा उपयोग तुम्हाला इथल्या दैनंदिन कामकाजात होतो का?"

"अर्थातच! त्याशिवाय तांत्रिक गोष्टी तुम्हाला कळणंच अशक्य आहे. म्हणून सर्व निर्मात्यांना कामावर रुजू होण्यापूर्वीच मुळी आधी सहा महिने प्रशिक्षण घ्यावं लागतं. रंगभूमीवर तुम्ही कितीही नाव मिळवलेलं असलं, तरी हे माध्यमच निराळं आहे. हे तांत्रिक माध्यम आहे. इथे थोडा चित्रपट, थोडा ध्वनी, थोडा अभिनय–म्हणजेच चित्रपट, आकाशवाणी आणि रंगभूमी ह्या सर्वांचा हा समन्वय आहे."

"तंत्राच्या दृष्टीनं फिल्म आणि टी. व्ही.त फरक आहे का?"

"पुष्कळच फरक आहे. टेलिव्हिजन हे जवळिकीचं माध्यम आहे. पाच–सहा फुटांवरून तुम्ही टी. व्ही. पाहता आणि टी. व्ही. चा कॅमेरा एवढा प्रभावशाली असतो की अभिनयाची एखादी जागा तो जितक्या अचूकपणे टिपतो, तितक्याच अचूकपणे तुमची क्षुल्लक चुकसुद्धा टिपतो तो! सतत क्लोजअपवर असतो ना तो! आपण दोघी आता जितक्या जवळकीनं बोलतोय ना, जितक्या जवळून आपण टी. व्ही.ची माणसं आपल्याशी बोलताना स्क्रीनवरून पाहतो तसं फिल्मवर दिसत नाही. फिल्म किती लांब असते! फिल्म पाहायला तुम्ही मुद्दाम थिएटरवर जाता. तिकीट काढता. टेलिव्हिजन तुमच्या घरातच असतो."

"टी. व्ही. वर तुम्ही एखादी भूमिका केलीय का?"

"हो!' बाई एके बाई' ही संगीतिका केली होती ना!"

"मग एखादी भूमिका स्टेजवर करताना आणि तीच भूमिका टी. व्ही. वर करताना खूप फरक जाणवतो का? कोणता अभिनय अधिक जिवंत, अधित रंगतदार वाटतो?"

"दोन्ही ठिकाणच्या अभिनयात खूप फरक आहे. दोन्ही अनुभव रंजक आहेत. स्टेजला वीस फुटांच्या अंतरावरून पुढे प्रेक्षकवर्ग बसलेला असतो. त्याच्यासाठी तुम्ही जो अभिनय करता तो खूप लाऊड अभिनय असतो. टी. व्ही. वर खूप संयत अभिनय करावा लागतो. शेवटी असं आहे नं, तुम्ही एखाद्या माणसाशी जेव्हा

घरगुती जिव्हाळ्यानं बोलता, तेव्हा कसे बोलाल तसं टी. व्ही. वर बोलावं लागतं.

"आलं लक्षात ! मग दिल्लीतल्या ट्रेनिंगचा तुम्ही प्रोड्यूसर म्हणून काम करताना कसा काय उपयोग करून घेतला ?"

"हे कॅमेऱ्याचं माध्यम आहे ना ! इथे बघ, प्रकाशयोजना, नेपथ्य सगळं स्टेजसारखंच करावं लागतं. पण त्याच वेळी शॉट्स जे घ्यायचे असतात ना, ते कॅमेऱ्यावर घ्यायचे असतात. कॅमेऱ्यावर त्या शॉट्सची कशी आखणी करायची, कॅमेरा कसा हाताळायचा, चित्रीकरण कसं करायचं ह्याचं जे तंत्रशुद्ध शिक्षण आम्ही प्रशिक्षण काळात घेतो, त्याचा पुरेपूर उपयोग दैनंदिन कामकाजात आम्ही करतो. पॅनेलवर बसलेल्या निर्मात्याला अनेक गोष्टींचा समन्वय साधावा लागतो. कार्यक्रमाला उठाव देण्याच्या दृष्टीनं ध्वनी (ऑडिओ), लहान फिल्म्म तयार केल्या असतील तर फिल्म्स, फोटोग्राफ्स, चार्टस्, स्नॅप्स, व्हिज्युअल्स, स्लाईड्स वगैरेंचा समयोचित वापर प्रोड्यूसरला करावा लागतो तरच तो कार्यक्रम रंगतदार होतो. आणि ह्या सगळ्या गोष्टी तो प्रोड्यूसर पॅनेलवर बसून सांभाळतो. पुष्कळदा लोक आम्हाला सांगतात, 'काय हो तुमचा कॅमेरामन शॉटच देत नव्हता !' दोष त्या कॅमेरामनचा नसतो. कॅमेरामनला प्रोड्यूसर सांगत असतो, 'आता मला ह्या बाईचा क्लोजअप शॉट दे. आता तू उजवीकडे वळ.' वगैरे. त्याशिवाय आम्हाला एखाद्या फिल्मचं संकलनही पाहावं लागतं. फिल्मिगच्या वेळी डोक्यात थोडंफार चित्र असतं– हे शॉट्स हवेत, हे काढावे लागतील वगैरे. पण तरी फिल्ममधला नेमका कोणता भाग हवा हे कळण्यासाठी संपूर्ण फिल्मसुद्धा पाहावी लागते. तसंच बाह्यचित्रीकरणासाठी जातो आम्ही. आयत्या वेळी अनेक अडचणी उपस्थित होतात तेव्हा ! कधी लाईट्स जातात, बॅटरीची रेंज कमी होते. त्यामुळे साऊंड डिस्टॉर्टेड होतो. मग काहीतरी खटपट करावी लागते. कॅमेरा, ध्वनी, प्रकाशयोजना ही सगळीच अवघड तंत्रं सांभाळावी लागतात. आणि ह्याचंच प्रशिक्षण दिलं जातं."

"पण चित्रीकरण नेमकं कसं करता तुम्ही ?"

"नाटकांचंच उदाहरण घे ! समजा एखाद्या नाटकाचं चित्रीकरण चालू आहे, तर त्या नाटकात अमूक एक शॉट क्लोजअपचा असेल, तेव्हा नेमका व्यक्तीवर कॅमेरा स्थिरावतो. सरावानं जमतं ते ! जिथे महत्त्वाची वाक्यं आहेत, अभिनयाची दाद घेऊन जाणारी विशिष्ट जागा आहे किंवा प्रतिकात्मक विचार व्यक्त करायचे आहेत तेव्हा कॅमेरा नेमका कुठं हवा ते प्रोड्यूसरला कळावं लागतं. स्क्रिप्टवर कॅमेरा शॉट्स मार्क केलेले असतात, पण हे फक्त नाटकातच असतं. जेव्हा चर्चात्मक कार्यक्रम असतात तेव्हा स्क्रिप्टमार्किंग नसतं. कारण तेव्हा स्क्रिप्टच नसतं. तेव्हा निर्मात्याला अंदाज असावा लागतो. त्याला आम्ही ॲडलीप म्हणतो. 'सुंदर माझं घर'-साठी असे चर्चात्मय कार्यक्रम चित्रित करताना सतत लक्ष ठेवावं लागतं. आता या बाईनं प्रश्न विचारलाय, बहुधा त्याला पुढची बाई उत्तर देईल, आता दुसरी बाई

बोलेल बहुतेक ! सतत भान ठवायला लागतं. ड्रायव्हिगमध्ये जसं अवधान ठेवावं लागतं–पुढचा ड्रायव्हर आता काय करणार आहे, त्याप्रमाणे आपण वेग कमीजास्त करावा–तसंच प्रोड्यूसरचं असतं."

"खूपच गुंतागुंतीचं असतं नाही हो हे सगळं !"

"हो तर ! अग टी. व्ही.चा एक कार्यक्रम म्हणजे वेगवेगळ्या प्रकारची चाळीस–पन्नास माणसं गुंतलेली असतात त्यात ! तंत्रज्ञ असतात. खाली फ्लोअर-वर कलाकार असतात. फ्लोअर मॅनेजर, कॅमेरामन हे सगळे असतात. प्रोड्यूसरला त्यांना सगळ्यांना सांभाळून, समजावून घ्यावं लागतं. त्यांच्या अडचणी समजावून घ्याव्या लागतात. कारण त्यातल्या एकाचं जरी डोकं फिरलं तरी अख्खा कार्यक्रम बिघडतो ना ! ह्या सगळ्याचा मानसिक त्रास होतो ग ! आणि तो सोसण्यासाठी ह्या माध्यमाची तुम्हाला मनापासून आवड असावी लागते, रुची असावी लागते. त्यातलं सम्यक् ज्ञानही हवं. मुख्य म्हणजे लोकसंचयाची कलाही अवगत हवी."

"पण काय हो, ह्या सगळ्या तांत्रिक गोष्टींची दिल्लीला तोंडओळख करून दिल्यावर पुन्हा तुम्हाला प्रशिक्षणासाठी स्कॉटलंडला का पाठवलं ?"

"त्याचं काय आहे, गाण्यातला रियाझ असतो ना, तस्संच हे असतं. एकदा तुम्ही बाहेर गाण्याचे कार्यक्रम करायला लागलात म्हणून काही तुम्ही रियाझ सोडत नाही. प्रयोगशील कलाकार कायम रियाझ ठेवतो. निर्माता हा एक असाच कलाकार असतो. त्यातलं जितकं जास्ती ज्ञान मिळेल, तेवढं तो घेण्याचा प्रयत्न करतच असतो. कारण ह्या तांत्रिक बाबींचं मूळ व्याकरण विसरून चालत नाही त्याला."

"पण तरीही तिथे जाऊन पाश्चात्यांची काही विकसित तंत्रं अवगत करून घेतलीत का तुम्ही ?"

"नाही ग ! त्यावेळी नव्या तंत्रांचा आम्हाला इथे फारसा उपयोगच नव्हता. कारण इथे काही तिथल्यासारखी रंगीत टी. व्ही. ची सोय नव्हती. पण एक आहे. त्यांची शिस्त असते. काम करण्याची एक पद्धत असते. त्या पद्धतीनं काम केल्यास ते सोपं होतं. लवकर होतं. ते सगळं शिक्षण इथे आल्यावर उपयोगी पडलं मला ! आणि तेवढाच विरंगुळा मिळतो ग ! आमचं इथलं काम खरोखरच इतकं वेळखाऊ आणि कष्टप्रद असतं की माणूस अगदी थकून जातो. कंटाळून जातो. त्याच त्या वातावरणातून बाहेर पडून थोडे दिवस दुसरीकडे गेलं की माणूस तेवढाच ताजा-तवाना होतो. माणसाच्या मनाच्या नूतनीकरणाची क्रिया असते ती ! "

"पण परदेशातील वास्तव्यात वैयक्तिक अथवा सांघिक अनुभवांमुळे तुमच्या ज्ञानात काही भर पडली का ? ट्रेनिंगव्यतिरिक्त काय अनुभवलंत तुम्ही ?"

"सहजीवनाचं सुख मनसोक्त अनुभवलं मी ! माझ्याबरोबर काही आफ्रिकन मुली होत्या. काही अमेरिकन मुली होत्या. मजा यायची. व्यक्तिमत्व–विकासाला

त्याची मदत होते ना ! पुढं ते भावी काळात प्रोडयूसरला उपयोगीच पडतं. तुमचे विचार बदलतात. एखाद्या गोष्टीकडे पाहण्याचा तुमचा दृष्टिकोन बदलतो. जसं 'सुंदर माझं घर' आहे. सुरुवातीला धार्मिक गोष्टी, सणवार ह्याच्यावरच तो कार्यक्रम आधारलेला असायचा. आता त्याचा चेहरामोहरा बदललाय. त्यात विज्ञान आलंय, तंत्रज्ञान आलंय. त्याच्यावर भर आहे. तसाच 'अमृतमंथन' हा कार्यक्रम. ह्या वर्षापासून मी तो बदललाय. इतके दिवस त्यात नुसतं नाट्य होतं. आता त्याचं मी नृत्यनाट्यात रूपांतर केलंय. त्याला संगीताचा साज चढवलाय. जनसामान्यांसाठी कार्यक्रम करताना निर्माता प्रगतीशील असावा लागतो. त्याला सतत स्वतःला बदलतं ठेवावं लागतं. आजुबाजूची परिस्थिती बदलली तशी मी बदलले. माझी विचार करण्याची पद्धत बदलली. ७२ सालची सुहासिनी मुळगावकर आता ८१ साली कशी मिळेल ? आणि तशी ती मिळूही नये. तसं झालं तर तिची वैचारिक वाढ तिथंच खुंटली असं मी म्हणेन !"

"निर्माती हा तुमचा रोल नेमका कुठपासून सुरू होतो ?"

"अगदी कार्यक्रमाचं आयोजन करण्यापासून ! तीन महिने आधी आम्ही कार्यक्रमांचं प्लॅनिंग करतो. विषय निवडतो. 'सुंदर माझं घर', 'नाट्यसंगीत', 'अमृतमंथन' ह्या कार्यक्रमांच्या मूळ कल्पना माझ्या असतात. नाट्यसंगीताच्या बाबतीत मात्र संयोजन आणि संकल्पन अशी दुहेरी जबाबदारी माझ्यावर असते. एखादा कार्यक्रम यमन रागावर करू या, एखादा सौभद्रातील पदांवर आधारित करू या, ह्या कल्पना माझ्या असतात."

"कार्यक्रमाच्या पूर्वतयारीच्या दृष्टीनं तुम्हाला खूप वाचन करावं लागत असेल नाही ? कारण वाचन जर विशेष नसेल तर नवीन कल्पना कशा सुचायच्या तुम्हाला ? नवीन घडामोडींशी तुमचा परिचय होणार नाही मग !"

"का नाही होणार ? इतर वाचन कमी असलं तरी रोजचं वर्तमानपत्र वाचतो ना आम्ही ! शिवाय रोज आमच्याकडे माणसांची केवढी ये-जा असते. टी. व्ही.मध्ये दिवसाकाठी शंभर माणसं भेटतात. त्यातून हवं तेवढं कळतं. भेटणाऱ्या लोकांकडून आम्हाला सूचना मिळतात. काही वेळा प्रेक्षकांची पत्रं येतात. त्यातूनही आम्हाला कल्पना सुचतात."

"तुम्ही टी. व्ही. च्या कार्यक्रमांच्या निमित्तानं प्रवास करता का ?"

"हो ! खूप ठिकाणी जाते. परवा पिंपरीला गेले होते. नगर, पुणे, नासिक, सोलापूर अशा अनेक ठिकाणी जाते. मला पत्रं येतात. त्यातलं हंसक्षीरन्यायानं आम्हाला बरोबर कळतं की ह्यातलं कुठलं पत्र खरं उपयुक्त आहे. पत्र चांगलं असलं की आम्ही त्यांच्याशी पत्रव्यवहार करतो. त्यांचं कोणीतरी मुंबईत असतंच. ती माणसं येऊन भेटतात. त्यांच्याकडून आम्ही मिळालेल्या माहितीचा खरेखोटेपणा तपासून पाहतो. कधी पार्टी स्वतः येऊन भेटते. मग आम्ही दिवस नक्की करतो.

आता मध्यंतरी अहमदनगरला गेले होते मी ! तिथे एका करंदीकर नावाच्या बाईनं हरिजन मुलींसाठी शाळा चालवली आहे. बाराशे मुली–फक्त हरिजन–त्या बाईंकडे शिकतात. फार चांगलं काम आहे हे ! "

" सुहासिनीताई, तुम्ही संवेदनाशील मनोवृत्तीच्या आहात, त्यामुळे हा असा विविध व्यक्तींशी, संस्थांशी येणारा निकटचा संबंध, दूर आडगावातील प्रवास, हे असे चाकोरीबाहेरील अनुभव तुमच्या व्यक्तित्व–विकासाला खूपच उपयुक्त ठरत असतील नाही का ? "

" तेच तर मी तुला आता सांगणार होते, की टी. व्ही. नं हे माझ्यासाठी फार मोठं काम केलंय की समाजातल्या ज्या थरांशी माझा एरवी कधी संबंधच आला नसता, एरवी ज्यांची सुखदुःखं मी त्रयस्थपणे जाणून घेतली असती, त्या समाजातल्या अगदी खालच्या थरांतल्या बाया–बापड्यांशी ह्या ' सुंदर माझं घर '-मुळे माझा फार जवळून परिचय झाला. "

" म्हणजे अमेरिकेत जाऊन तुमच्या व्यक्तिमत्व–विकासासाठी जसा फायदा झाला... "

" त्याहीपेक्षा जास्त फायदा झाला म्हण ह्या सगळ्यांचा ! समाजातील वैचारिक–आर्थिक–सामाजिकदृष्ट्या दुर्बळ, मागासलेल्या गटाशी एरवी माझा कधी संबंधच आला नसता. आज त्यांचं जीवन, त्यांची सुखदुःखं मला जवळून पाहायला मिळतात. अनुभवायला मिळतात. अर्थात असा संबंध आला नसता, तरी त्यांच्या-विषयी मला सहानुभूती निश्चितपणे वाटत राहिली असती. पण ह्या कार्यक्रमांमुळे माझा त्यांच्याशी जवळून संबंध आला आणि त्यांच्या समस्येकडे मी अधिक डोळस-पणे पाहू लागले. माझ्या विचारसरणीत त्यामुळे निश्चितच फरक पडला असं मला वाटतं ! "

" त्यामुळेच तुमच्या वागण्या–बोलण्यात अधिकाधिक मोकळेपणा, अनौप-चारिकपणा येत चाललाय का ? "

" असेल ! तेही एक कारण असेल ! पण मुळातच माझा स्वभाव खूप मोकळा आहे. माझ्या वागण्या–बोलण्यात औपचारिकपणा कधी नसतोच. आता माझ्या ' प्रतिभा आणि प्रतिमा 'चंच उदाहरण घे. हा कार्यक्रम खरा दुसऱ्या निर्मात्यांच्या हातात असतो. मी फक्त त्यात मुलाखती घेते. "

" मागे एकदा तुम्ही एका पेटी वाजवणाऱ्या छोट्या मुलाची मुलाखत घेतली होती. आठवतं ? आणि त्या एवढ्याशा मुलाला बोलतं करून, खुलवून त्याच्या-कडून इतकी सुंदर पेटी वाजवून घेतली होती तुम्ही ! मला फार आवडला होता तो कार्यक्रम ! "

" मी केलेले ' प्रतिभा आणि प्रतिमा 'चे कार्यक्रम लोकांना नेहमीच आवड-तात. त्याचं खरं कारण हेच असतं की मी त्या माणसाशी अगदी घरगुती मोकळिकीनं

बोलत असते. कुठेही कृत्रिमपणाचं ओझं मी बाळगत नाही. "

" इथल्या बऱ्याच अनुभवांवरून मलाही असं वाटतं की रेडिओ काय किंवा टी. व्ही. काय, लोकांना तिथल्या कार्यक्रमांविषयी आपलेपणा–जवळीक वाटायला हवी असेल, तर आधी कार्यक्रम सादर करणाऱ्यांना त्यांच्या तितकं निकट यावं लागतं. त्यांच्याशी दूर राहूनही जवळिकीचं नातं निर्माण करावं लागतं. विश्वास निर्माण करावा लागतो. तरच कार्यक्रम खऱ्या अर्थानं लोकांपर्यंत पोहोचतात. यशस्वी होतात. "

" तू म्हणतेस ते खरं आहे. पण त्यासाठी माणूस आधी खूप इन्फॉर्मल असावा लागतो. आणि माणूस इन्फॉर्मल तेव्हाच असतो, जेव्हा त्याला स्वत:बद्दल पूर्ण आत्मविश्वास असतो. माणूस जेवढ्यास तेवढं केव्हा वागतो ? जव्हा त्याला स्वत:बद्दल पूर्ण आत्मविश्वास नसतो. 'नको बाबा, झाकली मूठ सव्वा लाखाची !' –असं असतं. माझ्या बाबतीत तसं होत नाही. "

" ह्या आत्मविश्वासाची खरी परीक्षा केव्हा होते सांगू ? जेव्हा माणसाला दैनंदिन जीवनात किंवा प्रवासात वगैरे अनेक गोष्टींवर तडकाफडकी निर्णय घ्यावे लागतात, तेव्हा त्याची परीक्षा होते. "

" आणि हेच नेमकं आपल्या बायकांना जमत नसतं ग ! कारण बायकांना घरातल्या घरात कधी निर्णय घ्यावे लागत नाहीत. आपल्या भारतीय स्त्रीच्या बालपणी वडील निर्णय घेतात, तरुणपणी नवरा घेतो, म्हातारपणी मुलगा किंवा आणखी कुणीतरी घेतं. तिचा निर्णय ती स्वत: कधी घेतच नाही. इतकं परावलंबी करून ठेवलंय पुरुषानं बाईला, आणि तिला वाटत नाही कधी, आपणही काही करावं असं ! मुलाला शाळेत घालायचंय, 'अहो, कोणत्या शाळेत घालायचं मुलाला ?' किंवा 'अहो, कुठल्या सिनेमाला जायचं ?' साधं बाहेर जाताना साडी नेसायची तर 'अहो, कुठली साडी नेसू ?'–हे काय प्रश्न झाले ? कबूल आहे मला. ही नैसर्गिक भावना समजते मला ! एकानं दुसऱ्याच्या मनासारखं वागणं, सहजीवनातलं सौख्य लुटणं ही सुंदर, मनोहर गोष्ट आहे ! त्यात रमणीयता आहे. पण सदैव हेच ! 'त्यांना आवडत नाही ना, म्हणून मी लाल रंग नेसत नाही.' ठीक आहे. त्याला खूष करायचंय ना ? मग त्याच्याबरोबर जाताना नको नेसू. पण तुला लाल रंग आवडतोय मग तू एरवी का नाही नेसत ? पण त्यांना मुळी आवडच नसते कसली ! स्वतंत्र व्यक्ती म्हणून जगतच नाही ती स्त्री ! कधी कोणाची बायको असते, बहीण असते, वहिनी असते. सदैव दडपणाखाली वावरते ती ! "

" तुमच्या बऱ्याच कार्यक्रमांतून आणि स्पर्धांतून हेच विचार व्यक्त होतात नाही ? "

" हो ना ! आता 'मंगलदिनी तनमनधन' स्पर्धा ह्याच विषयावर ठेवली होती मी. त्यात आजच्या स्त्रीचं हेच रूप प्रतित झालं. मला प्रकर्षानं जाणवलं ते !

"मी विचारलं होतं, 'तुमचा नवरा पगार तुमच्या हातात देतो का ?' त्यावर उत्तर आलं, 'इश्श माझा नवरा अख्खा पगार माझ्याच हातात देतो.' मी उदाहरण सांगितलं– 'समजा तुमची एखादी अपंग बहीण आहे. तिला महिन्याकाठी तुम्हाला पाच–पन्नास रुपयांची मदत करावीशी वाटली, किंवा समजा लहानपणी तुम्ही गाणं सोडलंय, ते आता सुरू करावंसं वाटतंय, किंवा एखादी पाच–सहाशे रुपयांची हार्मोनियम विकत घ्यावीशी वाटली, तर तुमचा हक्क आहे का त्या पैशांवर ?' –नाही आहे ! हिशेब द्यावा लागतो नवऱ्याला ! तुम्हाला स्वतंत्र अस्तित्व, तुमच्या संसारात नसतंच मुळी ! त्याची तुम्हाला खंतही नाही. त्याची तुम्हाला नुसती जाणीवसुद्धा नाही."

"माझ्या मतानं, ह्या सगळ्याचा परिणाम उतारवयात स्त्रीवर होतो. उतारवयात एकप्रकारची पोकळी निर्माण होते आणि फार मोठं नैराश्य येतं त्यांच्या वाट्याला !"

"हळूहळू ही पण परिस्थिती पालटेल. मी तितकी निराश नाही. त्यालाही काही कारणं आहेत. सगळीच परिस्थिती पाहा ! आपली सामाजिक, आर्थिक परिस्थिती पाहा ! पुरुषांनाच जिथे रोजगाराच्या पुरेशा संधी नाहीत तिथे बायकांना त्या कुठून उपलब्ध होणार ? त्याचा अर्थच असा की जेवढ्या रोजगाराच्या संधी वाढतील, तेवढ्या बायका नोकरीसाठी अधिक घराबाहेर पडतील. स्वतंत्र विचारसरणीच्या होतील. आणि नवीन मुली काही अशा नाहीत. तडफदार आहेत त्या !"

"मधल्या पिढीचीच ही शोकांतिका आहे !"

"पण असं प्रत्येक पिढीत असतं. प्रत्येक पिढी ही नवी मूल्यं स्वीकारायला बघते आणि जुनी मूल्यं तिला पाठी खेचत असतात, हे चालायचंच. पण म्हणून मला परिस्थिती काही फारशी निराशाजनक नाही वाटत."

"तुम्ही नेहमीच अशा प्रचलित, ज्वलंत विषयांवर कार्यक्रम करत असता पण समजा एखादा विशिष्ट कार्यक्रम आयोजित करताना, विषय निवडल्यावर तुम्हाला असं वाटलं, की ह्या विषयावर आपल्याला फारच थोडी माहिती आहे, ती एकदा तपासून घ्यायला हवी, तर अशा वेळी तुम्ही काय करता ?"

"मग मी निवेदिका घेते ना ! तेवढ्यासाठी मी कॉम्पीअर निवडते आणि तिच्यावर ती जबाबदारी टाकते. आम्ही दोघी एकत्र बसतो, चर्चा करतो, त्यात ठरवतो, ह्या विषयाच्या तयारीच्या दृष्टीनं कोणती पुस्तकं वाचावी, त्यासाठी कुठं जावं, कोणाला भेटावं हे सगळं मी तिच्याबरोबर चर्चा करून ठरवते."

"निवेदिकेचं काम तसं खूप जोखमीचं असतं, कौशल्याचं असतं ह्यात वाद नाही. पण तरीही बऱ्याचदा त्याच त्या लेखिका तुमच्या कार्यक्रमात दिसतात असा लोकांचा आक्षेप आहे. ह्याला कारण काय ?"

"किती लेखिका आहेत माझ्याकडे ? इंद्रायणी सावकार, पद्मजा फाटक,

मोहिनी निमकर ह्या तिघी–चौघी सोडल्या तर कोण लेखिका आहेत माझ्याकडे ?"

"पण निवेदिका म्हणून तुम्ही आकावाणी कलावंत किंवा एखादी सुसंस्कृत चटपटीत गृहिणी ह्यांना का नाही चान्स देत ?"

"देते ना चान्स ! आत्ता तुझ्यासमोर येऊन गेलेली ती बाई कोण होती ? साधी गृहिणी तर होती ! मग करते ना ती माझ्यासाठी कार्यक्रम. तुझा काहीतरी गैरसमज झालाय, असं मला वाटतं. कारण माझ्याकडे निवेदिकांची यादी आहे. जवळ जवळ वीस–पंचवीस निवेदिका आहेत माझ्याकडे. संचालिकांचा माझ्याकडे जितका मोठा संच आहे, तेवढा दुसऱ्या कोणत्याही सेक्शनचा असणार नाही. त्या सगळ्या बायकांना मी मेहनतीनं तयार केलेलं आहे. आता ह्याव्यतिरिक्त ज्या नव्यानव्या येतात त्यांना..."

"त्यांना कसं निवडता तुम्ही ?"

"त्यासाठीच मी आधी अर्ज मागवते. तीन–चार महिन्यांनी त्यांची ऑडीशन टेस्ट घेते. नंतर त्यांना मी कार्यक्रमात सहभागी व्हायला बोलावते. एकदम निवेदन मुळी मी देतच नाही. म्हणजे मला कळतं, की तुम्ही कशा बोलता, तुमचे हावभाव किती सजग आहेत. तुम्ही कॅमेऱ्याला कशा दिसता ? अग हेसुद्धा केवढं महत्त्वाचं आहे सांग पाहू ? रेडिओला तुम्ही लाख करत असाल, पण कॅमेऱ्याला तुम्ही कशा दिसता–म्हणजे नाक डोळे तरी तुमचे जागेवर हवेत की नाही ? किंवा बोलताना तुमची एखादी चमत्कारिक लकब असेल, मग काय उपयोग ? तोंड वाकडं करून, किंवा डोळा बारीक करून बोलायची तुम्हाला सवय असेल तर ? रेडिओला तुमचा फक्त आवाज कळतो, हे दिसत नाही. आम्हाला तेही ध्यानात घ्यावं लागतं. आणि जी माणसं आमच्याकडे येतात, त्यांच्याबद्दल काय सांगू तुला ? मी असं म्हणत नाही की आम्हाला त्रिभुवनसुंदरी मिळायला हव्यात. तुमच्या ज्ञानाचं जे तेज असतं, ते तुमच्या चेहऱ्यावर येतंच. पण नाक, डोळे जरा तरी बरे नकोत ? त्यातल्या त्यात असं धरून चाला की तुम्ही अतीविद्वान आहात, तर मग तुम्हाला अगदी एक डोळा नसला तरीसुद्धा बोलवायला हवं. पण कुठेतरी त्याची भरपाईही व्हायला हवी. तेवढंच कशाला ? आत्ता मी एक कार्यक्रम करतेय. त्यात मला आतापर्यंत ज्या प्रेक्षकांची पत्रं आलेली होती ना, फक्त त्यांनाच मी बोलावतेय. अखेर तुम्ही कोणासाठी कार्यक्रम करता ? बघणाऱ्यांसाठीच ना ? मग त्यांच्या भावना कार्यक्रमात गुंतायला नको का ? म्हणूनच काही ना काही स्पर्धा आयोजित करण्यात हाच तर हेतू असतो माझा !

"आता वास्तविक या क्षेत्रातील फक्त अनुभवी लोकांनाच बोलावलं, तर त्यात आमचा कितीतरी फायदा असतो ! आमची मेहनत वाचते, पैसे वाचतात. कार्यक्रम चांगला होऊ शकतो, पण अशा वेळी आरोप होतो की तुमची तीच ती माणसं नेहमी दिसतात. खरं पाहिलं तर मी कितीतरी नव्या पार्श्वगायिकांना संधी

देते, नव्या संचालिकांना संधी देते. फार संधी देते मी! म्हणजे माझ्यावर हा आरोप कोणालाही करता येणार नाही की तुम्ही तुमच्या त्याच त्या लोकांना बोलावता वगैरे. आत्ता परवा मी पुण्याच्या एका बाईला साहित्यसंमेलनात पाहिली, हेरली. तिला मी पुढच्या महिन्यात संचालिकेचं काम देतेय. गेल्याच महिन्यात वैशाली भागवत म्हणून एक निवेदिका इंट्रोड्यूस केली. आता माझे डोळे तयार झालेत. ते अचूक पारखतात गुणी माणसं. गुणग्राहकता हेही निर्मात्याचं एक लक्षण आहे. त्यांनी नवेनवे कलाकार शोधलेच पाहिजेत."

"पण समजा अशी एखादी निवेदिका तुम्ही हेरलीत, तिला कार्यक्रम दिलात आणि ती अयशस्वी ठरली तर तिला पुन्हा कार्यक्रम देत नाही का तुम्ही?"

"नाही! तसं होत नाही. म्हणूनच मी संचालनाआधी तिला एखाद्या कार्यक्रमात सहभागी व्हायला सांगते, एकदम संचालन देतच नाही. मी तिला सांगते, तू प्रथम भाग घेऊन बघ. तू कशी बघतेस, तू कॅमेऱ्याला कशी दिसतेस. कॅमेऱ्याला तू आत्मविश्वासानं कशी सामोरी जातेस, इतरांशी खेळीमेळीनं बोलून तू कार्यक्रम कसा फुलवतेस मी आधी पाहते. मग मला वाटलं, की बुवा ठाक आहे, ह्या बाईत काही टॅलेंट्स आहेत तर मग मी तिला निवेदन देते. आणि पहिल्याच वेळेला निवेदन यशस्वी होईल असं काही नाही. कॅमेरा फाईट ही फार मोठी गोष्ट आहे. 'फुल खिले है गुलशन गुलशन 'मध्ये बघ! मी-मी म्हणणाऱ्या सिनेमातल्या लोकांची कशी दाणादाण उडते! सिनेमा-नाटकातील हे लोक तर नेहमी 'फेस' करत असतात ना प्रेक्षकांना! तरीसुद्धा कॅमेऱ्याची एक लेन्स समोर येते आणि बाकी स्टुडिओ रिकामा! आणि लाखो न दिसणारे लोक आपल्याला बघत आहेत, हा जो एक जबरदस्त तणाव मनावर येतो, तो सोपा नाही. तिथेच तुमच्या आत्मविश्वासाची कसोटी लागते. मी जे मघाशी तुला म्हणाले की आत्मविश्वास ही फार मोठी गोष्ट आहे, मोलाची गोष्ट आहे, ते ह्याचसाठी! मी गाणाऱ्या लोकांना नेहमी सांगत असते- तुम्ही सात सूर गाताना एक आठवा सूर महत्त्वाचा असतो. आत्मविश्वास हा पहिला सूर. आणि तिथून सप्तक सुरू करा. 'सा रे ग म प ध नी सा!' कोणत्याही गोष्टी-शब्द, वाङ्मय, कला-सर्वच प्रांतांत हा सूर पहिला. मग बाकी सर्व! आत्मविश्वास विलक्षण महत्त्वाचा. आणि तो आत्मविश्वास ज्ञानानं येतो. त्यासाठी त्या ज्ञानाची प्रचंड उपासना तेवढ्याच निष्ठेनं करावी लागते. तेवढीच तपश्चर्या तुम्ही केलेली असली, ते ज्ञान मिळवलेलं असलं की तुम्हाला त्याची परिपूर्ण माहिती असते. शहाण्या माणसाला ठाऊक असतं की, एवढ्या निष्ठेनं आणि कष्टानं आपण जी विद्या मिळवलेली आहे, ती खोटी नाही!"

"फारच सुंदर! तुमचे विचार मनन करण्याजोगे आहेत आणि ते स्वानुभवातून स्फुरलेले आहेत. केवळ पुस्तकी पांडित्याचे नाहीत ते! मला तुमच्याकडे

आणखी एक तक्रार करायची आहे हं, कार्यक्रमाच्या वेळेसंबंधी. 'सुंदर माझे घर' हा महिलांसाठी कार्यक्रम. त्याची वेळ आहे संध्याकाळी साडेसहाची. पुण्या-मुंबईतल्या शिक्षण घेणाऱ्या किंवा नोकरी करणाऱ्या, विशेषत: मुंबईच्या उपनगरांतून राहणाऱ्या महिलांना साडेसहाच्या आत घरी पोहोचून आणि पोहोचताक्षणी टी. व्ही. लावून निवांतपणे हा कार्यक्रम पाहणं जवळजवळ अशक्य ठरतं. त्यामुळे फक्त घरी बसणाऱ्या महिलांसाठीच हा कार्यक्रम असं त्याला मर्यादित स्वरूप प्राप्त होतं. तुम्ही आयोजित करत असलेल्या स्पर्धांपासून, महिलांच्या जिव्हाळ्याच्या आणि उपयुक्त विषयांवरच्या माहितीपूर्ण कार्यक्रमांपासून ह्या महिला वंचित राहतात. हा कार्यक्रम रात्री ठेवणं किंवा रविवारी ठेवणं शक्य नाही का ?"

"कठीण आहे. सगळे कार्यक्रम पाहावे लागतात ना ! तू म्हणतेस तसं होतं हे खरंय, पण ही पॉलीसी मॅटर आहे त्यात आम्ही काही बोलू शकत नाही."

"ही 'पॉलीसी मॅटर' आहे, असं तुम्ही म्हणालात, त्यावरून एक शंका मनात आली. टी. व्ही. हे सरकारी माध्यम आहे. त्यामुळे तुमच्या निर्मितीवर, विषयांच्या निवडीवर किंवा सादर करण्यावर काही बंधनं येतात का ?"

"छे ! अजिबात नाही. कार्यक्रम करण्याबाबत टी. व्ही.मध्ये पूर्णपणे स्वातंत्र्य आहे. आम्हाला इथे कोणत्याही विषयावर कार्यक्रम करण्यापासून कोणीही रोखू शकत नाही. कार्यक्रमाच्या आयोजनात इथे कोणताही हस्तक्षेप नसतो. उलट आम्हाला वाटतं की, जामच्या ह्या गोरगरीब बायाबापड्या आहेत, त्यांना कुटुंबनियोजनाविषयी आम्ही नाही सांगायचं तर कोणी सांगायचं ? आरोग्यविषयक सांगायलाच हवं. सारखं आपलं कवी आणि साहित्य सांगून काय उपयोग ? मॅन्युक्युअर, पेडीक्युअरविषयी सांगणं काही गैर नाही. टायपिंग करणाऱ्या बाईची नखं सुंदर असली, तर ते केव्हाही चांगलंच दिसतं. हे आयुष्यातलं सौंदर्य आहे. पण आयुष्याला काहीतरी मूलभूत तत्त्वं आहेतच ना ! ती जबाबदारीची जाणीव ठेवायला नको ? शेवटी तुम्हाला घाणेरडे कपडे, नॅपकीन्स इथे-तिथे टाकलेले बरे दिसतात का ? मग तिथे सौंदर्याला बाध येतोच ना ! मग त्यासाठी स्वच्छतेची, आरोग्यविषयक माहिती लोकांना द्यायला नको ? म्हणजे अखेर हेही सौंदर्यच आहे, सौंदर्यनिर्मितीसाठीच मी सगळं करते. माझ्या आजूबाजूची माणसं जर सुंदर असतील, त्यांची आयुष्याकडे पाहण्याची दृष्टी जर निकोप असेल, तर मलाच सुंदर आयुष्य जगायला त्याचा उपयोग होणार आहे, असा मी विचार करते आणि त्या दृष्टीनंच मी कार्यक्रम हाताळते."

"इथे तुमच्याशिवाय आणखी स्त्रीनिर्माता आहेत ?"

"आहेत ना ! आम्ही सहाजणी आहोत जवळजवळ !"

"मग स्त्री-निर्माती म्हणून तुम्हाला तुमच्या सहकाऱ्यांकडून अथवा वरिष्ठांकडून काही वेगळी वागणूक अनुभवायला मिळते का ?"

"नाही माधुरी! एकदा तुम्ही ह्या पदावर आलात की स्त्री आणि पुरुष हा भेदच अनुभवायला येत नाही. नुकतीच अकोल्याला मी गेले होते साहित्य संमेलनाला. सकाळी सातला आम्ही उठत होतो ते रात्री अडीचला झोपत होतो. सतत तीन दिवस. मग याला पुरुषासारखं काम म्हणायचं का? मी नाही म्हणत! कारण मी अतिशय मॉडर्न आहे. मी म्हणते, बाईसारखं काम करतात पुरुष! कारण बाईमध्ये सहनशक्ती आणि बळ जास्त असतं असं मी म्हणते. स्त्री-पुरुषातले भेदाभेद ही जुनी, पारंपारिक विचारसरणी आहे. आपण त्या दृष्टिकोनातून पाहिलं की तसेच अनुभव येतात. मी बाई आहे, असं आधी मनात आणू नका. मग त्यातल्या फायद्यांचा विचार करू नका आणि तोट्यांची काळजी करू नका."

"सध्या टी. व्ही. विषयी प्रचंड औत्सुक्य जनमानसात आहे. ह्या ग्लॅमरमुळे लोकांचे कसे अनुभव येतात तुम्हाला."

"काय आहे, मला तर कंटाळा येतो काही वेळा. कुठेही गेलं तरी टी. व्ही. शिवाय कोणी काही बोलतच नाही. सारखे बोलत राहतात, चुका काढत राहतात. तुमचे टी. व्ही. वरील कार्यक्रम किती वाईट आहेत, ते पुन्हा पुन्हा उगाचच सांगत राहतात. शेवटी हे लक्षात ठेवायला हवं की ज्या देशात सर्वच क्षेत्रांत अनादर्शा आहे तिथे टी. व्ही. वर मात्र सगळं आदर्श कुठून आणणार तुम्ही? आमच्याही कितीतरी अडचणी असतात. वास्तविक इथे कामाच्या मानानं पगार बरेच कमी आहेत. पण तरी आम्हाला इथे काम करण्यामध्ये किती आनंद वाटतो! आमचा एखादा कार्यक्रम खूप चांगला झाला, लोकांनी नावाजला तर किती बरं वाटतं! ती केवढी तरी मोठी भरपाई असते कष्टांची!"

"त्याचबरोबर तुम्ही मेहनतीन केलेल्या एखाद्या कार्यक्रमावर टीका झाली तर? मन विचलित नाही होत?"

"होतं तर! आम्ही स्वतःला जर संवेदनाक्षम म्हणवतो, तर थोडंफार मनाला लागतंच. पण सार्वजनिक जीवनात कौतुक आणि टीका दोन्ही झेलायची असते."

"तुम्ही एवढी वर्षं अनेक क्षेत्रं हाताळत फिरताहात. आयुष्यात भेटलेल्या कोणत्याही व्यक्तीचा– मग ती अडचणीच्या वेळी हात देणारी असो की आयुष्यभर पाठीशी राहिलेली असो– कृतज्ञतापूर्वक उल्लेख करावा असं तुम्हाला वाटतं?"

"तसं एखाद्याबद्दल नाही ग सांगता येणार. अनेकांचे आशीर्वाद, अनेकांची शक्ती मला उत्साह द्यायला, कार्यक्रम करायला कारणीभूत झालेत. कारण मुळातच मला सगळी माणसं फार आवडतात. मला माणसातलं वाईट फार कमी वेळा दिसतं. मला माणसं नेहमी चांगलीच वाटतात. मला नंतर कुणीतरी सांगतं की, 'अहो बाई, तुमच्या लक्षात नाही का आलं, मधाशी तो कसा तिरकस बोलला ते!' 'सौभद्रा'त श्रीकृष्ण कसं सांगतो बलरामाला, 'अहो दादा, ही सगळी जेव

णाची धांदल का उडाली ते तुमच्या लक्षात नाही का आलं ?' त्यावर बलराम उत्तरतो, 'का बरं ? केवढा मोठा साधु आहे तो ?'

तर तो उत्तर देतो...

'जेव्हा जेव्हा वाढाया ते,
येई सुभद्रा ती त्या मतीते।
भुलुनी पाहुनी तद्रुपाते, तैसे नाना ढंग करी।

'अहो, हे तुमच्या लक्षात नाही का आलं ?' तस्संच माझं होतं. मी अगदी सरळ पाहते. मला फार कमी वेळा माणूस नावडतो. माणसात नेहमी गुणदोष असतात. मला नेहमी माणसातले गुणच दिसतात– त्याला काय करणार ? तोच माणूस माझ्या पाठीत कधीतरी खंजीर खुपसतो. वाईट वाटतं त्या क्षणी ! वाटतं, आपलं रिडींग चुकलं. आपण एवढं ह्या माणसासाठी केलं आणि हा उलटला. पण म्हणून दुसऱ्यासाठी करताना मी कधीच पाठी येत नाही. आणि समजा, एखाद्या माणसाचा असा अनुभव आला तरी आपल्याला उत्तम वर्तणूक दिलेली माणसंसुद्धा कितीतरी असतात. त्यामुळे कोणावरचा रागसुद्धा माझ्या मनात जास्त दिवस राहत नाही. कारण त्यांच्यातले गुण मला दिसायला लागतात. राग आलेला असतो. एखाद्या दुष्ट प्रवृत्तीबद्दल ! पण ती दुष्ट प्रवृत्ती म्हणजे काही तो संपूर्ण माणूस नव्हे ! काही दिवसांनी वाटायला लागतं, त्याच्यातही काही गुण आहेतच की ! त्यांचा आपण विचार करू या. विसरून जाऊ या मागचं सगळं ! हे वाटायलाही एक कारण आहे. मला नेहमी जाणवतं की ह्या देशात साधं जगण्यासाठीसुद्धा फार संघर्ष करावा लागतो माणसाला ! मग वाटतं, आपल्याला आयुष्यात कितीतरी गोष्टी सहजगत्या मिळाल्यात. मी जीवन सर्वार्थानं उपभोगलंय. मी तृप्त आहे. त्यामुळे बारीकसारीक हेवेदावे, मानापमान माझे होत नाहीत."

"तुम्हाला असं कधी वाटतं का हो, की उगाच अडकलो आपण इथं ! इथं नसतो, तर कलेच्या प्रांतात आणखी खूप काही करू शकलो असतो !"

"छे ! छे ! असं मुळीच वाटत नाही मला. आणि टी. व्ही.वर मी जे करतेय ते काय कमी आहे ? हे बघ, बाहेर मी जे करू शकणार होते, ते मी आधीच केलं होतं. मी नाट्यसंगीताचे कितीतरी कार्यक्रम केले. मी मैफिली गाजवल्या. एकपात्री तर केलंच केलं. लेक्चररशिप केली, लिखाण केलं, कितीतरी गोष्टी केल्या !"

"लिखाणावरून आठवण झाली. रविवारच्या 'मुंबई सकाळ'मध्ये तुमचे ललित लेख वाचतेय मी. ते कधीपासून सुरू केलेत ?"

"दोन वर्षं झाली. 'सदाफुली' हे सदर चालवतेय मी ! तत्पूर्वी मी मधाशी म्हटलं ना, 'आलमगीर'मध्ये, 'मराठा'त वगैरे मी लिहायचीच. पण पुढे ते बंद केलं. कारण माझ्या मते ललित स्तंभलेखन फार काळ लिहूच नये लेखकानं !"

"पण ह्या टी. व्ही.च्या माध्यमातून तुमचे विचार पुरेसे व्यक्त होत नाहीत, भावनांना मोकळीक मिळावी म्हणून तुम्ही बाहेर लिहिता का ?"

"छे ! छे ! तसं नाही. हे माध्यम निराळं, लिखाणाचं माध्यम निराळं ! अखेर लिखाण ही माझी उर्मी आहे. संगीत ही माझी उर्मी आहे. आणि लिखाणामागे माझी ठाम मनोभूमिकाही आहे. तुला मागे सांगितल्याप्रमाणे नेहमी जीवनाची उजळ बाजू तेवढी मी दाखवत असते. मला जीवनाची उदास, काळी छटा माहीत नाही असं नाही. पण मला वाटतं, आयुष्यात सारखं रडत काय बसायचं ? रडून-भेकून काय होणार आहे ? जीवनातलं वैफल्य, दुःख भोगणारी आणि त्याचं चित्र रेखाटणारी अनेक माणसं आहेत. त्यांच्याप्रमाणेच आम्हीही असे अनुभव पेलत असतोच. पैशानं काही सगळीच सुखं मिळत नाहीत. सुखदुःखाची कल्पना ही अखेर भावनिक कल्पना आहे. आयुष्यात गुंतागुंतीच्या समस्या असतात आणि सगळ्याच समस्या काही पैशानं सुटत नसतात. तेच कशाला, दिवसाकाठीसुद्धा प्रत्येकाच्या आयुष्यात केवढंतरी सतत घडत असतं. त्यातलं मनाला लागणारं तेवढंच जर लक्षात ठेवलं, तर 'दुःख पर्वता' एवढे नाही का ? म्हणूनच मी 'सदाफुली" लिहितेय !"

"टी. व्ही. वरील अधिकारपदाच्या जबाबदारीमुळे तुमच्यातल्या कलाकारावर अन्याय होतोय, असं कधी तुम्हाला वाटलं का ?"

"छे ! छे ! उलट हे माध्यम माझ्या कलाविष्काराला साहाय्यभूत ठरलंय असंच मला वाटतं. माझ्यातलं कलात्मक तंत्र विकसित करण्याच्या दृष्टीनं टी. व्ही.-इतकं प्रभावी माध्यम दुसरं असेल असं मला वाटत नाही. तू माझा 'शतरंग' कार्यक्रम पाहिलास ना ? तो कार्यक्रम म्हणजे मी टेलिव्हिजनमध्ये काम केल्यानं मला आलेल्या दृष्टीचं ते द्योतक आहे. त्यात काय नाही ते विचार ! एका शोमध्ये नाट्य-नटी-सूत्रधार-निवेदक-आकाशवाणी टाईप गाणी-नाट्यसंगीत, आणि स्लाईड्स-म्हणजे टेलिव्हिजन आणि ह्या सगळ्यांचं एकत्रीकरण करून एक सलग कार्यक्रम करणं हे रंगभूमीवरील व्यक्तीला कधीही जमलं नसतं. सात वर्षांच्या माझ्या टी. व्ही. वरील कामगिरीमुळे अशा वेगळ्या दृष्टिकोनातून कार्यक्रमाची रचना करण्याचा विचार मला सुचला, अंमलात आणता आला. रंगभूमीवरील माणसाला त्याची कल्पनाही करता येणार नाही. त्यामुळे आजही जे अनेक नवनवीन कार्यक्रम करायचे माझ्या डोक्यात घोळत आहेत, त्या सर्वांमागे टी. व्ही. चा दृष्टिकोन असतो ?"

"आता शेवटचा पण महत्त्वाचा प्रश्न ! तुम्ही दूरदर्शनवरील अधिकारपद सांभाळता. नाट्यपरिषदेच्या कार्यकारिणीवर तुम्ही आहात. तुम्ही वृत्तपत्रांतून सातत्यानं लिखाण करता. 'शतरंग 'सारखे कार्यक्रम बसवता. संसार सांभाळून एवढं सगळं तुम्ही करता तरी कसं ? How do you manage ?"

"I mismanage everything !"

"ही आपली गंमत झाली. तुम्ही हसण्यावारी नेलंत, तरी मी असं म्हणणार नाही ?"

"नाही ग ! तसे माझ्या घरचे सगळेच लोक प्रगतीशील आचार-विचारांचे आहेत आणि आर्थिकदृष्ट्या सबळ असल्याकारणानं, नोकराचाकरांवर मी घर सोपवू शकते. अर्थात नोकरांचाही प्रश्न असतोच हं ! विशेषतः टी. व्ही. वर यायला लागल्यापासून नोकर नसणं आणि लहान मुलींना सांभाळणं ही तारेवरची कसरत नेहमीचीच !"

"किती मुलं आहेत तुम्हाला ?"

"दोन मुली आहेत मला ! अन्वया आणि अश्विनी ! माझी धाकटी मुलगी इलेक्ट्रॉनिक्स इंजिनियरींग करते, पिलानीला आहे ती शिकायला. आणि मोठी मुलगी एम. ए. करतेय. खूप शिष्यवृत्त्या मिळवल्यात तिनं ! सध्या शोभा गुर्टूकडे गाणं शिकते ती !"

"तुमच्याकडे पाहून वाटत नाही, एवढी मोठी मुलगी असेल तुम्हाला !"

"अग, इथे बघतेस तू मला ! सकाळी टेनिस कोर्टवर पाहा मला खेळताना ! तुला खरंच वाटायचं नाही. मी आणि माझी मुलगी आज वर्षभर जातोय तिथं खेळायला. तर तिथल्या लोकांना वाटायचं आम्ही बहिणी आहोत म्हणून ! एकदा कधीतरी त्यांनी माझ्या मुलीला विचारलं, 'हल्ली बरेच दिवसांत तुझी बहीण दिसत नाही कोर्टवर !' तर माझी मुलगी म्हणाली, 'ती बहीण नाही माझी, आई आहे.'"

"अरे वा ! म्हणजे ह्या प्रसंगावरून तर तुम्हाला 'आम्ही दोघी बहिणी जोडीच्या' हा मागच्या स्पर्धेचा विषय सुचला नव्हता ना ? पण काय हो, तुम्ही व्यायामासाठी खेळता की केवळ आवड म्हणून ?"

"खरं सांगू ? मला खेळायला फार आवडतं आणि खेळायलाच कशाला ? मला सगळंच करायला आवडतं. मला लोकांशी बोलायला, म्हणजे भाषणं द्यायला आवडतं. लिहायला आवडतं. गायला आवडतं. वाचायलासुद्धा आवडतं. मराठीतील मृत्युंजय, स्वामी, छावा वगैरे सगळी मोठी मोठी पुस्तकं मी वाचलीत. आणि पुस्तकांच्या बाबतीत मी फार काटेकोर आहे हं ! म्हणजे दुसऱ्यांनी वाचलेलं पुस्तक वाचायला मला आवडत नाही. त्यामुळे लायब्ररीतून मी पुस्तक कधीही आणत नाही आणि माझ्या स्वतःच्या लायब्ररीतलं पुस्तक मी कधी कोणाला देत नाही. मी काय करते, दर दोन महिन्यांनी बॉम्बे बुक डेपोत जाते. आणि त्यांना सांगते की उत्तम पुस्तकं निवडून तो मला द्या. मी विकत घेते ती ! मी घरी खूप छान लायब्ररी केलीय हं ह्या पुस्तकांची ! तर काय सांगत होते ? हं, खरोखर मला आवडत नाही, अशी आयुष्यात गोष्टच नाही, मला कार्ल्याची, सुरणाची भाजी

आवडते. मला बडूक, घोडा, डुक्कर, बदक खायला आवडतं. मी गोगलगाया खाल्ल्यात फ्रान्समध्ये ! 'एस्कार्गो' म्हणून अतिशय रुचकर पदार्थ आहे तो !"

"तुम्हाला देवानं एवढी चौफेर आवड दिलीय, तर मला सांगा, तुमच्या दिवसभराच्या भरगच्च कार्यक्रमातून तुम्हाला मोकळा वेळ मिळाला तर तुम्ही ह्यातलं नेमकं काय कराल ? वाचाल ? लिहाल ? की खेळायला जाल ?"

"यक्षप्रश्न विचारलास हं अगदी ! पण मी अशा वेळी नक्कीच तंबोरा काढून गायला बसेन. त्या चार तारा वाजल्या आणि त्यात आपला सूर मिसळला की मला ब्रह्मानंद मिळतो."

"संगीताला तुम्ही एवढं महत्त्व देता ! पण सांसारिक अडचणींमुळे संगीताच्या किंवा दुसऱ्या क्षेत्रातील सुवर्णसंधी तुम्ही गमावल्यात असं कधी झालंय ?"

"हो ! जातात की काही संधी ! पुष्कळ जातात. पण येतात कितीतरी नवीन ! आणि तुला सांगू का माधुरी, संधी जी असते ना ती ज्याची त्यानं मिळवायची असते. संधी जाते ह्यावर माझा विश्वास नाही ग ! आणि संसारात पडल्यावर असे अनुभव फार येतात. म्हणूनच संसारात पडतानाच हा विचार करायला हवा तुम्ही ! मी सुरुवातीलाच ठरवलं होतं की लग्न करायचं ते गाणं उत्तम जाणणाऱ्या, त्याची आवड असणाऱ्या आणि माझं गाणं जपणाऱ्या माणसाशीच ! मग तो फॉरीन रिटर्नड् नसला तरी चालेल. श्रीमंत नसला तरी चालेल. अत्याधुनिक राहणीचा नसला तरी चालेल. ही तडजोड मुळातच स्वीकारली मी ! माझे मिस्टर व्यवसायानं इंजिनियर आहेत, पण तबला उत्तम बाजवतात. मुळगावकर फॅमिलीच गाण्यातली ! अशा कलावंत कुटुंबात पडल्यावर तुमच्या कलेची गळचेपी होत नाही कधी ! पण असं घर मिळेपर्यंत थांबले मी ! वास्तविक मी चांगल्या घरातील होते. संगीत, साहित्यात गती असलेली होते. दिसायला स्मार्ट होते. त्यामुळे मला अनेक स्थळं सांगून येत होती. पण संगीतात ज्यांना गम्य नाही, अशांना मी सरळ नाकारलं. अशी आयुष्यात तुम्ही प्रायोरिटी द्यायला पाहिजे ना ! मग असं होणार नाही. सुलभा देशपांडे–अरविंद देशपांडेचं का नाही झालं ? सुधा करमरकर, विजया मेहतांचं का नाही झालं ? कारण त्यांनी मुळातच प्रायोरिटी ठेवली. आम्ही ज्या ह्या क्षेत्रात नाव कमावलेल्या बायका आहोत, त्यांची नावं उगीच नाही झाली ! त्यांनी आधी आयुष्यात ही तडजोड स्वीकारली."

"तुमच्याशी मनसोक्त गप्पा मारल्यावर खरोखरच असं वाटायला लागलंय, की आता तुम्ही आत्मचरित्रच लिहावं म्हणजे लोकांना तरी कळतील तुमचे अनुभव, तुमचे विचार !"

"अगं हो, परवा साहित्य संमेलनात कोठावळे भेटले. ते म्हणाले, 'बाई तुम्ही आमच्यासाठी आत्मचरित्र लिहा.' मी म्हटलं, 'अहो, झाले का मी वयस्कर एवढ्यात?' तर ते म्हणाले, 'अहो, तसं नाही. राम नगरकरांनी जसं रामनगरी

लिहिलंय ना, तसं तुम्ही लिहा. तुमच्या आयुष्यात एवढं काही घडलं असेल, त्यातून सौंदर्याची तुम्हाला जात्याच ओढ आहे. तेव्हा तुमच्या आयुष्यातलं सुंदर असेल तेवढंच आम्हाला सांगा.'"

"तुम्ही खरोखरच विचार करावा, अशीच सूचना केशवराव कोठावळेंनी केलीय तुम्हाला! 'वेळ पुरत नाही' ह्या सबबीवर त्यांची बोळवण करू नका असं मला सांगावंसं वाटतंय. आणखी सांगावासा एक विचार मनात आलाय. तो सांगावासा वाटतोय, सांगू?"

"सांग ना! जरूर!"

"मध्यंतरी शिवाजी सावंतांची 'छावा' ही कादंबरी वाचली मी! छावा, मृत्युंजय, ययाती अशा काही साहित्यकृती वाचल्या ना, की वाटतं आपण काही लिहूच नये. ह्या प्रतिभावान कलावंतांनी सरस्वतीसाठी विणलेली महावस्त्रं ही! आपण आपल्या लिखाणाची ठिगळं त्याला जोडूच नयेत. तसंच तुमच्यासारखं उत्तुंग व्यक्तिमत्व भेटलं ना की वाटतं, आपण करावं असं काही त्यांनी बाकी ठेवलंच नाही. आपल्या धडपडीला काही अर्थच उरत नाही मग. फार निराश वाटतं पाहा!"

"तसं वाटायचंच. मोगुबाई कुर्डीकरांचं गाणं एकताना पूर्वी मलाही असंच वाटायचं. वाटायचं, दैवी सूर आहेत हे! आपल्या गळ्यातून कधी निघायचेच नाहीत. पण तरी निराश होऊ नये माणसानं. सतत उत्साही असावं, धडपडत राहावं. एवढे बरे-वाईट अनुभव घेतलेत मी, पण मला आयुष्याचा उबग कधी येतच नाही. आत्ता परवा मी पाडगावकरांची ती कविता ऐकली. 'ह्या जन्मावर, ह्या जगण्यावर शतदा प्रेम करावे!' मला फार आवडली ती कविता! आणि जगणं हा शब्द जो घातलाय ना पाडगावकरांनी... Hats off to पाडगावकर! मी लगेच फोन केला पाडगावकरांना. म्हटलं, हे 'जगणं' आहे ना पाडगावकर, ते दैनंदिन जीवन आहे. आणि ह्याच्यावर तुम्ही प्रेम करा म्हणता, म्हणजे ही कल्पनाच किती सुंदर आहे! केवढा चॅलेंज आहे त्यात! दिवस उगवतो, दिवस मावळतो. ह्या प्रत्येक दिवसात किती किती घडतं! काही आपल्या मनासारखं घडतं, काही आपल्या विरुद्ध घडतं. काही वेळा कल्पना नसताना अनपेक्षित सुंदर घडतं, कधी अनपेक्षित वाईट घडतं. हेच जगणं आहे आणि ते हिंमतीनं जगायला ताकद लागते. आणि ही हिंमत, ही ताकद काही इंजेक्शनसारखी टोचून बाहेरून आत घेता येत नाही. ही मनाची उभारी तुमची तुम्हाला घ्यावी लागते. आणि ही उभारी तुम्ही उगवत्या सूर्यबिंबातून घेता, निळ्या आकाशात उडणाऱ्या पक्ष्यांच्या थव्यावरून घेता. वसंतात झाडावर फुटणारी कोवळी पालवी असते–तिच्यातून घेता. एकदा ही उभारी मनानं घेतली की आयुष्य एवढा निरामय आनंद देऊन जातं, की ते कधी संपूच नये असं वाटतं. मीही आयुष्यावर असंच उदंड प्रेम करते आणि करत राहणार आहे!"

'माहेर'/मे १९८१

सरगमच्या सप्तसुरांत रंगणारी कलावती

प्रमिला दातार

परवा–परवाच रंगलेली एक घरगुती खाजगी मैफल! शरदभाईंनी खूप जुन्या रेकॉर्डस् मिळवून आणल्या होत्या. एका पौर्णिमेच्या रात्री गच्चीवरील गुलाबांच्या ताटव्यात आणि कठड्यावरून झुलणाऱ्या जाई–जुईच्या मांडवात बसून, चांदरसाचं आकंठपान करता–करता, संगीत आणि सुगंधासह एक सुरेल मैफल जमून आली होती.

हिराबाई बडोदेकरांचे शास्त्रीय संगीताचे सूर विरतात न विरतात तोच 'माझिया माहेरा जाऽ' ही ज्योत्स्नाबाईंची लाडिक आळवणी सुरू झाली. त्यापाठोपाठ मालती पांडेंचे रसाळ सूर आणि जी. एन. जोशींचे 'नदीकिनारी नदकिनारी गऽ'चे उत्कट सूर हवेत तरंगले. त्यांच्या जोडीने माणिक वर्माचे चिरतरुण स्वर 'सावळाच रंग तुझा' लेऊन अवरले.

अवघं वातावरण नादमय होऊन गेलं होतं. एका वेगळ्याच विश्वात सारे डोलत होते. अन् अचानक कुठुनशी 'माय हार्ट इज बिटींग'ची धून छडली गेली आणि अचानक गाणं गाता–गाता तंबोऱ्याची तार तुटावी तसंच काहीसं झालं. हा चहाटळपणा कुणातरी सुपीक तरुण डोक्यातून निघालेला असावा. पण स्वतःचं तारुण्य नव्यानं उपभोगू पाहत असलेल्या बुजुर्गांना त्यानं चिथावणीच मिळाली. रंगलेल्या मैफलीचा पाहता–पाहता आखाडा झाला. ह्या तरुणांना सूरांची जाणच नाही, त्यांना नुसता धांगडधिंगा हवा अशी प्रच्छन्न टीकाही झाली. एकूण तंग वातावरणात मैफल विस्कटली.

एखादी सुरेख रेखलेली रांगोळी एका फटकाऱ्यासरशी विस्कटून जावी, तशा त्या जमून आलेल्या मैफलीचा केवळ चेष्टेतून झालेला हा विचका माझ्या मनाला

फार लागून राहिला. दोन्हीकडचे आरोप–प्रत्यारोप मला उगाचच अस्वस्थ करू लागले. तास न् तास चालणाऱ्या अभिजात शास्त्रीय संगीताचा आनंद लुटायला लागणारं स्वास्थ्य आज नाही, तेवढा अवधी नाही, म्हणून त्याचं महत्त्व थोडंच उणावतंय ? आणि गतिमान काळाबरोबर पावलं टाकीत, बेभान, वेगवान, पाश्चात्य धर्तीचं संगीत रसिक मनाला आज मोहवून टाकतंय तेही सवंगच समजायचं का ?

तशातच दोन–चार दिवसांनी प्रमिला दातारांचा 'सुनहरी यादे'चा हजारावा प्रयोग पाहण्याचा योग आला आणि मनातल्या उलटसुलट विचारांना एक वेगळीच दिशा मिळाली.

सध्या अनेक ग्रुप्सच्या, ऑर्केस्ट्राजच्या हाऊसफुल्ल प्रयोगांच्या जाहिराती माझ्या पाहण्यात येत होत्या. करमणुकीचा हा प्रकार चित्रपट–नाटकांइतकाच लोकप्रियतेच्या लाटेवर आरूढ होतोय, ह्याची मला जाणीव होती. मी असे अनेक कार्यक्रम पाहिलेही होते. पण आता मानसिक अवस्था काहीशी वेगळी होती. तशातच एका महिलेनं, गृहिणींनंच म्हटलं तरी हरकत नाही, एवढा मोठा भव्य कार्यक्रम आयोजित करावा, ह्याचं नाही म्हटलं तरी कुतुहल होतंच.

पाच मार्च ! गुढीपाडव्याचा दिवस. मुंबईतील चढती, तापती दुपार ! कार्यक्रमाची वेळ दुपारी अडीचची. षण्मुखानंदचं वातानुकुलित प्रचंड प्रेक्षागार उत्साही प्रेक्षकांनी तुडुंब भरलेलं. घड्याळाचा काटा अडीचवरून तीनवर झुकू लागला तसतशी प्रेक्षकांची अस्वस्थता, कोलाहल वाढत गेला. प्रेक्षकांतून शिट्ट्या आणि आरडाओरडा ह्यांचा गदारोळ सुरू झाला आणि काही क्षणांतच मखमली पडद्याआडून खणखणीत शब्द आले– 'सुस्वागतम् ऽ !'

'सुनहरी यादें'च्या हजाराव्या प्रयोगाची, प्रेक्षकांसाठी स्वागतपर अनाऊन्समेंट झाली आणि पाहता–पाहता ते हजारो प्रेक्षकांनी तुडुंब भरून ओसंडलेलं प्रेक्षागार शांत शांत झालं. कोलाहलाची कुजबुज झाली. अखेर तीही थंड झाली. 'गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु' संपलं आणि संथ सूर निनादले– 'अल्ला तेरो नाम... ईश्वर तेरो नाम ऽ !'

त्या सुरांची मोहिनीच अशी जबरदस्त होती की, त्यांची कार्यक्रमावरील पकड मध्यंतर आणि सत्कारसमारंभानंतरही क्षणभरासाठीसुद्धा ढिली झाली नाही. त्या सुरांसोबत मखमली पडदा हळूहळू सरकत गेला. स्टेजवर मनोरम डेकोरेशन केलेलं होतं. छतावर दीप्तीमान झुंबर झुलत होतं. स्टेजच्या दोहो बाजूंनी रंगीबेरंगी दिव्यांच्या माळा हेलकावत होत्या. मधोमध '१००'चा भव्य आकडा झगझगत होता. बाजूला मोठा दीप प्रज्वलित केलेला, त्याच्या पाठीमागे सुंदर रंगीबेरंगी गुढी उभारलेली. आणि पाठीमागील पडद्यावर गणपतीचं सुंदर चित्र ! वातावरण अस्सल मऱ्हाठमोळं होतं. प्रेक्षक त्या सुरेख सजावटीचं नेत्रसुख अनुभवत असतानाच 'अल्ला तेरो नाम'च्या सुरांनी वातावरणाला एक वेगळाच मंगल टच् दिला. ईश्वरप्रार्थने-

नंतर प्रमिला दातारांनी आपल्या संपूर्ण संचासह रंगमंचावर सुहास्य मुद्रेनं प्रवेश केला. टाळ्यांचा कडकडाट झाला आणि नंतर जुन्या–नव्या लोकप्रिय गीतांची बहार उडाली.

संपूर्ण कार्यक्रमभर साडेतीन हजार प्रेक्षकांचं जबरदस्त दडपण मी मनावर अनुभवत होते. नर्व्हस् होत होते– पण ९९९ प्रयोगांचा अनुभव पाठीशी असलेल्या प्रमिलाताई, प्रसन्न आत्मविश्वासानं स्टेजवर वावरत होत्या. एकामागून एक गाणी सादर करीत होत्या. कधी संथ सुरावटीतील, कधी उडत्या चालीतील, तर काही लावणी घाटातील ! त्यांची तृप्त पण काहीशी श्रांत मूर्ती भिंगरीसारखी स्टेजभर फिरत होती. आणि त्यांचं ते उत्साही अवतीभवती वावरणं इतर कलाकारांना चैतन्याची संजीवनी प्रदान करीत होते. प्रेक्षकांतून अधुनमधून फर्माईशी झडत होत्या. पण आपल्या ध्येय–धोरणांशी सुसंगत गाणी गाताना, प्रेक्षकांना काबूत ठेवण्याचं त्यांचं कसब वाखाणण्याजोगं होतं.

'हरि ओम् हरी...' प्रेक्षकांचं हे आवडतं डिस्को सांग रंगात आलं होतं. स्वतः प्रमिलाताईही मस्तीत गात होत्या. अवघे सूर जणू त्यांच्या बोलक्या हावभावांतून आणि लखलखत्या अंगप्रत्यंगांतून स्फुरत होते आणि गाणं एक जिवंत शिल्प बनून रसिकांपुढे उभं राहत होतं.

'हरि ओम हरी ऽ'! सुरांच्या लाटा तुफान वेगानं स्टेजवरून उसळत होत्या. प्रेक्षागारात लहरत होत्या. अवघं थिएटरच एक स्वरविश्व होऊन गेलं होतं. मला राहून राहून बाळकृष्णबुवा इचलकरंजीकरांच्या दोन ओळी आठवत होत्या–"मध्यरात्री नभ घुमटाखाली, संगीताचं झाड फुलवा ॥'

खरोखर प्रमिलाताईंचा वाद्यवृंद ऐन रंगात येतो ना, तेव्हा वाटतं, संगीताची एक वेलच फुलतेय रंगमंचावर ! संगीताच्या त्या फुलल्या झाडातून टपटपणारी स्वरसुमनं किती वेचू असं रसिक मन वेडावून जातं.

कार्यक्रमाच्या मध्यंतरात सी. रामचंद्र, राज बब्बर, प्रकाश मेहरा वगैरे सिनेजगतातील कलावंतांकडून वाद्यवृंदातील कलाकारांना मानचिन्हं देण्यात आली. हारतुरे झाले. प्रमिलाताईंना त्यांच्या कलाकारांनी 'आमच्या ताई' म्हणून गौरवलं. उपस्थितांची गौरवपर भाषणं झाली. सगळं कसं अशा सोहोळ्यांच्या सेटअप्मध्ये फिट्ट बसणारं होतं. ठरीव ठशाचं होतं. पण नंतरच्या एक–दोन साध्याशाच प्रसंगांनी, सत्कारांनी सगळ्याच समारंभाला एक वेगळ्याच पातळीवर नेऊन ठेवलं.

प्रमिलाताईंच्या सासूबाईंचं सहकार्य त्यांच्या पाठीशी सदैव असतं. अनपेक्षितपणे स्टेजवर त्यांच्या आईच्या हातून सासूबाईंचा जाहीर सत्कार केला गेला. आणि एका घरगुती सोहळ्याचं स्वरूप ह्या समारंभाला प्राप्त झालं. नुकतंच त्यांच्या वाद्यवृंदातील एका कलाकाराचं देहावसान झालं होतं त्यांच्या पत्नीलाही रंगमंचावर मानानं बसवून पाच हजार एक रुपयांचा चेक मदतीचा पहिला हप्ता म्हणून देण्यात

आला. आपल्या कलाकारांचंच नव्हे तर रसिकांचंही ऋण म्हणून मानणाऱ्या प्रमिलाताईंनी प्रेक्षकांना 'सुनहरी यादें'ची स्मृती म्हणून पेन्स वाटली आणि कदाचित त्याच क्षणी त्यांचं वेगळेपण मनाला स्पर्शून गेलं असावं. त्यांची भेट घेऊन, त्यांच्याशी गप्पागोष्टी करण्याची उर्मी मनात दाटून आली. मनात ही इच्छा दाटून आली खरी, पण मला सारखी शंका वाटत होती–पन्नास फुटांवरून आपण ह्या कलाकाराला पाहतोय, तेव्हा दुरून तो 'साजरा'च दिसणार! पण त्यांच्या निकट जाऊन गप्पागोष्टी करू तेव्हा त्यांचे कोणते रंग नजरेस पडतील? पन्नास फुटांवरून स्टेजवरील झगमगाटात उठून दिसणारं लखलखतं व्यक्तिमत्व, स्टेजवरून उतरल्यावर पाच फुटांवरून झाकोळलेलं भासलं तर!

पण सुदैवानं ती निराशा पचवावी लागली नाही. स्टेजवरील त्यांचं वावरणं जेवढं मनोरम आहे तेवढाच, किंबहुना थोडा अधिकच त्यांचा निकट सहवास लोभावून टाकणारा आहे. मी त्यांच्याशी संपर्क साधताच, महिन्याभरातल्या दौऱ्यांच्या आणि कार्यक्रमाच्या भरगच्च टाईट शेडयूलमधून एक दिवस मुक्रर करण्यात आला.

गप्पा सुरू होताच, 'तुमच्या गाण्यामागे शास्त्रीय संगीताची साधना आहे का?' –ही माझी पहिली चौकस विचारणा!

"अर्थातच!" त्या तत्परतेनं म्हणाल्या, "माझ्या घरात तसं कोणी गाणारं नाही. पण माझी गाण्याची आवड जाणून, वडिलांनी मला लहानपणी मास्टर नवरंगांच्या क्लासमध्ये गाणं शिकायला पाठवलं. त्यातूनच पुढे मी शाळेतल्या संगीत नाटकांतून पुरुष भूमिका करायला लागले. 'शारदा'मध्ये मी कोदंडाचं काम केलंय. 'स्वयंवर'मध्ये कृष्णाची भूमिका केलीय. तेव्हा अभिनयाचं मला वैयक्तिक पारितोषिकही मिळालं होतं. त्यावेळी माझं 'शारदा' नाटकातलं काम केशवराव भोळ्यांनी पाहिलं आणि मला रेडिओवर नेलं. आता मी रेडिओची 'ए ग्रेड' आर्टिस्ट आहे. टी. व्ही. वरूनही मी गाते."

मला स्वाभाविकच कुतुहल वाटलं की सौंदर्य होतं, अभिनयाचं अंग होतं आणि गाता गळाही होता, तर ह्या नाटकाकडे कशा वळल्या नाही? त्यावर हसून त्या म्हणाल्या, "अहो सतराव्या वर्षी माझं लग्न झालं, मग नाटकाकडे कशी वळणार? तेव्हा मी जेमतेम इंटरला होते. पण लग्नामुळे माझ्या शिक्षणात मात्र खंड पडला नाही हं! मी बी. ए केलं. पुढं वंदना झाल्यानंतरही 'ह्यां'च्या प्रोत्साहनानं मी संगीत विषय घेऊन एम्. ए. केलं. एम्. ए. झाल्यावर मात्र माझ्या शास्त्रीय संगीताच्या गायनात खंड पडला. कारण विक्रोळीसारख्या उपनगरातून गिरगावात शिकायला येणं, तेही संसार सांभाळून, अवघड होऊन बसलं होतं. पण मला पहिल्यापासून लाइट म्युझिकची आवड! ती मला स्वस्थ बसू देईना, म्हणून मी एकटीचे, खाजगी बैठकीचे कार्यक्रम करायला लागले. त्यात फक्त एक तबलजी

आणि दोन साथीदार ! मी स्वत: गायची आणि पेटी वाजवायची. महिला मंडळात, गणपती उत्सवात मी असे कार्यक्रम नेहमीच करायची आणि एकदा नाव झाल्यावर मुंबईबाहरचेही कार्यक्रम मिळायला लागले. अशा खाजगी बैठकीतून मी नेहमी मराठी गाणी गायची. पण खेडेगावांतून भावगीतं, नाट्यगीतं अशी चांगल्या टेस्टची गाणी लोकांना फारशी आवडत नाहीत. तिथे लावण्या वगैरे म्हणाव्या लागायच्या. आणि मराठी गाणी म्हणून म्हणून तरी तीन तास किती म्हणणार ? मग हिंदी गाण्यांची फर्माइश व्हायला लागली. हिंदी गाणी ऑर्केस्ट्राशिवाय म्हणणं शक्यच नाही म्हणून मग ही स्वत:च्या ग्रुपची कल्पना निघाली. "

अशा कल्पनांच्या वावड्या आपण खूप उडवतो. पण त्यातल्या फारच थोड्या प्रत्यक्षात उतरवतो. म्हणून मी म्हटलं, " पुरुषांची ह्या क्षेत्रातली मिरासदारी मोडून नुसता प्रवेशच न करता इथं चांगल्या स्थिरावलात तरी कशा तुम्ही ?"

उत्तरादाखल त्यांनी बरीच कारणं स्पष्ट केली. " महाराष्ट्रभर आधीच माझे बैठकीचे कार्यक्रम झालेले होते त्यामुळे सर्वच ठिकाणी ओळखी होत्या, नाव होतं. त्यातही ऑर्केस्ट्राच्या मॅनेजमेंटची माहिती मिळण्याच्या दृष्टीनं एक गंमतीदार योगायोग कारणीभूत झाला. साधारण अडुसष्ट साली लायन्स क्लबतर्फे षण्मुखानंद हॉलमध्ये एक विविध करमणुकीचा कार्यक्रम आयोजित केलेला होता. माझे पती भांडुपच्या लायन्स क्लबचे मेंबर होते. म्हणून मी त्या कार्यक्रमात दोन-तीन गाणी म्हटली. योगायोगानं तलत महमूद ह्यांचा एक प्रमोटर ह्या कार्यक्रमाला हजर होता. त्यांनी माझं गाणं ऐकलं आणि मला विचारलं की आमच्या ग्रुपबरोबर वेस्ट इंडिजच्या दौऱ्यावर याल का ?-एक महिला गायक म्हणून ? मी तात्काळ कबूल केलं. तीन महिने आम्ही तिथे पन्नास-साठ प्रयोग केले. त्यानंतर मी किशोरकुमार ह्यांच्या ग्रुपबरोबर ईस्ट आफ्रिकेला गेले, स्वर्गीय महंमद रफींबरोबर तर मी फिजी, कॅनडा, साऊथ आफ्रिका, मिडल ईस्टमध्ये पाच-सहा दौरे केले होते. हे सगळेच महान कलावंत आहेत. त्या मानानं आम्ही कितीतरी लहान ! पण ते आपल्या बरोबरीनं वागवायचे, काळजी घ्यायचे. त्यातूनच मला स्वत:च्या ऑर्केस्ट्राची कल्पना सुचली असं म्हणायला हरकत नाही."

माझ्या नजरेसमोर वैभवशाली हजारावा प्रयोग तरळत होता, म्हणून मी म्हटलं की, " ऑर्केस्ट्राचं हेच स्वरूप पहिल्यापासून होतं की वेळोवेळी आवश्यक ते बदल त्यात केले ?"

" गाणी, डान्स आणि मिमिक्री हे ' शो 'चं स्वरूप आजच्यासारखंच होतं. पण सहा-सात वर्षांपूर्वी जेव्हा कार्यक्रम सुरू केला तेव्हा ' शो ' म्हणून तो अगदीच कच्चा होता. कारण ह्या क्षेत्रातला अनुभव असा काहीच नव्हता. शिवाजी मंदिर-मधील पहिल्या प्रयोगाला, रेडकर म्हणून एक गृहस्थ होते, त्यांनी जुजबी स्टेज डेकोरेशन करून दिलं. आणि गाण्यासाठी तर चक्क तिथले नाटकाचेच माईक्स

वापरले होते. वाद्यंही भाड्यानंच आणली होती. एकूण सगळाच आनंद होता.

"वास्तविक अशा वाद्यवृंदांचा माइक्स हा आत्मा असतो. त्यासाठी वेगळ्या माईक सिस्टिमची गरज असते. मूळ गाण्यात वेगवेगळे 'इफेक्ट्स' घातलेले असतात. तेवढे काही स्टेजवर शक्य नसतात. त्यासाठी 'एको लाइट्स' नावाचं मशिन असतं. त्यामुळे आवाज घुमतो, प्रतिध्वनित होतो. तसंच ह्या कर्मशिअल 'शो'जमधून जास्त वादक घेणं आर्थिकदृष्ट्या परवडत नाही. आर्थिकदृष्ट्या त्यासाठी एखादं वाद्य असं असतं की त्यात एका वेळी पंधरा-सोळा वाद्यांचेही इफेक्ट्स मिळू शकतात. ते असावं लागतं. स्लाइड्स मशिन असावं लागतं. आता ही यंत्रसामुग्री, ॲम्लीफायर्स, प्रकाशयोजनेचं सामान आम्ही खास सिंगापूरहून विकत आणलंय. त्यामुळे ध्वनी, प्रकाशयोजना, वादन सर्वच दृष्टींनी आमचा वाद्यवृंद समृद्ध झाला आहे. त्याप्रमाणे जाहिरातींचं तंत्रही आम्ही आत्मसात केलंय. त्यामुळे पहिली एकदोन वर्षं जरी आम्हाला तोटा सहन करावा लागला तरी आता मात्र दौऱ्यासाठी स्वतःची लक्झरी बस घेण्याइतपत आम्ही प्रगती केलेली आहे."

"विविध कलावंतांच्या आवाजात गाणारे कसबी कलाकार तुम्ही कसे मिळवलेत?"

या माझ्या प्रश्नावर त्या पटकन् उद्गारल्या, "अहो, अशा कलाकारांना काय तोटा आहे? असे हवे तेवढे कलावंत मिळतात. तसं मीही नवीन टॅलेंट्सच्या शोधात असते. पण शक्यतो मिमिक्री आर्टिस्टशिवाय मी कोणाला बदलत नाही. कारण मुंबईतल्या बहुतेक थिएटर्समध्ये आमचे 'रिपीट'ऑडियन्स असतात. मग त्याच त्याच जोक्स आणि मिमिक्रीनं कार्यक्रमाची रंगत कमी होते ना! पण इतर वादक आणि गायक कायम असतात. नवीन गाणी लोकप्रिय झाली की ती ते स्वतःच बसवतात आणि माझ्या घरी येतात. त्यांची वाद्यं इथंच असतात. कार्यक्रम नसताना, फावल्या वेळात आम्ही रियाझ करतो. अशा अनुभवानं गाण्याचा अंदाज आम्हाला येतो. जुनी गाणी अधिक लोकप्रिय असतात. फार स्लो गाणी चालत नाहीत. तेव्हा काही जुनी, काही नवी, काही स्लो तर काही फास्ट ऱ्हीदमची गाणी आम्ही निवडतो, बसवतो. पण कार्यक्रम सतत बदलत ठेवण्यावर माझा फार कटाक्ष आहे.

प्रमिलाताईंच्या ह्या सांगण्यावर मला असित सेन ह्यांनी सांगितलेली एक आठवण चटकन आठवली. एकदा असित सेन प्रमिलाताईंच्या बरोबर दौऱ्यावर गेले होते. एकाच गावात लागोपाठ दोन शोज होते. पहिल्या दिवशीचा 'शो' हाऊसफुल्ल झाला होता. लॉजवर परतलेल्या असित सेन ह्यांना वाटलं, की आता बहुतेकजण जेवूनखाऊन आपपल्या खोल्यांत विश्रांती घेत पहुडलेले असतील. तर कसचं काय? सगळे कलाकार प्रमिलाताईंच्या खोलीत जमलेले. दुसऱ्या दिवशीच्या गाण्यांची रंगीत तालीम चाललेली. असित सेन चक्रावून गेले. म्हणाले, 'आजचा

शो हाऊसफुल्ल झालाय, लोकप्रिय झालाय, तर तो बदलता कशासाठी ?' प्रमिलाताई हसून म्हणाल्या, 'दादा, आजच्या शोसाठी आले त्यांपैकी उद्या पुन्हा जर कोणी आलं, तर त्यांना संपूर्णपणे नवा 'शो' पाहायला मिळावा म्हणून हा सगळा खटाटोप !'

प्रेक्षकांच्या रसिकतेची केवढी ही कदर ! त्यांचा कार्यक्रम पुन्हा पुन्हा पाहणाऱ्यांच्या रसिकमान्यतेची आणखी पावती काय हवी ?

माझ्या विचारांची साखळी प्रमिलाताईंनीच तोडली. त्या पुढे म्हणाल्या, "एक मात्र खरं की, कार्यक्रमाचं संयोजन करताना मी काही पथ्य पाळत असते. हल्ली वाद्यवृंदाचा एक ट्रेन्ड झालाय. अश्लील गाणी घ्यायशी, कोटच्या करायच्या, गाणी गाताना वेडयावाकडया उडया मारून धांगडधिंगा करायचा. मी हे सगळं कटाक्षानं टाळते. मी नेहमी चांगल्या टेस्टची गाणी घेते. नुसती न्हीदमची गाणी घेत नाही. आता मिमिक्रीचंच उदाहरण घ्या. मी नेहमी त्याचं एक धोरण ठेवते की घरातल्या लहान मुलांपासून वृद्ध व्यक्तीपर्यंत त्यातलं काहीही ऐकताना कोणालाही ऑक्वर्ड वाटता कामा नये. गाण्याचं सिलेक्शन करतानासुद्धा हेच धोरण मी ठेवते. काही वर्षांपूर्वी 'कुंवारा बाप 'मधील हिजडयांचं गाणं लोकप्रिय होतं. प्रत्येक वाद्यवृंदात ते असायलाच हवं असं जणू ठरून गेलं होतं. पण मी ते माझ्या कार्यक्रमात कधीही घेतलं नाही. चिक्कार फर्माईश व्हायची त्या गाण्याची, पण मी कधीही दाद द्यायची नाही. असाच एकदा नागपूरला कार्यक्रम होता. नागपूरचे प्रेक्षक तुम्हाला ठाऊकच आहेत ! कार्यक्रम आवडला तर डोक्यावर घेतील नाहीतर 'हुट आऊट' करतील. काही सांगता यायचं नाही. पहिल्या अंकापर्यंत कार्यक्रम व्यवस्थित झाला. अगदी प्रत्येक गाणं झालं की 'कुंवारा बाप 'चा ठेका ! दर गाणं संपलं की 'कुंवारा बाप !' शेवटी मी अनाऊन्समेंट केली की 'हे गाणं आमच्या वाद्यवृंदात होत नाही आणि होणारही नाही.' मग काय करतात ? बसले गप्प ! इथले एक आर. टी. ओ. ऑफिसर त्या कार्यक्रमाला हजर होते. मुंबईला परतल्यावर ते म्हणाले, 'बाई, आपल्याला तुमचा बोल्डनेस आवडला. सरळ ठणकावून सांगितलंत की हे गाणं होणार नाही !'"

प्रमिलाताईंच्या त्या बोल्डनेसची चुकूक मीही थोडी अनुभवली होती म्हणा ! परवाच्या कार्यक्रमाच्या मध्यंतरात प्रमिलाताईंचे गुरुवर्य सी. रामचंद्र ह्यांचा सत्कार सुरू असताना, प्रेक्षकांतून कोणीतरी कॉमेंट केली, 'टाइम पास !' प्रमिलाताई गर्रकन वळल्या आणि स्टेजवरूनच त्यांनी हजरजबाबी उत्तर दिलं, 'हा टाईमपास नव्हे ! हजार प्रयोग यशस्वी करण्यात ज्या लहानथोरांचा हातभार लागलाय त्यांचं ऋण अल्पांशानं फेडण्याची हीच वेळ आहे.'

'मी कोणालाही भीत नाही' अशी अकारण, अवास्तव दर्पोक्ती मात्र त्यांच्या वागण्या-बोलण्यात जराही डोकावत नाही. पण तरीही त्यांच्या बोल्डनेसचा

प्रत्यय स्टेजवर वावरताना अशा प्रसंगांतून नेहमीच दिसून येतो. आणि नुसता स्टेजवरूनच कशाला ? हा एवढा व्याप सांभाळताना घडोघडी असे धाडसी निर्णय त्यांना घ्यावे लागतात. गप्पांच्या ओघात तेही अनुभव सांगताना त्या म्हणाल्या,

" अहो आता पाच–सहा वर्षं झाली हे ' शो ' सुरू करून, पण अजूनही बाहेरगावी गेलं की नित्य नवी अडचण दत्त म्हणून पुढे उभी राहते. कधी वाटेत गाडी बिघडते आणि वेळेच्या आत आपण पोहोचू की नाही, अशी परिस्थितो येते. कधी एखादा आर्टिस्ट आजारी पडतो, कधी ठेकेदारांशी भांडणं करावी लागतात. सुरुवातीला फारसा अनुभव नव्हता तेव्हा हे ठेकेदार सांगायचे, कार्यक्रम होऊन जाऊ दे, मग देतो पैसे ! मग कोण कुठले पैसे द्यायला बसलाय ? ' आज देतो, उद्या देतो ' करून हमखास बुडवणारच ! आणि एकदा आम्ही कार्यक्रम सुरू केला की तो मध्येच थांबवणं आम्हाला शक्य नसतं. तो पुरा करावाच लागतो आणि बाहेरगावी आयत्या वेळी तुम्ही करणार तरी काय हो ? म्हणून आता आम्ही मुळी ॲडव्हान्स घेतल्याशिवाय कार्यक्रम सुरूच करत नाही. तरी हे कॉन्ट्रॅक्टर कसे फशी पाडतात पाहा ! शक्यतो आम्ही जेव्हा बाहेरगावचा दौरा आखतो, तेव्हा रोज एखाद्या ठिकाणी कार्यक्रम ठेवतो. कारण एखादा दिवस जरी रिकामा गेला तरी एवढ्या माणसांचा राहण्या–जेवणाचा पाच–सहाशे रुपये खर्च अंगावर पडतो. पण मागच्या एका दौऱ्यात आमच्या ठेकेदारानं आयत्या वेळी आमचे मधलेच तीन कार्यक्रम रद्द केले. आता एवढ्या लांब येऊन परत मुंबईला जाणं आणि पुन्हा येणं शक्यच नव्हतं. मग काय ? तिथंच हातावर हात ठेवून तीन दिवस आम्ही बसून काढले. मग अशा वेळी ठेकेदाराशी दोन हात करण्याची पाळी येतेच !"

" मग अशा वेळी मिस्टर दातारांना मुंबईहून बोलावून घेता का !"

" क्वचितच ! बहुधा माझे साथीदार, कलाकार वेळ निभावून नेतात. आता ह्या दौऱ्याच्या निमित्ताने, आम्ही मुंबईकर कधी जाणारही नाही अशा दूर आडगावात जातो तिथं कोणत्याही अडचणी उपस्थित होतात. पण अशा वेळी कलाकार नेहमीच माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे राहतात. नाही म्हटलं तरी एक बाईमाणूस म्हणून काही बंधनं माझ्यावर पडतातच. पण अशा वेळी हेच लोक पुढे सरसावतात. दौऱ्यामध्ये तर जेवणाखाण्याचीही आबाळ होते. जेवणं, झोपणं सगळंच अनियमित होऊन बसतं. म्हणजे संध्याकाळी लोक कामं करतात तेव्हा आम्ही झोपलेले असतो आणि लोक रात्री झोपतात, तेव्हा आम्ही कार्यक्रमाच्या तयारीला लागतो. अशा वेळी आमच्या लोकांचं फार सहकार्य लागतं. आणि ते मला मिळतंही. आम्ही एखाद्या कुटुंबाप्रमाणे राहतो आणि वावरतो."

स्वत:च्या सहकाऱ्यांविषयी प्रमिलाताईंनी मोकळ्या मनानं निर्वाळा दिला तरी स्वत:च्या वागणुकीविषयी मात्र तोंडी मिठाची गुळणी ! प्रेम आणि आदर ह्यांची देवाणघेवाण नेहमीच दुतर्फी असते, एकतर्फी नसते हे मी जेव्हा जाणवून दिलं

तेव्हा त्या म्हणाल्या, "तुमचं म्हणणं खरं आहे. मी माझ्या सहकाऱ्यांबाबत कधीही दुजाभाव ठेवत नाही. मी नेहमी त्यांच्याबरोबर जाते-येते. अगदी जयपूर-दिल्ली-सारख्या लांबच्या ठिकाणी जायचं असलं तरीही ! नाहीतर मला घरची अडचण पुढे करून, 'तुम्ही पुढे जा, मी मागाहून विमानानं येते' असं सांगणं सहजशक्य आहे, पण मी तसं करत नाही, त्यामुळे वाटेत जो काही त्रास झालाय, तो आपल्याप्रमाणेच प्रमिलाताईंनाही झालाय ह्याची जाणीव असते. किंवा कधी काही ठिकाणी चांगली लॉजेस् नसतात. अशा वेळी मी चांगल्या हॉटेलमध्ये राहायचं आणि त्यांना सामान्य लॉजमध्ये ठेवायचं असं कधीही करत नाही. आम्ही सगळे बरोबरीनं राहतो, जेवतो- खातो. भलंबुरं सगळं सगळेच मिळून सोसतो. त्यामुळे आमच्यात कायम आपुलकीची, सहकार्याची भावना असते."

प्रमिलाताईंच्या ह्या प्रांजळ आत्मकथनाला माझ्या अनुभवाची साक्ष आहे. सहकार्याचाच विषय निघाला म्हणून सांगण्याचा मोह आवरत नाही इतकंच ! मुलाखतीसाठी मी प्रथम फोन केला, तेव्हा प्रमिलाताई दौऱ्यावर गेल्या होत्या. फोन वंदनानं-त्यांच्या लेकीनं घेतला. तिनं माझा निरोप व फोननंबर घेऊन ठेवला. त्या दौऱ्यावरून परतताच त्यांनी फोन केला, मुलाखतीचा दिवस नक्की झाला. मुलाखत घेण्याच्या दिवशी सकाळी-सकाळी फोन खणखणला. अगदी घरगुती सुरात त्या म्हणाल्या, "माधुरी, मी प्रमिला बोलतेय !"

क्षणभर काळजाचा ठोका चुकला. वाटलं, काहीतरी अडचण उपस्थित झालीय आणि ह्या नक्कीच आजची अॅपॉइंटमेंट कॅन्सल करतायत ! मनात हा विचार चमकून जात असतानाच त्यांचं आर्जवी बोलणं कानी आलं, "मी काही कामानिमित्त मुंबईला येतेय (इथं मुंबईकरांची 'मुंबई' म्हणजे, उपनगरांतून फोर्ट-मध्ये येणं !) तर तुम्हाला येता येता गाडीतून पिकअप् करते. म्हणजे रेकॉर्डरचं ओझं घेऊन, रेल्वेनं येण्याची दगदग नको. फक्त कुठे भेटू ते सांगा !"

एवढं बोलूनच त्या थांबल्या नाहीत, तर स्वतःचं काम उरकून आकाशवाणीच्या गेटपाशी अगदी बरोब्बर ठरल्यावेळी गाडी हजर करून पार ! वर पुन्हा 'थोडासा उशीरच झाला, (म्हणजे फक्त सात मिनिटांचा हं !), फार थांबायला लागलं नाही नं !'-अशी स्नेहल पृच्छा !

त्यांच्या कणखर स्वभावाला असलेली, ही स्नेहशिलतेची किनार प्रेक्षकांशीही एक अतूट नातं सांधून जाते. त्या रंगून सांगत होत्या, "प्रेक्षकांची मनोधारणा फारच विचित्र- अगदी कल्पनेपलीकडली असते माधुरी. त्यामुळे कधीकधी दडपून, दाटून तर कधी गोड बोलून त्यांना टॅकल् करावं लागतं. ती नॅक् हळूहळू डेव्हलप होते. एकदा गुजराथेत आम्ही एक कार्यक्रम करीत होतो. तिथं अशी पद्धत आहे की, त्यांना गाणं आवडलं की ते मुठीनं पैसे उधळतात. त्याचा राग येऊन चालत नाही. कारण कार्यक्रम आवडलाय, हे दर्शविण्याची त्यांची ती परंपरागत पद्धतच

आहे. असंच कुणीतरी एक रुपयाचं नाणं फेकलं. ते आमच्या एका गायकाच्या नाकावर लागलं. त्यानं हे उलटून, फेकणाऱ्या माणसावरच टाकलं. झालं ! नाणं उलट फेकलं म्हणजे त्यांचा तो अपमान झाला. ते लोक एवढे चिडले की, त्याचा एक शब्दही ऐकून घ्यायला तयार होईनात. एकच घोष, 'त्याला स्टेजवरून हाकला !' बस्स ! अखेर मी माईक घेतला. म्हटलं, 'मी त्याच्या वतीनं तुमची माफी मागते. जेव्हा तुम्ही नाणी फेकता, तेव्हा ती आम्हाला नाही का लागत ?' माझ्या अनाऊन्समेंटनंतर कुठे ते शांत झाले आणि प्रोग्रॅम नीट पार पडला. पण असे प्रसंग अधूनमधून घडले, तरी एक गोष्ट मात्र निश्चित आहे की स्टेजवर आम्हाला, विशेषतः मला उद्देशून कधीही कोणी वाईट रिमार्क्स मारत नाही. अतिशय आदरान वागवतात."

अंगभूत कलागुण आणि मेहनत, जिद्द ह्यासारखे गुणविशेष या यशोमंदिराकडे नेणाऱ्या पायऱ्या असल्या तरी आधाराला शोभिवंत स्त्रीत्व असेल तर प्रवास काहीसा सुखकर होतो.

ह्या माझ्या मताला प्रमिलाताईंनी हसून मोकळेपणानं दुजोरा दिला.

"असं होतं खरं !" त्या म्हणाल्या, "मध्यंतरी किनई डिझेलचा तुटवडा होता. कुठंच मिळत नव्हतं. मग मी कलेक्टरला आणि त्या गावच्या तहशीलदाराला भेटले. त्यांना माझी अडचण सांगितली. रात्रीच्या 'शो'चे दोन पासेस् दिले. पन्नास-ऐवजी शंभर लिटर डिझेल मिळून गेलं. आता मुंबईत आमची कधी कधी आर. टी. ओ.त किंवा इतर ठिकाणी कामं असतात. मी आमच्या ड्रायव्हरला पाठवलं तर लाईनीत उभं करतील, उद्या ये, परवा ये असं सांगतील. पण तेच स्वतः गेलं की, कामं झटपट करून देतात. वर पुन्हा तुम्ही स्वतः कशाला आलात वगैरे मखलाशीही करतील. कधी माझ्या ग्रुपमधला आर्टिस्ट आयत्यावेळी आजारी पडतो, तर लगेच दुसऱ्या ऑर्केस्ट्रातले लोक त्यांचा आर्टिस्ट पाठवतील. कुठंही अडवणूक अशी होत नाही. दुसरं काय आहे की, मी बऱ्याच संस्थांना आर्थिक मदत म्हणून 'चॅरिटी शो'ज करते. कधी अल्प पैशात तर कधी अगदी फुकट ! त्याचीही जाणीव लोक ठेवतात. विसरून जात नाहीत. आणि कळत-नकळत त्याचाही फायदा होतो. एक घटनाच सांगते. तीन वर्षांपूर्वी ट्रॅफिकवाले पोलीस मोटरसायकलवरून लंडनला गेले होते. त्यांच्या साहसी प्रयोगासाठी त्यांना आर्थिक मदत म्हणून त्यांच्यासाठी आम्ही फुकट प्रोग्रॅम केला होता. आता ट्रॅफिकचा कुठेही काही प्रॉब्लेम आला की, ते लोक लगेच ओळखतात. अडवणूक करीत नाहीत.

"एकदा काय गंमत झाली, मला राँग पार्किंगसाठी घरी एक पत्र आलं. मी गेले त्यांच्या ऑफिसात. तिथल्या माणसानं तसं ताबडतोब ओळखलं मला, पण मुद्दामच खडूसपणे विचारलं, 'तुमचं नाव ?' म्हटलं, 'प्रमिला दातार !' 'काय करता ?' (त्यांचा प्रश्न बरं का !) म्हटलं, 'तुम्हाला ठाऊक नाही का काय करते

ते ? स्टेजवर गाणं गायचा प्रयत्न करते !' तर हसायला लागला, मग म्हणे, 'बरं, त्या मोठ्या साहेबांकडे जा !' मी गेले आणि त्यांना सांगितलं, 'तुमचा काय दंड असेल तो घ्या– मी भरायला तयार आहे' तर तो समोरच्याला म्हणतो, 'बघितलं, दंड भरायला तयार आहेत त्या !' मी म्हटलं, 'ऑफकोर्स ! माझ्याकडून चूक झालीय, तर मला दंड भरायलाच हवा.' मग म्हणतो कसा, 'असं करा, ह्या फॉर्मवर सही करा आणि जा घरी ! पुढच्या वेळी असल्या कामाला स्वतः येऊ नका– कोणाला तरी पाठवत जा !"

सांगता सांगता प्रमिलाताई खळखळून हसल्या आणि हसता–हसता बाजूचा बराच वेळ खणखणत असलेला फोन त्यांनी उचलला. अकोल्याहून कार्यक्रमाचं आमंत्रण आलं होतं बहुधा ! वेळेनुसार आणि सवडीनुसार कार्यक्रमाची तारीख पुढेमागे होत होती. मी आल्यापासून पाहत होते, तासाभरात कितीतरी वेळा फोन वाजत होता. बहुधा तो कार्यक्रमासंबंधीच असे. श्रीयुत दातारांपासून लेकीपर्यंत कोणीही तत्परतेनं फोन घेत होतं, मेसेज घेऊन ठेवत होतं. मला गंमत वाटली.

त्यांच्या दोन्ही मुलींनी, वंदना आणि शर्मिलानं मुळाक्षरं गिरवण्याआधी सुरांशी सलगी केलीय, हे मला ठाऊक होतं स्टेजवरून त्या त्यांच्या बरोबरीनंच नव्हे, तर कधीकधी 'सवाई'पणानं गातात, रसिकांची दाद घेऊन जातात, ह्याचीही मला कल्पना होती. तरी पण–

प्रमिलाताईंनी माझ्या चेहऱ्यावरचे भाव ओळखले असावेत बहुधा ! त्या स्वतःहून म्हणाल्या, " मी नसताना मुलीच नव्हे तर सासूबाईसुद्धा माझे फोन घेतात. निरोप घेऊन ठेवतात. अगदी मी दौऱ्याहून परतते त्या दिवशी आठवणीनं माझ्या आवडीची भाजीसुद्धा करून ठेवतात. वास्तविक माझं क्षेत्रच असं आहे की, सतत मला पुरुषांच्यात वावरावं लागतं. पण तरीही सासूबाईंचं मत फार चांगलं आहे माझ्याविषयी ! पती आणि सासूबाई, दोघंही कोत्या मनोवृत्तीचे नाहीत. त्यांचं पाठबळ सुरुवातीपासूनच मला लाभलंय. त्याशिवाय एवढं यश मिळवणं मला शक्यच झालं. नसतं. महिन्यातून पंधरा–वीस दिवस मी दौऱ्यावर असते, तेव्हा सगळेच मिळून घर सांभाळतात. त्यामुळे घरच्या अडचणींमुळे दौरा अर्धवट सोडून येणं किंवा रद्द करणं असं कधी सहसा होत नाही. पण एकूणच हा व्यवसाय एवढा धकाधकीचा आहे की कधीकधी वाटतं, नको हा व्याप ! पण खरं सांगू ? जेव्हा एखाद्या रंगलेल्या गाण्याला कडाडून टाळ्या मिळतात किंवा चाहत्यांची पत्रं येतात, तेव्हा हे विचारही मनातून निघून जातात."

मला तेवढ्यात एक गंमत आठवली. घरी येता येता त्यांची गाडी सिग्नलला थांबत होती, तेव्हा बाजूनं जाणारे काही वळून, वाकून गाडीकडे पाहत होते. त्यांच्याकडे कुतूहलानं पाहून कुजबुजत होते. मी त्याचा उल्लेख करताच, त्या निर्व्याजपणे हसत म्हणाल्या, " छान वाटतं नाही अशा वेळी ? सतत स्टेज शोज झाल्यानं

लोकांना नकळत स्टेज आर्टिस्टबद्दल जिव्हाळा वाटायला लागतो. अगदी पाच रुपयांच्या तिकिटात कार्यक्रम पाहणारा अनोळखी माणूसही रस्त्यात थांबून मुद्दाम चौकशी करतो आणि कार्यक्रमाची स्तुती करतो, तेव्हा सगळ्या कष्टांचं चीज होतं. पण कधीकधी लोक कार्यक्रम आवडला नाही, त्यात अमूक अमूक सुधारणाही व्हायला हव्यात असं सांगतात. तेव्हा त्यांच्या सूचनांनाही मान द्यावा लागतो. दखल घेण्याजोग्या असतील तर स्वीकाराव्याही लागतात. आता परवाच एकानं आमच्या हजाराव्या प्रयोगाबद्दल 'रसरंग'ला खुषीपत्र पाठवलं. अशी खूप पत्रं येतात. अहो, मुंबईतला एक माणूस तर आमचा प्रत्येक शो पाहायला आवर्जून येतो."

"हा तुमचा फॅन आहे की, 'सुनहरी यादेंचा ?'" मी मिस्किलपणे विचारलेल्या प्रश्नाला त्यांनी हसून साथ दिली–

"छे ! छे ! तो 'सुनहरी यादें'चाच चाहता आहे. अहो, अशा कितीतरी माणसांच्या शुभेच्छा–आशीर्वाद, चंद्रपूरला घडल्या तशा प्रसंगात, कळत–नकळत धीर देतात. मानसिक बळ देतात."

"म्हणजे असं घडलं तरी काय ?" मला भलतीच उत्सुकता लागली.

काहीशा अस्वस्थतेनंच त्यांनी तो प्रसंग सांगितला.

"चंद्रपूरजवळच्या एका गावात आमचा प्रयोग होता. खेडेगावात आयत्या वेळी स्टेज उभारावं लागतं. प्रयोग साडेआठचा होता, म्हणून ठरल्याप्रमाणे आमचे लाईटवाले दोन तास आधी कार्यक्रमाच्या जागी गेले. ते बसले हातावर हात टाकून ! नऊ वाजता ते परत आले. म्हणाले, तिथं अजून कशाचा काही पत्ता नाही. श्रोते येऊन बसलेत आणि स्टेजच्या जागी नुसते खड्डे खणलेले ! दहा वाजता स्टेजचं सामान आलं. बारा वाजता अर्धं स्टेज बांधून झालं. बारा वाजता संयोजक माझ्याकडे आले. म्हणे स्टेजचं सामान उशीरा आलं, काय करणार ? मी म्हटलं, 'तुम्हाला प्रोग्रॅम करायचाय की नाही ? हे चालवलंय काय तुम्ही ? प्रत्येक गोष्टीला काही वेळ असते. मूड असतो. लोकांचाही मूड हवा, रात्री एकला कार्यक्रम सुरू करून तो ऐकणार कोण ? आम्ही चाललो परत !' आम्ही परत निघालो. उलट फिरलो. विचार केला, इथून पाच किलोमीटरवर एक गाव आहे, तिथं जेवण घ्यावं आणि निघावं. पाहतो तर मोटरसायकलवरून संयोजक आमच्या मागे ! म्हणे, चला परत ! आमचा हा पहिलाच कार्यक्रम आहे. हा झाला नाही तर आम्हाला गावात राहणं मुश्किल होईल ! हो–नाही करता रात्री एकला गाडी परत फिरवली आम्ही. परत कार्यक्रमाच्या ठिकाणी आलो मात्र आणि मला वाटलं, आपण इथं परत येऊन फसलो ! कारण आमची गाडी परत निघालेली पाहिली आणि लोकांना वाटलं, आता काही कार्यक्रम होत नाही. लोक खवळले. त्यांनी पडद्याची, स्टेजची चिंधूनं अक्षरशः नासधूस करून टाकली. आता म्हटलं, एक जरी दगड गाडीवर बसला आणि एखादी काच फुटली तरी पाचशे रुपयांचं नुकसान ! शिवाय भडक-

लेला जमाव म्हणजे जिवालाही धोका ! पण नशिब आमचं ! आम्हाला परतलेलं पाहिलं आणि लोक शांत झाले. समोरचे पडदे फाटलेले. त्यांच्यासमोरच स्टेजवर आमच्या लोकांनी माईक वगैरेची व्यवस्था करायला सुरुवात केली. लोक अगदी चुपचाप बसले होते. अखेर रात्री अडीचला कार्यक्रम सुरू झाला आणि साडेचारला संपला. अक्षरशः आयुष्यभर स्मरणात राहील असा तो प्रसंग ! अजूनही काटे येतात अंगावर !"

प्रमिलाताईंच्या अनुभवाशी समरसून जाताना एकच गोष्ट मनाला प्रकर्षानं जाणवत होती का वाटतं तेवढं सोपं नाही हे काम ! विशेषतः एका स्त्रीच्या दृष्टीनं! हे विश्व उभारणंच नव्हे तर उभं राखण्यातसुद्धा वारंवार त्यांच्या सहनशीलतेची कसोटीच लागतेय !

पेशन्सचाच विषय निघाला, तेव्हा अपरिहार्यपणे त्यांच्यावर टीका करणाऱ्या समीक्षकांचाही विषय निघाला. टीकाकारांचे आक्षेप सरळ होते. सर्वसाधारण वाद्यवृंदातील संगीत अतिशय लाऊड असतं. इतकं की गायकाचे शब्दही गुदमरून जातात. कलाकारांचे कपडेही अतिशय भपकेबाज असतात. कधीकधी गाण्यातसुद्धा मिमिक्री घुसडवून रंगाचा बेरंग करतात.

प्रमिलाताईंनी यातल्या प्रत्येक आक्षेपाचा समाचार घेतला. 'सुनहरी यादें' च्या म्युझिकबद्दल म्हणाल तर, प्रेक्षकांच्या कानाला सुखद वाटेल, गाण्याला पोषक ठरेल तेवढ्याच लेव्हलवर वाजवण्याचं बंधन आहे. प्रकाशयोजनाही गाण्याच्या मूडला अनुरूप असेल तशीच ठेवते. उगाचच स्टेजवर अंधार आणि फक्त गाणाऱ्यावर स्पॉट असला प्रकार मी कधी करत नाही. डान्सरसुद्धा माफक हालचाली करते आणि स्लाईड्ससुद्धा गाण्याला पूरक ठरतील, मारक ठरणार नाहीत एवढ्याच वापरते. कपड्याबद्दल म्हणाल, तर तुमचा आक्षेप खरा आहे. आमचे कपडे भपकेबाज असतात. काही लोक तर चांगले चांगले कपडे घालायचे आणि लोकांना आपल्याकडे बघत ठेवायचं, अशीसुद्धा टीका करतात. पण मला एक सांगा, गाणी लोकांना आवडली नाहीत, तर उगाचच लोक तीन तास नुसते बघत बसतील का ? उलट काही लोक तर म्हणतात की, 'सुनहरी यादें' चे शो आम्ही केवळ ऐकायलाच नाही, तर बघायलाही जातो. म्हणजे आम्ही कार्यक्रम प्रेक्षणीय करतो. ही पसंतीची पावती म्हणायची नाही का ?"

मी म्हटलं, 'आणखी एक आक्षेप असा की वाद्यवृंदातले लोक दुसऱ्यांनी गायलेली गाणी गातात. त्यांच्यात 'ओरिजिनॅलिटी' नसते. ऑर्केस्ट्रा हा क्लासेस्साठी नसून मासेस्साठी आहे. एकूण काय, रसिकांकडून उदंड लोकप्रियता लाभली तरी समीक्षकांकडून वाद्यवृंद हा काहीसा 'चीप' करमणुकीचा प्रकार म्हणून उपेक्षिला जातोय. हे तुम्हाला पटतं का ?"

माझ्या प्रश्नानं प्रमिलाताईंची जणू अवघी व्यथाच बोलकी झाली. त्यांनी

आपली भूमिका मांडताना सांगितलं की, "आम्ही दुसऱ्यांनी गायलेली गाणी गातो हे खरंय ! पण मी माझ्या गायकांना नेहमी सांगत असते की ह्या गाण्याचे मूळ गायक नक्कीच फार महान कलावंत आहेत, त्यांच्यापुढे आपण फार छोटे ! पण तरीही तुम्ही ह्या गायकांच्या गाण्याचं, त्यांच्या स्टाईलचं आंधळं अनुकरण करू नका. त्यांची गाणी तुमच्या स्टाईलमध्ये गा ! मुकेशजींचा आवाज म्हणजे नाकातच गायलं पाहिजे, किशोरकुमारांचा आवाज म्हणजे नाचूनच गायलं पाहिजे असा दंडक पाड् नका. माझ्या कलाकारांना मी प्रत्येकाच्या गुणधर्मानुसार गाणी दिलेली आहेत. लोकांना तंतोतंत नक्कल आवडते तरीही आम्ही आमच्या चालीत गातो तेही लोकांना आवडतं. आणि त्यातूनच लोकांना पुनःश्रवणाचा जिवंत आनंद लाभतो. उगाच का लोक तीन-साडेतीन तास बसून कार्यक्रम ऐकतात ? बहुतेक 'शोज' हाऊसफुल्ल जातात, त्या अर्थी त्यात काहीतरी तथ्य असलंच पाहिजे. आणि तुम्हाला सांगते, सतत रेडिओ ऐकल्यानं लोकांचे कान एवढे तयार झालेत की एखादा चुकीचा सूर, वादकाची छोटीशी चूक किंवा गायकाच्या गळ्यातून एखादा शब्द-सुद्धा वेडावाकडा निघाला, तर लगेच लोक आरडाओरडा करून गाणं बंद पाडतात.

"आता वाद्यवृंद काढण्यामागची माझी स्वतःची भूमिका मी थोडी स्पष्ट करते परवा ज्ञानेश्वर नाडकर्णींशी बोलताना हाच विषय निघाला, तेव्हा मी म्हणाले, की हल्ली खूप मुली गाणाऱ्या आहेत. चांगल्या गातात त्या ! तुम्हाला ठाऊकच आहे, कोणत्याही कलेला लोकमान्यतेची (Public Recognition) नितांत आवश्यकता असते. त्यातूनही मुंबई-पुण्यासारख्या ठिकाणी रेडिओ, टी. व्ही.-सारखी माध्यमं त्यांच्या कलाविष्कारासाठी आहेत. खेडेगावांतून तर तीही सोय नाही तसं पाहिलं तर पार्श्वगायनाची संधी मिळावी हे प्रत्येक गायकाचं सुरुवातीचं स्वप्न असतं. पण ते प्रत्यक्षात उतरणं तितकं सोपं नसतं. मग अशा धडपडणाऱ्या गायकांना जर त्यांची कला लोकांपुढे मांडायची संधी मिळाली नाही, तर त्यांनी गप्प बसायचं का ? लोकांचं कौतुक जर त्यांच्या वाट्याला आलं नाही, तर त्यांच्या कलेची गळचेपी व्हायची नाही का ? समजा, इतर गोष्टी अनुकूल असल्या तर त्यांनी असा काही प्रयत्न करणं वावगं आहे का ? कदाचित ह्यातूनही चांगले पार्श्व-गायक निर्माण होतील."

प्रमिलाताईंचे मुद्दे बिनतोड होते. पण मला पुन्हा छेडल्यावाचून राहवेना ! पार्श्वगायनासंबंधी विचारलं तेव्हा त्यांनी मोकळेपणानं सांगून टाकलं की, मला पार्श्वगायनाला तेवढा वाव मिळाला नाही. मी सी. रामचंद्र ह्यांच्या 'घरकुल' चित्रपटासाठी गायलेय. 'बायांनो नवरे सांभाळा' ह्या चित्रपटातील 'उभी अशी त्रैलोक्यसुंदरी' ह्या गाण्याला तर मला 'सूरसिंगार संसदे'तर्फे तानसेन अॅवॉर्डही मिळालंय !

"तरीही नव्या चित्रपटांतून तुम्हाला पार्श्वगायनाची संधी मिळाली नाही ?"

ह्या माझ्या आश्चर्यावर त्या म्हणाल्या,

"पार्श्वगायन हे तसं पाहिलं तर फार सोपं आणि कमी दगदगीचं आहे. तुमचं एखादं गाणं हिट् झालं तरी भरपूर नाव मिळतं, प्रतिष्ठा मिळते. त्या मानानं स्टेज सिंगिंग हा व्यवसाय धकाधकीचा आहे. पण दुर्दैवानं स्टेज सिंगर हा छाप तुमच्यावर बसला की संगीतकार पार्श्वगायनासाठी तो आवाज योग्य समजत नाहीत. स्टेज सिंगर्स हे त्यांना कमी प्रतीचे वाटतात. अजून तरी मला चित्रपटगायनासाठी बोलावणं आलेलं नाही. पुढचं काय सांगावं ? आणि खरं सांगू का ? मी फार स्वतंत्र विचारसरणीची बाई आहे. पार्श्वगायनासाठी कोणाची हांजी हांजी करणं, विनवण्या करणं माझ्या स्वभावात बसत नाही. पहिल्यापासून मी कुठेही दुय्यम स्थान पत्करलेलं नाही. त्या दृष्टीनं पाहता इथे मीच मुखत्यार आहे. अनेक गोष्टी मला अनुकूल आहेत, माझ्यावर अवलंबून आहेत. उद्या जरी मला वाटलं की आता हे 'शोज' बंद करायचे, बस्स झालं, तरी मी करू शकते. शोज वाढवायचे म्हटलं तरी वाढवू शकते. म्हणूनच हा व्यवसाय मी स्वीकारलाय. वाद्यवृंदाची एकमेव यशस्वी स्त्री-प्रवर्तक म्हणून यश मिळवलंय आणि मी फार संतुष्ट आहे."

एकसुरी संसार रंगवत न बसता, त्यात ह्या व्यवसायाच्या निमित्तानं अनेकविध गहिरे रंग भरताना, संसार आणि संगीत ह्यांचा सुरेल वाद्यमेळ घडवून आणणाऱ्या प्रमिला दातारांचं हे सडेतोड आत्मकथन !

समीक्षकांनी आणि जाणत्यांनी त्यांच्या व्यवसायावर कितीही टीका केली तरी, अखेर एक मुलभूत प्रश्न उरतोच ! पूर्वीच्या काळी प्रहरो न् प्रहर चालणाऱ्या शास्त्रीय संगीताच्या मैफलीतली धुंदी खरी की तीन तासांच्या ऑर्केस्ट्राच्या वेगवान, नादमय लोकप्रिय संगीताची झिंग खरी ?

अखेर गतिमान काळाच्या गरजेनुसार जुन्या पठडीतून निघालेले हे नवे व्यवसाय ! नवनव्या कला ! आणि त्यांचा आविष्कार करणारे हे नवनवे कलावंत ! वास्तविक संस्कृतीचा, कलेचा ओघ निखळ, स्वच्छ आणि वाहता ठेवणारे हे कलावंत ! बदलत्या अभिरुचीनुसार कलेचं, कलेच्या प्रकटीकरणाचं रूप त्यांनी सतत बदलतं ठेवलं म्हणूनच तो कालौघ स्वच्छ राहिला, वाहत राहिला. अज्ञात वाकणावळणांवरच अद्‌भूत वैभव दाखवत राहिला.

माहेर/जून १९८१



एक अशान्त वादळ

सई परांजपे

आपण आपलं अनेक पदरी खाजगी आयुष्य जगत असतो. जगता–जगता अनेक अनमोल अनुभवांच्या ठेवी मनाशी जतन करीत असतो. असे बहुरंगी अनुभव संवेदनाशील मनाच्या तरल स्पंदनांशी लय साधणारे असतात. काही काळापुरते का होईना ते आपल्याला भोवतालच्या भल्याबुऱ्या दुनियेला विसरायला लावून, आगळाच झुलवा खेळायला लावतात. झपूर्झाच्या अवस्थेप्रत नेऊन ठेवणारे असे क्षण चंद्रज्योतीच्या केशरी–चंदेरी ठिणग्यांसारखे अवचित झळाळणारे आणि त्यांची पूर्ण दखल घेण्यापूर्वीच लुप्त होणारे !

आकाशातून बरसणाऱ्या पहिल्यावहिल्या पावसाच्या सरी पृथ्वीच्या कवेत आवेगानं शिरत असताना, काचेच्या तावदानातून झिरपणाऱ्या सांद्र प्रकाशात विसावलेल्या त्या देखण्या, मनोरम अन् गप्पिष्ट व्यक्तिमत्वाच्या सहवासात वेचलेले ते क्षणही माझ्या लेखी असेच !

त्या दोन अनुभवी डोळ्यांच्या अथांग निळाईत डुंबून निघालेल्या क्षणांचं आलेखन, हीच सई परांजपेंशी केलेली बातचीत !

रोजचं चाकोरीबद्ध आयुष्य जगत असताना आपलं मन नकळत भोवतालच्या घडामोडींची नोंद घेत असतं. अर्थात ही नोंद आत्मिक अथवा मानसिक स्तरावरचीच असते. कारण घडणाऱ्या त्या गोष्टींशी तसा आपला प्रत्यक्ष संबंध काडीमात्र नसतो. पण ह्या नोंदीचा एक–एक टाका मिळून एक घट्ट वीण तयार होते. कधी एखाद्या गाजलेल्या कादबरीचे पडसाद चर्चा अथवा गप्पांतून कानावर पडतात अन् त्या कादंबरीशी नातं जुळवून जातात. कधी एखाद्या नटसम्राटाचं अकाली मरण चटका लावून जातं. कधी एखाद्या गाण्याचे सूर दीर्घ काळ आपल्या मनाचं दालन

घुमवून टाकतात. कधीकधी तर एखादं चुटपुटतं दृश्य कायमच्यासाठी मनावर कोरलं जातं. कधी एखादं विशिष्ट नाव विविध घटनांच्या संदर्भात त्याच्या काळापुरता आपला ठसा दुसऱ्यांच्या मनावर उमटवून जातं. गेली वीस–बावीस वर्षं असंच एक नाव मराठी मनाला आपल्या अस्तित्वाची सतत नोंद घ्यायला लावतंय. सुरुवातीला आकाशवाणी कलावंत-दूरदर्शन निर्माती म्हणून, नंतर 'जास्वंदी'सारख्या नाटकाची शिल्पकार म्हणून अन् आता तर 'चष्मेबद्दूर'च्या निमित्तानं काही मोजक्याच अभिरुचिसंपन्न, यशस्वी चित्रपट दिग्दर्शकांच्या नामावलीत जागा पटकावणारी बुद्धिमती म्हणून, 'सई परांजपे' हे नाव मराठी मनावर शिलालेखासारखं घट्ट कोरलं गेलंय.

बहुरंगी अनुभवांना धाडसानं सामोरं जात व्यतीत केलेलं त्यांचं आयुष्य जाणून घेणं, आरपार छेद घेणाऱ्या त्यांच्या निळचा नजरेतले भाव वाचणं हा म्हणूनच एक 'अनुभव' होता. त्यांच्या बोलण्याला खास पुणेरी वळण आहे. शब्दांना अस्सल मराठी रुची आहे. त्यामुळे इंग्रजीच्या मद्यार्कात बुडवून भाषेला कृत्रिम मधुवा आणण्याचा प्रयत्न कुठेही त्यांच्या बोलण्यात नाही, हे सतत जाणवत राहतं.

वय वाढत जातं तसतसं आपलं मातीशी असलेलं नातं तुटत जातं. सई परांजपेंच्या बाबतीत नेमकं उलटं घडलंय. हाताशी असलेल्या लेखणीचा असो की कॅमेऱ्याचा असो, पुरेपूर लाभ उठवीत, दिवसेंदिवस त्या ह्या मातीशी अधिकाधिक जवळीक साधतायत. अन् स्वत:बरोबर आपल्यालाही ह्या विश्वाचा नव्यानं परिचय घडवून देण्याचा प्रयत्न करतायत. त्यासाठीच आपल्यालाही त्यांचा परिचय करून घेणं अगत्याचं आहे.

"अलीकडं पाहावं त्या मासिकात, पेपरात, साप्ताहिकात तुमचं नाव–तुमच्या मुलाखती छापलेल्या आढळतायत. रेडिओ, टी. व्ही. सुद्धा ह्यातून सुटलेली नाहीत. ह्या इन्स्टंट प्रसिद्धीमागे किती वर्षांची तपस्या आहे साधारण?"

"अनेक वर्षांची! माझ्यावरच्या संस्कारांचं, अनोख्या कौटुंबिक पार्श्वभूमीचं हे फलित आहे. तुम्हांला ठाऊकच आहे, रँग्लर परांजपे माझे आजोबा! वडील रशियन होते. अर्थात वडिलांजवळ मी काही फारशी राहिलेले नाही. पुढे मोठेपणीच ते मला भेटले. त्यामुळे माझ्यावर खरा प्रभाव माझ्या आणि आजोबांचाच आहे. माझे आजोबा भारतातले प्रसिद्ध गणिततज्ज्ञ आणि शिक्षणतज्ज्ञ! आईसुद्धा केंब्रिजला वगैरे जाऊन आलेली. मुळात माझे आजोबा अत्यंत स्वतंत्र वृत्तीचे होते ते चारचौघांसारखे मुळीच नव्हते. ते निरीश्वरवादी होते. त्यामुळे सामान्य मराठी मुलीसारखी मी वाढवले गेले नाही. एक गोष्ट खरी की दुर्दैवानं त्यांच्या बुद्धिमत्तेचा आणि गणिताचा वारसा माझ्याकडे अजिबात आला नाही. शिक्षणात मी कधीही चमकले नाही. बी. ए.सुद्धा मी पास क्लासमध्ये झाले. त्यांच्या माझ्या-

बद्दल खूप अपेक्षा होत्या की आपली नात नाव काढेल, अभ्यासात चमकेल. पण माझं अभ्यासात कधीही लक्ष नसायचं. इतर मुलांसारखी मी शाळेत अभ्यासात किंवा खळातसुद्धा रमले नाही. अहो, खेळसुद्धा मी नेहमी बैठे खेळच खेळायची. कारण पळापळीत माझा नेहमी शेवटचाच नंबर यायचा. त्यामुळे खेळायला मला आवडत नसे."

"सई परांजपे म्हणजे मूर्तिमंत कल्पकता असं समीकरण मांडलं तर त्याला तुमचा आक्षेप नसेल. कारण 'जास्वंदी' हे नाटक पाहिल्यापासूनच मी तुमच्या लिखाणाच्या प्रेमात पडलेय असं म्हणायला हरकत नाही. तेव्हा या कल्पकतेला धोरणीपणाची जोड लहानपणापासूनच मिळालीय का ?"

"हो ! तसं म्हणायला हरकत नाही. कारण लहानपणीसुद्धा मी ह्या माझ्यातल्या उपजत कल्पकतेच्या जोरावर स्वतःच असे निरनिराळे खेळ रचायची की ज्याच्यामुळे सगळी मुलं माझ्याभोवती घरात बसून राहतील, किंवा त्यात पळापळी फारशी करावी लागणार नाही. मला एक खेळ अजूनही आठवतो. 'चंदेरी टोळी–सोनेरी टोळी' असा मोठा गंमतीशीर, गुंतागुंतीचा खेळ असायचा तो ! म्हणजे त्या खेळात आमच्या दोन पार्टर्या असायच्या. मग आमची कारस्थानं असायची, हेरगिरी असायची, गुहा असायच्या. म्हणजे हल्लीच्या गल्लाभरू चित्रपटाला लाजवेल असं काय–काय त्या काळी मी त्या खेळात घातलं होतं. अर्थात एका टोळीची नायिका माझी मैत्रीण असायची. म्हणजे अभ्यासापेक्षा कल्पनेच्या राज्यात रमणं मला फार आवडायचं."

"नुसतं कल्पनेच्या राज्यात भराऱ्या मारणं निराळं आणि कल्पकतेच्या बळावर त्या राज्यातल्या अंधाऱ्या गुहेचा शोध लावून, नवनिर्मितीचा खजिना रसिकांपुढे उधळणं निराळं ! खरं की नाही !"

"अगदी खरंय ! माझ्या सुदैवानं माझ्यातल्या ह्या निर्मितीक्षमतेचा शोध लहानपणीच लागला. अर्थात ह्याला कारण माझी आईच ! माझ्या आईनं बरोबर हेरलं की अभ्यासात जरी ही हुशार नसली, तरी इतर बाबतीत तिला खूप गम्य आहे आणि लिखाणाच्या किंवा कलेच्या क्षेत्रात ही काही तरी करू शकेल. आईनं हे कसं ओळखलं ती गंमत सांगते हं ! आई मला रोज रात्री झोपताना गोष्ट सांगायची बरं का ! मग कधीतरी एखाद्या रात्री ती मला म्हणायची, 'आज मला नाही आठवत गोष्ट, आज तूच मला सांग.' मग मी काहीतरी रचून सांगायची. ती मला विचारायची, 'तू कुठे वाचलीस ही गोष्ट ?' मी म्हणायची, 'मी वाचली नाही कुठे ! स्वतःच केली.' असं बऱ्याच वेळा झालं तेव्हा तिला वाटलं की हिच्यात काहीतरी निराळीच चमक आहे. मग तिनं सांगितलं की तू आता मला जी गोष्ट सांगितलीस ना, ती लिहून काढ. मग मी लिहायला लागले. माझं पहिलं पुस्तक प्रसिद्ध झालं तेव्हा मी फक्त आठ वर्षांची होते. अर्थात मी लिहू शकले तरी

उठून पुस्तक प्रसिद्ध तर मी करू शकले नसणार. तेव्हा अर्थातच घरचं कौतुक आणि प्रोत्साहन होतं म्हणूनच हे शक्य झालं. नाही तर कितीतरी कल्पक आणि हुशार मुलं परिस्थितीमुळे किंवा त्यांच्यातल्या सुप्त गुणांचं आकलन न झाल्यामुळे फुकट जातात, खरं की नाही ? पण माझ्या बाबतीत तसं झालं नाही. कारण माझी आई स्वतःच एक चांगली लेखिका आहे ना ! त्याशिवाय माझी आजी म्हणजे आईची आईसुद्धा चांगली कवियत्री होती. कल्पक होती. ती नेहमीच कवितांच्या नादात असायची."

" म्हणजे लेखणीचा वारसा असा मातृसत्ताक पद्धतीप्रमाणे तुमच्याकडे चालून आला असं म्हणायला हरकत नाही. विशेष गंमतीची गोष्ट म्हणजे तुमचं लेखन किंवा तुमची कला बालवयापासूनच केवळ तुमच्या आनंदासाठी राहिलेली नाही. तिला सतत वाचकांपुढे, प्रेक्षकांपुढे येण्याचं भाग्य लाभत राहिलंय नाहीतर उर्मीची एखादी लाट स्वतःच्याच मनाला तेवढी चिंब करून जावी अन् भोवती सगळी मरूभूमी !–असं नाही झालं !"

" होय ! तिला सतत लोकमान्यता, राजमान्यता मिळत गेली. आता तसं पाहिलं तर बालवयातलं ते लिखाण ! पण मी रचलेल्या त्या परीकथा, राजाराणींच्या गोष्टी, गाणी, अंगाईगीतं ह्यांचं ते छोटेखानी पुस्तक घराघरात पोहोचलं. मला लहानपणची ह्याच संदर्भातली आणखी एक गंमत आठवते बरं का ! शाळेत असताना किनई मी खूप इंग्रजी सिनेमे पाहायची आणि असा कोणताही इंग्रजी सिनेमा पाहून आले की त्याची गोष्ट वर्गातल्या मुलामुलींना रंगवून–रंगवून सांगायची. माझी फार ख्याती होती त्यासाठी ! आणि हे गोष्टी सांगण्याचंही एक टेक्निक होतं बरं का ! म्हणजे सगळ्यांचा अभिनय करून दाखवायचा आणि तशाच सुरात संवाद वगैरे म्हणायचे. तसा थोडासा अभिनय होताच ना अंगात ! शिवाय त्या गोष्टीला पदरची थोडी मिरची–मसाल्याची फोडणीही असायची. धम्माल यायची ! नंतर मुली मला पकडून गोष्टी सांगायला लावायच्या. मी तरी कसली वस्ताद ! पुढे–पुढे मला आठवतं, मी त्यासाठी गोळ्या, चॉकोलेट्स घ्यायला लागले होते. गोष्ट ऐकवायची म्हणजे फुकट तरी किती दिवस ऐकवायची ? सांगायचं कारण की एवढा भाव आला होता त्या गोष्टींना आणि माझ्या प्रेझेंटेशनला !"

" म्हणजे त्या लहान वयातही तो भाव अचूक वसूल करून घेण्याचा धूर्तपणाही होता हं तुमच्यात ! पण मग त्या चिमुरडया बाललेखिकेची बाळगोपाळांची लेखिका कशी झाली ?"

" तो तर माझ्या आयुष्यातला फारच महत्त्वाचा टप्पा ! माझी बी. ए.ची परीक्षा त्यावेळी पंधरा दिवसांवर आलेली आणि अचानक एक दिवशी आकाशवाणीच्या पुणे केन्द्रावरचा शिपाई मला बोलवायला आला. चाचणीसाठी ! खरं

तर मी तसा काही अर्जही केला नव्हता. पण म्हटलं बघू या तर खरं जाऊन ! तिथे गेले. मराठी निवेदनाची चाचणी दिली आणि घरी परत यायला निघाले. तेवढ्यात फाटकापाशी एक अधिकारी पळतच आले. म्हणाले, तुम्हाला परत बोलावलंय. मी परत गेले. त्यांनी सांगितलं, की मराठी निवेदिका म्हणून तुमची निवड झालेय. त्यांना फारच घाई होती बहुधा ! एरवी तुम्हाला ठाऊकच आहे. चार-चार महिने काही सिलेक्शन होत नाही. ते म्हणाले, 'तुम्ही उद्यापासून कॉन्ट्रॅक्ट बेसिसवर रुजू व्हा.' मी म्हटलं, 'वेळ काय आहे साधारण ?' तर म्हणाले, 'कधी सकाळी, कधी दुपारी, किंवा रात्री. ट्रान्समिशन ड्युटी असेल त्याप्रमाणे.' म्हटलं, 'छे ! छे ! माझी परीक्षा पंधरा दिवसांवर आलेय. मला काही ते शक्य नाही.' पण त्यांना बहुधा खूपच अडचण असावी. कारण ते पुन्हा म्हणाले, 'तुम्ही इंग्रजी अनाऊन्समेंट बघता का ? त्यांची अगदी पाच मिनिटांची वेळ असते. शेवटी इंग्रजी निवेदनाची पुन्हा मी चाचणी दिली. निवड झाली आणि लगेच मी नोकरीवर रुजूही झाले. महिना पन्नास रुपये पगार मिळायला लागला. तोसुद्धा त्या काळात मला जास्तच वाटायचा हं ! वाटायचं आपण त्यांना बनवतोय. आणि आता एखाद्या कार्यक्रमासाठी पन्नास रुपयांपेक्षा जास्त मिळतात आणि तरीही आपली ओरड असते, ते कमी पडतात म्हणून ! पुढे परीक्षा झाली आणि मी मराठी अनाऊन्समेंट्सही करायला लागले. म्हणजे कसा योग असतो पाहा ! माझ्या लेखीही नव्हतं की रेडिओ आहे तिथे आपण प्रयत्न करावा. पण बोलावणं आलं काय, सहज गंमत म्हणून मी गेले काय आणि नोकरी लागली काय ! सगळंच अनपेक्षित ! म्हणजे त्या रेडिओच्या नोकरीमुळे असेल कदाचित, पण माझ्या आयुष्याला असं वळण लागलं. नाहीतर मी पुढे नक्की काय केलं असतं, ते आज नाही सांगता येणार ! पण रेडिओवर कार्यक्रम करायला लागले, नाव गाजायला लागलं."

"आणि ते आजपर्यंत ह्या ना त्या माध्यमाद्वारे गाजतच राहिलंय. आणि ह्याला रेडिओनं मोलाचा हातभार लावलाय, हे ऐकून आकाशवाणीवर उदंड आणि अथांग प्रेम करणाऱ्या माझ्यासारखीचं मन भरून आलं नाही तर नवल ! अहो, तुमच्यासारख्या कित्येक कलाकारांच्या दैदिप्यमान कारकीर्दीची वाटचाल आकाशवाणीच्या स्टुडिओपासून सुरू झालेली आहे. खरोखर आकाशवाणीचे हात एवढे स्नेहशील आहेत ! कोणाकोणाला ती पोटाशी धरेल– बिजाचा अंकुर, अंकुराचं रोप आणि रोपाचा वेलु गगनावरी नेईल ते तीच जाणे !"

" मघाशी तुम्ही विचारलंत, मी बाळगोपाळांची लेखिका कशी झाले ? बाळगोपाळांची लेखिका होण्यापूर्वी 'बालोद्यान'मध्ये मी त्यांची 'ताई' झाले. हेही पुन्हा एक नवीन वळणच म्हणायला हवं माझ्या कलाजीवनातलं ! कारण पुढे मी रेडिओवर 'बालोद्यान' हा मुलांचा कार्यक्रम करायला लागले. 'नाना' असायचे गोपीनाथ तळवळकर ! आमची जोडी त्या काळी खूप गाजली. अगदी रस्त्यातसुद्धा मुलं

ऑटोग्राफ वगैरे मागायची, तेव्हा छोटेखानी धर्तीवर स्टार वगैरे झाल्यासारखं वाटायचं ! आम्ही दोघंही निवेदन मोठं छान हसत–खेळत करायचो. गप्पा मारायचो. पुढं मी त्या कार्यक्रमांतून मुलांसाठी नाटकं लिहायला लागले. अशी चार–पाच नाटकं लिहून मी पुस्तकाच्या रूपात ती प्रसिद्ध केली आणि ती खूप गाजली. 'झाली काय गंमत !', 'जादूचा शंख', 'पत्तेनगरी' अशा पाच नाटकांना हजार रुपयांची पारितोषिकं मिळाली. राज्य पुरस्कार, राष्ट्रीय पुरस्कारही प्राप्त झाले."

"आमच्या लहानपणी आम्हीसुद्धा शाळेत ही नाटकं बसवलेली मला अजूनही आठवतात. अर्थात तेव्हा 'जादूच्या शंखा'चं कौतुक वाटायचं. आता त्यात प्राण फुंकणाऱ्या लेखिकेच्या जादुगिरीचं कौतुक वाटतं !"

"अहो ही नाटकं अजूनही खेड्यापाड्यांतून शाळा–शाळांतून होतात. मला नेहमी पत्रं येतात. पुढे ह्यातूनच अरुण जोगळेकरनं आणि मी बालरंगमंचाची उभारणी केली. रेडिओवर येणारी किंवा इतर गुणी मुलं निवडून आम्ही नाटकं बसवली. माझी नोकरीही चालूच होती. आता दीडशे रुपये मिळायला लागले होते. पुढे पुढे मात्र वाटायला लागलं की कुठेतरी, काहीतरी चुकतंय. कारण आता मी तिथे दिवसभर काम करीत होते, आणि पुढे तसा काहीच वाव नव्हता. मी त्या ठराविक साच्यात अडकले होते. मध्यंतरी मी आणि अरुण जोगळेकरनं लग्नही केलं !"

"चारचौघींसारखं 'संसार एके संसार' करणं तुमच्या वृत्तीत बसणारं नाही आणि रेडिओच्या नोकरीतलं थ्रिलही संपलेलं होतं. तेव्हा तुम्ही नक्कीच तुमच्यासाठी एखादं नवं क्षेत्र शोधून काढलं असेल ! माझा आपला हा एक अंदाज आहे हं !"

"तुमचा अंदाज अगदी बरोबर आहे. कारण त्याच सुमारास एन्. एस्. डी.ची जाहिरात माझ्या पाहण्यात आली. तिथे मला दोन वर्षांसाठी शिष्यवृत्ती मिळाली. मग मात्र माझी नोकरी थांबली. पण अल्काझींकडे दिल्लीत मी जे नाट्यशिक्षण घेतलं, त्याचा पुढे सबंध करिअरमध्ये मला फारच उपयोग झाला. मग अरुणनं पण एन्. एस्. डी. जॉईन केलं. पुढे दिल्लीतच आम्ही दोघांनी मिळून नाट्यसंस्था काढली. नाटकांकडे माझा प्रथमपासून खूप ओढा होता. त्यामुळे 'नांदा सौख्यभरे', 'जास्वंदी'सारखी नाटकं मी त्या काळात लिहिली. एक तमाशाही लिहिला. माझ्या नाटकांबरोबर 'सखाराम बाईंडर', 'वासनाकांड' अशी दुसऱ्यांनी लिहिलेली नाटकंही मी बसवली. आमचं थिएटर खूप छान चाललं होतं. पण कुठेतरी कलाबंताचा आत्मा नेहमीच अस्वस्थ असतो म्हणतात. त्यामुळे एकीकडे काम केल्यावर एकाच ठिकाणी टिकून राहावंसं वाटत नाही. मुलांचं थिएटर झालं. आता वेगळं काहीतरी करावं. मग नाट्यशिक्षण घेतलं. पुढं काय ? त्याच सुमारास फिल्म इन्स्टिट्यूटमध्ये शिकवण्याची संधी मिळाली. 'Acting & Speech' ह्या विषयावर मी

मुलांना शिकवायची. पण शिकवणं माझ्या रक्तात नाही. तो माझा पेशा नाही. पण ह्या वर्षभराच्या काळात मी फिल्म्सच्या संबंधातील तांत्रिक अथवा पुस्तकी ज्ञान काहीही मिळवू शकले नसले तरी तिथे राहून एक फायदा मात्र झाला. मी तिथे खूप चित्रपट पाहिले. तिथली लायब्ररी खूप संपन्न आणि समृद्ध होती. तिथं फिल्मिंगच्या वेगवेगळ्या अंगांविषयी माहिती देणारी खूप पुस्तकं मी वाचली. दिवसांतून दोनदा जगातले उत्कृष्ट जुने-नवे बोलपट मला तिथे पाहायला मिळत. माझ्या सहकाऱ्यांची लेक्चर्सही ऐकायला मिळत. स्क्रीनप्लेजही खूप वाचले मी !"

"मला वाटतं, वर्षभरातल्या चाकोरीबद्ध शिक्षणातून विशेष काहीच साधलं नसतं. उलट तुम्ही स्वतंत्रपणे, अभ्यासू वृत्तीनं जे काही जाणून घेतलंत, त्याचा फायदा पुढे तुम्हाला खूपच झाला असेल !"

"हो ! आणि तिथे मी जे काही स्वत:हून शिकले त्याचा उपयोग करून घेण्याची संधी मला दिल्ली दूरदर्शनवर 'निर्माती' म्हणून नेमणूक झाल्यावर मिळाली. दिल्ली दूरदर्शनवर मात्र मी आठ वर्षं सुरळीतपणे नोकरी केली. अर्थात मध्यंतरी एक शिष्यवृत्ती मिळाली म्हणून वर्षभर फ्रान्सला गेले होते. नंतर डेप्युटेशनवर इंग्लंडला गेले. जर्मनीलाही जाऊन आले. पण ते सोडल्यास आठ वर्षं मी दिल्लीतच होते. दूरदर्शनसाठी पुन्हा मी खूप लिहिलं. फिल्मिंग वगैरेही करायला शिकले. ह्या नोकरीच्या बरोबरीनं मी आणि अरुण नाटकंही करता होतो."

"रेडिओ, टेलिव्हिजन आणि फिल्म्स ही सगळी माध्यमं एका पाठोपाठ एक येतात. आणि तुम्हाला ती त्याच क्रमानं मिळत गेली. त्यामुळे एकाच्या अनुभवाचा फायदा घेत दुसऱ्या क्षेत्रांत शिरायचं, तिथे नवीन तंत्र आत्मसात करून ते क्षेत्र गाजवायचं आणि पुढे जायचं, हाच तुमचा शिरस्ता दिसतो."

"होय ! त्या दृष्टीनं मी फार भाग्यवान आहे. ह्या सगळ्या माध्यमांतून मला वावरायला मिळालं. तसं पाहिलं तर ही सगळी माध्यमं एकमेकांशी निगडित आहेत, नातं सांगणारी आहेत. एक-दुसऱ्याला पोषक आणि पूरक आहेत. आणि त्याशिवाय प्रत्येक माध्यमाचं काहीतरी वैशिष्ट्य असतं. ते शिकायला थोडा वेळ लागतो, आणि तो फार थ्रिलींग असतो. आजपर्यंत एका माध्यमात स्थिर होऊन बोअर व्हायच्या आत मी दुसऱ्या माध्यमाकडे सहजगत्या वळत गेले. आणि ह्या सर्वच माध्यमांत मला गम्य असल्यानं फारसं कठीण गेलं नाही. अशा तऱ्हेनं वेगवेगळी माध्यमं हाताळायचं कारण हेच की वेगवेगळ्या माध्यमांचा चॅलेंज पुढे येऊन उभा राहतो. त्या वेगळेपणातही थ्रिल असतं. मजा असते. मला तर इतक्या वर्षांनंतरही ह्या सगळ्या माध्यमांबद्दल अजूनही एवढं तीव्र आकर्षण वाटतं की ह्या ना त्या कारणानं टी. व्ही. साठी मी काही ना काही करत असते. रेडिओवर मात्र मी बोलायला त्रास होतो म्हणून सहसा जात नाही. आणि आता तेवढा मोकळा वेळही मिळत नाही. पण 'फिल्म्स डिव्हिजन' साठी एक फिल्म मी आता करणार आहे.

मधाशीच तिथल्या चीफ् प्रोड्यूसरचा फोन आला होता– फिल्म फायनल झाली म्हणून ! मध्यंतरी सुभाषचंद्र बोस ह्यांच्या महिला विंगच्या कॅप्टन डॉ. लक्ष्मी ह्यांच्यावर मी टी. व्ही. साठी एक फिल्म केली. आता त्या वयस्क झाल्यात तरी अजूनही लोकोपयोगी कामं करतात आणि खूप क्रियाशील आयुष्य जगतात. तर असं काही ना काही चालूच असतं."

" मला एका गोष्टीचं नेहमी आश्चर्य वाटतं की तुम्ही बालसाहित्य लिहिलंत, त्याला पुरस्कार मिळाले. बालकांसाठी फिल्म्स केल्यात, त्यांना आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळाली. ' जास्वंदी ' सारखी नाटकं लिहिलीत, ती गाजली. अलीकडे ' स्पर्श ' किंवा ' चष्मेबद्दूर ' सारखे चित्रपट लिहिलेत, दिग्दर्शित केलेत, त्यांनीही तुम्हाला यशाच्या अत्युच्च शिखरावर नेऊन ठेवलं. आणि केवळ ' Masses ' च नव्हे तर Classes ' चंही कौतुक भरभरून तुमच्या वाटयाला आलं."

" मला जर तुम्ही आता विचारणार असाल की ह्या माझ्या थोड्याबहुत यशाचं रहस्य काय तर मी सांगेन, की त्याला एकच कारण आहे आणि ते म्हणज माझा वेगळेपणा ! वेगळेपणा आणि अत्यंत स्वाभाविकपणा ! आता ' जास्वंदी ' चं उदाहरण घ्या. सर्वसाधारण कथावस्तू असलेली अनेक नाटकं आपण पाहतो. प्रक्षोभक म्हणूनही काही नाटकं गाजतात- पण ह्या नाटकाची मुळात थीमच फार आगळी वेगळी आहे. ते अत्यंत सरळ आणि सहजसुंदर आहे. त्याच्यात अस्वाभाविक काही नाही. तोच–तोचपणा नाही. अर्थात त्या नाटकात मांजरं बोलतात, घडणाऱ्या घटनांवर भाष्य करतात ते अस्वाभाविक आहे. पण तरीही त्यांचं वागणं, बोलणं, हावभाव हे सगळं इतकं सहजसुंदर आहे की बस्स !"

" मला नाही वाटत की व्यावसायिक रंगभूमीवर ' जास्वंदी ' सारखं इतकं आगळंवेगळं कथानक असलेलं आणि तरीही कोणताही विकृत दृष्टिकोन न राखता, इतकं निर्मळ आणि निकोपपणे सादर केलेलं नाटक दुसरं कोणतं असेल !"

" आता ' चष्मेबद्दूर ' सुद्धा बघा ! तो इतका का यशस्वी झालाय ? कारण त्यातल्या घटना अगदी खऱ्याखुऱ्या वाटतात. अगदी जसं आपण बोलतो, वागतो तसंच चित्रपटात दाखवलंय. कोणताही कृत्रिमपणा त्यात नाही. अगदी रोजच्या जीवनातल्या साध्यासुध्या प्रसंगांतून त्यातला विनोद फुललाय. द्व्यर्थी वाक्यं, आचरट जोक्स, कृत्रिम प्रसंग ह्यांच्या आधारासाठी चाचपडावं लागलेलं नाही. ह्यातच त्यांचं यश सामावलेलं आहे."

" तुमच्या पहिल्यावहिल्या चित्रपटाला एवढं यश लाभलं तर मग तुम्ही ह्यापूर्वीच चित्रपट व्यवसायात का पडला नाही ? "

" अहो, चित्रपट काढणं ही काय एवढी सरळसोधी गोष्ट आहे ? चित्रपटात मला आता नाव मिळालं. आता पंचवीस प्रोड्यूसर्स माझ्याकडे येतात. पण त्या काळात मी माझं स्क्रिप्ट घेऊन फिरलेच की जागोजाग ! आणि तेव्हा काय मी

' जास्वंदी ' लिहिलं असलं तरी, मला राज्य पुरस्कार मिळालेले असले तरी त्याची किंमत ह्या निर्मात्यांच्या लेखी शून्य असते. इथे चलनी नाण्याचीच चलती ! ' स्पर्श 'चं स्क्रिप्ट आज लिहिलं आणि उद्या त्याच्यावर उडया पडल्या असं नाही काही ! तीन–चार वर्षं तरी पडूनच होतं ते ! आणि आता स्क्रिप्ट नाही, तरी प्रोड्युसरांची रांग लागते."

हातच्या काकणाला आरसा नकोच होता. कारण माझ्यासमोरच चित्रपट व्यावसायिकांचे, शबाना आझमीसारख्या अभिनेत्रीचे फोन खणखणत होते. आणि अशाच एका प्रोड्युसरच्या आगमनामुळे ती रंगलेली बातचीत संपवावी लागली होती. पण तरीही–

" मी चित्रपटांकडे कशी वळले, हे तुम्ही मला विचारलंच नाही, तरीही मी सांगते. आठ वर्षं टी. व्ही.वर काम केलं आणि पुढे तिथल्या रटाळपणाला, लाल फितीला, कामात काडया घालणं किंवा पाय ओढणं असल्या प्रकारांना मी फार कंटाळले. आणि ह्या कटकटींच्या मानानं पगार तुटपुंजा ! तेव्हा ठरवलं की स्वत:चा काही स्वतंत्र उद्योग सुरू करायचा. आपण उपाशी तर नक्कीच राहणार नाही. म्हणून मग मी राजीनामा दिला.

" पण तिथले सेक्रेटरी किडवाई म्हणून होते, त्यांना माझ्याबद्दल फार कौतुक होतं. ते म्हणाले, ' तुझ्यासारखे प्रोड्युसर सोडून गेले तर व्हायचं कसं ? ' मी म्हटलं, ' आम्ही इथे राहावं असं तुम्हाला वाटत असेल तर आम्हाला रस वाटेल असं काहीतरी तुम्ही करायला हवं ! ' तर त्यांनी सुचवलं की, तू ' चिल्ड्रेन फिल्म सोसायटी 'मध्ये बढतीवर ' चीफ प्रोड्युसर ' म्हणून जा. म्हणजे नोकरीही कायम राहील. "

" अर्थात ती पोस्ट खूपच ग्लोरिफाईड होती. खुर्ची होती, सत्ता होती. कामात आनंदही होता. ' जादूचा शंख ' आणि ' सिकंदर ' ह्या माझ्या तासा–दीड तासांच्या पहिल्यावहिल्या दोन बोलपटांची निर्मिती मी तिथेच प्रथम केली. कारण आतापर्यंत मी माहितीपट खूप केले होते. पण चित्रपट असे ते पहिलेच ! आणि त्या दोन्ही चित्रपटांना मॉस्कोमधील चित्रपट महोत्सवात पारितोषिकं मिळाली. पण तरीही ती शेवटी सरकारी नोकरीच ! तिथेही मर्यादा होत्याच. मग मात्र मी कंटाळून नोकरी सोडून दिली. पण ह्या नोकरीच्या निमित्तानं माझा प्रथमच मुंबईशी संबंध आला. नाहीतर तोपर्यंत एक दिल्ली तरी किंवा पुणं तरी ! नोकरी सोडल्यानंतर एक–दोन वर्षं जरा जड गेली. जड म्हणजे फारसा चोखंदळपणा नाही करता आला. काय हाती येतील त्या फिल्म्स् करायच्या. कधी टी. व्ही. साठी, कधी फिल्म्स डिव्हिजनसाठी, कधी बँक ऑफ महाराष्ट्रसाठी तर कधी जाहिरातदारांसाठी ! अगदी डुकरांना जास्त पिल्लं झाली तर ते फायदेशीर कसं होईल अशा तऱ्हेच्या-सुद्धा फिल्म्स मी केल्या. असं नाही म्हटलं की ह्या विषयांवर मी नाही काही

करणार ! कारण अखेर हा व्यवसायाचा प्रश्न असतो ना ?

"त्याच सुमारास मी टी. व्ही. साठी माझं एक नाटक केलेलं होतं, 'रैना बीती जाय !' म्हणून. ते मी आणखी विस्तारानं लिहिलं. बासू भट्टाचार्यांना ते फार आवडलं. ती माझी पहिली फिल्म 'स्पर्श !' तीन राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झालेत त्याला ! वास्तविक 'आक्रोश', 'चक्र' सारखे चित्रपट उत्तम चालतात, तर 'स्पर्श' नक्कीच यशस्वी होईल. पण निर्मात्यांच्या मनात काय आहे कळत नाही. ते ती फिल्म रिलीजच करत नाहीत. वास्तविक त्यात नासिरुद्दीन शहा, शबानासारखे कलाकार आहेत. कथानक उत्तम आहे. तुलनेत 'चष्मेबद्दूर'च्या निर्मात्यांचा मला फार चांगला अनुभव आला."

"तुम्ही अत्यंत यशस्वीपणे आणि आत्मविश्वासानं प्रत्येक माध्यम हाताळता. तुमच्या चतुरस्त्र निर्मितीला फक्त कल्पनाशक्ती साहाय्यभूत होते की प्रवास, वाचन, माणसांच्या गाठीभेटी ह्यांचाही फायदा होतो ?"

"असं होतं ना शेवटी की तुमच्या डोक्यातून कल्पना कधी निघतात ? जेव्हा बाहेरच्या काही गोष्टी तुम्ही न्याहाळता, काही तुम्ही स्वतः अनुभवता, कधी लोकांचे अनुभव पाहता–ऐकता, जेव्हा बाहेरच्या काही गोष्टींचे आकलन करून घेता. मुख्य म्हणजे तटस्थ न राहता जीवन अनुभवता, तेव्हाच तुमच्या मनात काही प्रसंग, घटना, गोष्टी रुजतात आणि त्यापुढे साहित्यरूपात बाहेर पडतात. मग कधी त्यांची कथा होते, कविता होते, कधी चित्रपट होतो, कधी नाटक होतं."

"असा एखादा प्रसंग पाहून तुम्हाला स्फूर्ती आली, आणि हातून काही चांगली निर्मिती झाली असा अनुभव तुम्हाला सांगता येईल ?"

"अंधांच्या जीवनावरील 'स्पर्श' ह्या चित्रपटाची कल्पना मला सुचली हे ह्याचं उत्तम उदाहरण आहे. घरात बसून काही मला 'स्पर्श'चं कथानक नसतं सुचलं. एरवी माझा अंधांच्या विश्वाशी संबंध यायचं काय कारण ? पण एकदा मी टी. व्ही.वर असताना मला सांगण्यात आलं की अपंगदिनानिमित्त काही कार्यक्रम व्हायला पाहिजे. तेव्हा तू दिल्लीत जी 'ब्लाईंड रिली असोसिएशन' नावाची संस्था आहे, तिथे जाऊन त्यांच्या दिवसभराच्या घडामोडींचं चित्रीकरण करू ये. अंध मुलं काम कसं करतात, अभ्यास कसा करतात, यांत्रिक शिक्षण कसं घेतात ते सर्व पाहून यायचं होतं. माझी काही जायची फारशी इच्छा नव्हती. पण नोकरी म्हटलं की जायलाच हवं. मला वाटलं, माझ्यासारखीला तिथे जाऊन काय वाटणार ? ते आंधळे लोक बिचारे ! आपल्या कोमल स्त्रीहृदयावर ते पाहून परिणाम होईल, आपल्याला फार वाईट वाटेल वगैरे ! अगदी नाखुषीनं आणि निरुत्साहानंच मी तिथे गेले. आणि तिथे गेल्याबरोबर माझ्या असं लक्षात आलं की माझा दृष्टिकोन साफ चुकीचा आहे. अगदी सामान्य आणि वरवरचा आहे. कारण तिथली अंध मुलं इतकी आत्मविश्वासानं वावरत होती ! त्यांना आपल्या

सहानुभूतीची, करुणेची अजिबात जरूर नव्हती. अंधपणा सोडल्यास ती अगदी इतर शाळकरी मुलांसारखीच एकमेकांशी भांडत होती, रस्सीखेच करत होती, ढकलाढकली करत होती. आणि तो सगळा प्रकार पाहून मी इतकी थक्क झाले ! त्यानंतर त्या संस्थेचा प्रिन्सिपॉल मला भेटला. मित्तल त्याचं नाव ! तो स्वत: अंध होता. पुढे त्याची–माझी चांगली ओळख झाली. दोस्तीही झाली तो माणूसही इतका तडफदार होता म्हणून सांगू ? आंधळ्या माणसांबद्दल बोलताना आपण मुळात सुरुवातच 'बिचारा ! '–वगैरे अशा शब्दांनी करतो. त्यांची कीव करतो. हा माणूस कुठंही 'बिचारा' नव्हता. व्यवस्थित अद्यावत होता. तडफदार आणि थोडासा आक्रमक असा होता. आणि तो ही संस्था एवढ्या उत्कृष्टपणे चालवत होता. बाहेरच्या लोकांचे फोन्स घ्यायचे, फंड जमा करण्यासाठी लोकांची मनं वळवायची, सगळं काही इतक्या सहजपणे करत होता. फारच प्रभावी माणूस होता तो ! त्याला पाहिल्यावर कुठेतरी त्याचं व्यक्तिमत्व एवढं ठसलं माझ्या मनावर ! पुढे दोस्ती झाल्यावर त्यानं आपल्या खाजगी आयुष्यातल्या काही गोष्टी मला सांगितल्या. म्हणजे अगदी आयत्या वेळी त्यांचं लग्न कसं मोडलं वगैरे. असे कितीतरी किस्से सुनावले त्यानं ! 'स्पर्श' मध्ये त्याच्या स्वत:च्या आयुष्यातले प्रसंग घातलेत मी ! उदा.–त्यात प्रसंग आहे, नासिरुद्दीन शहा शबानाला प्रथमच एका चायनीज रेस्टोरंटमध्ये घेऊन जातो. निघताना वेटर शबानाच्या हातात बिल देतो. त्याला ते अपमानास्पद वाटतं. आपल्या आंधळेपणामुळे हे घडलं असं त्याला वाटतं. ही खरोखरच मित्तलच्या आयुष्यात घडलेली घटना होती. हे सगळंच मला फार स्फूर्तिदायक ठरलं. त्या संस्थेत जाणं, मित्तलला भेटणं...त्यातूनच 'स्पर्श'चा जन्म झाला. अर्थात पुढे मग बाकीची सगळी कलाकुसर माझी स्वत:ची ! 'स्पर्श'ची सगळीच कथा काही मित्तल ह्या प्रिन्सिपॉलची नाही. तेव्हा कथा मी माझ्या कल्पनेनंच लिहिली. कारण मुळात मी लेखिका आहे."

"तुमचं बालपण ऑस्ट्रेलियात गेलं. तुमचे वडील रशियन होते. घराणं अतिशय सुधारक आणि पाश्चात्य वळणाचं होतं. तरी तुमच्या निर्मितीवर पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव नाही, असं कसं ?"

"छे ! छे ! उलट पाश्चात्य संस्कृतीचा माझ्या निर्मितीवर खूपच प्रभाव आहे. म्हणजे पाश्चात्यांचं आंधळं आणि बटबटीत अनुकरण नसलं तरी त्यांची काही चांगली तंत्रं मी आत्मसात केलीत आणि संभाषणाचं उदाहरण घ्या. जे बोलायचं ते सरळ बोलायचं ही माझी पद्धत ! आपल्याकडे आपण फार भोंदूपणानं आणि कृत्रिमपणे गोष्टी सादर करतो. कालच मी एक सिनेमा पाहिला. त्यात ते सरळ बोलतच नाहीत.एक आई बोलतेय की, 'एक माँ अब भगवानका दर्शन करने जा रही है!' मी मनात म्हटलं–अरे, पण सरळ सांग ना की मी देवाच्या दर्शनाला जातेय ! आपण काय असं म्हणतो की, 'एक माँ अब सब्जी लेने बाजारमें जा रही है !' हे ज आहे

ना, त्याचा मला इतका मनस्वी तिटकारा वाटतो. आपण एक भूमिका केल्याशिवाय कुठेही सरळ, सोपं काही करूच शकत नाही. आता 'स्पर्श' मध्येसुद्धा पाहा. जरी गंभीर विषय असला तरी त्यात हलकेफुलके असे खूप प्रसंग चित्रित केले आहेत. 'चष्मेबद्दूर' पाहा. त्यात जो सुसंस्कृतपणा आहे, त्या चित्रपटाची हाताळणी आहे, ते इतकं सोफिस्टिकेटेड् आहे. त्याला कारण माझ्यावरील पश्चिमात्य संस्कृतीचा, इंग्रजी वाचनाचा परिणाम! तशी माझ्यावरच्या पाश्चात्य संस्कृतीचं प्रदर्शन करण्याची मला जरूर नाही. अखेर मी भारतात वाढले आहे. मी स्वतःला पूर्णपणे भारतीयच समजते. तसा मला माझ्या प्रांताविषयीही खूप अभिमान आहे. पण म्हणून काही माझं महाराष्ट्रप्रेम फक्त मराठी सिनेमा काढण्यापुरतंच असावं असं काही नाही. म्हणून निर्वेधपणे हिंदी चित्रपट काढते. कारण माझे मराठी प्रेक्षक तर 'माझा' चित्रपट म्हणून तो पाहणारच, तसेच इतर भाषिकही पाहतात. पण मजा म्हणजे लिहिताना मात्र मी मराठीतून लिहिते. ते मला सोयीचं पडतं. नुसत्या चित्रपटकथाच नव्हे तर मी 'महाराष्ट्र टाइम्स', 'दीपावली', 'सत्यकथा' मधूनही खूप लिहिलंय. डायरेक्टर आणि लेखकही मीच असल्यानं पुढे काय समस्या उभी राहील ते माझ्या आधीच लक्षात येतं आणि त्याप्रमाणे मी सुधारणा करते."

"लिखाण हे आपल्या हातातलं हुकमाचं पान असतं. पण त्याची खेळी करताना तुम्ही स्वतःचीच बुद्धी पणाला लावता की इतरांचीही मतं विचारात घेता?"

"मी काहीही लिहिलं तरी माझ्या लेखनाचे दोन-तीन टीकाकार ठरलेले असतात. सुरुवातीला मी ज्यावेळी लिहायची, त्यावेळी आईबरोबर चर्चा करायची. आई थोडंफार स्क्रिप्ट दुरुस्तही करायची. हल्ली मी तितकं आईला दाखवत नाही म्हणा! दुसरी माझी मुलगी विनी! आता सोळा वर्षांची आहे ती! तिला दाखवते. मग ती सांगते, 'हे मस्त झालं. हा भाग जरा कंटाळवाणा वाटतोय. काढून टाक' वगैरे! तशीच पुण्याला माझी एक मैत्रीण आहे, मीरा रानडे म्हणून! स्वतः मीरा अगदी घरगुती गृहिणी आहे, पण कुठेतरी तिची स्वतःची विनोदबुद्धी आणि कल्पनाशक्ती इतकी सुप्तावस्थेत आहे! ती फारच छान सूचना करते. लोकांना नेमकं काय आवडेल ते ती मला बरोब्बर सांगते. त्यांचं प्रतिनिधित्व ती माझ्यासाठी करते असं म्हणायला हरकत नाही. बऱ्याचशा गोष्टींची तिच्याबरोबर बसून मी चर्चा करते आणि नंतर ठरवते. आता पुढच्या माझ्या दोन चित्रपटांपैकी एकाचं कथानक चाळीतलं आहे. त्याच्याविषयीसुद्धा मी आणि मीरा दोघीजणी बसून खूप गप्पा मारतो. आयुष्याच्या एका टप्प्यात ती स्वतः चाळीत राहिलेली आहे. त्यामुळे तिला तिथला खूप अनुभव आहे. ती काय काय सांगत असते, तिथले लोक डालडाच्या डब्यात तुळशीची रोपं लावतात, वगैरे! मी अशा वातावरणात अजिबात वाढलेली नाही. त्यामुळे मला तिचे हे सगळे अनुभव फार उपयोगी पडतात."

"तिच्या अनुभवांवर आधारित, पण कथाकल्पना तुमची का?"

"नाही ! ह्यावेळेची कथा मूलतः माझी स्वतःची नाही. शं. गो. साठे म्हणून पुण्याचे एक नाटककार आहेत, त्यांचं 'ससा आणि कासव' ह्या नावाचं एक नाटक आहे. ती कल्पना घेऊनच मी पुढे स्वतंत्रपणे लिहिणार आहे. म्हणजे लहानपणी आपण सर्वांनी 'ससा आणि कासवा'ची गोष्ट वाचलीय. म्हणजे, शर्यतीत कासव पुढे जातं, कारण ते नेटानं पुढे जात राहतं आणि उनाडटप्पू ससा मात्र माग राहतो, कितीही जोरात पळाला तरी ! पण नाटककाराचं म्हणणं, हल्ली असं अजिबात नसतं. आयुष्याला एवढी गती आलीय की, हल्ली ससाच पुढे जातो. त्यामुळे हल्ली वागण्या–बोलण्यात चतुराई लागते. जनसंपर्काची कला अवगत असावी लागते. धाडसी स्वभाव लागतो. मुळात सिन्सिअॅरिटी नसली तरी दिखाव्याला महत्त्व आहे. मला ही सगळीच कल्पना आवडली. आणि असं वाटलं की, मी ही कथा छान हाताळू शकेन. माझ्या प्रवृत्तीत ते बसणारं आहे. म्हणून सध्या ते मी करायचं म्हणते !"

"इथेच तुमच्या वेगळेपणाचा प्रत्यय येतो. इतर चारचौघांसारखा मालमसाला गोळा करून गल्लाभरू चित्रपटात असतात तसे प्रसंग उभे करायचे, पात्रं उभी करायची, आणि झगमगते सेट्स उभारून प्रेक्षकांच्या डोळ्यांत धूळफेक करायची, हा तथाकथित प्रतिष्ठित चित्रपट व्यावसायिकांचा फॉर्म्युला तुम्ही कधीही वापरत नाहीत. उलट तुमच्या–आमच्या जीवनातले साधेसुधे प्रसंग घेऊन, त्यावर विनोदाचं हलकं कशिदाकाम करायचं किंवा अशा काही प्रसंगांचं, पात्रांचं चित्रपटातून रेखाटन करायचं की वाटावं हे तर आमच्यातलेच लोक ! अजूनपर्यंत आम्हाला कसे दिसले नव्हते ते ? ही माणसाची माणसाविषयी डोळस जाणीव आणि उत्कृष्ट ओळख करून देण्याचं तुमचं कसब वाखाणण्याजोगं आहे. त्यातूनच तुमचे प्रसंग फुलतात, संवाद उमलतात."

"त्यासाठी आधी माणसांत मनापासून मिसळायला लागतं. आत्मियतेनं त्यांची सुखदुःखं जाणून घ्यावी लागतात. चौकसबुद्धीनं त्यांचं जीवन जवळून न्याहाळावं लागतं. एक–दोन उदाहरणं सांगते. आता कामगारांवर एक फिल्म करतेय. त्यासाठी चाळीचाळीतून फिरतेय. येत्या रविवारी काही कामगार यायचेत घरी जेवायला आणि दिवसभर गप्पा मारायला ! अशाच कामगारांबरोबर गेल्या आठवड्यात मी त्यांचे काही गाळे पाहायला गेले होते. जे कामगार मुंबईत राहतात ते बहुधा खेडोपाड्यांतून येतात आणि तीस–चाळीस लोक एक खोली भाड्यानं घेऊन राहतात. ह्या गाळ्यांमध्ये ते फक्त आठ तास झोपू शकतात. गिरणीतील पाळीनुसार नवव्या तासाला दुसरा कामगार येतो आणि पहिल्याला उठवून त्याची जागा येतो. एका कामगाराला मी सहज म्हटलं, 'म्हणजे तुम्हाला फक्त झोपायला जागा असते इथं ?' – 'फक्त झोपायला जागा असते ताई, कुशीवर वळायला नसते !"

"आता हा मी संवाद जसाच्या तसा लिहिला की लोक म्हणणार 'वाः !

सई परांजपे काय संवाद लिहिते !' हे असे विलक्षण अनुभव, ज्याची आपल्याला कल्पनासुद्धा करता येणार नाही, ते कुठेतरी मनाला स्पर्श करून जातात, अस्वस्थ करून जातात.

"असाच आणखी एक अनुभव सांगते. विजय परुळकर आणि सरोजा परुळकर हे एक महाविलक्षण जोडपं आहे. विजय परुळकर स्वतः कॅमेरामनही आहे. एक दिवस अचानक त्याला जाणीव झाली की परदेशातली आपली नोकरी, भक्कम पगार हे सगळं फोल आहे. आपल्या देशात जाऊनच आपल्याला काहीतरी केलं पाहिजे ! तेव्हा भक्कम पगाराच्या नोकरीवर पाणी सोडून तो इथं आला. इथल्या ग्रामीण विकासाच्या कार्यक्रमात ही मंडळी हिरीरीनं भाग घेतात. शरद जोशींच्या शेतकरी आंदोलनातही त्यानं सक्रीय सहभाग घेतला होता. पुढे त्यावर 'योद्धा शेतकरी' हे पुस्तकही लिहिलंय त्यानं !

"सांगायचं कारण काय तर त्यानं ह्या शेतकऱ्यांच्या जीवनातले इतके अप्रतिम किस्से सांगितले म्हणून सांगू ! वास्तविक शेतकरी आणि खेड्यातील जीवन हा काही माझा विषय नाही. मला त्यांच्याविषयी विशेष माहितीही नाही. पण त्यानं सांगितलेले अनुभव म्हणजे एक तयार फिल्मच झाली. अर्थात मग मी माझी कल्पनाशक्ती पणाला लावून ते अनुभव एकत्र गुंफले. प्रसंग आणि पात्रं उभी केली. त्यानं मला सोमाची गोष्ट सांगितली. थांबा हं, मी तुम्हाला त्या सोमाचा फोटोच दाखवते. नीरा ऽ ए नीरा ऽ, कपाटातला तो सोमाचा फोटो आण ग !

"हा सोमा म्हणजे एक साधा शेतमजूर ! नायगाव इथं त्याची अर्धा एकर उजाड आणि वैराण जमीन होती, ज्यावर एक दाणा उगवायचा नाही. पण त्यानं ध्यास घेतला की माझ्या जमिनीत पाणी लागणार ! म्हणून तो खणत राहिला आणि आश्चर्य वाटेल तुम्हाला, सोळा वर्षं तो खणत राहिला आणि सोळा वर्षांनी खरोखर त्या जागेला पाणी लागलं. ही गोष्ट ऐकून मी अक्षरशः थक्क झाले. विजयला म्हटलं, माझा ह्यावर विश्वास बसत नाही. तेव्हा त्यानं मला नेऊन ती जागा दाखवली. मी त्या सोमाला भेटले. त्याच्याशी बोलले. आणि जशी मित्तलला पाहून मी अस्वस्थ झाले होते, तशी पुन्हा अस्वस्थ झाले. आपल्याला वाटतं फक्त थोरामोठ्यांनाच जिद्द असते. पण ह्या सोमासारख्याची जिद्द पाहा ! एक तर तो साधा शेतमजूर. दिवसभर दुसऱ्याच्या शेतात राबायचं, घरी आलं की तास-दोन तास खणत बसायचं. बायको चिडायची, त्रागा करायची. पण तरीही नाऊमेद न होता सोळा वर्षं ही प्रखर जिद्द टिकवायची म्हणजे मनात केवढा प्रचंड आत्मविश्वास असेल ! हातातल्या कामावर केवढी नितांत श्रद्धा असेल त्या माणसाच्या !"

"हे असे जगावेगळे विषय सामोरे येतात आणि मी लिहिते. मग ते लिखाण इतकं सहज स्वाभाविक होतं की मला स्वतःलाही कळत नाही की माझी पर्सनॅ-

लिटी संपली कुठे आणि वातावरणाचा प्रभाव सुरू झाला कुठे ?

" तीक्ष्ण निरीक्षणशक्ती आणि अथांग सहृदयता असेल तर विषयांना तोटा नाही डोळस वृत्ती आणि मन जागं असेल तर हे असं आजूबाजूला हवं तेवढं मिळतं. अगदी चार पावलं चाललं तरी खूप काही कळतं आणि माझ्या बाबतीत तर हे इतकं सहजगत्या घडतं की मला ते कळतही नाही. सांगताही येणार नाही. सुचतं एवढं मात्र खरं ! "

आपल्या कर्तृत्वाची उंची गाठण्याच्या प्रयत्नात सई परांजपेंनी सर्वसामान्यांच्या अपेक्षाही उंचावल्या आहेत. ह्याला कारण जीवनातल्या तरल अनुभवांचं स्फटिक प्रकटीकरण हा त्यांचा हातखंडा आहे. त्यामुळे एखादं उन्मार्गी आयुष्य असो की मांगल्यानं उजळलेलं आयुष्य असो, त्याला ' जीवनदान ' देणं हा त्यांचा लाडका छंद ! इथे ' जीवन ' हा शब्द मी व्यापक अर्थानं वापरलाय. सामान्य माणसाच्या ' जगण्याला ' अनुभूतीच्या अर्थवाही छेदानं, कंगोरे लाभून लखलखतं ते जीवन ! अन्यथा तुम्ही आम्ही जगतो ते केवळ उगवत्या मावळत्या चंद्रसूर्याला साक्ष ठेवून जगलेले चार निष्फळ क्षण ! कधीतरी अवचित सई परांजपेंसारखी माणसं भेटतात अन् मग ते चार निष्फळ क्षणही फळाला येतात.

माहेर / डिसेंबर १९८१

पहिल्या स्त्री-न्यायमूर्ती

सुजाता मनोहर

फ्लोरा फाऊंटनला उजवी घातली की रस्त्याच्या जरा आतल्या अंगाला लागते उच्च न्यायालयाची इमारत ! मुंबई शहराचा मानबिंदू ! प्रशस्त आवार, प्रचंड मनोरे, जागोजागी वर्तुळाकार खांब, मजबूत दगडी बांधकाम, दगडी पाय-ऱ्यांचे अंतर्गत जिने, तळमजल्यापासूनच 'ऑनरेबल जस्टिस...' अशा पाटचा अभि-मानाने मिळवणारी एकेक दालने !

अर्धवर्तुळाकार जिन्यांच्या ऐसपैस दगडी पायऱ्या चढून दुसऱ्या मजल्यावर यावे, तर पुरातन काळाची याद येईल असे एक प्रचंड दालन ! दालनाच्या भिंतींवर त्या त्या काळातल्या मशहूर न्यायमूर्तींचे फोटो, भिंतीलगतच्या काचेच्या कपाटांतून कायद्याची पुस्तके हारीने मांडलेली ! समोरच्या लाकडी कठड्यामागे न्यायमूर्तींचे भव्य उच्चासन ! छतावर प्रकाशणारी पुराणकालीन हंड्या-झुंबरे ! कोणीतरी सांगतेय, 'ह्याच दालनात टिळकांना अंदमानाची-काळचा पाण्याची सजा फर्मावली गेली होती.' अन् ती ऐकल्यानंतरचे टिळकांचे सूर्यठिणग्यांसारखे तेजस्वी उद्‌गार दालनाच्या प्रवेशद्वारी संगमरवरावर सुवर्णाक्षरात कोरले गेलेत.

केवळ प्रसंगाच्या कल्पनेने, त्या दालनाच्या थंडगार फरशीवर पाऊल ठेवताना अंगभर रोमांच उठतात. एकशे अकरा वर्षांचे उन्हाळे पावसाळे पाहिलेल्या ह्या न्यायालयाने असे अनेक चित्तथरारक प्रसंग अनुभवलेले ! ह्या न्यायालयाच्या दगडी भिंती टिळकांच्या रुद्रगंभीर आवाजाने रोमांचित झाल्यात. गुन्हेगारांना शासन घडताना पाहून समाधान पावल्यात, तशाच राज्यकर्त्यांचाही मुलाहिजा न पाळता, कायद्याची बूज राखली जाताना पाहून आनंदाने पालवल्यात.

ह्या न्यायालयाने जसे अनेक इतिहास घडताना पाहिलेत, जसे वादळी प्रसंग

पचवलेत, तशीच काळाची करामतही अनुभवलीय.

कोर्टाच्या आवारात पाऊल टाकले, तर जिथे-जिथे, दोन पिढ्यांचे प्रतिनिधित्व करणारे, काळचा झग्यातले अथवा कोटातले, गळ्याला पांढरी त्रिकोणी गळपट्टी लावलेले अनेक वकील, हातातले कागदपत्र सांभाळीत गडबडीने तिथे वावरताना दिसतात. ह्यांच्यातच एकदा कधीतरी साडीतली पहिली तरुण वकील मुलगी पाहताना ह्या न्यायालयालाही खरोखर कौतुकच वाटले असेल नाही ?

आज ह्या न्यायालयात जेव्हा खटले चालवले जात असतात, तेव्हा अनेक मुली शांत चित्ताने ते ऐकत असताना, न्यायमूर्तींसमोर युक्तिवाद करताना अथवा जाणत्या वकिलांना तत्परतेने मदत करताना-कायद्याच्या पुस्तकातील संदर्भ सुचवताना सर्रास दिसतात.

सुमारे पंचवीस एक वर्षांपूर्वी अशीच एक मुलगी हे काम करताना बरोबरीच्या वकिलांना आढळायची. तेव्हा त्यांच्या कौतुकभरल्या नजरा तिच्याकडे हटकून वळायच्या. आणि ते स्वाभाविकच होते. तेव्हा वकिली करणारी मुलगी अभावानेच दिसायची. आणि ही मुलगी तर इतकी सुंदर होती ! सागराच्या शुभ्र-धवल लाटांनी लाजावे असा गोरापान रंग, नितळ अंगकाती, टपोरे-करवंदी बोलके डोळे आणि बांदेसूद देहयष्टी ! चेहऱ्यावरून बुद्धिमत्तेचे तेज आणि आवाजातून रूपाची माधुरी ओसंडतेय ! एल्फिस्टन कॉलेजच्या या ब्यूटीक्वीनने कॉलेजच्या आवारातून शिक्षणासाठी परदेशी प्रयाण केले अन् तिथून माघारी पावले वळवली ती थेट न्यायालयाकडेच !

आज त्यांच्या पाऊलखुणांचा मागोवा घेत अनेक मुली ह्या पाऊलवाटेवरून नि:संकोचपणे चालल्या आहेत. ह्याचे श्रेय त्यावेळच्या वकील आणि आत्ताच्या महाराष्ट्रातील उच्च न्यायालयाच्या पहिल्या स्त्री-न्यायमूर्ती सौ. सुजाता मनोहर ह्यांनाच जाते.

बावन्न नंबरची कोर्टरूम ! तशी छोटीशीच ! पुढच्या दोन-तीन बाकांवर प्रथितयश वकील आणि त्यांचे असिस्टंट्स ! मागच्या बाकावर अशिले, केस ऐकायला आलेली माणसे ! बैठ्या कठड्याला लागून कायद्याचे अनेक जाडजूड संदर्भ-ग्रंथ ! समोरच्या डेस्कवर वाकून जोरजोराने युक्तिवाद करणाऱ्या, वकिलांच्या बोलण्याने वातावरण तापलेले ! दोन्ही बाजूंच्या भल्याथोरल्या दरवाजातून थंडगार वाऱ्याच्या झुळका येतात, पण ते वातावरण थंडावत नाही. सर्वांचे चेहरे उत्सुक. ताणलेले. समोरचे दोन चेहरे मात्र पूर्णपणे तटस्थ ! अलिप्त ! वकिलाचे म्हणणे शांतपणे ऐकताना चेहऱ्यावरची रेषाही हलत नाहीय. मध्येच समोरच्या बोलणाऱ्या वकिलाला अडवून काही मुद्यांवर चर्चा ! तर मध्येच सुजाता मनोहरांची दुसऱ्या न्यायमूर्तींशी अतिशय हलक्या आवाजात बातचित ! वकिलाला काहीतरी विचारताना अनवधानाने ओठांबाहेर फुटणारे मोहक हसू ! अन् ते आवरण्याच्या प्रयत्नात

चेहऱ्यावर उडालेला मजेदार गोंधळ ! त्यांच्या चेहऱ्यावरला उत्सुक अभ्यासूपणा नजरेत भरणारा !

संध्याकाळचे पावणेपाच होतात. कामकाजाच्या नादात घड्याळाकडे त्यांचे लक्ष नसते. कोणीतरी खुणावते. त्या घड्याळाकडे पाहतात अन् हसत-हसत उठतात. अगदी ग्रेसफुली ! कमरेत किंचित लवत कोर्टाला अभिवादन करतात. तेवढ्यात लांब अंगरख्याला पांढरा शेमला खोचलेला लाल पगडीतला पट्टेवाला पाठीमागे उभा राहतो. आसन किंचित मागे घेतो अन् आपल्या काळ्याशार पायघोळ झग्याचा घोळ सावरत त्या स्वत:च्या चेंबरकडे दिमाखात चालू लागतात.

प्रत्येक व्यवसायाचे स्वत:चे एक रूप असते. आणि ते रूप त्या व्यावसायिकाच्या व्यक्तिमत्वात प्रतिबिंबित होत असते. तसेच प्रत्येक व्यवसायाचे काही संकेत असतात. सुजाता मनोहरांचे रूपही ह्या संकेताला अपवाद नव्हते.

त्यांच्या प्रशस्त चेंबरमध्ये बसल्या-बसल्या मी त्यांचे आणि चेंबरचेही निरीक्षण करीत होते. इथल्या कायद्याच्या पुस्तकांसोबत नजरेत भरणारा विशेष म्हणजे कोर्टाच्या कामकाजातील विनोदी प्रहसनांची भितीवरील छायाचित्रे ! त्यांच्या तरल विनोदी बुद्धीची साक्ष देत असलेली ! समोरच्या फुलदाणीतील फुलांसारखे निर्मळ हसत, त्या हळूच विनंती करतात, 'मुलाखत इंग्लिशमधून घ्याल ना ? मला बरं पडेल ते ! कारण मराठी माझी मातृभाषा नाहीय.'

माझी हरकत नसतेच. ह्या दिमाखदार, बुद्धिमान व्यक्तित्वाच्या सहवासात चार क्षण वेचायला मिळतात, त्यांचे विचार ऐकायला मिळतायत हीच माझ्या दृष्टीने खूप मोलाची गोष्ट असते. अनेक कुतुहले असतात, शंका असतात. त्यातली पहिलीच शंका ही असते की एवढ्या बुद्धिमान व्यक्तीला अनेक मार्ग खुले असतात. त्यांच्या अस्मानभरारीला अवकाश ठेंगणे ! अशा परिस्थितीत कोणत्याही व्यवसायात पडले तरी त्यांच्या पदरी यशाचे झुकते माप येणार हे निश्चित ! म्हणूनच मला कुतुहल वाटते की त्यांनी वकिलीचा व्यवसाय का पत्करला ?

माझ्या ह्या कुतुहलमिश्रित प्रश्नावर त्यांनी प्रांजळपणे सांगून टाकले की, "माझे वडील वकील होते. मी घरात सर्वात थोरली ! म्हणून मला वाटलं की, आपणही वडिलांच्या पावलावर पाऊल टाकून हा व्यवसाय स्वीकारावा. पण एक गोष्ट खरी की, मी माझ्या वडिलांबरोबर कधीही काम केलं नाही. कारण मी परदेशाहून बॅरिस्टर होऊन आले आणि त्याचवेळी ते गुजराथ इथे हायकोर्टाचे न्यायमूर्ती म्हणून गेले. मी मात्र इथे मुंबईतच वकिलो करत होते. त्यामुळे सुरुवातीपासूनच मी ह्या व्यवसायात माझ्या स्वत:च्या पायावर उभी आहे !"

"वकिली करत असतानाच तुम्ही न्यायाधीश होण्याचं स्वप्नं पाहिलं होतं की वकिली करताना अशा काही केसेस् तुम्ही अनुभवल्यात की ज्यायोगे न्यायाधीशपद आपल्याला मिळावं अशा विचारांना पुष्टी मिळाली ?"

त्यांनी स्वच्छपणे सांगून टाकले, " खरं सांगू का ? मी न्यायमूर्तीपदाची स्वप्न कधी पाहिलीच नाहीत. मला वकिलीच करायची होती. आणि मला नाही वाटत की, कोणत्याही केसेस्मुळे ह्या पदाचा मोह पडावा ! कारण प्रत्येक केसचं स्वतःचं असं स्वतंत्र स्वरूप असतं. कोणत्याही दोन केसेस् सारख्या नसतात, प्रत्येकात त्या केसची स्वतःची खासियत असते. अर्थात् काही केसेस् खरोखर कायदेशीर गुंतागुंतीच्या असतात आणि म्हणूनच त्या अधिक स्वारस्यपूर्ण वाटतात आणि सतत सामोऱ्या येणाऱ्या अशा गुंतागुंतीच्या केसेस्, नवनवीन समस्या नि त्यांची बुद्धिकौशल्य पणाला लावून करावी लागणारी उकल हे सगळं काम इतकं चॅलेंजिंग असतं की त्यामुळे हा व्यवसाय कधीच एकसुरी, कंटाळवाणा वाटत नाही."

माझ्या मनात वेगळंच प्रश्नचिन्ह होतं. ह्या व्यवसायात वकील खोऱ्यानं पैसे ओढू शकतो. मग वकिलीच करत पाहण्यापेक्षा सुजाता मनोहरांनी तुलनेनं कमी आर्थिक उत्पन्न देणारे न्यायमूर्तीपद का स्वीकारले ?

त्याचे कारण सांगताना त्या म्हणाल्या की, " मला न्यायधीशपदाचं काम आवडतं. आणि मला काही आर्थिक समस्या नाहीत. मी काही घरातील एकमेव मिळवती व्यक्ती नाही. माझे पती टाटाचे प्रमुख इलेक्ट्रिकल इंजिनियर आहेत. त्यामुळे माझ्या बाबतीत तसा काही प्रश्न नाही. पण हीसुद्धा एक समस्या आहे खरी ! आणि त्यामुळे न्यायाधीश म्हणून चांगली माणसं मिळणं फार कठीण होत चाललंय. त्याशिवाय हे काम तसं खूपच शुष्क आहे. बऱ्याचजणांना पाच तास सतत एका जागी बसून आर्ग्युमेंट्स ऐकणं फार कंटाळवाणं वाटतं ! तरीही मी अभिमानानं सांगते की आमच्या न्यायालयात खरोखर निष्णात न्यायाधीश आहेत, निष्णात वकीलही आहेत ! "

" त्या निष्णात न्यायाधिशांच्या पंक्तीत जेव्हा तुम्ही प्रथम मानाचं पान पटकावलंत तेव्हा तुम्हाला कसं वाटलं ?"

" महाराष्ट्रात मुंबई उच्च न्यायालयाची पहिली स्त्री–न्यायाधीश म्हणून माझी नेमणूक झाल्यावर, खरं सांगायचं तर मला त्याचं विशेष काही वाटलं नाही. पण लोकांनी जरा जास्तच वाहवा केली, त्याचं मला आश्चर्य वाटलं. माझी भावना अशी होती की ही नेमणूक हा व्यवसायाचाच एक भाग झाला. त्यात विशेष काय आहे ? आत्तापर्यंत ह्या व्यवसायात स्त्रियांचं प्रमाण खूप कमी होतं, म्हणून कोणी स्त्री न्यायाधीश झाली नाही इतकंच ! आणि तसं न्यायमूर्तीपद मला काही एका रात्रीत लाभलेलं नाही, इतरांप्रमाणे मलाही काही वर्षं वकिली करावी लागली. वयाची चाळीशी गाठावी लागली."

मला ह्या व्यवसायाची अधिक माहिती करून घ्यायची होती, म्हणून म्हटले, " तुम्हाला ह्या पदाचं अप्रूप वाटलं नाही, तरी एकदा ते पद ग्रहण केल्यानंतर तुम्ही अंगिकृत कर्तव्य पार पाडणारच. तेव्हा मला तुम्ही वकिली करत असतानाचं

काम आणि न्यायमूर्तीपदाचं काम ह्यांचं स्वरूप आणि त्यातला फरक विशद करून सांगाल का ?"

"जरूर ! त्याचं काय आहे. वकिलाला आपलं बुद्धिकौशल्य पणाला लावून केस लढवायची असते. केस जिंकणं किंवा हरणं हे वकिलाच्या दृष्टीनं महत्त्वाचं नसतं. त्यामुळे न्यायाधिशाला आपली बाजू आपण व्यवस्थित पटवून दिली एवढंच समाधान वकिलाला पुरेसं असतं. मग भले न्यायाधीश कोणताही निर्णय देवोत ! मग वाटलं तर तुम्ही अपील करू शकता. न्यायाधिशाचं काम मात्र ह्यापेक्षा वेगळं असतं. त्यांचा निर्णय उपलब्ध पुराव्यानुसार आणि कायद्याला धरून असावा ही जबाबदारी त्यांच्यावर असते. ह्याउलट आपली केस उत्तम रीतीनं न्यायमूर्तींसमोर मांडणं एवढंच वकिलाचं काम असतं. जिथं वकिलाचं काम संपतं तिथे न्यायाधीशाचं काम सुरू होतं. त्यामुळे न्यायाधिशाला जे निर्णय द्यायचे ते कायद्याला धरूनच द्यावे लागतात. ते एकांगी असून चालत नाहीत. कायदा प्रमाण मानून कोणती बाजू बरोबर आहे हे ठरवणं एवढी किमान अपेक्षा आपण न्यायाधिशाकडून करू शकतो. एकूण काय, वकील आणि न्यायाधीश हे एकाच क्षेत्रात आणि एकाच प्रकारचं काम करीत असले तरी त्यांचा दृष्टिकोन मात्र वेगवेगळा असतो."

"संपूर्ण केस ऐकल्यानंतर आणि अभ्यासल्यानंतर तुमचं मतपरिवर्तन होतं का ? आणि युक्तिवाद ऐकून जो निर्णय द्यावासा वाटला, तो कायद्याच्या चौकटीत बसत नसेल तर ?"

"नाही ! जो कायदेशीररीत्या योग्य वाटेल तोच निर्णय द्यावा लागतो. आम्ही कोर्टानं, त्यापूर्वी तशा केसेस्संबंधात दिलेल्या निर्णयांचा अभ्यास केलेला असतो. दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकलेले असतात. केसचा सर्वांगीण, सखोल अभ्यास केलेला असतो. त्यामुळे कधीतरी असं होतं की सुरूवातीला त्या केससंबंधी जे विचार असतात ते कालांतरानं बदलतात. पण तरीही वकिलांचे युक्तिवाद आणि संबंधित कायदा ह्या दोन्हींवर न्यायमूर्तींचे निकाल आधारलेले असतात. त्यांचा विभक्तपणे विचार करता येत नाही. कारण अखेर वकील युक्तिवाद करतो, म्हणजे काय करतो ? तो त्याच्या केससंबंधी सत्य परिस्थिती न्यायाधिशांपुढे मांडतो आणि कायद्याचा आधार घेऊन तुम्हाला पटवून देतो की त्याच्या अशिलाचं कृत्य कायदेशीर आहे. वकिलानं केलेल्या युक्तिवादाची सत्यासत्यता पडताळून पाहण्याची जबाबदारी ही शेवटी न्यायाधिशांची असते. त्याप्रमाणे कायद्यानुसार न्याय देणं हे महत्त्वाचं काम अखेर न्यायाधिशांच्या हाती उरतं."

"न्यायदान करताना एक स्त्री म्हणून तुमच्या दृष्टिकोनात काही फरक पडतो का ?"

"मला नाही तसं वाटत ! लोकांची अशी एक समजूत असते की स्त्री–न्यायाधिशांचा दृष्टिकोन काहीसा निराळा असेल, विशेषतः एखाद्या स्त्रीला न्याय

देताना तिच्या दृष्टिकोनात फरक पडेल. त्या स्त्रीला स्त्री-न्यायाधीश अधिक चांगल्या रीतीनं समजावून घेऊ शकेल ! तेही केवळ कौटुंबिक अथवा वैवाहिक केसेस्‌च्या बाबतीत कदाचित शक्य आहे. पण मला मात्र असं वाटत नाही. तुमच्या खाजगी समस्यांकडे पाहताना एक स्त्री म्हणून तुमचा दृष्टिकोन वेगळा असू शकतो, पण न्यायदानाच्या बाबतीत काही फरक पडेल असं वाटत नाही."

"तरीही 'Divisional Bench'ला जेव्हा दुसऱ्या न्यायाधिशांसह तुम्ही न्यायदानासाठी बसता तेव्हाही हा प्रश्न येत नाही का ? कारण अखेर काही झालं तरी तुमच्या आणि त्यांच्या दृष्टिकोनात फरक पडणारच. त्यामुळे काही गुंतागुंत निर्माण होत नाही का ?"

"तशी गुंतागुंत निर्माण होऊ शकते. कारण मूलतः प्रत्येकाची मनोवृत्ती वेगळी असते. दोन माणसांचा एकच दृष्टिकोन कधीही असू शकत नाही. हे जरी खरं असलं तरी कायद्याची मूलतत्त्वं प्रत्येकालाच स्वीकारावी लागतात. त्याला काही पर्याय नसतो. तरीही कधीतरी एखाद्या केसच्या बाबतीत मतभिन्नता होते. मग अशा वेळी तीन पर्याय असतात. समजा काही वादग्रस्त मुद्यांवर आमचं एकमत होत नसेल तर मी माझ्या सहकारी न्यायमूर्तींना माझं मत पटवून देईन. त्यांना पटलं तर ठीक आहे. तसंच तेही त्यांचे मुद्दे मला पटवून देण्याचा प्रयत्न करतील. मला ते मान्य झाले तर काही प्रश्न उद्‌भवणार नाही. पण प्रदीर्घ चर्चेनंतरही आम्ही दोघंही एकमेकांचं मन वळवण्यात अयशस्वी झालो तर आम्ही 'डिसेंडींग जजमेंट' देऊ ! मग ती केस तिसऱ्या न्यायाधिशांकडे जाईल ! मग तिसरे न्यायमूर्ती जो निर्णय देतील तो अधिकृत मानण्यात येईल. अर्थात त्यांचा निर्णय दोघांपैकी एकाच्या बाजूनं झुकलेला असेल. अर्थात असं नेहमीच होतं असंही नाही, आणि कधी झालेलं नाही असंही नाही. माझ्या संबंधात मात्र असं कधी झालेलं नाही. म्हणूनच पुरुष सहकाऱ्यांबरोबर काम करणं मला अवघड वाटत नाही. कारण स्त्री आणि पुरुषांच्या विचारसरणीत मूलभूत फरक असतो असं काही मला वाटत नाही."

"स्त्री आणि पुरुषांच्या कार्यपद्धतीत काही फरक होणार नाही हे मलाही पटतं, परंतु एखाद्या स्त्रीला वकिली करताना, विशेषतः फौजदारी खटले चालवताना काही मर्यादा पडत नसतील का ? हेच कारण तुम्ही दिवाणी खटले चालवण्यास घेण्याचं होतं का ?"

"नाही ! आपल्याकडे फौजदारी खटले चालवणाऱ्या काही अत्यंत यशस्वी वकील स्त्रिया आहेत. त्यांनी कधी तक्रारीचा सूर काढलेला आढळत नाही. निदान मुंबईत तरी त्यांना कामात काही अडचण येते असं मला वाटत नाही. त्या सरकारी प्रॉसिक्युटर म्हणून उत्तम रीतीनं काम करतात. कैद्यांच्या मुलाखतींसाठी त्यांना कित्येकदा तुरुंगातही जावं लागतं. ज्या काही फौजदारी खटले चालवणाऱ्या स्त्री-

वकिलांची प्रॅक्टीस उत्तम चालते ती काही केवळ सुदैवानं चालते असं नव्हे. त्या तेवढ्या कर्तबगारही आहेत. मी मात्र दिवाणी न्यायालयात काम स्वीकारलं, कारण कायद्याच्या दृष्टीनं हे काम खूपच इंटरेस्टींग आहे. निरनिराळ्या प्रकारच्या कायद्यांचा अभ्यास दिवाणी खटले चालवताना करावा लागतो. उदा. कंपनी लॉ, कर्मशिअल लॉ, कॉन्ट्रॅक्ट, ट्रान्सफर ऑफ प्रॉपर्टी, ट्रस्टीज, करपद्धती, वैवाहिक अथवा कौटुंबिक बाबी, पैशांचे व्यवहार इत्यादी अनेक विषयांच्या कायद्यांचा अभ्यास करायला मिळतो. आणि ते फार चॅलेंजिंग काम असतं."

"ह्या व्यवसायातलं काम आव्हानात्मक असतं, तसंच ह्या व्यवसायाचीही काही मागणी असते. सर्वात मुख्य मागणी वेळेची असते. त्यामुळे व्यवसाय आणि घर ह्यात स्त्री वकील अथवा स्त्री–न्यायमूर्ती ह्यांची ओढांताण होत नाही का ? घर आणि व्यवसाय अशा दुहेरी समर्पणामुळे, द्विधा मनःस्थिती होऊन त्याचा ह्या बुद्धिजन्य व्यवसायावर विपरीत परिणाम होत नाही का ?"

"तुमचं म्हणणं अगदी खरंय. कारण केवळ कोर्टात हजर होणं एवढंच वकिलाचं काम नसतं. त्याआधी त्याला प्रत्येक केसची सखोल माहिती करून घ्यावी लागते. अशिलांशी चर्चा करावी लागते. सर्व कागदपत्र काळजीपूर्वक वाचावे लागतात. कायदेशीर नोटीसा द्याव्या लागतात. कोर्टानं वेळोवेळी दिलेले केसलॉज अभ्यासावे लागतात. अनेक प्रकारची वेळखाऊ कामं असतात. त्यामुळे स्त्रियांना वकिली करताना फार मोठ्या संघर्षाला तोंड द्यावं लागतं. विशेषतः विवाहित वकील स्त्रीला तर संसार आणि मुलाबाळांची जबाबदारी सांभाळत असताना हे सर्व करावं लागतं. हाताशी वेळ थोडा आणि काम भरपूर अशी तिची अवस्था होते. तेवढी ओढाताण स्त्री–न्यायमूर्तींच्या बाबतीत होत नाही. कारण परिस्थिती बरीचशी तुमच्या हातात असते. आम्हालाही केसचा अभ्यास करावाच लागतो, त्यासाठी वेळ द्यावाच लागतो, परंतु एकदा घराची व्यवस्थित घडी बसवली की तितका प्रश्न येत नाही. मुलं लहान असताना मात्र आपल्या व्यवसायाकडे आपण तितकं लक्ष पुरवू शकत नाही. आणि न्यायाधीशपद मिळेपर्यंत मुलंही जाणती होतात. स्त्री सुटवंग होते. आणि अधिक वेळ आपल्या कामाला देऊ शकते. मी गेली चार वर्षं न्यायाधीश म्हणून काम करते. आता मला काहीच प्रश्न नाही. कारण माझा मोठा मुलगा पीएच्. डी. करतोय, मुलगी कॉलेजला जातेय, धाकटा मुलगाही शाळेत जातो. पण असे प्रॉब्लेम तर सुरुवातीला कोणत्याही व्यवसायातल्या स्त्रीला येणारच !"

"तरीही परवा कोर्टात शुभ्र साडीतल्या काळ्याशार झग्याला त्रिकोणी पांढरी गळपट्टी लावलेल्या अनेक तरुण मुली दिसत होत्या. त्यावरून ह्या व्यवसायाचं आकर्षण मुलींना किती आहे ते जाणवतं !"

"खरंय ! आणि ते फार चांगलं चिन्ह आहे. त्यातल्या बऱ्याचशा मुली

निव्वळ व्यावसायिक आकर्षणापोटी नव्हे तर अगदी तळमळीनं ह्या व्यवसायात शिरत आहेत. प्रत्येक माणसाची बुद्धिमत्ता आणि कुवत निरनिराळी असते. पण एखाद्या स्त्रीची जर तेवढी पात्रता असेल, तर तिला पुरेशी संधी उपलब्ध झालीच पाहिजे. केवळ ती स्त्री आहे म्हणून तिची पात्रता आणि बुद्धिमत्ता नाकारली जाऊ नये. ह्यालाच तुम्ही 'स्त्री–मुक्ती' म्हणत असलात तर माझी हरकत नाही. आता माझी शैक्षणिक प्रगती उत्कृष्ट होती, आणि माझ्या वैयक्तिक प्रगतीच्या आड कोणीही आलं नाही. मी एस्. एस्. सी. ला एकूणात पाचवी आणि मुलींमध्ये पहिली आले आणि चॅटफील्ड प्राईझ, नारायण महादेव परमानंद प्राईझ, आणि दादाभाई नवरोजी स्कॉलरशिप मी मिळवली. इंटर आर्टस्ला असताना मुंबई विद्यापीठाची सहा पारितोषिकं आणि शिष्यवृत्त्या मी मिळवल्या होत्या. तो त्या काळातला विक्रमच होता. कॉलेजच्या इंग्रजी आणि गुजराथी भित्तीपत्रकांचंही संपादन मी करीत असे. तत्त्वज्ञान आणि संस्कृत हे विषय घेऊन मी प्रथम वर्गात पदवी परीक्षा पास झाले. आणि पुढे ऑक्सफर्ड इथे तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्रात पदव्युत्तर शिक्षण घेतलं. तिथं मी टेबल टेनिसही उत्कृष्ट खेळत असे. पुढे लंडन इथून मी बॅरिस्टर होऊन मुंबईत आले आणि चौदा फेब्रुवारी १९५८ पासून मुंबई उच्च न्यायालयात वकिली करायला लागले. सांगायचं कारण की, एक स्त्री म्हणून सामोऱ्या येणाऱ्या संधीवर मला कधीही पाणी सोडावं लागलं नाही."

"पण बऱ्याचशा स्त्रिया आपल्या हक्कांबाबत जागरूकच नसतात असं माझं मत आहे. तुम्हाला काय वाटतं ?"

"मी आजपर्यंत अनेक सामाजिक आणि शैक्षणिक संस्थांसाठी काम केलेलं आहे. बरीच वर्षं मी 'महाराष्ट्र स्टेट वुमेन्स कौन्सिल'च्या संसदीय मंडळाची चेअरमन होते. बॉम्बे बार असोसिएशनच्या स्थायी समितीवर आणि महाराष्ट्र बार असोसिएशनच्या शिस्तपालन समितीवर होते. तसंच 'इंडियन फेडरेशन ऑफ वुमेन लॉयर्स' ह्या संस्थेची अध्यक्ष म्हणूनही मी काम केलेलं आहे. अशा संस्थांमधून काम करत असताना अनेक स्त्रिया कायदेशीर सल्ल्यासाठी माझ्याकडे यायच्या, तेव्हा माझ्या असं लक्षात आलं की त्यांना स्त्रीविषयक कायद्यांची काहीच माहिती नसते. कधीतरी त्यांच्या वाचनात त्याविषयी येतं अन् मग त्या वकिलाकडे धाव घेतात. तोपर्यंत चक्क वीस–बावीस वर्षांचा काळ उलटलेला असतो. मग वकिलांना काही करता येत नाही."

"अशा स्त्रियांमध्ये कायद्याची जागृती निर्माण करण्याचं काम..."

"ते काम तुमचं–पत्रकारांचं आहे. वृत्तपत्रांतून अथवा मासिकांतून अल्पशिक्षित स्त्रियांनाही समजेल, अशा सोप्या भाषेत माहितीपर लेख प्रसिद्ध व्हायला हवेत. काही वकिलांना हाताशी धरून प्रकाशकांनी कायदेशीर ज्ञान देणाऱ्या पुस्तिका प्रसिद्ध केल्या पाहिजेत. अधिकाधिक स्त्रियांना शिक्षण घ्यायला उद्युक्त केलं

पाहिज. व्याख्यानांचं आयोजन केलं पाहिजे. दूरदर्शन, आकाशवाणी ह्यासारख्या प्रसार–माध्यमांचा ह्या दृष्टीनं उपयोग करून घेतला पाहिजे. मी न्यायाधीश होण्यापूर्वी खूप मासिकांतून लिहीत असे आता मात्र नाही लिहीत ! ह्या संदर्भात एक अभ्यासण्याजोगा प्रश्न आहे की, दूरदर्शनवरील 'कोर्टाची पायरी' हा उद्‌बोधक आणि मनोरंजक कार्यक्रम कितीजण आवर्जून पाहतात ? की तो कार्यक्रम अखेर एका विशिष्ट वर्तुळापुरताच मर्यादित राहतो ? तसं असेल तर शिक्षणाबरोबर लोकांमध्ये आपोआप जिज्ञासू वृत्तीची वाढ व्हायला हवी. लोकांनी स्वतःच्या हक्कांबद्दल सजग व्हायला हवं. तर ह्या सर्वांचा खऱ्या अर्थानं उपयोग होईल. इंग्रजीत एक म्हण आहे ना, घोड्याला पाण्यापर्यंत नेता येतं, पाण्यात लावता येत नाही !"

"हे विचार करत असतानाच आणखी एक प्रश्न मनात आला तो असा की सामान्य माणसाला कोर्टाचं कामकाज समजणं कठीण जातं. कारण ते गुंतागुंतीचं आणि खर्चिक व वेळखाऊ असतं. कदाचित् म्हणूनच 'शहाण्यानं कोर्टाची पायरी चढू नये' असा सल्ला जाणती माणसं देत असावीत. म्हणजे जरूर पडली तरी कोर्टात खटले दाखल करण्यापेक्षा हक्कावर पाणी सोडणं माणसं पसंत करतात. तर त्या दृष्टीनं तुम्हाला काही उपाय सुचवता येतील का ?"

"तसे उपाय कसे सुचवता येतील ? तुम्हाला ठाऊक आहे, जसं म्हणतात की हजार दोषी निर्दोष सुटले तरी चालतील पण एखादाही निरपराध माणूस बळी जातः कामा नये. ह्या दृष्टिकोनातूनच कोर्टाच्या कामकाजाची रचना केलेली असते. कोर्टापर्यंत येण्यास काही व्यावहारिक अडचणी सामान्य माणसाला निश्चितपणे येत असतील, पण कोर्टाचं कामकाज मात्र तुम्ही म्हणता तितकं काही गुंतागुंतीचं नाही. तसं फार सोपं आहे ते ! ह्या कामकाजाची साधारण पद्धत काय असते की-न्यायाधिशाला निर्णय देण्यापूर्वी दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकून घ्यावे लागतात. एकाच बाजूचं ऐकून निर्णय घेता येत नाही हे तर खरंय ? म्हणजे एक बाजू कोर्टात दाखल झाली हे दुसऱ्या पार्टीला कळायलाच हवं. म्हणजे तशी नोटीस गेलीच पाहिजे. दोन्ही पार्टीज्‌ना केस दाखल करण्यासाठी सवड द्यावी लागते. दोन्हीकडच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकून घ्यावा लागतो. दोघांनाही आपले साक्षीपुरावे कोर्टापुढे मांडण्याची संधी द्यावी लागते. नंतरच योग्य तो निर्णय दिला जातो. कोर्टाचं कामकाज हे संपूर्णपणे ह्याच मूलभूत तत्त्वांच्या परिघात फिरत असतं. सध्याच्या समाजरचनेत ह्यातील कोणत्याही मूलभूत तत्त्वाला धक्का लावून न्यायदान करता येणं अशक्य आहे. ते ह्याहून सुलभ होणंही शक्यच नाही. त्यामुळे तेवढा वेळ हा लागणारच !"

"ह्याच कारणांमुळे आज कोर्टात अनेक केसेस् वर्षानुवर्षं पडून आहेत का ?"

"होय ! केसेस् अनेक आणि जज्ज मात्र थोडे ! तेव्हा बऱ्याच केसेस् पडून राहणारच ! दोष न्यायदानाच्या पद्धतीचा नाही, तो अंमलात आणण्याच्या पद्ध-

तीचा आहे. न्यायाधिशांच्या नेमणुका हा न्यायालयाच्या अखत्यारीतला बिषय नाही. त्यामुळे अपरिहार्यपणे लोकांचं नुकसान होणारच ! अर्थात किती केसेस् कोर्टात पडून आहेत ते केसच्या स्वरूपावर आणि कोणत्या कोर्टात त्या दाखल केल्या आहेत, त्यावर अवलंबून आहे. उच्च न्यायालयात फार थोडे फौजदारी खटले शिल्लक आहेत. पण काही दिवाणी खटले मात्र पाच–पाच वर्षांपर्यंत पडून आहेत. केसचं स्वरूपही त्याला कारणीभूत आहे. एखाद्या केसचा अर्ध्या तासात निकाल लागतो तर एखादी केस महिनो न् महिने चालते. "

"कोर्टाचं कामकाज अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचावं म्हणून ते स्थानिक भाषेत चालावं असा एक विचारप्रवाह आहे. त्याबद्दल तुम्हाला काय वाटतं ? "

"मी त्याविरुद्ध आहे. कारण निकाल देताना आम्हाला संपूर्ण भारतातील कोर्टाच्या केसेस्चे निकाल विचारात घ्यावे लागतात. न्यायमूर्तींना सर्वच भाषा अवगत असतील, अस्खलितपणे बोलता येतील असं थोडंच आहे ? यामुळे उच्च न्यायालयात तरी हे शक्य नाही. अर्थात स्थानिक पातळीवरील कोर्टांतून बऱ्याचदा स्थानिक भाषेत कामकाज चालतंच ! तेव्हा तसा काही प्रश्न नाही. "

"न्यायालयातलं कामकाज चोख असावं अशी अपेक्षा असते. तसं ते असतंही. पण 'उडदामागे काळे–गोरे' तसं ते इथंही होण्याची शक्यता असते. त्यातून दोन्ही अशिलं स्वतःकडे ठेवणं, साक्षीदार फोडणं अशा प्रकारची गैरकृत्यं होऊ शकतात. त्यावर उपाय काय ?"

"वेल् ! तसं म्हटलं तर कोणत्या व्यवसायात गैरकृत्यांना वाव नसतो ? गैरकृत्य करणाऱ्यांना हजार मार्ग खुले असतात. पण त्यावरही प्रतिबंध असतोच ना ? जे इतर व्यवसायांच्या बाबतीत आहे. तेच ह्या व्यवसायाच्या बाबतीत आहे. 'महाराष्ट्र बार कौन्सिल'ला न्यायालयीन कामकाजातील अशा कोणत्याही गैरकृत्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा कायदेशीर हक्क आहे. "

"न्यायमूर्ती एखाद्या खटल्याच्या संदर्भात मतप्रदर्शन करतात, तेव्हा त्या निमित्तानं, त्यांच्या हेतूबद्दल संशय उत्पन्न करणारी टीका झाल्यास न्यायमूर्तींना काम करणं कठीण होईल आणि न्यायालय ही संस्थाच धोक्यात येईल. तुम्हाला त्याबद्दल काय वाटतं ?"

"न्यायाधिशांच्या निकालपत्रावर टीका होणारच ! बोलणाऱ्यांचं तोंड थोडंच धरता येतं ? ह्याविषयी मी काही बोलू शकत नाही. अशा प्रकारची टीका रास्त आहे किंवा नाही हे लोकांनीच ठरवायचं आहे. मी काय सांगणार ?"

"हुंडाविरोधी अथवा अस्पृश्यताविरोधी कायदे आज आपल्या देशात अस्तित्वात आहेत. तरी हरिजनांवरील अत्त्याचार देशभर चालूच आहेत. हुंड्याला बळी पडून अनेक तरुणींवर आत्मघाताचेही प्रसंग येतच आहेत. ह्या कायद्याच्या अंमलबजावणीच्या दृष्टीनं एक न्यायाधीश ह्या नात्यानं तुम्ही काय करू शकाल ?"

"वेल्! बेसिकली आपली पद्धत काय आहे? लोकांनी अन्यायाविरुद्ध कोर्टात दाद मागितली पाहिजे न्यायमूर्ती म्हणून मी काही लोकांना जाऊन सांगू शकत नाही, की पाहा, 'तुमच्या व्याह्यांनी हुंडा घेतलाय, तेव्हा तुम्ही कोर्टात केस का नाही दाखल करीत?' हे काही माझं काम नाही. कायदे लोकांसाठीच असतात, ते त्यांनी समजून घेतले पाहिजेत. त्यानंतरच माझं काम सुरू होईल. मी एखाद्या केसमध्ये फक्त निकाल देऊ शकते. इतरांना तो गुन्हा करण्यापासून परावृत्त तर करू शकत नाही? तुम्हाला सांगितलं तर आश्चर्य वाटेल, पण अशा सामाजिक समस्यांवरील केसेस् येतच नाहीत. आजपर्यंत माझ्याकडे एकही हुंडाविरोधी केस आलेली नाही. लोकांना ह्या रूढी कितीही जाचक वाटत असल्या, तरी ते कोर्टापुढे यायला तयार होत नाहीत. हे कशाचं निदर्शक आहे? को अशा रूढी लोकांना मान्य आहेत? कोणीही त्यांना विरोध करायला धजावत नाही. मग अशा समाज-व्यवस्थेत तुमचे कायदे धूळ खातच पडणार! त्याची अंमलबजावणी करणं फार कठीण आहे."

"पण मग हे जनजागरणाचं काम कोण अधिक चांगल्या रीतीनं करू शकेल?"

"ते आमचं आम्हीच केलं पाहिजे. समजा, दोन्ही– वधुपक्ष आणि वरपक्षाचं अनुकूल मत असेल आणि त्रयस्थानं जर वधुपित्याला सांगितलं, तू हुंडा देऊ नकोस तर तो म्हणेल, 'बाबारे, तू माझ्या मुलीच्या हिताच्या आड का येतोस? तुझा काय संबंध?' त्यामुळे मनाविरुद्ध हुंडा द्यावा लागत असेल, तरी वधुपिता काही कोर्टात तक्रार करणार नाही. त्यासाठी त्या रूढीविरुद्ध सामाजिक मतपरिवर्तन केलं पाहिजे. तेवढं लोकशिक्षण दिलं गेलं पाहिजे. आज लोक कोर्टात का येत नाहीत? कारण, आज हे लग्न मोडलं तर उद्या दुसरं लग्न होणार नाही. जोपर्यंत ही धास्ती वधु-पित्याच्या मनात आहे, तोपर्यंत तो कोर्टाची पायरी चढणार नाही. तेव्हा त्याच्या मुलीच्या भवितव्याची धूळधाण होणार नाही अशी जागृती समाजात व्हायला हवी जे हुंडाबंदीचं तेच अस्पृश्यतेचं! अशा सामाजिक समस्यांवरील जनजागरणाचं काम हे केवळ समाजसेवकच करू शकतील असं मला मनापासून वाटतं!"

मुलाखत संपली. पण विचारायचं खूप राहून गेलंय हे मला सतत जाणवत होतं. त्याला कारणही तसंच होतं. काही वादग्रस्त प्रश्नांना बगल देण्याची चतुराई त्या करतात. तसंच त्यांनी दिलेल्या निकालाबाबत कोणतंही मत व्यक्त न करण्याचा कणखरपणाही त्या दाखवतात. व्यवसायायुळे अंगात रुजलेली काळजीपूर्वकता आणि तटस्थता बोलताना त्यांच्या शब्दाशब्दांतून प्रत्ययाला येते. न्यायमूर्ती-पदाची जबाबदारी सांभाळताना त्या प्रतिष्ठित अन् पवित्र व्यवसायाची आचार-संहिता पाळण्याचं त्यांचं धोरण हे म्हणूनच मला त्यांच्याइतकंच लोभनीय वाटलं.

'माहेर' एप्रिल १९८२

चित्रपट तारकांची छबीछाया

रेशमा

करी रोडचा एक मुस्लीम मोहल्ला ! जागोजागी बाहेर खाटा टाकलेल्या ! त्यावर पानानं रंगवलेल्या तोंडानं बाजूलाच पिंक टाकीत गप्पा मारणारे अर्धेउघडे, लुंग्या लावलेले, तलवारकट् दाढीवाले पुरुष. घागरा, चोळणा आणि वर झिर-झिरीत ओढणी डोक्यापर्यंत ओढून घेत तारस्वरात कलकलणाऱ्या बायका. गुलाम अलीच्या गझला ऐकवता–ऐकवता दोन गुलाबी चायचा कडक पुकारा करणारी मुसलमानी हॉटेल्स, पानाचे ठेले आणि पत्र्यांच्या शेड्समध्ये भंगाराचा किंवा इतर अनेक तऱ्हेचा उद्योग करणारे त्यांचेच स्वजातीय !

सर्वच घरांची तोंडं आतल्या बाजूला वळवलेली. पण खिडकीचा एक किल-किलता डोळा मात्र गल्लीच्या तोंडावर रोखलेला.

अशाच एका एकमजली घराच्या तुटक्या लाकडी जिन्याच्या तोंडाशी वरच्या मजल्यावरील चौकोनी चौकात बरोबर मध्यभागी युद्ध पेटलेलं ! बायकांचं तार-स्वरातलं ओरडणं, पोरांचं आकांतानं किंचाळणं आणि पुरुषांचं अर्वाच्य शिव्या देत भांडणं सोडवणं आणि पुन्हा भांडणावर येणं ! आता, ह्या क्षणी ह्यातलं कोणीही भसकन् खिशातून चाकू बाहेर काढेल आणि समोरच्यावर वार करेल इतकं वाता-वरण तापलेलं ! मार खाणारणीला घेराव घालून वाचवू पाहणाऱ्या पुरुषांच्या गराड्यात वस्त्रांचं भान सुटलेली एक मुलगी मुसंडी मारून आत शिरू पाहते आणि त्या बाईचा गळाच पकडते !

" बोल साली हरामजादी ! क्यूं मेरे बहेनको मारा ? मेरे बेहेनपे हाथ उठाती है, तेरे दोनो हाथ कलम करके रख दूंगी ! "

त्या चवताळलेल्या वाघिणीचे हात फटाफट तिच्या तोंडावर, अंगावर पडत

असतात. डोळ्यांत रक्त उतरलेलं ! तिचं ते उग्रचंडीचं रूप पाहून आजूबाजूच्या बायकाच काय पुरुषसुद्धा पाऊलभर मागे सरकतात. शेवटी दुसरीचा शोहर मध्ये पडतो, माफी मागतो, तेव्हा कुठे धुमसत, धपापत ही मागे होते. तोंडानं शिव्यांचा मारा चालूच !

तर अशी ही रेशमा ! कोणत्याही बाईलाच काय पुरुषालाही सहजपणे लोळवणारी. आपल्या किंवा भावंडांच्या वाटेस जाणाऱ्याचा किंचितही मुलाहिजा न बाळगता त्याच्यावर तुटून कोसळणारी, स्वत्वाचा आणि स्त्रीत्वाचा अपमान करणाऱ्या कोणालाही आपल्या राकट पंजाची ताकद दाखवणारी !

सहज म्हणून बोलता बोलता तिनं हात हातात घेऊन दाबला तरी चटकन डोळ्यांत पाणी यावं. सहज म्हणून चालता-चालता तिचा दंड पकडावा तर टरारलेले टणक स्नायू हाताला लागतील. सहज म्हणून तिच्यावरून नजर फिरवली तरी कित्येक जखमांचे वण बहादुरीनं अंगावर वागवलेले दिसतील. काही जखमा जुन्या तर काही ताज्या !

चित्रनगरीच्या आटपाटनगरातील एका रस्त्यावर काही मंडळी गोळा झालेली. हॅटमधली फिल्लमवाली व्यग्रतेनं तिथं वावरणारी, तर उरलेली त्यांची मदतगार मंडळी अधेमधे लुडबुडणारी ! कॅमेऱ्याची ट्रॉली सरकतेय, त्यावर बसलेला कॅमेरामन भिंगाला डोळे लावून समोरची घटना किती जिवंतपणे कॅमेऱ्यात पकडता येईल ह्याचे आडाखे-अंदाज बांधण्यात मग्न आहे. एक मोठ्ठा अवजड ट्रक-सामानानं गच्च भरलेला-समोरच्या मोकळ्या रस्त्यावरून सुसाट येतोय, हॉर्न वाजवतोय. आणि तेवढ्यात, डोळ्यांचं पातं लवतं न लवतं तोच एक मुलगी एक कोलांटी खाऊन बरोबर त्या ट्रकच्या पुढच्या चाकाखाली पडते आणि तो ट्रक गचकन् थांबतो. दोघांमध्ये अवघी किनारभर रेषा ! जणू जीवन-मरणातील किनारभर अंतरच ते !

पण ही तर निव्वळ चित्रीकरणाची तयारी ! अजून खरं चित्रीकरण व्हायचंच आहे. दोन-तीन रिहर्सलसनंतर अंग घासलेलं, खरचटलेलं अशा अवस्थेत फायनल शॉटसाठी तयार झालेली ती मुलगी, मोठ्या आत्मविश्वासानं रस्त्याच्या कडेला उभी असते. दक्ष मानसिक पावित्र्यात ! ट्रक रिव्हर्स घेऊन मूळ जागेवर जाण्याच्या तयारीत. आणि ड्रायव्हरच्या कानात डायरेक्टर काहीतरी कुजबुजतो. चित्रीकरणाला सुरुवात होते. ती मुलगी कोलांटी खाऊन रस्त्यावर, ट्रक एव्हाना थांबायला हवा. पण-पण तो न थांबता तिला धडक मारून फर्लांगभर पुढेच जाऊन थांबतो. तशाही स्थितीत ती आपला चेहरा कॅमेऱ्यापासून हटवते. शॉट ओ. के. होतो. डायरेक्टर, कॅमेरामन, स्टंटमास्टर धावत येतात. ड्रायव्हरला शिव्या घालतात. हाडं मोडलेली, रक्तबंबाळ झालेली ती मुलगी रस्त्याच्या कडेला विव्हळत ते नाटक असहाय्यपणे पाहतेय. कालपरवा डायरेक्टरनं केलेल्या अवाजवी मागणीला विरोध

केल्याची ही शिक्षा !

तर अशी ही काहीशी रासवट, गावरान रेशमा ! तलम रेशीमपण फक्त नावात वागवणारी. एरवी तिचं रूप, घट्टीकट्टी शरीरयष्टी, बोलण्याची धाटणी ह्यात कुठेही रेशमी मुलायमपण नाही. पण तरीही तिच्या ह्या असल्या गावरान स्वरूपालाही कधी विश्वासात घेतलं, त्यावर स्नेहाचे चार गुलाबपाण्याचे थेंब शिंपडले तर ते गावरान रूपही फुलून येतं.

सरत्या पावसाळ्यातल्या एका थंड, कुंद, ओल्या दुपारी गच्चीवरल्या बैठकीत, समोरच्या अथांग सागराकडे, त्यावर डोलणाऱ्या बोटींच्या तापयांकडे नजर लावीत, कॉफीचे घुटके घेता–घेता अंतर्मुख होऊन गेलेल्या रेशमाचं गावरान रूप किती बेगडी आहे, तिच्या आत्म्याचं अस्सल रूप किती निर्मळ, सुंदर आहे ते कळतं. तिच्या वागण्यामागची कारणमीमांसा ध्यानी येते. अखेर आत्म्याच्या तळातून आलेलं सच्चं निवेदन हेच तिच्या आयुष्यातलं एकमेव सत्य असतं. ज्याला उजळवायला मेणबत्त्या, शमादानांची जरूरी नसते. ते सत्य स्वयंप्रकाशित असतं, लखलखीत असतं.

फिल्मी दुनियेचं बाजारू, बेगडी स्वरूप वास्तव जीवनात मिसळून तयार झालेल्या रसायनाचा दाट थर हलक्या हातानं दूर सारला की उमलतं निर्मळ मनोगत ! ते सांगणाऱ्याचं सांगणं खरं, ऐकणाऱ्याचं स्थान आणि अस्तित्व गौण !

" बात ये है माधुरी, मैने असलमे दुनिया देखी है. चौदा सालकी खेलकूदकी उमरमे जब मै अपनी जान हथेलीपर रखकर ये इंडस्ट्रीमे स्टंटसीन करने लगी तो मेरे सामने बस्स मजबुरी थी । मेरी बेसहारा माँ और भाई-बहन, इन सबकी जिंदगी बसानी है तो भले मेरी अकेलीकी जिंदगी बरबाद क्यूं न हो ?"

" खरंय ! पण जिंदगी बरबाद करायला तुला हे एकच क्षेत्र सापडलं ?"

" हो ! कारण इतर ठिकाणी जिंदगी बरबाद होऊन हातात पाच–सहाशे रुपयांच्या कवडथा पडल्या असत्या. त्यात हा एवढा प्रपंच निभवायचा कसा ? इतने कम पैसोंमे तो ना आदमी घर बसा सकता है ना सबके अरमान पुरे कर सकता है ! त्यावेळी कुठे पैसा चांगला मिळत असेल तर मग जीव गहाण ठेवायलाही माझी हरकत नव्हती. फक्त माझ्या आईचं, भावंडांचं सुख तेवढं दिसत होतं. त्यांच्या चेहऱ्यावरील समाधानाचं हसू ही एवढी एकच गोष्ट इतकी मोलाची होती की त्यापुढे माझं जीवन मला कवडीमोल वाटत होतं. "

" तू लहानपणापासून बंडखोर होतीस का ग ?"

" हां ! तशी मस्तीखोर होतेच. सायकल छान चालवायची. मग वेगात जाता जाता कोणाला तरी हुल देऊन जायची. कोणाच्या डोक्यावरच्या टोप्या उडवायची. कोणाची धोतरं सोडायची आणि तक्रारी घेऊन भय्यालोक घरी आले की मग दुपारी ते हातगाडीवर झोपले असताना त्यांच्या तोंडावर तेलाची कुपीच उपडी करून पळा-

यचं ! तर हे असले उद्योग बालपणापासून केले. पण ती मस्ती वेगळी, ते धाडस वेगळं ! त्या धाडसात बेफिकीरी होती. काही झालं तरी वडील सांभाळून घेतील, पैसेवाल्याची छोकरी म्हणून लोकही हात चोळून स्वस्त बसतील ही खात्री होती. पण फिल्म इंडस्ट्रीत येऊन जी धाडसाची कामं मी अंगावर घेतली त्यामागे निव्वळ मजबुरी होती, आणि ह्या मजबुरीमुळे जी ताकद, जो जोश येतो तो वेगळाच असतो. आपल्यावरची जबाबदारी ओळखून मजबुरीपोटी जे रिस्क मी घेत होते ती हकिकत होती, जिंदगीकी वो सच्चाई थी ! नाहीतर कोणाला असल्या कामाची हौस तर नसतेच. पंचवीस फुटांवरून खाली उडी मारली तर हातपाय तुटणार, किमान जखमी तर होणारच. हे सर्व डोळ्यांना दिसत असूनसुद्धा जिवावर उदार होणं–ये सबसे बडी बात है, मुश्किल बात है । 'शोले' त बसंतीचा टांगा बेभान होऊन दौडवताना मला खात्री होती, ह्या घोडदौडीत माझा हातपाय तुटणार आहेत, दगडधोंड्यात मी ठेचाळून पडणार आहे. पण तेव्हा माझ्या डोळ्यांपुढे माझी आई होती, चिमणी भावंडं होती आणि त्यांची परवरीश करण्यासाठी लागणारा पैसा होता. पैसा ! बस्स ! दुनियामे जीनेके लिए और कुछ नही चाहिए ! रुपयोंके इन टुकडोंके बिना जिंदगी तो मौतके बराबर है ! माधुरी, ये कोई फिल्मी डायलॉग नही है ! ये जिंदगीकी असलीयत है, जो मैने देखी है–सात सालकी उमरसे !"

सातव्या वर्षांपर्यंत फुलपंखी जीवन जगणाऱ्या रेशमाच्या आयुष्यात अशी कोणती स्थित्यंतरं झाली की ज्यामुळे ती अंतर्बाह्य बदलली ! रेशमा थोडंफार हातचं राखून सांगून टाकते–

"आज सगळी दुनिया, सगळा माहौल बदललाय. रिश्तेदार, त्यांची वागणूक बदललीय. आता जुन्या गोष्टी उकरून काढून त्यांना दुखवण्याची माझी इच्छा नाही. पण सात वर्षांपर्यंत ऐषोआराम आणि श्रीमंती भोगलेली मी–खानदानी घरातली आम्ही सर्व अक्षरशः रस्त्यावर आलो. वडिलांना भाईबंदांनी धंद्यात बुडवलं, घराबाहेर काढलं. वडिलांनी त्या गोष्टीची फारच हाय खाल्ली. त्यांचं डोकं फिरलं. मग त्यांना काही वर्षं मेंटल हॉस्पिटलला ठेवलं होतं. आई आम्हा कच्च्याबच्च्यांना घेऊन झोपडपट्टीत राहायची. ते आयुष्य आम्ही कधी दुरूनही पाहिलेलं नव्हतं. मग आम्ही काही दिवस चोरटा तांदूळ विकायचा धंदा केला. आई आपली कोणाचं रेशन आणून दे, धुणीभांडी कर असं करून आम्हा मुलांना जेमतेम खाऊ–पिऊ घालायची. एक वेळ तर अशी आली की आम्ही सगळीजण नुसतं पाणी पिऊन झोपत होतो. दुकानवाल्यांनी गोणपाटं दिली होती. भर थंडीत रस्त्याकडेला तीच अंगावर घेऊन कुडकुडत एकमेकांच्या कुशीची ऊब घत पडून होतो.

"मला एक प्रसंग अजूनही आठवतो. आम्हाला घराबाहेर काढलं होतं. आम्ही रस्त्यावर पडलो होतो. खूप तहान लागली म्हणून पाण्यासाठी काकांच्या दारात गेले. त्यानं तोच तांब्या ठाणकन् फेकून मला मारला. माझ्या कपाळावर ही ऽ एवढी

खोक पडली. सगळं रक्त तोंडभर झालं. आणि मी पेटून उठले. बस्स! ह्या लोकांना माझ्या ह्या वाह्यलेल्या रक्ताची किंमत किती ते दाखवून द्यायचंच. आईचं काय! बिचारी जवान आहे. आपल्याला वाऱ्यावर सोडून कोणाही बरोबर ती पळून जाऊ शकतेय. तरी तसं न करता ती आपल्याला जिवाच्या करारानं सांभाळते. पण अशं ती किती दिवस सांभाळेल? आज आपलं बालपण ती सांभाळतेय खरी, पण उद्या आपली जवानी कशी सांभाळेल ती? नही! हमे अपनी जवानी, अपना जीवन बचाना है और वो भी अपना जमीर बेचकर नही, बहादुरीसे! इमानदारीसे! वफादारीसे! और हम अझिम अंकलसे मिले!"

"अझिम अंकलना तू त्यापूर्वी ओळखत होतीस?"

"हो! थोडीफार! माझ्या वडिलांच्या दुकानात ते नेहमी येत असत. त्यांची ओळख होती. त्यांच्यामुळेच मी ह्या क्षेत्रात आले, स्थिरावले. नाहीतर ह्या क्षेत्रात येण्याची हिंमत मी कशी करू शकले असते? तशी मजबूरीपोटी हिंमतही मी केली असती, पण तरी इतरांना जो त्रास भोगावा लागतो, ज्या अडचणी वाटचाला येतात त्या अझिम अंकलमुळे माझ्या वाटचाला मुळीच आल्या नाहीत. नाहीतर इतर मुलींना लोक किती फसवतात, त्यांचा फायदा घेतात. ह्या सगळ्यांपासून मला त्यांनी वाचवलं. मी त्यांची अत्यंत ऋणी आहे. त्यांना मी गुरुस्थानी मानते. त्यांनी मला खराखुरा आधार दिला. आज मी इंडस्ट्रीत जे काही नाव कमावलंय, टिकून राहिलेय ती केवळ त्यांच्यामुळे! त्यांनी मला नुसतंच इंट्रोड्यूस केल नाही तर हे काम, ह्या कामातल्या खुबी पण शिकवल्या."

"चौदाव्या वर्षी तुला मिळालेलं पहिलं पिक्चर?"

"राखी और हथकडी! ज्यात मी आशा पारेखची डुप्लिकेट म्हणून सर्वात प्रथम उभी राहिले. एक मात्र होतं, वयाच्या मानानं मी उफाड्याची होते. उभार बांध्याची, ठसठशीत रूपाची होते. अझिम अंकल ह्या चित्रपटाचे फाईट कंपोझर होते."

"पण इथे ज्या पैशांसाठी तू आलीस, तो कितपत मिळेल, किंवहुना भरपूर मिळेल अशी तुझी खात्री होती?"

"अर्थातच! त्या काळात मला एका दिवसाच्या कामाचे १७५ रुपये मिळत होते. म्हणजे एक गोष्ट सहज लक्षात येत होती की जर मी अधिक मेहनत केली, माझ्यात काम करण्याची ताकद आणि लगन असेल तर मला भरपूर काम मिळेल, नाव मिळेल. स्वाभाविक पैसाही पायाशी चालत येईल!"

"पण काय ग, कोणत्याही पूर्वानुभवाशिवाय, प्रशिक्षणाशिवाय हे एवढं जोखमीचं काम तुम्ही मुली केवळ जिद्दीवर करू शकता? मला मोठं आश्चर्य वाटतं!"

"हे बघ जिद्द ही तर हवीच. तसं थोडंफार जुजबी ज्ञान आम्हाला देतात.

सुरुवातीला जुहुला रोज सकाळी सहा वाजता मला जावं लागे. तिथे फायटींगचं तंत्र, जुडो, कराटे, तलवारबाजी ह्यांचं शिक्षण दिलं जायचं. एरवी फाईट मार सांगितलं आणि ठेवून दिली एक फाईट, इतकं साधं–सोपं नसतं ना ते पिक्चर-मध्ये ! वहाँ मस्तीसे काम नही चलता है, वहाँ चाहिए जजमेंट और फिनिशिंग ! ते नसेल तर फाईटिंगला काही अर्थच नाही."

"म्हणजे ती मारामारीसुद्धा सरळ, सिधी नसते तर !"

"छे ग ! एक साधा ठोसा मारायचा तर हात जलद येऊन चालणार नाही, तर तो हात एका ठराविक वेळात, ठराविक पद्धतीनुसार फिरवून तो ठोसा मारला पाहिजे. आता त्या चित्रपटात मी आशा पारेखची डुप्लिकेट म्हणून काम करत होते ना– तर त्यात हाणामारी, स्टंट सीन्स तर होतेच, पण तिचा डबल रोलही होता. त्यामुळे थोडंफार ॲक्टिंगही करावं लागत होतं. पण हां, ते करतानासुद्धा कॅमेरा-समोर अशा रीतीनं शॉट द्यायचा की आपला चेहरा झाकला गेला पाहिजे. उद्या समज आईला बेटी मिठी मारते असा सीन आहे तर आशाचा चेहरा कॅमेऱ्यासमोर, पण मी केवळ माझ्या हातांनी, शरीरानं असा अभिनय करायचा की, जणू काही मी तिला भावनावेगानं मिठी मारतेय. तर ते एक मुख्य तंत्र असतं."

"जजमेंटचं काय म्हणत होतीस तू ?"

"हा तर जजमेंट आणि टायमिंग ! म्हणजे असं की– 'सायलेन्स ! कॅमेरा स्टार्ट !'– असं बोललं की, समोरचा फाईट मारणार ! त्याचा हात माझ्या चेहऱ्याजवळ येण्यापूर्वी मी माझा चेहरा हटवायचा तो अशा रीतीनं की, पडद्यावर वाटलं पाहिजे त्याची जोरदार फाईट मी खाल्लीय ! पण प्रत्यक्षात मात्र मी माझा चेहरा वाचवलेला असतो. तसंच दुसऱ्याला मारत असताना नेमका हात कुठे रोखायचा हे कळलं पाहिजे. नाही तर एखाद्याची बत्तीशीच पडायची. आता एखाद्या जागेवर उंचावरून उडी मारायचा शॉट आहे, फाईट-मास्टर फिल्ड दाखवेल– ह्या एवढ्याच जागेत तुला पडायचंय, ह्याबाहेर गेलीस तर आऊट ऑफ कॅमेरा जाशील ! तर मग आम्हाला स्वतःला जर जजमेंट नसेल, नेमकं कुठे पडायचं त्याचा अंदाज नसेल तर आम्ही कुठेही पडून कॅमेऱ्याच्या क्षेत्राबाहेर जाऊ आणि एवढा रिस्की शॉट दिलेला फुकट जाईल. मग अशा वेळी अगदी एकटक नजर त्या जागेवर रोवून बरोबर तिथंच पडता आलं पाहिजे. उगाच उंचावरून ठोकली उडी आणि दिला शॉट– इतकं सरळ गणित नाही ते !

"तसंच बऱ्याचदा चित्रपटात उतारावरून रोलिंगचे शॉट्स असतात. अमिताभ बच्चनसारखे नट असे शॉट्स स्वतःच देतात. पण त्यांच्या हिरॉइन्स अशा शॉट्सना सहसा तयार होत नाहीत. मग हिरो ओरिजनल, आम्ही डुप्लिकेट ! तर अशा शॉटमध्ये रोलिंग करत येताना मी अमिताभ बच्चनच्या बॉडीशी माझा चेहरा अशा रीतीनं कव्हर करत रोलिंग करत येणार की, लोकांना अमिताभचा चेहरा

दिसतो, त्याला लपेटलेली मी ! म्हणजे लोकांना त्या शॉटमध्ये खरेखुरे हिरो-हिरॉईन्स काम करतात असं वाटणार !

"आता टाईमिंगविषयी ! आम्हाला ठाऊक असतं की, कॅमेऱ्यापासून अमुक इतक्या अंतरावर आलो की आमचा चेहरा दिसणार. ते टाळायचं असेल तर नेमकं त्या अंतरावर आपला चेहरा बाजूला वळवायचा. म्हणजे कॅमेरा, अँगल आणि आमची सफाई ! 'शोले'चा तो टांगा दौडवायचा प्रसिद्ध सीन तुला आठवत असेल ! वसंतीच्या मागे चार डाकू लागलेत... तर कॅमेरा माझा चेहरा टिपेल त्याच्या नेमकं एक सेकंद आधी मी मागे वळून पाहिलंय की माझ्या मागे ते चौघे डाकू येतायत की काय ? तर हे टायमिंग टेक्निक आहे."

"वा ! ही तंत्रं फार सुरेख सांगितलीस हं तू ! पण काय ग रेशमा, आज हॉर्स रायडिंगमध्ये तू एवढं नाव कमावलंस, तू कधी शिकलीस ते ? इथं येण्यापूर्वी की नंतर ?"

"इथे येण्यापूर्वीही नाही आणि नंतरही नाही."

"म्हणजे ?"

"अल्लाकी दुवासे नाम तो हो गया है मेरा रायडींगमे ! मगर मै वो कभी सिखीही नही थी ! सुरुवातीला ना काय झालं, मला उमंग होती, शौक होता. त्यामुळे आडवीतिडवी पडले, लागलं– खरचटलं तरी मी काही बोलायची नाही. शॉट ओ. के. झाला ना ? बस्स ! और एक, मेरा दिमाग बहोत तेज है. दुसऱ्यानं सांगितलेली कोणतीही गोष्ट माझ्या डोक्यात पक्की बसते. नुसतं तुम्हाला काही करताना मी पाहिलं ना तर तीच गोष्ट नंतर तुमच्यापेक्षा पण मी चांगली करून दाखवेन. इतकी माझी स्मरणशक्ती तेज आहे. हां, तर काय सांगत होते मी ?"

"तुझ्या रायडिंगविषयी !"

"हां, तर माझं इंडस्ट्रीत जरा नाव होत चाललं होतं. कोणीतरी 'उपरवाला जाने' ह्या चित्रपटासाठी (जो अजून डब्यात पडून आहे !) माझं नाव सुचवलं. रेहानाची डुप्लिकेट म्हणून मी गेले. तिथे त्या लोकांनी मला विचारलं, 'तुला घोडा चालवायला येतो का ?' मी खामोश ! कारण कधीतरी आमच्या मोहल्ल्यात रमझानच्या वेळेला घोडेवाले येत. त्यांच्या तट्टांवर पंधरा पैसे देऊन मी बसलेली. एरवी घोडा दौडवणं म्हणजे काय ते मला कुठं ठाऊक होतं ? पण त्यावेळी मला पैशांची फार जरूरी होती. आता मी राहते ना, त्या घराचे पैसे दोन दिवसांत भरायचे होते. म्हटलं चला, दोन दिवस काम केलं तर पाचशे रुपये ॲडव्हान्स तरी भरता येईल. एकदा छप्पर मिळालं हक्काचं की नंतर महिनाभर हातपाय मोडून पडले तरी हरकत नाही. ठरवलं, घोडा दौडवायचा. माझ्याबरोबर शूटींगला तेव्हा आई यायची. ती मला बसू देईना. तिला म्हटलं, 'तू चूप राहा. इथे मी काम करायला आलेय. पैशांची मजबुरी आहे, इज्जतका भी सवाल है.

जादासे जादा क्या होगा ? गिरेंगे, लगेगा, हाथपाँव टूटेंगे, दुसरा तो कुछ नही होगा. अब सब भरोसा उपरवालेपे छोड दो ! ऐसा दुवा किया और घोडेपर बैठ गयी ! माशाअल्ला ! बडा रेसका घोडा ! वर्माजीका देवदास ! पण मी हिंमत हरले नाही. घोडेवाल्याला म्हटलं, ' न पडण्यासाठी मी काय करू तेवढंच फक्त सांग तू ! ' त्यानं थोड्याफार सूचना केल्या. 'बॉडी टाईट करू नकोस, उतारावर बॅलन्स पाठीमागे कर, दोन पायांवर घोडा उभा राहिला तर बॅलन्स पुढे कर म्हणजे पडणार नाहीस, लगाम खेच ' वगैरे. मी ते सगळं नीट ध्यानात ठेवलं आणि अल्लाकडे दुवा मागितला, ' हे अल्ला ! रहम कर ! बडी मजबूर लडकी हूं ! ना मैं मेरे लिए दौलत कमाती हूं ! तू जिस तरह किसीका बिगाडता है, तू ही तकदीर बनाता है। आज मै अजमाती हूं की तेरेमे कितनी सच्चाई है। '

" माझी आई तर कोपऱ्यात जपाची माळ घेऊनच बसली. झालं ! ' सायलेन्स, स्टार्ट कॅमेरा ' म्हणताक्षणी मी टाच मारली आणि तो घोडा जो काय उधळालाय ! हाय तोबा ! तरीसुद्धा कॅमेऱ्याच्या समोरून पुढे गेले मात्र, लगाम असा काही खेचला की तो रेसचा तगडा घोडा क्षणात थांबला. लगाम सोडून अशी धपकन् खाली उडी मारली म्हणून सांगू माधुरी ! सब लोग दौडके चले आये. रेहाना बोलली, ' वाः भई रेशमा, क्या रायडर हो तुम ! ' मी तर काही बोलूच शकले नाही. नुसतं म्हटलं, ' या अल्ला ! आज जिंगदीमे पहिली बार एहसास हुआ के तुम भी कुछ हो ! उन दुःखभरे दिनोंमे ऐसा लगता था की तेरे पास इन्साफ नही. पर नही ! आज तुमने हिम्मत दिलायी. दिलमे उमंग लायी की मै आगे जाके मेरे भाइबहनोंकेलिए कुछ कर पाऊंगी. "

" ' राखी और हाथकडी ' नंतर तू कोणते पिक्चर केलेस ? "

" त्यानंतर ' गरम मसाला ', ' रामपूर का लक्ष्मण ' –ज्यात मी डॅनीबरोबर रेपसीन केले होते– फार जिवंत वठले होते ते ! खूप टाळ्या पडल्या. कारण मी मन लावून काम केलं होतं ना ! त्यातच मी ड्रायव्हिंगचेही शॉट्स दिलेत. "

" म्हणजे रायडिंगप्रमाणेच ड्रायव्हिंगही तुला येत नसेलच ना ! "

" कुठलं यायला ? आमच्या बापजाद्यांनी कुठे मोटारी बघितल्यात ड्रायव्हिंग यायला ? पण तिथेही तेच टेक्निक ! कधीतरी शेजारच्याची टॅक्सी पाच मिनिटं चालवलेली आणि ही तर ओपन इंपाला ! लेफ्ट हँड ड्रायव्हिंग ! पण बसले. ड्रायव्हरकडून गियर समजावून घेतले. ॲक्सिलेटर दाबण्याची थोडीफार माहिती होतीच. त्या शॉटमध्ये मी ती गाडी नुसतीच चालवली नाही तर रणधीर कपूर गाडीवर चढतो, मी गाडी रिव्हर्स घेते, गोल–गोल फिरवते असले शॉट्ससुद्धा दिले. "

" पण काय ग, घोडदौडीच्या वगैरे सीनमध्ये समजा घोडा बेफाम दौडलाच, तर त्याला अडवायला, तुला सांभाळायला माणसं असतात का ग ? "

रेशमा गालातल्या गालात हसली. "असतात ना ! दूर अंतरावर चार-पाच उभे असतात. पण फुलस्पीडमध्ये ते धूड अंगावर आलं तर तिथे थांबणार कोण ? सगळे साईडला सरकून मोकळे होतात. म्हणतात, 'पडेल ही पोरगी, आणखी काय होईल जास्तीत जास्त ?' समजा डोंगरावरून रोलींग करत येण्याचा शॉट आहे. लोक सांगतात, 'फिकर मत करना रेशमा, हम पकडेंगे.' पण रोलींगला एकदा सुरुवात केली की असलीयतका पता चलता है ! रेशमा आपली दगडधोंड्यांतून, काट्याकुट्यांतून ठेचाळत वेगात खाली येतेय आणि हे धूड आपल्या अंगावर घेऊन आपलीही अशीच हालत होईल ह्या विचारानं सगळे आजूबाजूला पळतायत."

"सुरुवातीला रिटेक्स वगैरेमुळे डायरेक्टरांचा ओरडा खायचीस की नाही ?"

"नाही ! ह्या बाबतीत मी फार भाग्यवान आहे. मेरे रिटेक्स तो बहुत मुश्किलसे हुए है । आणि झालेत ते त्यांच्या किंवा कॅमेऱ्याच्या चुकीनं झालेत."

"सुरुवातीला मास्टर स्वत:च रिस्की काम करू द्यायचे नाहीत. म्हणायचे, नवी आहे ही, इतक्यात नको. पण इतरांना तसले शॉट्स देताना पाहून मलाच खुमखुमी यायची. पडले, लागलं तरी चालेल पण मी असे शॉट्स देणारच. आता असे शॉट्स देताना चुका झाल्याच तर आमचे मास्टर डाँटतात. प्रोड्यूसर, डायरेक्टर, नाही डांटणार. ते फार तर मास्टरला सांगतात-फलाणी मुलगी अशी चुकतेय, तिला सूचना द्या ! आणि डायरेक्टरनं केलेल्या सूचना मी ऐकते, पण मानतेच असं मात्र नाही. मी प्रथम मास्टरची सलाह घेते. डायरेक्टरनं ढीग सांगितलं पण ते करायला मला जमेल की नाही हे मास्टरलाच ठाऊक असतं. कधी रागलोभ दाखवून, कधी पिटाई करून पण त्यांनीच आम्हाला ट्रेंड केलेलं असतं ना ! शिवाय मास्टरवर आमची जबाबदारी असते."

"ती ते व्यवस्थित पार पाडतात का पण ?"

"व्यवस्थित म्हणजे ? अग वेळेला जीव धोक्यात घालूनसुद्धा !"

"असं म्हणतेस ?"

"तुला मी 'हम तेरे आशिक है' ह्या चित्रपटाच्या वेळची गोष्ट सांगते. देवकुमार हेमा मालिनीला मारण्यासाठी तिच्यामागे लागलेला असतो. ती लपतछपत एका बॉक्समध्ये घुसते. त्याला ती कुठं दिसत नाही तेव्हा तो सरळ त्या ठिकाणाला आग लावून देतो. त्या शॉटमध्ये हेमाच्या ऐवजी मी बॉक्समध्ये घुसलेली आहे. मन्सूरभाई-आमचे स्टंटमास्टर, त्यांनी सुताराला बजावून ठेवलं होतं, बॉक्सची मागची बाजू साधारण बंद कर, म्हणजे आग लागताच रेशमा पटकन बाहेर पडेल. झालं ! सगळे शॉटच्या तयारीत दंग. शॉटची तयारी झाली, मी बॉक्समध्ये गेले. बाहेरून कडी लावली गेली. आगीचं सोल्यूशन लावून सभोवती आग लावली गेली. शॉट सुरू झाला, संपला, ओ. के. झाला. कॅमेरा कट् झाला आणि मास्टर ओरडले, "रेशमा, बाहेर आव जल्दीसे !'

"पण मी बाहेर कशी येणार? त्या सुतारानं चुकून बॉक्सची मागची बाजू सैल ठेवायची सोडून तिथं आठ ते दहा भलेमोठे खिळे ठोकलेले. दारावर धक्के मारून मारून हात सुजून आले.

"एव्हाना आगीच्या ज्वाळांनी मला लपेटायला सुरुवात केली होती. माझ्या अंगात सिल्कचा चुडीदार कमीज. आग केसांपर्यंत पोहोचलेली. माझी जगण्याची आशा संपली आणि मास्टरजींना दरवाजाचा खाटखाट आवाज आला. त्यांच्या लक्षात आलं की, काहीतरी घोटाळा झालाय. ते आगीच्या लोळात तीरासारखे धावले, बॉक्सची कडी काढली, माझा हात धरला आणि ते ओरडले, 'रेशमा घाबरू नकोस. आगीतून बाहेर उडी मार.' मी त्यांच्या मागोमाग लोळातून बाहेर उडी टाकली. आणि–आणि काय सांगू माधुरी–"

रेशमा घळघळा रडायळा लागली. काही क्षण शांततेत गेले. इतक्या दिवसांनंतर हा प्रसंग सांगतानासुद्धा रेशमाला आपला भावनावेग आवरता आला नाही. त्या आगीच्या ज्वाळा, त्यात लपेटलेली रेशमा, आणि तिला मन्सूरभाईंच्या रूपात वाचवणारा परवरदिगार...!

मी स्वतःही सुन्न होऊन गेलेली. रेशमा स्वतःच सावरली. डोळ्यांतलं पाणी पुसून म्हणाली, "खरं सांगते, मन्सुरभाईंच्या ग्रूपमध्ये काम करताना सच्चे गुरूके साथ काम करती हूँ ऐसा लगता है. खूप सुरक्षित वाटतं. त्या प्रसंगात ते स्वतःही भाजले, मीही भाजले. पण माझा चेहरा फक्त वाचला. मास्टरजींना मी म्हटलं, 'मास्टरजी, ये तो मेरे जिंदगी और मौतका सवाल था! जिंदगी तो मिल जाती लेकीन मेरी शक्ल बरबाद हो जाती तो? मेरी रोजीरोटी चली जाती थी मास्टरजी!'

"मास्टरजी नंतर त्या सुतारावर एवढे भडकले! म्हणाले, 'तुला नीट ऐकायला काय झालं? त्या पोरीला काही झालं असतं तर? ही आमची पोरं आमच्या शब्दाखातर जिवावर उदार होऊन काम करतात. आणि त्यांच्या जिवाशी तुम्ही असा खेळ करता?'"

"काय ग रेशमा, अशा प्रसंगातून निभावल्यावर ज्यांच्यासाठी तुम्ही असले शॉट देता ते–म्हणजे तुमचे हिरो, हिरॉईन्स तुमची चौकशी तरी करतात का ग? विशेषतः 'कस्मेवादे' चित्रपटात राखीची डुप्लिकेट म्हणून काम करताना तुला जो मोठा अपघात झाला होता तेव्हा?"

"तेव्हा तिनं तर माझी साधी चौकशीसुद्धा केली नाही. उलट कोणीतरी त्याबद्दल सांगत होतं तर तिनं चक्क मान फिरवली.

"पण हां, त्यानंतर बरी होऊन मी पुन्हा काम करायला लागले, आणि 'मीरा'च्या सेटवर हेमा मालिनी काम करत होती, तिला कळलं तसं ती लगेच मला भेटायला आली. माझ्या तब्येतीची चौकशी केली. हेमाजी नेहमीच माझ्याशी

चांगली वागते. मला अगदी घासातला घास काढून देते. मुमताजनं पण माझ्यावर खूप जीव लावला होता. ती इंडस्ट्री सोडून गेल्याचं मला फार दुःख झालं. हां, आणि त्यावेळी अमिताभ बच्चननं पण माझी पूछताछ करून काही मदत लागली तर जरूर सांग म्हणून बजावलं होतं. शुकर है ! कोई अच्छे इन्सान भी मिल जाते है ! शशी कपूरचा स्वभावही खूप मोकळा आहे. आमच्यासारख्यांबरोबरसुद्धा तो खूप धमाल करतो. त्याला अहंपणा मुळीच नाही.

" हां, पण त्याचबरोबर मी ह्या सगळ्या लोकांपासून अलिप्तही राहते. एकदा बोलले, गोड बोलले की चिकटलं त्यांना, असं मी करत नाही. मला ते आवडत नाही. त्यांच्या सतत पाठीशी राहणं, त्यांच्यात बसून खाणंपिणं, त्यांची चमची बनून राहणं... छे ! उनसे सलाम दुआ मिलती है, इज्जत मिलती है, बस है ! "

" तुम्ही एवढी रिस्की कामं करता, तुमचं काही इन्शुअरन्स वगैरे असतं का ग ? आणि मुख्य म्हणजे तुमचे पैसे बुडवण्याचे प्रकार ? विचारायचं कारण असं की, अलीकडेच एका अत्यंत गरीब स्पॉट बॉयनं आकाशवाणीसाठी मुलाखत देताना सांगितलं होतं की एका प्रोड्यूसरनं शूटिंगसाठी त्याच्याकडून काही झाडं, झावळ्या वगैरे आणवून घेतल्या आणि त्याचं पंधराशे रुपयांचं बिल मात्र शंभर चकरा मारूनसुद्धा बुडवलं. एखाद्या फिल्मसाठी करोडो रुपये खर्च करणारे आणि क्वचित एखाद्या कलावंताच्या लहरीखातर लाखो रुपयांचा सेट वाया घालवणारे, पाटर्यांमधून हजारो रुपयांच्या दारूचे पाट वाहवणारे हे लोक एखाद्या गरीबाला इतके बुडवत असतील हे खरंही वाटत नाही, म्हणून मुद्दाम विचारतेय. "

" आमची संघटना, मुव्ही स्टंट असोसिएशन मजबूत आहे म्हणून असेल, पण अशी वेळ आमच्यावर कधी येत नाही. कोणी पैसे नाहीच दिले तर आमच्या संघटनेकडून त्यांना पत्र जातं. आम्ही उरलेलं शूटिंग करत नाही, त्यामुळे पिक्चर रिलीज होत नाही. त्यामुळे तशी आमची फसवणूक कधी होत नाही. हो, पूर्वी नवी असताना एक-दोनदा असं घडलंय, पण आता नाही. "

" पण तुमच्या अपघाताच्या वेळी– "

" हां ! तू इन्शुअरन्सचं विचारत होतीस ना ? अग, आमचा नाही घटकेचा भरवसा. कधी हातपाय, डोकं तोडून फोडून घेऊ सांगता येत नाही. कुठली विमा कंपनी आमचा विमा उतरवेल ? "

" पण स्टंट करताना एखाद्याचा जीव गेला तर त्याच्या बायकामुलांना– "

" आमची असोसिएशन मदत करते ना ! थोडीफार मदत आर्टिस्ट लोकांकडून होते. पण त्यांचं काही खरं नाही. हे लोकसुद्धा आपल्यासारखी हाडामांसाची माणसे आहेत ह्याची ज्यांना जाणीव असते तेच मदत करतात आणि जे करत नाही त्यांच्यावर जबरदस्ती तर करता येत नाही. एकूण ह्या व्यवसायात हातावर पोट असतं, भविष्याची तरतुद काही नसते."

"खरंय ! मागे एकदा एका लाईट बॉयनं बोलता–बोलता सांगितलं होतं, की प्रोड्युसरकडे जेवण न मिळाल्याची तक्रार केली तर त्यानं निर्लज्जपणे विचारलं, 'घरी काय रोज सकाळ–संध्याकाळ जेवतोस का रे ? एखादा दिवस उपास काढतोस ना ? तसंच आज समज.' आणि जास्तच तक्रारी केल्या तर सरळ तक्रारखोर आहे म्हणून घरी बसवतात. तुम्हा लोकांना असा अनुभव येतो का ग ?"

"येतो ना ! नेहमीच नाही, पण कधीतरी, विशेषतः नवीन असताना. सुरुवातीच्या काळात एकदा रेल्वेमधून उडी मारायचे, चालत्या गाडीत चढायचे आणि रेल्वे पटरीवर पडायचे शॉट्स होते. शूटींग माथेरानजवळ होतं. नेरळपासून जुम्मापट्टीपर्यंत प्रोड्यूसरनं आम्हाला चालत नेलं होतं. हम भी भुकेप्यासे चले ! काय करणार ? तसेच शॉट्सही दिले. ती तर असल्या शॉट्सची माझी पहिलीच वेळ होती. जजमेंट, टायमिंग काही ठाऊक नाही. रेल्वेचा ड्रायव्हर पण शूटींग बघण्याच्या नादात स्पीड कमी करायला विसरलेला. भुकेल्यापोटी, दिवसभर उन्हात तळपत, तसले जीवघेणे शॉट्स दिले. काय करणार ? तेव्हा तोंड उघडायला भीती वाटायची, न जाणो काही गडबड झाली तर ? अभी तो कुछ डर नही लगता ! अब हमारे कामको सब चाहते है–तब शायद हमे चाहते थे !"

रेशमाचं मिस्किल उत्तर ! ज्याला वास्तवाची एक धारदार किनार आहे. अशीच आणखी एक जीवघेणी, रखरखीत आठवण !

जयपूरचो गर्मी. वरती कडक ऊन, खाली तापलेली रेती. त्यात कॅमल रायडिंगचा शॉट. उंटावर बसलेली शर्मिला टागोर अचानक उंट पागल झाल्यामुळे वरून फेकली जाते, रेतीत गडगडत जाते अन् भोवती उंट वेड्यासारखा थयथय नाचतोय. झालं ! शॉटची तयारी झाली ! मोठ्ठा गॉगल लावून रंगीबेरंगी छत्री-खाली, ओल्या रुमालानं घाम पुसत, थंड पीत शर्मिला टागोर दूर बसलेली आणि तिची छबीछाया, त्या शॉटची 'असली' हिरॉईन रेशमा उंटावर चढली. जन्मात प्रथमच उंटावर बसण्याचा, चालवण्याचा अनुभव ! ठरल्याप्रमाणे उंट पागल झाला. त्यानं रेशमाला खाली फेकून दिलं. तो उंट एवढा उंच ! आपण क्षणभर कुठून कुठे आलो ते रेशमाला कळलंही नाही. जखम काही झाली नाही, पण त्या गरम रेतीत पडल्यावर जणू आगीच्या प्रचंड लोळात फेकल्यासारख्या वेदना झाल्या. तशात ती रेतीच्या उतारावरून जळत्या अंगानं फरफटत होती. नाका-तोंडात गरम रेती जात होती, पण दुर्दैव तिचं !

ती आऊट ऑफ कॅमेरा झाली. असल्या शॉटचा पुन्हा रिटेक ! त्यात ह्या बहाद्दर मुलीचे रमझानचे रोजे चालले होते. जिथे लोक सेकंदा–सेकंदाला पाणी पीत होते, तिथं ही मुलगी आपण चुकून थुंकीसुद्धा गिळू नये ह्या खटाटोपात !

"एका पिक्चरमध्ये जंगली हाथीबरोबर काम केलं होतं. माशाअल्ला ! इतनी बडी उसकी सूल ! आधी वाटलं होतं, त्यानं नुसती सोंड उगारली की गड-

गडल्याचा अभिनय करत खाली जाईन. बापरे ! पण प्रत्यक्षात त्यानं त्याच्या मजबूत सोंडेनं नुसतं मला ढकललं आणि मी कुठून कुठे गडगडले ते मला कळलं पण नाही. मग वाटलं, ह्यानं पुढे न ढकलता मला उलट गिळलं असतं तर ? पण एक मात्र हं, त्याच्या त्या मजबूत सोंडेचा स्पर्श मात्र कापसासारखा मऊ, लुस-लुशीत होता."

रेशमा नुसतं हत्ती–घोडे ह्यांच्याबरोबर काम करून स्वस्थ राहिली नाही. तोंड शिवलेल्या आणि त्यामुळे चवताळलेल्या वाघाशी तिनं कडवी झुंज दिलीय. त्याच्या पंजानं शरीरभर हजार जखमा करून घेतल्यात. शेवटी ही जनावरंच ! मूड बिघडला तर हत्ती–घोडचांसारखे प्राणी पायांखाली कुस्करून टाकतील. मूड बिघडलेल्या घोडचानं 'अलीबाबा चाळीस चोर 'मध्ये रेशमाला बऱ्याचदा आपल्या पाठीवरून खाली फेकून दिलंय. लाल ड्रेस पाहून पिसाळणाऱ्या एका बैलाबरोबर तर रेशमानं खरोखर लाल ड्रेसमध्ये झुंज दिलीय. तरीसुद्धा ती म्हणते,

"जनावरं प्रेमाची भुकेली असतात. घोडा दौडवताना मी त्याला खूप गोंजारते. 'डार्लिंग, हा शॉट आपल्याला छान द्यायचाय हं !'–असं बडबडत त्याला कुरवाळते. त्याच्यावर कधीही चाबूक उगारत नाही. जनावरांची पण एक खासियत असते. उंट असो, घोडा असो, ते तुम्ही पडले असताना तुमच्या अंगावर पाय देऊन कधीही जाणार नाहीत. म्हणून तर एकदा चित्रनगरीत शे-दीडशे उधळलेले घोडे माझ्या अंगावरून गेले. त्यांच्या टाचांखाली मी होलपटत होते. पण किरकोळ जखमांपलीकडे मला फारसं लागलं नाही."

रेशमाच्या लेखी हातपाय तुटणं, हाडं मोडणं याच फार मोठचा जखमा. बाकी सब मामुली चोट !

'शोले 'तला एक किस्सा सांगताना रेशमा रंगून जाते.

"आज तुला सांगून खरं वाटणार नाही माधुरी, पण 'शोले' चित्रपटाचा मुहूर्ताचा पहिला शॉट माझ्यावर चित्रित झाला होता. 'शोले 'पूर्वी इंडस्ट्रीत माझं फारसं नाव झालं नव्हतं. तेव्हा मागल्या चित्रपटातल्या हॉर्सरायडींगच्या पुण्याईवर 'शोले 'तली बग्गी दौडवण्याचं काम मला मिळालं. मला तर येत नव्हतं. पण मी दडपून हो म्हटलं. 'शोले 'चा पहिलाच शॉट. बाजूला हेमाजी–धरमजी बसलेले. मला हेमाजींचा ड्रेस चढवला गेला. त्यांच्यासारखा केसांचा विग लावला गेला. सिच्युएशन सांगितली गेली की, 'तळचाच्या काठावर मी बसलेय. एवढचात ते चार दरवडेखोर मला घेरतायत. या चार दरवडेखोरांच्या घोडचांच्या मधून वाट काढीत मी बग्गीकडे धाव घेत, 'चल धन्नो !'–असं म्हणताच बग्गी सुरू होईल आणि त्या चालत्या बग्गीत मी तीरासारखी उडी ठोकायची. पुढे जाऊन ती बग्गी थांबेल नि शॉट संपेल.'

"आता 'चल धन्नो !'–म्हणताच घोडे आपोआप तर दौडणार नाहीत.

म्हणून मग त्या घोडागाडीत माझ्या बसण्याच्या पायात एक टांगेवाला दडवून बसवलेला होता. मी 'चल धन्नो' म्हणताच तो रन खेचणार आणि बग्गी सुरू होईल. मग मी त्या चालत्या बग्गीत उडी ठोकायची. तर, शॉटची तयारी झाली. मी अल्लाचं नाव घेतलं. तळ्याच्या काठाशी बसले होते. ते घोडेस्वार बघताच त्या चार घोड्यांमधून तीरासारखी बग्गीकडे धावले आणि म्हटलं, 'चल धन्नो!'

"मी 'चल धन्नो' म्हणताच त्या म्हाताऱ्या कडक्या टांगेवाल्यानं आतल्या आत हिसका मारला आणि जे बग्गीचे घोडे उधळले म्हणून सांगू! मी आत उडी मारून त्याच्या हातातला लगाम घ्यायला बघते– तर तो कुठेतरी अडकलेला! मी धडपडतेय आणि घोडे बेफाम दौडतायत. शेवटी रस्त्याच्या कडेच्या एका शेताचा मातीचा बंधारा आडवा आला. त्यावर टांग्याचं एक चाक वेगात चढलं आणि टांगा उलटा झाला. नेमकं त्या बाजूला एक वडाचं झाड होतं. टांगा उलटा होताना जोरात उंच उडाला.आणि मी उडता उडता नेमकी त्या वडाची एक पारंबी पकडली माझ्या मागोमाग त्या बुढ्ढ्या चाचानं माझी टांग पकडली. माझ्या घागऱ्याच्या घोळात तो बुढ्ढा चाचा! आम्ही दोघं आपले त्या झाडाला लोंबकळतोय आणि खाली सगळे युनिटचे लोक गोळा झालेले. त्यांना हसू आवरेना."

चित्रपटातल्या एखादा विनोदी सीन असावा तसा तो प्रसंग डोळ्यांपुढे येऊन त्यांनाच काय मलाही हसू आवरेना.

माझं हसणं पाहून शेवटी रेशमा ओशाळून हसली. म्हणाली,

"घागरेके अंदर पँटी थी भाई! लेकिन वो बुढ्ढा चाचा तो इतना कडका था के पुरा मेरे घागरेमे घुस गया था! त्यामुळे मला धड उडी मारता येईना. उडी मारली तर चाचाचा खिमा होणार, खूपच उंचावर लोंबकळत होतो ना आम्ही! शेवटी आमचे फायटर लोक एकत्र आले. त्यांनी बुढ्ढ्या चाचाला हातावर जेमतेम झेलला आणि उचलून बाजूला ठेवतायत नाही तोच मी धपकन् उडी मारली. अशी मज्जा!"

"हे झालं अकस्मात अपघाताचं! पण काय ग रेशमा, दुसऱ्याच्या चुकीनं तुझ्या जिवावर बेतण्याची वेळ कधी आली होती का ग?"

"खूपदा! 'शोले'तलीच गोष्ट सांगते. एकदा टांगा दौडवताना चाक निखळण्याचा एक शॉट होता. मला आधीच सांगितलं होतं की, उजव्या बाजूचं चाक कच्चं असेल आणि ते अमूक वेळेला निसटेल. तेव्हा तू डाव्या बाजूला स्वत:ला बॅलन्स करून घे. मी बरं म्हटलं. आणि नेमकं सुतारानं कच्चं चाक बसवण्याच्या ऐवजी पक्कं मजबूत चाक बसवलं. त्यामुळे ते निखळलंच नाही. ठरल्याप्रमाणे मी डावीकडे कलंडल्यामुळे बॅलन्स जाऊन मी खाली पडले आणि माझ्यावर टांगा पडला. मी त्या टांग्याच्या धुडाखाली चिरडून गेले. तीन तास त्या जंगलात बेशुद्ध होते. मजा म्हणजे, शुद्धीवर येताच मी पुन्हा शॉट द्यायला तयार झाले!"

रेशमाच्या तोंडून असले थरारक प्रसंग ऐकताना मनात येतं, परमेश्वरानं हिच्या शरीराचं रसायन नक्कीच एखाद्या मजबूत धातूचं बनवलं असावं !

"परवाची गोष्ट ! एका उंच खांबावरून खाली उडी मारण्याचा शॉट होता. तसले शॉट देण्यात मी आता पटाईत झालेय. पंचवीस फूट उंचावरून एका अरुंद तोंडाच्या विहिरीत उडी मारण्याचा एक इतका भयंकर शॉट मी दिलाय - तोही दोनदा ! माझी जराशी चूकसुद्धा माझं थोबाड फोडून बत्तीशी घशात घालायला पुरेशी होती. कारण त्या विहिरीचा काठ संपूर्ण अणकुचीदार दगडांनी घडवलेला होता. तर काय सांगत होते, मी त्या उंचच उंच सुळक्यावरून खाली उडी मारली आणि उडी मारतामारताच मध्येच माझा कॅमेरामन ओरडला, 'रेश्मा, तू कट-आऊट झालीयेस कॅमेऱ्यातून !' झालं... माझी एकाग्रता ढळली आणि मी वेडी-वाकडी खाली पडले. माझा पाय लचकला आणि सुजला. आम्ही जेव्हा अशा उंचावरून उड्या मारतो ना माधुरी, तेव्हा जिथं पडायचं तिथे घट्ट नजर रोवून एकाग्रचित्तानं उडी मारतो. आमची एकाग्रता अशा वेळी किंचितही ढळता कामा नये ! त्या शॉटमध्ये तो मूर्खासारखा ओरडला ना ! आता तूच सांग, एकदा हवेत उडाल्यावर मी काय करू शकणार होते ? फार तर मी खाली उडी मारल्यावर शॉट पुन्हा घ्यायला सांगयचा. ते राहिलं बाजूला. मग मी खूप ओरडले त्याला ! म्हटलं, नशिब, पाय नुसता लचकला. मोडला असता तर ? पण तो कॅमेरामन नवीन होता ना ! म्हणून मग मी ते प्रकरण तिथंच मिटवलं. तक्रार केली असती तर त्याच्या करिअरवर परिणाम झाला असता !"

रेशमाच्या एवढ्याशा कुडीत आभाळाएवढं मन आहे. उदार अन् संयमी ! तिच्या पोलादी शरीरातलं हृदय कापसासारखं मऊ, अलवार आहे. म्हणूनच मला वाटतं तिचा परवरदिगार अशा कठीण, जीवघेण्या प्रसंगात आपला मायेचा हात पुढे करून तिला वारंवार अलगद झेलत असावा, सुरक्षित ठेवत असावा. कारण रेशमा जे करतेय ते स्वत:साठी नव्हे, इतरांचा प्रतिपाळ करण्यासाठी ! अन् तरीही तिच्या ठायी अवास्तव उद्दामपणा, अहंपणा आलेला नाही. कुटुंबियांशी वागताना, ती आपल्या वडिलांशी जितक्या अदबीनं वागते तितक्याच ऋजुतेनं माघारी आलेल्या आपल्या बहिणीशी वागते. छोट्या भाचरांना आईचा लळा लावते अन् बहिणींना वडिलकीची छत्रछाया देते. खून पसिना एक करून उभारलेल्या संसाराच्या उपकाराचं ओझं लादून कुटुंबियांना तिनं तिळमात्र दबवलेलं नाही, हे त्यांच्याशी बोलता-वागताना पटतं, जाणवतं. असं असूनही तिच्या ठायी स्वाभिमानाचं स्फुल्लिंगही तितक्याच प्रखरतेनं पेटतं आहे.

ती म्हणते, "आम्ही हिरॉईन्सच्या डुप्लिकेट म्हणून काम करतो म्हणून सतत त्यांच्या मागेमागे राहायचं हे मला मुळीच आवडत नाही. कोणाची चमचेगिरी करत, आशाळभूतासारखी त्यांच्या अवतोभवती वावरायचं ? त्या चांगलं

वागतात म्हणून सतत चिकटायचं ? छे ! त्यांनाही असं वाटता कामा नये– उंगली दी इनको तो हाथ पकडके बैठी ! त्यांनाही भेटायला कोणी ना कोणी येत असतं, त्यांच्याशी त्यांना मोकळेपणानं वागता–बोलता आलं पाहिजे, ही जाणीव आपल्याला असलीच पाहिजे."

"पण काय ग, तुम्ही त्यांच्यासाठी जिवावर उदार होऊन कामं करता; तुम्ही नसाल तर त्यांचा जीव धोक्यात येईल, ह्याची त्यांना जाणीव असते का ?'

"असते ना काहींना ! हेमाजींचंच बघ ना ! किती लोभ करते माझ्यावर जशी काही माझी थोरली बहीणच ! मला काही झालं तर लागलीच फोन करेल, भेटल्यावर चौकशी करेल. अगदी दमसुद्धा देईल की रेशमा, माझ्यासाठीसुद्धा रिस्की काम पत्करायचं नाही. प्रोड्यूसरला सरळ नाही सांगायचं. आता तिला काय सांगणार ? ये तो पापी पेटका सवाल है ! पण काहींना मात्र वाटतं की, हॅः ! त्या काय बोलूनचालून आमच्या डुप्लिकेट ! पिक्चर चालतो तो आमच्या नावावर ! "

"खरं आहे. पण रेशमा, हल्ली अनेकदा चित्रपट हिरो–हिरॉईन्सच्या केवळ अभिनयावर नव्हे तर त्यांच्या अशा स्टंट सीन्सवरही चालतो !"

"हो ना ! पण त्याची जाणीव फार थोड्यांना असते. तरी हल्ली लोकांमध्ये खूपच जाणीव निर्माण झालीय. नाही तर पूर्वी लोकम् हणायचे, 'वाः ! फलाणा हिरो किंवा हिरॉईननं व्हिलनला काय झकास चोपलंय, काय रिस्की काम केलंय ! किती बहाद्दूर है हिरो !' हे ऐकून आमचा जीव आतल्या आत जळायचा. वाटायचं, काय हे ? जान हमारी जा रही है, और नाम इनको मिल रहा है ! फिर तसल्ली कर लेते थे चलो ये तो आखिर अपनेही कामकी तारीफ है ! पण आता असं होत नाही. आता लोक म्हणतात, 'छे ! हे हिरो–हिराईन तर दिखाऊ गुड्डा–गुड्डी आहेत, खरी कामं तर ह्यांचे डुप्लिकेट करतात.' पब्लिकमध्ये बसून स्वतःची अशी तारीफ ऐकायला फार बरं वाटतं. विशेषतः अनोळखी माणसांकडून अशी स्तुती ऐकून अंगावर मूठभर मांसच चढतं !" तृप्तीचं हसू हसत रेशमा उद्‌गारते.

मी तिला मुद्दाम छेडते,

"सध्या ठीक आहे. तू तुझ्या कामात समाधानी आहेस पण आज ना उद्या तू लग्न करणारच, मग तुझ्या शोहरनं तुला असल्या कामाला बंदी घातली तर ? देशील सोडून ?"

"शादी होईल तेव्हा ना ! त्याबाबत तर मी अजून काहीच ठरवलं नाही." लग्नाच्या विषयाला सहजगत्या बगल देऊन ती पुढे म्हणते, "हां, भविष्याची तरतूद म्हणून मी एका भावाला ऑटोरिक्षा घेऊन दिलीय. दुसऱ्याला मेकॅनिकल कोर्स देतेय."

"आणि ह्यातून पुरेसा पैसा मिळायला लागला तर मग ही जिवावर बेतणारी कामं देशील सोडून ?"

" क्यूं ? जब बुरी वक्तमे उसको अपनाया, तो भला अच्छे वक्तमे उसे क्यूं छोडू ? आणि एक लक्षात ठेव माधुरी, तकदीरमध्ये जे लिहिलंय ते होणारच आहे. भले मी असलं काम करत असो– किंवा सोडून दिलेलं असो ! उलट अशा कामांमुळे माझी ताकद वाढतेय, मजबुती वाढतेय, माझ्यातली बहादुरी वाढतेय. मी ह्या कामावर इतकं मनापासून प्रेम करते की, अगदी घरात लग्न असलं तरी ठरलेल्या वेळी शूटिंगला वेळेवर हजर राहते.

" माझ्या धाकटचा बहिणीच्या लग्नात मी दुपारी दोन वाजेपर्यंत काम करत होते. हो, मी जर काम केलं नाही तर लग्नाची बिलं कशी काय चुकती केली असती ? मेरा एक उसूल है, चाहे चटणी–रोटी क्यूं न खाये, पर मेरे दरवाजेपे कोई पैसा माँगने कर्जदार नही आना चाहिए ! मुझे कर्जा लेनेसे सक्त नफरत है !"

रेशमा करारी मुद्रेनं, तडफदारपणे हे सांगते. हीच रेशमा जेव्हा जेव्हा लग्नाचा विषय निघतो, तेव्हा तेव्हा अबोल होऊन, हळवी होऊन जाते. आयुष्यातल्या अनेक घटना जिवाभावानं सांगता सांगता तारुण्यातल्या ह्या अलवार क्षणी मात्र ती गुमसुम बनून जाते.

मुलाखतकाराचं नातं संपून मैत्रीचा गोफ विणला गेला तेव्हा बंद शिंपल्यातलं हे मनोगत अत्यंत हळुवारपणे तिनं कधीतरी उलगडून दाखवलं. मीही ते तितक्याच कसोशीनं जपलं. माझी खात्री आहे, एक ना एक दिवस तिची ही दीर्घकाळची तपस्या संपून कॅमेऱ्याच्या घरघराटात अन् प्रखर मर्क्युरी लॅम्पसच्या प्रकाशात सध्या व्यतित होणाऱ्या तिच्या आयुष्यात शहनाईचे मंजूळ सूर गुंजणार आहेत अन् विद्युत्दीपांची नेत्रदीपक रोषणाई सजणार आहे नि त्या सुवर्णक्षणी चित्रपट तारकांची डुप्लिकेट म्हणून वावरणाऱ्या रेशमाला स्वतःची ओरिजिनॅलिटी लाभणार आहे. दुसऱ्याच्या छबीछायेचं उसनं रूप संपून रेशमाला तिचं अस्सल स्वरूप गवसणार आहे.

माहेर : ऑगस्ट १९८४

मोकळचा मुठीतलं तुफान

देवयानी चौबळ

"ती खूप छान आहे–दिसायला, बोलायला !"

"छे ! छे ! ती फारच फटकळ, तुसडी आहे."

"ती भलती बोल्ड बाई आहे. एकदा भेटाच तुम्ही !"

"हे पाहा, ती फार भांडखोर आणि मूडी आहे. कशाला उगाच तिच्या वाटेस जाता ?"

"अहो, फिल्मवाल्यांमध्ये चोवीस तास वावरणारी बाई ती ! तशीच फिल्मी आणि showy असेल अशा माणसांपासून चार हात दूर राहणं बरं !"

आश्चर्य वाटेल तुम्हाला, पण ही सगळी उलटसुलट मतं एकाच बाईबद्दल आहेत–जिला अत्रे 'शुक्रकन्या' म्हणायचे, जिला सगळी फिल्मी दुनिया 'देवी' ह्या नावानं ओळखते. अशी ही 'Frankly speaking' देवयानी चौबळ ! सर महादेवराव चौबळांची नात ! आणि बॅरिस्टर चौबळांची लेक ! तिचं तुम्ही उच्च वर्गात जन्माला आलीय म्हणून कौतुक कराल, तर ती फटकन म्हणेल, 'तुम्ही क्लास कशानं मोजता ? आर्थिक परिस्थिती, नाव की फॅमिलीमुळे ?' तुम्ही तिला छेडलंत की तुझ्या आजोबांनी ब्रिटिशांची चाकरी केली तर ती सरळ ठणकावेल, 'Excuse me ! ब्रिटिशांनी माझ्या आजोबांच्या बुद्धीचा उपयोग करून घेतला आणि माझ्या आजोबांना जर सुपर पॉवर मिळाली, तर त्यांनी त्याचा का उपयोग करून घेऊ नये ? त्यांनी का घाटयांकडे काम करावं ?'

तर अशी ही देवी ! फटकळ वाटावी इतकी सडेतोड ! सहा मुलांच्या पाठीवर झालेलं सातवं अपत्य ! म्हणून आईवडिलांना नकोशी नव्हे, पण नको असताना झालेली हे मात्र खरं ! म्हणजे आईवडिलांचा मुलांमध्ये जो इंटरेस्ट असतो, तो

खतम झाल्यानंतर झालेली ! मुलांच्या बाबतीत ज्या काही बारीकसारीक घडामोडी असतात, त्या तशा सामान्यच असतात. म्हणजे मुलांचं चालणं, बोलणं, शाळेत जाणं, नापास होणं, आजारपण वगैरे...त्या सगळ्या झाल्यानंतरच्या काळात ही जन्माला आलेली ! तिचा जन्मच नकारातूनच झालेला. तेव्हा जन्मतःच झगडा करण्याची सवय हाडीमाशी रुजलेली. पारा पचवून जन्माला आलेली ही शुक्रकन्या म्हणून तर पाऱ्यासारखी गोरीपान, चंचल आणि हातात गवसली असं वाटण्यापूर्वीच निसटून जाणारी तर झाली नसावी ?

बालपणीचा काळ आठवताना रंगून जात ती सांगते, " मी स्वतःच्या घरात लहानाची मोठी झालेच नाही. शेजारच्या ख्रिश्चन कुटुंबातच मी वाढले. त्यांनी माझं फार कोडकौतुक केलं. आमच्या घरात कोणी पाहुणे आले की, ' ही आमची सातवी कन्या ' एवढं दाखवण्यापुरतीच मी यायची घरात. आमच्या घरात ते महाराष्ट्रीयन वातावरण, तो मराठी बाणा, ते शिवाजीचं वेड वगैरे मुळीच नव्हतं. ख्रिश्नच कुटुंबात वाढल्यानं इंग्रजीवर प्रभुत्व आलंच. पण वडिलांनी मराठी आणि उर्दूही आलं पाहिजे असा हट्ट धरून तेही शिकायला लावलं. माझी आई जामनगरच्या दिवाणांची मुलगी ! तेव्हा तिचं वागणं–बोलणं गुजराथीच !

" माझे आजोबा म्हणजे फार क्लास माणूस असला पाहिजे. त्यांनी ओळखलं, आपली दोन्ही मुलं फार अय्याशी आहेत. एक फ्रेंचचा प्रोफेसर होऊन पॅरिसमध्ये घुमतोय, तर माझे वडील रेसकोर्स ते शेअरबाजार धुंडाळणारे ! इंदौरचे लीगल ॲडव्हायझर होते ते ! आणि माझं व राजेशचं जसं हजारदा वाजतं तसं त्याचं नि तुकोजीराव महाराजांचं हजारदा वाजायचं. मग असं काही झालं की, वडील सहा–सहा महिने चक्क बेकार ! मला वडील घरी आलेले अत्यंत आवडायचे. मी आईला म्हणायची, ' पपांनी कधी जाऊच नाही नै इंदौरला ! '

" आई म्हणायची, ' अवदसे, जाऊ दे ना त्यांना ! कशाला नाही त्या इच्छा करतेस ?' तिला बिचारीला चिंता त्यांची नोकरी कशी टिकेल आणि ही सात मुलं ती वाढवेल कशी ह्याची ! "

देवयानीचा मध्यमवर्गावर खास रोष ! ह्या रोषाचं मूळ ह्याच प्रसंगात आहे. कुठेही आई हळदीकुंकवाला गेली की, बायका हमखास विचारायच्या, ' काय हो पद्मावतीताई, चौबळसाहेबांना येऊन चार महिने वगैरे झाले नाही ? लांब सुट्टीवर आलेत का ते ? ' मग आई खालच्या मानेनं भरल्या हळदीकुंकवातून उठून यायची !

वडिलांचा हा अय्याशी स्वभाव त्यांच्या ह्या शेंडेफळात पुरेपूर उतरलाय. ती स्वतःच म्हणते, " मला उनाडपणा करायला, निरुद्देशपणे भटकायला फार आवडतं. मला काही करण्यापेक्षा काहीही न करायला फार आवडतं. कोणीही मारून-मुटकून माझ्याकडून काम करून घेतलं तरच ते होतं. मला काम करायची हौस नाही.

काहीही बनण्याची महत्त्वाकांक्षा मला नव्हती. शाळेत टीचरनी, मोठेपणी तुला कोण व्हायचंय विचारलं, तर मी सरळ सांगितलं, मला कोणीच बनायचं नाही. मला हे असं फिल्मी पत्रकारसुद्धा व्हायचं नव्हतं. हां, मला स्टार्सच्याभोवती वावरायला मात्र चिक्कार आवडायचं. म्हणजेच मला Reflected glory आवडते. स्टार होण्यापेक्षा स्टारची बहीण होणं फार छान असतं."

काही बनायचं नाही म्हणता–म्हणता खूप काहीतरी बनून जाणाऱ्या अगदी मोजक्या भाग्यवंतांपैकी देवयानी ही एक आहे. अत्रे आणि पु. ल. देशपांडे ह्यांच्या व्यक्तिमत्वाचा तिच्या मनावर खूप परिणाम झालेला आहे. ती म्हणते,

"काही माणसांना श्रीमंत माणसांची संगत लागते. काही अगदी बुद्धिवादी मंडळींचाच हट्ट धरतात. काहींना पैसा हेच सर्वस्व असतं. अशी फूटपट्टी घेऊन तुम्ही काय बसता ? माणसांना कसं पारखता ? तुमचं आयुष्य म्हणजे काय ? –तर एक मध्यमवर्गीय चौकट ? तुम्ही आयुष्यात किती पाहिलेलं असतं ? किती अनुभवलेलं असतं ? अत्रेसाहेब मला फार आवडायचे ते ह्याचसाठी ! ते इतके बोहेमियन होते! त्यांच्याकडे जायला कोणालाही, कोणतंही क्वॉलिफिकेशन लागायचं नाही. राज कपूरचं फिल्ममधलं कॅरॅक्टर पाहा– तो कसा कोणाशीही हसत–खेळत, विनोद करत, कोणातही मिसळत, गाणी गात वावरतो. तसं मला आवडतं !"

देवयानीचं फिल्मलाईनमधलं प्रस्थापित होणं 'प्लॅन्ड' नसेल, पण प्रवेश मात्र अगदी निश्चितपणे 'प्लॅन्ड' होता. घरातल्या पाश्चात्य प्रभावाखाली राहूनही तिला हिंदी फिल्म्सचं विलक्षण आकर्षण ! फिल्म स्टार्समध्ये दांडगा इंडरेस्ट ! मुळात मिरवायची खूप आवड ! गणपती असो की पूजा असो, छान छान कपडे घालून मिरवायला मिळतंय ना, मग कुठेही जायची तयारी ! ह्या अशा मिरवण्याला, एक्स्पोजरला फिल्म इंडस्ट्रीत मजबूत वाव ! तेव्हा ओढा तिथं असणं स्वाभाविक ! साधारणपणे पंधरा–सोळा वर्षांच्या तरुण सुंदर मुलीला 'स्टार' होण्याचं वेड असतं. ह्या वेडीला स्टारच्या भोवती फक्त वावरण्याचं वेड ! त्यात दिलीपकुमारच्या बहिणीची मैत्रीण म्हणून त्यांच्या घराचे दरवाजे सदैव उघडे ! त्या काळात ग्वाल्हेर-इंदूरकडे चौबळ घराण्याचं मोठं प्रस्थ ! देवयानीच्या भावाची घोडी होती. ह्या रेसमुळे राज कपूरच्या घराशी त्यांचा चांगला घरोबा होता. घरातल्या लोकांना रेससाठी रेसकोर्सची ओढ, तर सोळा वर्षांच्या देवयानीला तिथे फिल्म स्टार्स पाहायला मिळतील म्हणून रेसकोर्सची ओढ ! तेव्हाचा एक प्रसंग आठवताना ती अजूनही त्यात रंगून जाते. ते वातावरण, तो माहौल, त्या घोड्यांच्या टापा, ते उत्सुक–ताणलेले चेहरे आणि ती रंगरंगीली दुनिया !

"रेसकोर्स मला घरच्या बगिच्यासारखा होता. ग्वाल्हेरची प्रिन्सेस आणि मी त्या दिवशी ठरवून गेलो होतो की आज दहा फर्लांगांवरून रेस पाहायची नाही, आज रेसकोर्सवर जाऊन बेटींग करायचं ! उषाराजेंमुळे ग्वाल्हेरच्या सेक्रेटरी

वगैरेंचा मोठ्ठा घोळका आमच्याभोवती जमलेला ! जॉकीज आदाब करून जात होते. तेवढ्यात भावानं मला दाखवलं–'तो पाहा राज कपूर !' राज कपूरला मी आसासून दुर्बिणीतून पाहत होते. मी आणि प्रिन्सेस दोघी एका झाडाखाली उभ्या. डोक्यावरून पदर आणि साडचा वगैरे नेसून ! जरा मोठं दिसायला हवं ना ! आणि मजा म्हणजे राज कपूर पण दुर्बिणीतून आमच्याकडेच पाहत होता, की इथे चाललंय तरी काय ? जरा वेळानं तो तिथं आला. अत्यंत पिऊन तर्रर झालेला. हातात लाल गुलाबाचं फूल ! माझ्याजवळ आला आणि फूल देत म्हणाला, 'हॅल्लो प्रिन्सेस ! ' मी म्हटलं, ' मी नाही प्रिन्सेस, ही आहे. ' तर तो म्हणाला, ' Who are you ? ' मी अगदी गोंधळून गेले होते. म्हटलं, ' I am nothing ! ' अजूनही तो मला चिडवतो, ' I am nothing, come here ! '

" राज कपूरनं असे गुलाब कितीकांना दिले असतील ! पण माझ्यावर अजूनही त्या लाल गुलाबाची नशा आहे. कारण गुलाबानं एक केलं. दिलीपकुमारची त्याच्या बहिणीमुळे ओळख झालीच होती, राज कपूरनं तर गुलाब दिला ! म्हणजे सितारे तर माझ्या पायाशी यूं येतील ! वाटतंय तितकं कठीण नाही ते ! अर्थात माझ्या आयुष्यात नशिबाचा भाग फार मोठा आहे. "

" एकदा वडिलांनी मला एक पत्ता शोधायला सांगितला होता, तर मी चुकीच्या पत्त्यावर गेले तिथे रुबेनच्या घरात मला पत्रकार बनी रुबेन भेटले. ते वडिलांना ओळखत होते. मग ते सर्व घरी आले. ओळख वाढली. ते मला त्यांच्याबरोबर त्यांची फॅन म्हणून नेहमी न्यायचे. प्रिमियरला घेऊन जायचे. मी त्यांच्याबरोबर मुद्दाम चांगले संबंध ठेवले होते. कारण त्यांच्याकडे नेहमी फिल्म स्टार्स यायचे ना ! '

फिल्म स्टार्सच्या ह्या वेडातूनच देवीचं लिखाण अंकुरलं. त्याचं असं झालं, एकदा एका फिल्मी मासिकाच्या ऑफिसमध्ये जाऊन तिनं वर्णन केलं की दिलीपकुमार असा राहतो, असा जेवतो ! आणि ते सगळं त्यांना ऐकायला इतकं आवडलं की ते म्हणाले, ' तू हे सगळं लिहीत का नाहीस ? ' तिनं लिहिलं. ते त्यांना आवडलं लोकांना आवडलं. ही अशी स्टार्सविषयी खाजगी गोष्टी लिहिण्याची स्टाईल प्रथम सुरू करण्याचं श्रेय देवीकडेच जाते. तोपर्यंत त्यांचे चित्रपट, अभिनय वगैरे बद्दलच लिहिलं जायचं. एकदा लिखाण लोकांना आवडलं, संपादकांना आवडलं, यश मिळत गेलं, तसतसं ते अंगवळणी पडत गेलं. कोणतंही ध्येय ठरवून त्यासाठी आखणी करणं, पद्धतशीर प्रयत्न करणं हे प्रकार देवीसारख्या ख्यालीखुशाली बाईला जमणं शक्यच नव्हतं. पण पत्रिकेतील योग मात्र देवीला स्वस्थ बसू देण्यास तयार नव्हते.

' स्टार अँड स्टाईल 'च्या ऑफिसमध्ये देवी नोकरीसाठी गेलेली. लिफ्टमध्ये तिच्या सोबत आणखी एक माणूस आत आला. दोघंही नशिब काढायला तिथे चालले होते. तिला अपघात झालेला. तर पायाला बँडेज वगैरे बांधलेलं.

त्यानं मोठ्या आपुलकीनं विचारलं, 'ये आपके पाँवको क्या हो गया ह ?'

देवीच्या डोक्यात नोकरीचेच विचार घोळत होते. तिनं विचित्रपणे उत्तर दिलं, 'क्या हो गया है क्या ? दिखता नही ? पाँवको लग गया है ! ' वगैरे.

तिच्या मतानं आला असेल कोणी तरी New comer ! तो कोण आहे, काय आहे, ठाऊक नाही. संपादक म्हणाले, 'हा स्टार आहे. ह्याची स्टोरी लिही.' देवीनं तेखीनं विचारलं, 'मी ह्याची स्टोरी का लिहू ? ' तेव्हा तो म्हणाला, 'आप क्या बनना चाहती हो ? ' देवीनं त्यालाच उलटं विचारलं, 'आप क्या बनना चाहते हो ? '

'मैं सुपरस्टार बनना चाहता हूं !' ते ऐकलं आणि देवीनं त्याला आपादमस्तक न्याहाळलं. हे सुपरस्टार वगैरे तिनं पहिल्यांदाच ऐकलेलं.

त्यानं पुन्हा विचारलं, 'आपने बताया नही, आप क्या बनना चाहती हो ?'

देवीनं रुबाबात उत्तर दिलं, 'मैं सुपरकॉलमिस्ट बनना चाहती हूं !'

त्यानं खुषीत हात मिळवला. 'तो ये हुई ना बात ! चलो, लिखना शुरू करो !'

आणि राजेश खन्ना प्रकाशात आला. दोन-तीन फिल्म्स फ्लॉप झालेल्या, आणि 'फिल्मफेअर'शी भांडून आलेल्या राजेश खन्नाला देवीनं हात दिला आणि तो एका रात्रीत सुपरस्टार झाला. म्हणून तर देवीच्या हाताला फिल्मवाले परीस मानतात, लकी मानतात.

देवीचा हात लोखंडाचं सोनं करणारा परीस जसा आहे तसा खणखणाट करणारा तलवारबहाद्दरही आहे. देवीविषयी आणि देवीच्या स्टाईलविषयी आजपर्यंत इतकं लिहिलं आणि बोललं गेलंय की त्या लिहिण्या–बोलण्याचीच एक स्टाईल होऊन गेलीय. देवी मराठीतून लिहायला लागली तेव्हा लोक म्हणायचे, ती इंग्लिशमधून भाषांतरित लिहिते. पण इंग्लिश अथवा मराठीतून लिहितानाही देवी बोलणाऱ्याचे बरेचसे हिंदी अथवा उर्दू शब्द तसेच ठेवते, असं लोक म्हणतात. त्याबद्दल विचारलं तर देवी म्हणते, "अहो शालिनीताई पाटीलबद्दल लिहिताना मी काही हिंदी शब्द तिच्या तोंडी टाकत नाही. कारण ती हिंदी बोलत नाही. तसंच निरुपा रॉय अथवा सुलोचनाबद्दल लिहिताना शेक्सपिअर अथवा बर्नॉर्ड शॉची कोटेशन्स पूर्वीचे पत्रकार घालायचे, ते अत्यंत चुकीचं होतं. मी तसं मुळीच करत नाही. ते ज्या सुरात गातील, तोच सूर मी पकडणार. माझ्या मतानं भाषेला एक नाद असतो. तो जर आणायचा असेल, तर त्या लोकांची भाषाच लिहायला हवी. त्या लोकांच्याच शब्दांची पखरण हवी. ह्याचा अर्थ असा नाही की माझं मराठी कच्चं आहे. माझ्या ह्या स्टाईलची पी. एल. नी सुद्धा तारीफ केली होती. पु. ल.-सारखी माणसं, जी स्वतः काहीतरी घडलेली असतात, ती वेगळीच असतात."

देवी लिखाणावर विशेष मेहनत घेत नाही असाही आक्षेप आहे. त्यावर ती

म्हणते, " लिखाण ही अंगभूत कला आहे. ती मागून मिळत नाही. बैठक मारून, उदबत्त्या लावून, सुंदर पेन हातात घेतलं म्हणजेच लिहिता येतं, ह्यावर माझा विश्वास नाही. मी एखाद्या चिटोऱ्यावर, धोब्याच्या हातातील पेननंसुद्धा लिहीन. माझ्या निर्हेतुक भटकण्यातून मला खूप काहीतरी मिळतं मी धडपड कशाला करू? आऊटडोअरला गेलं की सगळे पत्रकार भल्या पहाटे शूटिंगच्या जागी पोहोचतात, दिवसभर राबतात. मी मात्र तेव्हा मस्तपैकी हॉटेलात बसलेली असते. तिथे ते स्टार्स बिचारे शूटिंगच्या जागी काम करीत असतात. तिथं तुम्हाला काय मटेरिअल मिळणार ? संध्याकाळी सगळे जेव्हा रिलॅक्स्ड मूडमध्ये हॉटेलच्या लाऊंजमध्ये बसलेले असतात तेव्हाच खरं मटेरिअल मिळतं. मग इतर लोक म्हणतात, 'वो महारानी तो आरामसे बैठी होगी ! आम्ही मात्र धावपळ करतो !' मी म्हणते, 'धावपळ करता तर जा ऑलिंपिकमध्ये ! संपादकांना मटेरियलशी मतलब ! ते कुठून गोळा केलं, त्यासाठी किती धावपळ केली ह्याला कोण विचारतो ?' आणि तुम्हाला सांगते, मी गेल्या पंधरा वर्षांत स्टुडिओत जाऊन स्टार्सना कधीही वॉच केलेलं नाही. पहिल्यापासून मी त्यांची डिस्कव्हरी आहे. स्टार्सनीच मला ह्या लायनीत आग्रह करून ओढून आणलंय. मी आपली नखरे करायची, नक्ला करायची. माझं बोलणं–वागणं त्यांना आवडायचं. ते तास न् तास ऐकत बसायचे. अशी मी त्यांच्यात मिसळत गेले.

" एकदा कोणीतरी माझ्या भावाला विचारलं की 'स्टार्स इतके मूडी, तऱ्हेवाईक आणि तिरके असतात तर त्यांचं आणि देवीचं पटतंच कसं ?' त्यावर भावानं मोठं मार्मिक उत्तर दिलं होतं, 'देवी पण त्यांच्याइतकीच मूडी आणि फनी आहे, So they equally match !' हे फार खरं आहे. मी त्यांना पुरून उरते. त्यांचीच शस्त्रं त्यांच्यावर उलटवते. त्यांच्या बरोबरीनं वागते. मी स्वत:ला कधीही झीनत अथवा हेमापेक्षा कमी किंवा जास्त समजत नाही. तसा न्यूनगंड माझ्यात नाही. आणि हेच माझं वेगळेपण आहे. एकदा बी. बी. सी. च्या रिपोर्टरनं राजेश खन्नाच्या बदललेल्या वागणुकीबाबत मला विचारलं. त्यावर मी त्याला उत्तर दिलं, की तो सुपरस्टार होण्यापूर्वी स्वभावानं चांगला होता. नंतर बिघडला. पण तेव्हा मीसुद्धा बोचरी स्तंभलेखक नव्हते ना ? मीही आता पूर्वीची राहिले नाही. तेव्हा आमच दोघांचंही यशानं अध:पतन झालं आहे, हेच सत्य आहे. "

देवयानीचं सत्याविषयीचं विश्लेषण जगावेगळं आहे. तिच्या मतानं सत्याचा अपलाप अपरिहार्य आहे. सत्याला मर्यादा आहेत. खोट्याच्या साहाय्यानंच खऱ्यापर्यंत पोहोचता येतं. सत्यासाठी असत्याचा आधार घ्यावाच लागतो. समजा एखादी हकीकत तिनं लिहिली आणि ती बरोबर असली, तर त्या घडलेल्या घटनेची ती साक्षीदार असलीच पाहिजे असं कुठं आहे ? घडलेल्या घटनेला महत्त्व आहे. एखाद्या बड्या प्रस्थाशी एवढंसं पेन घेऊन ती कशी झगडणार ? शेवटी काय

तो हरला पाहिजे आणि ती जिंकली पाहिजे. तो जसा त्याचा मार्ग पत्करतो, काय-द्याच्या त्रुटींचा फायदा घेतो, तसा ती असत्याचा आधार घेते. सत्याविषयी सामान्यांच्या कल्पना फार बालिश आहेत असं तिचं स्पष्ट मत आहे. तिला कोणीही म्हटलं, की तुम्ही सत्य लिहिता ना म्हणून आम्हाला आवडतं, तर ती बजावते,

"अहो मी कधीही निर्भेळ सत्य लिहीत नाही. मी खूपदा भेदभाव करते. मी वाहवत जाते आणि माझ्या मूडप्रमाणे लिहिते. कधी मी कुणावर फिदा असते, तर कधी मुळीच नसते. मला कुठून जोडे भिळाले तर तेही मी बिनधास्तपणे लिहिते. कारण मी धक्के खायला तिथे पोहोचते. किनाऱ्यावर बसून राहत नाही इतर पत्रकारांसारखी! म्हणूनच माझे फॅन्स माझ्यासोबत माझ्या लिखाणात वाहवत जातात."

देवयानीचं लिखाण अति सडेतोड असतं आणि तिची स्तुती जितकी मनमोकळी असते, तितकीच तिची टीका विपर्यस्त असते. तिच्या मतानं फिल्म इंडस्ट्रीतले लोक अतिशय भावनाप्रधान असतात अखेर हे कलावंतांचं जग आहे. त्यांना त्यांच्या अफेअर्सविषयी लिहिलेलं फार आवडतं. त्यामुळे त्यांचं पुरुषत्व वगैरे सिद्ध होतं तसं काही लिहिलं की त्यांना फार आनंद होतो. म्हणून ती त्यांच्याविषयी लिहिताना वेगळाच ॲप्रोच घेते. तिच्या मतानं हे लोक नोकरांना रद्दी वागवतात, त्यांची फसवणूक करतात. ते अत्यंत चिक्कु असतात. कोणाला चहाचा पेलासुद्धा देत नाहीत. नेमकं हेच लिखाण त्यांना बोचतं. कारण त्यांच्या दीनदयाळू, परोपकारी 'इमेज'ला ते हानिकारक असतं. श्रीमंत वाईट, गरीब चांगले म्हणून गरीबाचा रोल ते करतात, पण प्रत्यक्षात ते गरीबांशी इतके वाईट वागतात की बस्स! मारे मोठमोठे बंगले बांधतात, पण तुमच्या-आमच्यासारख एका खोलीत गोळा होऊन बसतात. स्वतःच्याच घरात तिऱ्हाईतासारखं वागतात. नव्या घराची पार्टी हॉटेलमध्ये देतात. देवीची ही अशी टीका स्टार्सना झोंबली नाही तरच नवल!

डिंपलला पहिल्या डायव्होर्सच्या वेळी जेव्हा ती भेटायला गेली तेव्हा तिनं स्पष्ट लिहिलं होतं की, डिंपल आता नटी वगैरे दिसत नाही. ती चक्क ग्राऊंडेड एअरहॉस्टेस वाटते. त्याबद्दल विचारलं तर फटकळपणे देवी म्हणते,

"काय खोटं होतं त्यात? नटचा कशा रंगीन असतात. त्यांचे हावभाव सतत कॅमेऱ्यासमोर असल्यासारखे असतात. डिंपल कार्डवाल्या ग्रुपमध्ये राहून तशीच मेकअप् करते. मी हे लिहिल्याबरोबर तिला राग आला. कारण तेव्हा तिला ते हानिकारक होतं ना! सहा महिने झाले ह्या गोष्टीला, मग का नाही एकाही निर्मात्यानं साईन केलं तिला? ते काही माझ्या लिखाणाप्रमाणे चालत नाहीत. इतर पत्रकारांना तिनं सांगितलं, "मी आठ फिल्म्स साईन केल्या. बर्थडेला अनाऊन्स करणार!' झालं! पत्रकार दणादण लिहून मोकळे झाले. मी स्पष्ट लिहिलं, ती बोजड आणि उतरलेली वाटते. इथं चालतं ते फक्त चलनी

नाणं ! हे असं मी स्पष्ट लिहिते म्हणून मी आवडत नाही. मी डिंपल असते तर मलाही देवयानी आवडली नसती. साहजिकच आहे."

त्या कार्डवाल्या ग्रुपवरून आठवण झाली. लोक म्हणतात, ह्या बायका जुगार खेळतात, त्यांच्याविरुद्ध कोणीतरी लिहिलं पाहिजे. त्यावर देवी म्हणते की, " त्यांना त्यात सुख वाटतंय या, मग घेऊ द्या ना ! पूर्वी सासू हरकत घ्यायची तर आता सुनांनी त्यांनाच खेळायला लावलंय. ठीक आहे. पूर्वी पांडवांनी द्रौपदी पणाला लावली, आता द्रौपदी पांडवांना लावील. त्यात काय आहे ? प्रत्येकाच्या सुखाची कल्पना फार निराळी आहे. मध्यमवर्गीय म्हणतो, 'ठेविले अनंते तैसेची राहावे.' कबूल आहे. प्रत्येकानं झेप घ्यावी असं थोडंच आहे ? पण आहे त्या परिस्थितीत मध्यमवर्ग मुळीच सुखी नसतो, म्हणून तो कुरबुर करीत जगतो. परप्रांतीयांच्या पैशांचा हेवा करतो."

देवयानीनं सगळे वर्ग, सगळ्या प्रकारची माणसं फार डोळसपणे पाहिली आहेत. तिनं राजघराणं पाहिलंय, घोडे आणि जॉकींचं जग पाहिलंय, फिल्मस्टार्सचं जग पाहिलंय, तसंच स्वतःचं मध्यमवर्गीय जगही फार जवळून पाहिलंय. ते नातेवाईक, सण–समारंभ, त्यांची भांडणं हे सगळं तिनं अनुभवलंय. म्हणूनच ती अत्यंत चवीनं मसालामुर्गी खाते तसंच पिठलंभातही खाते. समाजातला प्रत्येक वर्ग तिला मोहात टाकतो. मुंबईवर प्रेम करताना मुंबईच्या श्रीमंत वस्तीबरोबरच तिथला फूटपाथही तिला आवडतो. फूटपाथचंही एक आयुष्य आहे. ते लोक कसे जगतात, दुसऱ्याला कशी जागा करून देतात, कसं सांभाळतात हेही एक टेक्निक आहे असं तिला वाटतं. अर्थात तिला गर्भश्रीमंतीचा मात्र खूप राग आहे. कारण तिच्या मतानं घरात चांदीची पातेली असतात, पण रिकामी खणखणत ! खाऊन–पिऊन सुखी ही स्थिती तिच्या मते सर्वात वाईट ! कारण श्रीमंत ऐष करू शकतो, तर गरीब रस्त्यावर येऊन झगडतो. मध्यमवर्गाची स्थिती मात्र त्रिशंकूसारखी असते. मध्यमवर्गाविषयीची तिची मतं जरा जादाच तिखट आहेत. मध्यमवर्गाच्या पतीवरील एकनिष्ठेला ती बेधडक सुरुंग लावते. तिच्या मते एकनिष्ठता ही शेवटी मजबुरी आहे.

" झीनत आणि डिंपलसारख्या मुलींना जेवढा चॉईस मिळतो तेवढा दुसऱ्या कुठल्याही मुलीला मिळाला तर ती किती एकनिष्ठ राहील ? एखादी अनारकली घरात बसली तर तिला कीण मिळणार ? आता तुम्ही नोकरीला बाहेर पडलात तर तुम्हाला जास्त पुरुष भेटतात, तुमचा चॉईस वाढतो. त्याला देवयानी चौबळ किंवा झीनत अमान लागत नाही, त्याला एक्स्पोजर लागतं, असं देवयानी बिनदिक्कतपणे सांगते. ती म्हणते, कोणे एके काळी मीही प्रेम केलं. समोरच्या खिडकीतल्या कोणावर तरी मरमर मरायचं. शिरीष अत्रे तेव्हा मला खूप चिडवायची, 'वाः देवी ! तू पुन्हा प्रेमात पडलीस का ?' मग मी लाजत म्हणायची, 'नाय

ग शिरीष, तुला कोणी सांगितलं ? प्रेम एकदाच होतं ग !' वगैरे– वगैरे. ती म्हणायची, 'सोड ग ! एकदा होतं ते फक्त कथा–कादंबऱ्यात. प्रेमात पडणं म्हणजे खूप मोठ्ठा ड्रामा !' वगैरे. अत्रेसाहेब खूप हसायचे. म्हणायचे, 'ऐकतोय मी ती काय पकवतेय ते !' आणि आत्ता मला विचाराल तर धडाधड महिन्या–दोन महिन्यांनी प्रेमात पडते. आणि त्यात फार मजा असते हो ! मध्यमवर्गीयांच्या खुळचट कल्पना असतात. नुकत्याच वयात आलेल्या मुलीला खूप जपावं, कळीनं हळूच उमलावं, वगैरे. अरे ! मी तर म्हणते, या फुलण्याच्या वयातच तिनं बाहेर जाऊन नाना तऱ्हेचे आयुष्याचे अनुभव घ्यावे. मी एक किस्सा सांगते तुम्हाला ! आमच्या घराजवळ एक अँग्लो इंडियन विधवा राहायची. तिची पंधरा–सोळा वर्षांची लेक ज्युली एका जॉकीच्या प्रेमात पडली होती. त्याचं लग्न ठरलेलं होतं. त्या अँग्लो-इंडियन बाईच्या कानावर ती गोष्ट घालावी म्हणून माझा भाऊ तिच्या घरी गेला होता. त्याच्याबरोबर मीही गेले होते. भावानं तिला भीत–भीत सांगितलं, 'ज्युली अजाण आहे. तिला सांभाळा.' त्यावर त्या अनपढ अँग्लोइंडियन बाईनं इतकं सुरेख उत्तर दिलं, ती म्हणाली, 'कोण अजाण ? ज्युली ? ती सोळा वर्षांची आहे. तुम्हाला नाही वाटत, हे तिच्या पहिल्या प्रेमभंगाचं वय आहे ? माझा तर बाराव्या वर्षी पहिला प्रेमभंग झाला होता. ह्या वयात तिनं हे अनुभवायलाच पाहिजे.' अहाहा ! किती सुरेख सांगितलं तिनं ! माझ्या कानात अजूनही शब्द घुमतात तिचे ! डिम्पलनं पंधराव्या वर्षी लग्न केलं तेव्हा मी म्हटलं, 'ती मूर्ख आहे. अहो, पंधरावं वर्ष लग्नाचं नाही, पहिल्या प्रेमभंगाचं आहे. पंधरावं वर्ष म्हणजे कसं पहिला प्रेमभंग अनुभवून, चंद्र उशाशी घेऊन सिताऱ्यांचे अश्रू ढाळीत रडायचं ते वय आहे ! "

या अशा सुंदर, फॅन्टस्टिक कल्पना फक्त देवीच्याच असू शकतात. शिक्षण, लग्न, संसार ह्या मध्यमवर्गीय चौकटीच्या विरुद्ध देवयानी आघाडी उघडते ती उगाच नव्हे ! ही मध्यमवर्गीयांच्या मनातल्या चौकटीची भीती तिला काढून टाकायची आहे. त्या बंदिस्तीतून लोकांना तिला मोकळं करायचं आहे. डिग्री मिळवण्यात माणसं आयुष्यातली उमेदीची वर्षं वाया का घालवतात हेच तिला कळत नाही. नट, नटद्या किंवा नेते–ज्यांचा तुम्ही हेवा करता ते कुठे शिकलेले आहेत ? तसंच लग्नाचं ! लग्न झालंच पाहिजे, नाही तर काय होईल ?–हा प्रश्न पडतोच का ? तसाच तो नोकरीचा कॉम्प्लेक्स ! देवी सरळ म्हणते,

"माझा नवरा unemployed असेल तर मला लाज वाटणार नाही. तो unoccupied असेल तर मात्र मला लाज वाटेल ! का म्हणून माणसानं आयुष्यभर मर–मर मरायचं आणि पोट भरायचं ? मी भयंकर उधळी आहे. मला चिक्कूपणा मुळीच आवडत नाही. सात पिढ्यांना पुरेल एवढा पैसा म्हणे ! करायचाय काय तो ? एका पिढीला पुरेल एवढा पैसा कमवावा आणि स्वतः उत्तम

जगावं. तुम्ही हाडाची काडं करून बंगले बांधता आणि तुम्ही मरायची वाट बघून मुलं त्याचं शॉपिंग सेंटर करतात. मग का तुम्ही हाडं झिजवता ? मी म्हातारपणी कधीही खंत करणार नाही की, मी हे केलं नाही. आता साखरपुड्याचंच उदाहरण. कोणत्या तरी नटीचा साखरपुडा मोडला तर मी लिहिलं होतं की मोडला तर मोडला ! हिऱ्याची वगैरे असेल तर अंगठी ठेवून घ्यावी, बाकी सगळं परत करावं. मी नेहमी साडी कमरेच्या खाली नेसते. एकदा एकजण मला म्हणाली, 'पुरुषांचं लक्ष जातं.' मी म्हटलं, अहो, बायका–पुरुषांचं लक्ष जावं म्हणूनच मी एवढं खाली नेसते. माझी काही बाळंतपणं, ऑपरेशन्स नाही झालेली. सपाट पोळीसारखं गोरं-पान पोट आहे, छान दिसतं. पाहू दे लोकांना ! स्त्री–मुक्ती वगैरे म्हणे ! ह्या सगळ्या कल्पना भारतात आत्ता कुठे पोहोचतायत. पाश्चात्य देशात हे सगळं आऊटडेटेड झालंय. माझी मतं ही असली मुलखावेगळी आहेत. आणि यातूनच मी माझा वाचकवर्ग स्वतः तयार केलेला आहे. कोण कोणाच्या बिछान्यात आहे हे तर सगळेचजण लिहितात. मी हे असं वेगळं लिहिते म्हणून माझे कॉलम्स चालतात. महाराष्ट्रातील वाचकवर्गाची readership अत्यंत मध्यमवर्गीय लेखकांवर पोसली गेली आहे युगानुयुगे एकाच प्रकारच्या कथानकावर हे लोक लेखन करतात. असली पुस्तकं वाचण्यापेक्षा माणसं वाचावी. प्रत्येक माणसागणिक एक वेगळं कथानक मिळेल तुम्हाला ! म्हणून मी कधीही वाचत नाही. आत्तापर्यंत मी फक्त नऊ पुस्तकं वाचलीत. काय तेच ते वाचायचं ? काय तर म्हणे, श्रीमंत वाईट ! चाळ उत्तम ! फ्री सेक्स म्हणजे भयंकर काहीतरी ! ज्यांनी स्वतःच्या हयातीत लग्नाच्या बायको-शिवाय दुसऱ्या बाईला पाहिलेलं नसतं, त्यांनी इतर बायकांबद्दल काय लिहावं ? मग अविवाहित मुलगी झुरते वगैरे असंच त्यांना वाटणार. तसा श्रीमंती, साहस, सौंदर्य आणि उपभोगाचा मध्यमवर्गीयांनी असा काही धसका घेतलाय ! अहो साधा मागे सी. के. पी.वर लेख लिहिला होता तर सगळी जात उलटली होती माझ्या-वर ! तेव्हा प्रभाकर पाध्येच म्हणाले होते की, ह्या मुलीनं इतकी विनोदबुद्धी वापरलीय ! गडकऱ्यांच्या जातीला विनोदाचं वावडं असावं याचं आश्चर्य वाटतं.' तसंच श्रीमंती ! श्रीमंती काही एवढी वाईट नसते हो ! कोणी लिहितात, या फिल्मवाल्यांच्या एका पार्टीत गरीबांचं एक लग्न होईल वगैरे. मी असं मुळीच म्हणणार नाही. अगदी बिल्ला मुंबईत फिरत असतानासुद्धा त्याचं रिस्क घेऊन मी रात्री–बेरात्री टॅक्सीनं पार्टीला जायची. एवढं मला पार्टीचं व्यसन आहे पार्टीत एवढ्या पैशांचा चार–पाच तासांत नुसता हवेत शेणगोठा होऊन जाणार आहे असं लोकांना वाटतं. मग रोजसुद्धा जेवू नये की हो ! अहो तो पार्टीतला कैफ, ती हवा, तो मूड, तो मौसम पकडणं हे उपभोगल्याबाचून कळणारच नाही की पार्टी म्हणजे काय ते ! "

देवयानी चौबळ आणि भांडण ह्या दोन गोष्टी सदैव एकत्र नांदतात. संपा-

दकांशी भांडण झालं तरी ती माघार म्हणून घेत नाही. लोक तिला म्हणतात, राजिनामा द्या ! ती सरळ विचारते, " त्यांना पाहिजे तर त्यांनी राजिनामा द्यावा. मी का देऊ ? अडीच रुपये घेऊन जी हजारो माणसं अंक विकत घेतात, त्यांना मी हवी असेन तर एक-दोन माणसांसाठी मी का जावं ? मला हा पलायनवादच पटत नाही की झालं कुठं भांडण की निघ तिथून ! एकदा आपण रिंगणात उतरलो की मारामारी करून, कधी बचावाचा खेळ करून रिंगणात टिकलंच पाहिजे. माघार घेऊन का परतायचं ? तसंच फिल्मवाल्यांशी आहे. त्यांची माझी खूपदा भांडणं होतात. माझ्या लिखाणावर बंदी येते. पण शेवटी रागालाही मर्यादा असतात. कोणीतरी मध्ये पडतं आणि भांडण मिटतं. बंदी उठते. तोच प्रकार मराठी पत्रकारांबाबत झाला. मी न दिलेली मुलाखत माझ्या नावावर छापून, मी न बोललेली वाक्यं माझ्या तोंडात टाकून केवढं कुभांड रचलं माझ्यावर ! आणि कोर्ट केसिस् चालवल्या. सगळ्यांना पुरून उरावं लागतं हो ! तीन वर्षांपूर्वी धर्मेंद्र प्रकरणात तर सगळी इंडस्ट्री माझ्याविरुद्ध उठली होती. आधी धर्मेंद्र बायकांशी तसाच वागतो. माझ्याशीही तसाच वागला म्हणा किंवा काय ! त्यात हेमाला मी शिळ्या-पाक्या अन्नाची उपमा दिली. असं ते बऱ्याच दिवसांचं साठलं होतं. तर तो मला सारखं चिडवायचा-' ठंडी कुडी, ठंडी बर्फी, आती है क्या लोणावळा ? ' तोपर्यंत तो छेडछाड करतो, अशी जयानं स्टेटमेंट्स दिली होती. मग मीही एक दिवशी सणसणीत उत्तर दिलं, ' मैं कोई पंजाबकी तंदुरी नही हूँ जो तेरे जैसा आनेजाने-वाला कोई भी रोटी पकाये ! ' त्यावरून ते जे पेटलं ! ही बाई मला बोलते म्हणजे काय ? त्यांना वाटतं, ते म्हणजे महापुरुष ! प्रत्येक बाई त्यांच्याबरोबर झोपायला धन्य समजेल ! त्यांचा अहंकार दुखवतो. मग ते पटकन् उलटतात.

" पण ही बंदी आली ती फार विचित्र वेळेला. माझा अत्यंत आवडता गायक मेहेंदी हसन त्या सुमारास येणार होता. त्याचा नशा सबंध हिंदुस्थानभर पसरलेला. त्या वेळेला ह्या लोकांकडच्या खाजगी मैफलींना मला बोलावलं जात नव्हतं. त्या वेळेस सलीम-जावेद माझ्या पाठीशी उभे राहिले. अर्थात त्यांच्याशीही माझं भांडण होतं. पण मी प्रस्थापितांविरुद्ध भांडतेय, तेव्हा त्यांनी त्यांच्या घरच्या मैफ-लींना मला मुद्दाम बोलावलं. दिलीपनं विचारलं, ' वो कौन है ? कैसी आयी ? ' तेव्हा त्यांनीही उत्तर दिलं, ' वो देवयानी चौबळ आहे. वो हमारी फ्रेंड है ! उसे हमने बुलाया है ! ' तेवढ्या त्या दहा मिनिटांत मी मेहेंदी हसनला उर्दूमधून सगळी हकीकत पटकन सांगितली आणि म्हटलं, ' आता मी तुमच्या मैफलींना कशी येऊ ? ' त्यावर ते चटकन म्हणाले, ' तू माझ्याबरोबरच चल. ' आणि त्यांनी त्यांच्याबरोबरच मला सर्व मैफलींनाही नेलं. मग फिल्मवाल्यांनाही जरा ते आवडलं की एवढ्या बंदीतूनसुद्धा ही एवढ्या जिद्दीनं आली वगैरे ! "

एकूण देवयानीची भांडणं ही अशी चहाच्या पेल्यातील वादळंच असतात. ती

महाराष्ट्र ग्रंथ संग्रहालय पुणे

फारशी टिकत नाहीत. कारण वैऱ्याचेही गुण टिपण्याचं मोठं मन देवयानीकडे आहे. म्हणूनच तिचे कॉलम्स फिल्म इंडस्ट्रीतल्या लोकांतसुद्धा पॉप्युलर आहेत. देवी म्हणते, "एकदा पेन हातात घेतलं की खाजगी गोष्टी मी साफ विसरते. मी एवढी छोटी नाही हो ! माझी भांडणं मी माझ्या जिवावर चालवू शकते. मी उद्या पत्रकारिता सोडली तरी मी ह्या फिल्मी लोकांशी प्रेम आणि वैर सांभाळू शकेन. कारण फिल्मइंडस्ट्रीनं मला पेनमुळे जवळ केलेलं नाही. पेनमुळे संबंध ठेवण्याइतके मतलबी आणि व्यवहारी नाहीत ते ! त्यांना बुद्धीचं आणि व्यक्तिमत्वाचं कौतुक आहे. विषप्रयोगसुद्धा सगळ्यांनाच नाही जमत. ह्या पेग ऑफ पॉयझनचीसुद्धा सतत गोड खाऊन कंटाळलेल्या ह्या लोकांना फार आवश्यकता असते. त्यांचं वागणं कृत्रिम असतं ह्यात वाद नाही. पण ते प्रसिद्धी आणि कॅमेऱ्यापायी बनतं. आणि सगळ्याच माणसांनी अगदी खरं-खरं वागावं असं कुणी सांगितलंय ? प्लॅस्टिकची फुलंही चांगलीच वाटतात की ! वास नसलेली फुलं काही वाईट नसतात हो ! डेलीयाची बागही छानच दिसते. फुलं म्हणजे वासाचीच हवी, ही सगळी जुनाट मतं आता बदलायलाच हवीत. तसंच माणसांचं आहे. त्या कृत्रिमपणात तो माणूस सुखी आहे ना ? मग झालं तर ! हे फिल्मवाले जितके मोठे असतात, तितकेच ते छोटे होऊ शकतात. ही जादुगिरी मी त्यांच्याकडूनच शिकलेय. त्यांचं प्रत्येक नवीन गोष्ट आसासून शिकणं मी पाहिलंय. परवा एका पंजाबी घरात गणपती बसवला होता. त्यांनी मला आवर्जून बोलावलं. मी मुद्दाम चांदीच्या दुर्वा वगैरे घेऊन गेले. आपण त्यांच्या वैष्णोदेवीचं कौतुक कधी केलंय ? पण त्यांनी आपले रीतीरिवाज किती चटकन उचललेत ! आपण लोक पाठीमागून माणसाचं कौतुक करतो. काय उपयोग त्याचा ? ते लोक उलट म्हणतात, 'देवी, दाद जिथल्या तिथं द्यावी.' खरं आहे. मी अशी मरणं पाहिलीत घरात की वाटतं पुन्हा एखादं माणूस भेटेल की नाही ? तेव्हा दाद जेव्हाच्या तेव्हाच द्यावी. नशा तेव्हाच, त्या मिनिटालाच असते. हे लोक एवढे हुशार असतात, चतुर असतात ! आयुष्यातल्या लहानमोठ्या गल्ल्या त्यांनी पार केलेल्या असतात. जो राज कपूर मास्कोला उतरल्यावर अख्खा मास्को एअरपोर्ट त्याच्या पाठीशी उभा राहतो, तोच राज कपूर पुण्यातल्या त्याच्या फार्मवर पापलेटचं कालवण करेल आणि स्वतः तुम्हाला सर्व्ह करेल तुमच्या छोट्या-मोठ्या आवडी लक्षात ठेवेल. दोन तपांपूर्वी भेटलेल्या देवीचं चित्र त्याच्या मनात ताजंतवानं राहील. सूक्ष्म गोष्टी टिपणारी त्याची नजर, ती भावना हे सगळं एवढं कृत्रिम नसतं हो ! कृत्रिमपणा तुम्ही एक-दोन वर्षं चालवू शकता, दहा-बारा वर्षं टिकवू नाही शकत."

देवीच्या आयुष्याची आता फिल्मी आणि गैरफिल्मी जग अशी दोन शकलं झाली आहेत. ह्यातलं कोणतं खरं, आणि कोणतं अधिक खरं ह्याविषयी सुरुवातीला तिच्या मनात गोंधळ उडाला होता. स्वाभाविकच होतं ते ! मध्यमवर्गीय पगडा असा

सहजी थोडाच जाणार आहे? पण आता ?

"आता मी ह्या तळ्यात पुरती मुरलेय. आणि मला ते आवडू लागलंय. आयुष्यात ज्या-ज्या वेळी कसोटीचे प्रसंग आले, तेव्हा-तेव्हा घरच्या लोकांपेक्षा फिल्मचे लोकच मला अधिक उपयोगी पडले. कधीतरी माझे मध्यमवर्गीय लोक म्हणतात, 'हुश्श करावंसं वाटलं तर या आमच्याकडे ! जरा घरच्यासारखं वाटेल !' मला कीव येते त्यांची ! मला फिल्मी लोकसुद्धा आपलेसे वाटतात. त्यांनाही मी जवळची वाटते. म्हणून तर झीनत मला कामासाठी कधीही गाडी वापरायला देते. राजेश खन्नाची आई माझ्याबरोबर छोट्या-छोट्या दुकानांतून शॉपिंग करत फिरते. वरळीच्या दंगलीत सापडल्यानंतर पहिला फोन राज कपूर आणि कृष्णा कपूरचा येतो. त्या लोकांच्या घरीही मी घरच्यासारखी वागते. त्यांनाही स्वयंपाकाची, टापटिपीची आवड असते. संगीताची आवड असते. आम्ही मिळून अनेक गोष्टींची चर्चा करतो. हे करू या, ते करू या असे प्रोग्राम्स आखतो, पिकनिकला निघतो. लंब्याचवड्या गप्पा मारतो. त्यांच्या घराचा मी एवढा कब्जा घेतलेला असतो की एखादा नट माझ्याशी भांडला तरी त्याची आई नाहीतर बायको माझी बाजू घेते. मला वाटतं, हेच महत्त्वाचं आहे. त्या लोकापर्यंत पोहोचणं-खऱ्या अर्थानं. ते लिहिण्याबिहिण्याचं जाऊ द्या ! ते नंतर येतं. तेव्हा ह्या इंडस्ट्रीत असे झगडे करून मी आत येऊन बसलेय, ती मोठी कर्तबगारी नाही, असं मी मानते. ते बडे आहेत. त्यांना चमचे, तरफदार खूप मिळतात. पण त्यांना समजून घेणारे, मनानं त्यांच्यापर्यंत पोचणारे किती लोक असतील ? त्यांचं एक दालन कुणी ओलांडू शकत नाही तिथं त्यांच्या मनाची दालनं ओलांडून जे माणूस तिथवर पोहचतं तेच खरं ! डिंपलनं मला तिच्या घरी येण्याची बंदी केली. तेव्हाही मी हेच म्हणाले होते, तू राजेशच्या घराचे दरवाजे मला बंद करशील, पण ते दरवाजे पार करून, त्याच्या मनात, त्याच्या डोक्यात, त्याच्या प्रत्येक हालचालीत जिथं मी जाऊन पोहोचलेय तिथं तू मला काय बंदी करणार ? माझा चॅलेंज आहे. म्हणे मी दरवाजातून आत येऊ देणार नाही. अग दरवाजे कसले ? मातीविटांचे ?"

देवीचे असे अनेक रोकडे सवाल आहेत. त्यापैकी एक-फूल ना फुलाची पाकळी घेऊन कोणत्याही मासिकासाठी मी लिखाण का करावं ? ती म्हणते, 'मला चांगल्या फुलांचा गुच्छ हवा. कॉलम्स लिहिण्यात मला नाही वाटत माझा कोणी हात धरेल ! 'मनोहर' चा सेल सहापटीनं वाढला तो काय उगीच नव्हे ! मग कशासाठी खर्डायचं कमी पैशांत ? अर्ध्या भाकरीत संतुष्ट राहायची आणि स्वतःची किंमत स्वतःच कमी करून घ्यायची महाराष्ट्रीयन वृत्ती म्हणूनच मला मानवत नाही. सुगीचं भरलं पीक आल्यावर त्याला खरीददार पाहिजेत. 'वा ! गहू काय छान आहे ?'-म्हणणारे कदरदार मला नकोत. खरीददार पाहिजेत. दुसरं म्हणजे मला कोणीही परगावी समारंभाला बोलावलं तर मी चक्क प्लेनचं तिकीट मागते.

मी एकटी प्रवासात बोअर का होऊ ? म्हणून मी मित्राच्या तिकिटाचीही व्यवस्था करा असं सांगते. स्वखर्चानं वगैरे जाणं मला मंजूर नाही. तसंच एका गावात, एका ठिकाणी, एकच समारंभ ठेवा. गणपतीसारखं मला नाचवू नका असं मी स्पष्ट बजावते. जर मी सर्वांचं उत्तम आदरातिथ्य करते तर, माझंही तसं झालं पाहिजे.

" पुण्याचा एक किस्सा सांगते तुम्हाला. नवीनच पत्रकारिता सुरू केली. त्यावेळी पुण्यात एक सुंदर पार्टी मी अॅरेंज केली होती. तन्हेतऱ्हेच्या लोकांना बोलावलं. वाटलं, आता माझं खूप कौतुक वगैरे होईल ! तर कौतुक राहिलं बाजूला, उलट महिनाभर इतकं संशयाचं वातावरण होतं की हिला पाहिजे तरी काय ? का हिनं पार्टी केली ? म्हणजे जेव्हा प्रथम मी मराठी लोकांच्यात पाऊल टाकलं, स्वगृही का काय म्हणतात तशी परतले तर इथलं वातावरण वगैरे पाहून मला इतकं वाईट वाटलं ! (तेव्हा मला वाईट वगैरे वाटायचं हं !) तलावात राहून माशाशी वैर करू नये असं म्हणतात. पण ह्याचा अर्थ मगर–माशांनाही मिठ्या मारू ! ह्या तलावातून बाहेर येण्याचा मी जेव्हा–जेव्हा प्रयत्न केला तेव्हा–तेव्हा बिनपाण्याचं मरण ह्या माणसांनी मला दिलं. इतकं टॉरचरींग ! जणू काही मी एखादा गुन्हाच करतेय ! मी मुद्दाम माझ्या परिचितांना जाऊन भेटायची. त्यांच्यात मिसळायचा प्रयत्न करायची. तेव्हा–तेव्हा ही माणसं म्हणायची, ' तू काय बाबा आमच्याकडे चहा पिणार ? तू तर मोसंबीचा रस, ज्यूसेस वगैरे पीत असशील ! पोहे खायची सवय मोडली असेल नाही तुझी ? ते बदाम–पिस्ते ...' वगैरे.

" अहो मी खाण्यापिण्याचं का लिहायची ? तर लोकांचं कुतुहल शमावं म्हणून ! कोणी म्हणायचं, ' फोन केव्हा करायचा तुला ? उठतेस का दहापर्यंत ? नाहीतर म्हटलं, रात्री अपरात्री पार्टी झोडून उशीरा झोपत असशील, म्हणून विचारलं हो !' म्हटलं मी साडेसहाला उठून पूजाअर्चा करते ! तसंच पिण्याचं ! पार्टीत इतर लोक पितात म्हणून पिणं हे आता आऊटडेटेड झालंय. मला दारू आवडत नाही म्हणून मी विशेष पीत नाही. आणि दारू पिऊनही माझी मनःस्थिती फारशी काही सुधारते असंही नाही. पण घ्यायची इच्छाच झाली तर मी पार्टीतच कशाला, घरीही घेते. माझ्याकडे संध्याकाळी कोणी आलं तर मी त्यांना व्हिस्की किंवा जीन विचारतेच. एकूण काय ? फिल्मी आणि गैरफिल्मी अशी दोन्ही लोकं मला स्वीकारतात. आणि मलाही ते सोयीचं आहे. आणि आता मी अशा पदाला पोहोचलेय की मी कशीही वागले तरी लोक चांगलाच अर्थ घेतात. उद्धटासारखी वागले तरी म्हणतात, फ्रँक वगैरे आहे. यशाची हीच तर खरी गंमत असते. तुम्ही कसंही वागलात तरी लोक तुम्हाला खपवून घेतात मग मी बिनधास्तच का वागू नये ?"

देवीचा बिनधास्तपणा इतका पराकोटीचा आहे की इतर पत्रकार जेव्हा ' आम्ही फिल्मवाल्यांचं काही घेत नाही.' असं सांगून, आपले हात स्वच्छ आ[illegible]

असं दाखवण्याचा खटाटोप करतात, त्यावेळेला देवी त्यांना चक्क मूर्खात काढते. ती म्हणते–

"भूक असली तर मी पार्टीत जेवेन, नसली तर मुळीच जेवणार नाही. पण मी ही अशी आहे. जेवेन त्याच थाळीत थुंकेन ! कारण मला माहीत आहे की, हे जे जेवण आहे ते पक्कं धंदेवाईक आहे. एक तर ते इन्व्हेस्टमेंट म्हणून किंवा स्वतःचा मोठेपणा दाखवायला दिलं गेलेलं असतं. तेव्हा त्या अन्नाला का जागायचं? मी तर उत्तमोत्तम प्रेझेंट्स, हिऱ्यामोत्यांचे दागिने सरळ ठेवून घेते आणि लिहायचं ते लिहिते. लक्ष्मीला नाही कशाला म्हणायचं ? आपण लोकांना खाऊ घातलं तर चपात्या मोजत नाही, तर त्यांनी काय दिलं हे कशाला मोजायचं ? फिल्मवाले मला जेव्हा कंपनी म्हणून मजेखातर बाहेरगावी नेतात, तेव्हा मी बिनदिक्कतपणे जाते. काहीतरी निर्माण करणं, कोणाला उपदेश करणं असले माझे उद्देश कधीही नसतात.

"मी म्हणते, आयुष्य इतकं थोडं आहे ! त्यात काय करावं, काय नाही असं होऊन जातं. हिंदुस्थानी माणूस आयुष्य दोन हजार वर्षं धरतो. सगळं प्लॅनिंग त्यावर बेतलेलं ! अहो, मूठभर आयुष्यातली दहा वर्षं जातात बालपणात, वीस वर्षं जातात म्हातारपणात, मिळून हातात राहिला तो एवढासा मौसम ! त्याच्यात काय–काय करावं हे जेव्हा माणसाला कळेल ना, तेव्हाच तो खरोखर सुखी होईल! आपला राष्ट्रीय पदार्थ काय तर लोणचं ! आपण अगदी सगळ्याचंच लोणचं घालतो. सगळं Preserve करण्याची, राखण्याची आपली जी संस्कृती आहे ना, त्याची प्रथम तोडफोड केली पाहिजे. बाईच्या कमरेची ती किल्ली, ती साखळी, ते कपाट, हे सगळं गेलं पाहिजे. सगळं सुख, सगळी खुषी त्या कपाटात ! सगळ्या छान–छान वस्तू ठेवायच्या कुठे ? तर कपाटात ! मारे चांदीच्या वस्तूंचा सेट विकत घ्यायचा. कशाला ? तर इंदिरा गांधी नाही तर राज कपूर घरी येईल तेव्हा त्यांच्या स्वागतासाठी ! ना कधी तुमच्या घरी राज कपूर येत, ना इंदिरा गांधी ! मग त्यांची वाट बघत तुमच्या गोवऱ्या जातात स्मशानात आणि वस्तू राहतात कपाटातल्या कपाटात !

"मी स्वतः नेहमी चांदीच्या ताटलीत जेवायची. मला फकिरांचं फार वेड ! मी नेहमी त्यांना जेवण घालायची. एकदा चुकून मी चांदीची थाळी पण त्याच्या झोळीत घालून टाकली. आई नेहमी चिडायची की ही कार्टी एखाद्या गोसावड्याचा हात धरून जाणार ! कोणीही बनवेल हिला ! नाहीतरी शेवटी माझ्या आयुष्याचं गणित असंच झालं. शेवटी मी विकली जाते फार विचित्र गोष्टींना ! कोणी एखादा चांगला डायलॉग टाकला, चांगलं परफ्यूम, चांगलं संगीत, की झाले मी पागल ! म्हणूनच मला वाटतं, माणसानं उघळं असावं, शारीरिक, मानसिक भावनिक, आर्थिक सर्व बाजूंनी जेव्हा तुम्ही खर्चले जाता, तेव्हाच तुम्ही काही

तरी बनता. अहो, स्वत:ची बरबादी स्वत:च करावी. तुकड्या-तुकड्यानं कशाला स्वत:ला सांभाळत जगायचं ?"

व. पु. काळे म्हणतात-'एक क्षण भाळण्याचा, बाकी सगळे सांभाळण्याचे !' देवीचं वागणं बरोबर ह्याउलट आहे. ज्या क्षणावर देवी भाळते, त्याच क्षणाला स्वत:ला सांभाळणं ती सोडून देते. पण अशा भाळण्या-सांभाळण्याच्या खेळातल्या भिडूविषयी मात्र तिची मतं अस्सल बायकी आहेत. त्या एका हळव्या मुद्यावर मात्र तिचं सगळं पुरोगामित्व संपुष्टात येतं. पुरुषाला जिंकायला फक्त गोरा रंग आणि अवखळ खळ्या पुरेशा नसतात, याचं भान तिला आहे आणि तरीही स्वत:चा नवरा आपल्या मुठीतच असावा-त्या बाबतीत मात्र कोणतीही तडजोड नाही. सुरुवातीला चक्क घरच्यांचं मन राखण्यासाठी, 'दाखवून' वगैरे घेण्याची बदमाशी केली आणि तीन भावांच्या तिहेरी मतांचा अचूक लाभ उठवून घेतला. पण आता मात्र ती विवाहाच्या प्रश्नाकडे अगदी वेगळ्याच नजरेतून बघते. मुळात तिला यशस्वी, मान्यवरांची जात्याच ओढ ! राहणीसुद्धा अतिशय रंगेल ! तेव्हा जोडीदाराबद्दलच्या अपेक्षाही तशाच रंगीन असणार नाही का ? त्याबद्दल विचारलं असता, ती दिलखुलासपण हसून म्हणते,

"मी खूप आजारी पडले ना माधुरी, की मी पक्कं ठरवते की आता बरी झाल्यावर पहिल्यांदा मी लग्न करणार ! मी मुळीच antimarriage नाही. लग्न ही आवश्यक गोष्ट आहे.

"पण आता माझी स्थिती अशी आहे ना, की मला मिस्टर देवयानीशी लग्न करायचं नाही. माझ्या मागे शेपटासारखा फरपटणारा नवरा मला नको. आर्मी-नेव्हीतले लोक तर मला मुळीच आबडत नाहीत. नवऱ्याचा हुद्दा काय करायचा ? त्याला नाव आणि कीर्ती पाहिजे. ज्याच्याभोवती चार बायका पिंगा घालतात, ज्याच्याकडे लोक खूप आदरानं बघतात, असाच माणूस मला नवरा म्हणून हवा. कदाचित हा पु. ल.-अत्रे यांच्या सहवासाचाही परिणाम असावा ! त्याशिवाय मला अत्यंत dominating नवरा पाहिजे. मला मिळमिळीत माणूस नकोय. लग्नाचा विचार मनात आला की, मला नेहमी एक स्वप्न पडतं की माझा नवरा रेखा, राखी आणि हेमा यांच्यामागे लागलाय... की मी दचकून जागी होते आणि मला दरदरून घाम फुटतो. एकूण काय, मला पैसेवाला नवरा नाही मिळाला तरी चालेल, पण तो फमस असला पाहिजे. त्याला हेड-लाईनची सवय पाहिजे, कॅमेऱ्याच्या फ्लॅशेस्ची सवय पाहिजे. काही बायका अशा असतात ना, की नवऱ्यानं फ्लर्टिंग केलं, मग मी का करू नये ? मी ह्याच्या अगदी विरुद्ध आहे. म्हणजे एक तर त्यानं दुसऱ्या बाईबरोबर जायचं ते आपल्या मर्जीविरुद्ध आणि पुन्हा आपण दुसऱ्या पुरुषाबरोबर जायचं तेही आपल्या मर्जीविरुद्धच ! मग का ते असं मनाला आणि शरीराला छळायचं ? हा कसला जीवघेणा खेळ ? मी फिल्म इंडस्ट्रीत एवढी

लफडी बघते की उद्या माझ्या नवऱ्यानं असं काही लफडं केलेलं मला मुळीच सहन होणार नाही. माझ्या अहंकाराला धक्का लागला तर आयुष्याचा सत्यानाशच ! त्या सायरा, जया कशा राहतात देव जाणे ! म्हणजे शेवटी तुम्ही काय पाहता ? एक चेकबुक, बंगला आणि सुरक्षितता ! असल्या सुरक्षिततेला काय अर्थ आहे ?"

"अहो, ही सुरक्षितता तारुण्यासाठी नसून म्हातारपणासाठी असेल !"

"छे ! मला नाही वाटत तसं ! ज्या बाईनं आपल्या खडतर आयुष्यात अनेक चढउतार पाहिलेत, तिला त्याचं काही विशेष वाटणार नाही. आणि ते प्रत्येक बाईवरसुद्धा अवलंबून आहे बरं का ! तुम्हाला कल्पना नाही, काही बायकांना नवऱ्याची लफडी अभिमानास्पद वाटतात, आवडतात. त्या मोठ्या कौतुकानं सांगतात, 'तुला ठाऊक आहे देवी, ती अमकी नटी माझ्या नवऱ्यावर मरते !' म्हणजे त्यांना काय वाटतं, की त्या आता त्या नटीच्या लेव्हलवर आल्या. एरवी त्या अत्यंत साध्या, धुण्याभांड्यातल्या बायका असतात. पण नवरा त्या नटीबरोबर गेल्यानं, निदान बिछान्यात तरी कुठेतरी बरोबरी झाली ! कित्येकदा लग्न झालेल्या बायका कारणावाचून चक्क विचारतात, 'क्या देवी, कुछ चल रहा है मेरे मियाँ के साथ ?' उगाचच त्या नवऱ्याच्या नावानं चिडवणार ! म्हणजे त्यांना ते पाहिजे. कुठूनतरी झीनत नाही तर निदान देवीबरोबर तरी नवऱ्याचं नाव यावं ! भयंकर न्यूनगंडातून हे असं होतं."

देवयानी एक तुफान आहे. त्याला रोखायला तसाच माणूस पाहिजे पण जर त्या तुफानानंच सामावून जाणं नाकारलं तर ? पतिपरायणता आणि एकनिष्ठेच्या पायावर उभी असलेली विवाहाची वास्तू देवीच्या आयुष्यात उभी राहील ? कारण 'एकनिष्ठे'बद्दल देवी म्हणते की–

"वफा– ज्याला इमान अथवा एकनिष्ठा म्हणतात, ती माझ्यात मुळीच नाही. मी अगदी नमकहराम होऊ शकते. बहुतेक लोक इडियट असतात. ते असतात हो इमानी ! पण हाही एक मूर्खपणाचाच भाग आहे. कोणीही व्यक्ती महत्पदाला पोहोचली की, तिला वफा देणारे हजारो भेटतात. पण तिला समजणारे किती भेटतील ? माझ्याशी भांडणारे, माझ्याविषयी रद्दी बोलणारे लोक पुन्हा तुम्हाला माझ्या खोलीत दिसतील. मी म्हणते, एक बात है उसमे ! त्यांच्या काही गोष्टी मला आवडतात, त्यांची मी पक्की व्यसनी बनते. मग मी त्यांना पुन्हा थारा देते. मग मी म्हणते, 'वफा सिर्फ कुत्तों मे अच्छी दिखती है !' बाईला तर इमानीपणा शोभतच नाही. बाई म्हणजे कशी जरा चंचल, रंगेल, बेभरंवशी अशीच पाहिजे. आणि पत्रकार तर खासच ! भेजा नसलेला एखादा विश्वासू माणूस तुम्ही घरात ठेवलात, पण जर का तो निरुपयोगी असेल तर तो काही लोकांशी बोलू शकणार नाही, काम करू शकणार नाही. फक्त तुमचा खजिना सांभाळत बसेल ! तसा खजिना नाही माझ्याकडे. मी लुटली जाते. मी नेहमी म्हणते, प्रत्येक किना-

ऱ्याला भरलं माणूस लुटलं जातंच ! त्याच्यासाठी मी भरली बागच आहे. लोक म्हणतात, माणसं तुझा फायदा उठवतात. म्हटलं, का उठवू नये ? भरला बगीचा लुटला जाणारच. मग काय वाळवंट होऊन बसायचं ? जिथं कोणी येणार नाही. म्हटलं, वाहती गंगा आहे– अनेक लोक हात धुऊन घेतात. काय वाईट आहे त्यात ?"

अशी कणाकणानं लुटली जाणारी देवी क्षणोक्षणी भरून पावत असते. पण तरीही शेवटी ती इतकी पक्की देवयानी आहे की, तिच्या मतानं आयुष्यातल्या एका क्षणावरसुद्धा आपला अधिकार नाही, तिथे घोषणा काय कामाचा ? आपल्या मुलाला कोणीतरी बनवण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या पालकांना बनवून मुलगा अमिताभ बच्चन होत नाही आणि कधीतरी त्याच्याही माथ्यावरची उन्हं कडक होतात, हे कोणी पटवायचं ? देवीचा तरीही ज्योतिषावर विश्वास नाही. ग्रह-गोलांचा मानवी आयुष्यावर परिणाम होतो ह्यावर विश्वास नाही. पुढच्या क्षणांचा भरवसा ती देत नाही. फक्त तिचा गाढ विश्वास तिच्या अंतःप्रेरणेवर आहे. म्हणूनच डॉक्टरांनीसुद्धा आशा सोडलेल्या अमिताभविषयी सांगताना ती छातीठोकपणे बजावायची की, दुखण्यातून अमिताभ सहीसलामत बाहेर पडणार आहे ! आणि तिच्या अंतःप्रेरणेचा खरेपणा प्रत्ययास आला. शेवटी देवीच्या मतानं बुद्धाचं तत्त्वज्ञानच खरं ! वृद्धावस्था, मरण आणि आजारपण ह्यावर मात तुम्हाला करताच येत नाही. म्हणूनच स्वतःला उघळून लावायचं आणि आयुष्यातला प्रत्येक क्षण खऱ्या अर्थानं जगायचा हेच तिच्या आयुष्याचं तत्त्वज्ञान !

मला स्वतःला माणसं नेहमीच पुस्तकासारखी वाटतात. काही तत्त्वज्ञानाची असतात. काही गूढकथेसारखी, तर काही चार घटका करमणूक करणारी ! काही माणसं फक्त वाचायची असतात, तर देवीसारखी काही माणसं वाचून 'फील' करून घ्यायची असतात. दिवसातल्या कोणत्याही क्षणी देवयानीचं दिलखुलास हसणं पाहिलं की वाटतं, तिच्या आयुष्याचं सगळं सार एका वाक्यात सांगायचं झालं तर...

Life is like a camera
So face it with a smile !

माहेर / दिवाळी अंक १९८२

अंतरातल्या दिव्याच्या प्रकाशात वाट चालणारी पत्रकार

शोभा किलाचंद

कॉलेजजीवनाच्या हिरवळीवरून चालताना वाटेवरल्या तप्त, रक्तरंजित गुलमोहराकडे लक्ष वळतं–कोणाचं ? पुढल्या वळणावरील काटचाकुटचांचा मागोवा घेण्याची इच्छा असते– कोणाला ? त्या तरुण, पर्युत्सुक मनाची नजर कायम अस्मानातले तारे हातात आणून देणाऱ्या एखाद्या सिताऱ्याच्या शोधात असते किंवा कदाचित् दूरवरील सिताऱ्यांच्या दुनियेचा शोध घेत असते ! प्रत्येकाच्या आयुष्यात येणारा तो काळ माझ्याही आयुष्यात कधीतरी येऊन गेला. आणि तेव्हा चंदेरी दुनियेतल्या सिताऱ्यांच्या घरात डोकावण्याचा अनावर मोह मलाही आवरता आला नाही. त्या अजाण, स्वप्नील वयाची सीमारेषा ओलांडली मात्र–कधी, कसं ते कळलं नाही, पण वेगळं आणि त्यापेक्षाही अधिक व्याप्तीचं, खोलीचं काहीतरी वाचायला मिळावं ही आस वाढीला लागली.

मन:पूर्वक सांगते, त्या ओढाळ वयात जसं 'स्टारडस्ट'नं कुतुहलाचं कौतुक पुरवलं, तितक्याच सहजपणे जाणत्या वयात 'सोसायटी', 'सेलिब्रिटी'नं ज्ञानार्जनाचीच केवळ नव्हे तर कॅलिडोस्कोपमधून रंगीबेरंगी चित्रं दिसावीत तसं समाजाच्या बहुरंगी रूपाचं चित्रदर्शन करून त्या वयातल्या नैसर्गिक उत्कंठेचीही तृप्ती केली.

ही स्थित्यंतरं अशाच क्रमानं प्रत्येकाच्या आयुष्यात घडली असतीलच असं नव्हे, पण तरीही गेल्या दहा–बारा वर्षांत कोणत्याही कॉलेजकन्यकेच्या, नोकरदार स्त्रीच्या किंवा दुपारची झोप डोळ्यांवर घेऊन वाचन करणाऱ्या गृहिणीच्या हाती ती तीन मासिकं नक्कीच आढळत आहेत.

कोणतंही मासिक असो वा वृत्तपत्र, त्यात गतिमान समाजाच्या बारीक-

सारीक घडामोडींची नोंद करून त्या नेटकेपणानं वाचकांसमोर आणण्याचं, आपलं प्रकाशन आकर्षक आणि लोकप्रिय करण्याचं कसब केवळ दुर्मिळच नव्हे, तर ते काम अत्यंत जोखमीचं आणि चतुरस्र बुद्धिमत्तेचं असतं.

त्यामुळे जेव्हा 'सोसायटी', 'सेलिब्रिटी'च्या प्रत्येक नव्या अंकाची उत्सुकतेनं वाट पाहायला लागले, तेव्हाच त्यांच्या संपादिकेनं आपल्या आगळ्या संपादकीयानं आणि त्यात हाताळल्या जाणाऱ्या विषयांच्या वैविध्यानं लक्ष वेधून घेतलं. शोभा किलाचंद हे नाव वारंवार वाचनात यायला लागलं तसं तिच्याविषयीच्या कुतुहलानं चौकसपणाची जागा घेतली आणि मग निष्णात वकील आणि केंद्रीय खात्यातील कायदे सल्लागार श्री. राजाध्यक्ष यांची ही लेक आहे आणि उद्योगपती किलाचंद कुटुंबाची सध्या गृहलक्ष्मी आहे वगैरे बरीच माहिती कानांवर पडायला लागली. तेवढ्यापुरतंच ते थांबलं नाही. तिच्या मॉडेलिंगपासून बोचऱ्या पत्रकारितेपर्यंत आणि तिच्या लिखाणाविषयीच्या उलटसुलट प्रतिक्रियांपासून ते तहत् तिच्या जीवनातील अनेक स्कँडल्सपर्यंत अनेक गोष्टींचा उहापोह गप्पांमधून व्हायला लागला. तेव्हा 'अनोळखी पाऊलवाटे'साठी तिच्याकडे पावलं वळवणं अपरिहार्य होऊन बसलं.

तिच्या 'सेलिब्रिटी'च्या ऑफिसकडे पावलं वळवली खरी, पण मनातली धाकधूक कायम होती. 'ही काही औपचारिक मुलाखत नव्हे ! ह्या नुसत्या गप्पा. दोन मैत्रिणींमधल्या. तेव्हा रेकॉर्डरचं टेन्शन वगैरे बाळगायला नको.'–ह्यासारखी शेरेबाजी पोकळ ठरणार आहे ह्याची पूर्ण कल्पना होती. तिला खुलवत असताना, आपल्याला बोलतं करण्याचा हा प्रयत्न आहे, हे आजवर शेकडो व टॉपमोस्ट लोकांच्या मुलाखती अभ्याहतपणे घेणाऱ्या शोभा किलाचंदला कळणार नाही हे न कळण्याइतका असमंजसपणा माझ्याकडे मुळीच नव्हता. शिवाय आजवर ग्लॅमरस आयुष्य पुरेपूर वाटचाला आलेली शोभा दिसण्या–बोलण्यात आणि वागण्यात किती ग्लॅमरस असेल ही शंका मनाला सतत अस्वस्थ करीत होती.

तरीही माझा आणि शोभा किलाचंदच्या लिखाणाविषयी अपरंपार माहिती असलेल्या, तिच्या लिखाणाच्या प्रत्येक कंगोऱ्याचा बारकाईनं तपशील सांगणाऱ्या आणि तिच्याविषयी उदंड कुतुहल असणाऱ्या माझ्या मैत्रिणीचा–सौ. आभाचा उत्साह उतू जात होता हे निःसंशय !

जव्हेरी हाऊसमधल्या जुन्या लाकडी पण प्रशस्त जिन्यावरून जात, मनातल्या मनात तिच्या ऑफिसची कल्पना करता–करता थेट पाऊल पडलं ते समोरच्या ब्लॉकमध्येच ! टस्क आयव्हरी रंगात रंगवलेला प्रशस्त हॉल, त्या क्रीमकलरला उठाव देणारी प्रकाशयोजना, जागोजागी ठेवलेल्या परड्यांमधून हसणारी रंगीबेरंगी गुलाबफुल हॉलला मधोमध विभागणारं कोरीव काम केलेलं लाकडी त्रिफळी पार्टिशन, मधेमधे केनच्या खुर्च्या, त्या मोकळ्या प्रशस्त दालनातल्या ओरिसा

डिझाईनच्या लालभडक पडद्याच्या पार्श्वभूमीवर एक पूर्वाभिमुख टेबल आणि त्या टेबलावर संपूर्ण हॉलला उजळा देणारी एक निमगोरी, नितळ अंगकांतीची, नाकी-डोळी नीटस तरुणी ! तिच्या समोरच्या टेबलावर जलतरंगाच्या वाटचांसारखी नक्षीदार सुबक भांडी, कलमदानं, काचेच्या दगडाचा सुंदर शोपीस, जवळच्या कपाटात रचलेली आणि सभोवार पसरलेली अनेक जाडजुड पुस्तकं ! हॉलचं एकूणच रूप एखाद्या मासिकाच्या कार्यालयाच्या पसाऱ्याला शोभेसं, पण तरीही कार्यालयाचा कृत्रिमपणा नसणारं. एखाद्या गृहसजावटीचा उत्कृष्ट नमुना वाटणारं. पहिल्या नजरेतच तिथल्या कर्त्या बाईच्या सौंदर्यदृष्टीचा (ॲस्थेटिक सेन्स) प्रत्यय आणून देणारं !

आम्ही क्षणभर थबकून पाहतोय की ही एखाद्या कार्यालयातील स्मार्ट, तरतरीत मुलीसारखी दिसणारी नाजूक, साधीसुधी मुलगी म्हणजे गेली पंधरा वर्षं गाजत असलेली बहुचर्चित शोभा किलाचंद ?

" शोभा किलाचंद ? "

" हो, मीच ती ! या, आपण आत बसू या. "

क्विक रिसेप्शन ! खोटं हसू नाही. मनातून हवेसे वाटणारे पाहुणे तरीही अनाहूतपणे आलेत असं भासायला लावणारं यजमानपण नाही. इम्प्रेशन मारण्याचा नाटकीपणा नाही आणि विचाराला अवधी देत बसण्याचा संथपणा तर मुळीच नाही.

आम्हाला आतल्या खोलीत बसवून ती मिनिटभरासाठी बाहेर गेली तेव्हा माझ्या आणि आभाच्या विस्फारलेल्या नजरेत नकळत हसू फुटलं. आभाच्या मनात उसळणारे प्रश्न ओठांवर यायला अधीर झाले.

ती डौलदार चालीनं समोर येऊन बसली. पाय मुडपून सेटीवर बसत तक्क्याला रेलली. अगदी सहजपणे.

खादीच्या सलवार–कमीजमधली, कृश पण बांधेसूद अंगयष्टी, तरतरीत नाक, क्वचित हसताना ओठांची जाणती मुरड, मोकळा सोडलेला सरसरीत रेशमी केशकलाप, वय अल्लद लपवणारा चेहऱ्यावरचा ताजेपणा, निमगोरा नितळ रंग आणि त्या रंगाशी एरवी विसंगत वाटणारे पण आकर्षक नेत्रप्रसाधनानं आणि त्यांच्या मूळच्या सौंदर्यानं विलक्षण भेदक वाटणारे गर्द तपकिरी डोळे !

तिच्या चकचकीत, पारदर्शी, तपकिरी डोळ्यांनी आजवर किती कॉम्प्लिमेंट्स घेतले असतील, कितीजणांना मेस्मॅराइज केलं असेल ते तिचं तिलाच ठाऊक !

" तुमच्या करिअरचा इतिहास जाणून घेण्यापूर्वी तुमच्या आयुष्याच्या पूर्वेइतिहासाकडे एक चुटपुटता दृष्टिक्षेप टाकायची इच्छा आहे. कारण बऱ्याचदा पुढल्या आयुष्याची, काही नाटचमय प्रसंगांची पाळंमुळं ह्या चिमण्या वयात घट्ट रुजलेली असतात ! "

ती हसली. झुकलेल्या दाट पापण्या वर उचलून घेत उद्‌गारली, "ते बायोग्राफिकल डिटेल्स रटाळ, बोअरींग होतात असं नाही वाटत तुम्हाला ?"

हिच्यातली 'मुलाखत घेणारी' शोभा किलाचंद काढून टाकून तिला 'मुलाखत देणारी' कशी करायची हा माझ्यापुढचा आता खराखुरा प्रश्न !

"आणि मला प्रामाणिकपणे वाटतं, माझ्यात असं विशेष काय आहे ? मी असं काय भव्यदिव्य केलेलं आहे ? सुदैवानं मला चांगलं रूप लाभलं, बुद्धिमत्ता लाभली, आर्थिक सुबत्ता लाभली. हाती आलेल्या संधीचा चांगला उपयोग मी मला मिळालेल्या बुद्धिमत्तेच्या आणि आकर्षक व्यक्तिमत्वाच्या साहाय्यानं करून घेतला. बस्स !"

"हा तुमचा विनय झाला !"

"मुळीच नाही ! अहो, माझ्या बरोबरीच्या इतर बायका पाहा ! त्यांना कुटुंबाचं, कामाच्या वेळेचं, प्रवासाच्या वेळेचं, सामाजिक अपेक्षा आणि मर्यादांचं पालन करून व्यवसाय करावा लागतोय. आणि इतक्या संघर्षमय आयुष्यातून व्यवसाय करता-करताच त्या विणकाम-भरतकाम करतात, सण-समारंभ उत्साहानं पार पाडतात, सिनेमा-सहलीचे बेत करतात, योग्य ती प्रसाधनं करून स्वत:ला आकर्षक, नीटनेटकं ठेवतात, वाचन-लेखन करतात. आयुष्याला न कंटाळता रस घेऊन स्वत: हसतमुखानं जगतात, दुसऱ्यांना जगवतात. त्या बायका खऱ्या मोठ्या ! त्यांच्या तुलनेत मी कितीतरी स्वतंत्र आणि सुखी आहे. मला पैशांची सुबत्ता आहे, प्रवासाची दगदग नाही, स्वयंपाकाची कटकट नाही, वेळेचं बंधन नाही. मग मी चार गोष्टी केल्या तर त्यांचं कसलं कौतुक ?"

आणि त्या क्षणी मी सुस्कारा सोडला. वाटलं, आता खरीखुरी शोभा-शोभा किलाचंद बोलायला लागली. 'स्टारडस्ट', 'सोसायटी', 'सेलिब्रिटी'ची संपादिका, 'टाइम्स ऑफ इंडिया'ची स्तंभलेखिका, अन्यायाविरुद्ध आपली लेखणी निर्भीडपणे चालवणारी तलवारबाज शोभा-आणि श्रीमंती आयुष्य जगतानाही तळागाळातल्या लोकांचं मनस्वी भान असणारी आणि म्हणूनच त्यांच्यापर्यंत पोहोचणारी शोभा ! पण त्यासाठी केवळ तिच्याकडे संवेदनाशील मन आहे, त्याचबरोबर बंडखोरपणाही आहे.

"मी टिपिकल उच्च मध्यमवर्गीय मराठी कुटुंबात जन्माला आले असल्यानं माझ्यावर खूपच बंधनं होती. ही बंधनं मला फार जाचक वाटत. विशेषत: माझ्या माहेरी कला आणि खेळ यांना अभ्यासापेक्षा नेहमीच दुय्यम स्थान मिळत असे. मला खेळाची खूप आवड होती. त्यात मी प्राविण्यही मिळवत होते. परंतु माझ्या आईवडिलांची अपेक्षा होती की मी अभ्यासात काहीतरी भव्यदिव्य करून दाखवावं. खेळासारख्या माझ्या आवडीच्या विषयापासून मला असं परावृत्त करून रूक्ष विषयांच्या अभ्यासाकडे माझे लक्ष वळवण्याच्या त्यांच्या अट्टाहासापायी कदाचित

माझ्या मनात विद्रोहाची ठिणगी पडली असावी."

ह्या विद्रोहानंच कदाचित शोभाला वेगळ्या मार्गावरून चालायला मजबूर केलं असावं. घरातील श्रीमंत पण खानदानी वातावरण आणि बाहेरील पारशी-ख्रिश्चन मैत्रिणी, त्यांची सोशल्स, पाटर्या, पिकनिक्स ह्यांची धमाल, त्यांचा जाड-जूड पॉकेटमनी...घरातील बंधनं आणि बाहेरील स्वातंत्र्य ह्या दोहोंच्या कैचीत सापडलेल्या शोभाला त्या वयात स्वातंत्र्याची भुरळ पडणं अपरिहार्य होतं. त्यातूनच मग स्वत.च्या पायावर उभं राहणं आलं. हाताशी डिग्री नाही. कुठे ओळख नाही. आणि बंधनांचं वावडं ! तेव्हा अशा परिस्थितीतल्या किशोरवयीन शोभाकडे सौंदर्याचं जे एकमेव हुकमी पान होतं त्या पानावरच तिनं खेळायचं ठरवलं आणि सरळ मॉडेलिंगला सुरुवात केली. तिच्यासारख्या उत्कृष्ट फिगर असलेल्या आणि अतिशय तरतरीत चेहरेपट्टी लाभलेल्या तरुणीला मॉडेल म्हणून लोकप्रियता मिळवणं फारसं कठीण गेलं नाही. त्याच सुमारास तिला पदवी मिळून गेली आणि इतरांच्या 'पुढे काय ?'–ह्या प्रश्नाचं तोंड बंद करण्यासाठी तिनं पत्रकारितेच्या कोर्सला नाव घातलं.

हा कोर्स नावापुरता होता. पुढे पत्रकारितेची कारकीर्द करायची हे तेव्हा मनातही नव्हतं. मॉडेलिंगच्या निमित्तानं जाहिरात व्यवसायातील नरी हिरा-सारख्या जाणत्या माणसाची ओळख झाली होती. सहज विषय निघाला म्हणून त्यांनी विचारलं, 'माझी कॉपीरायटर रजेवर जातेय तर तिच्या जागेवर काम करशील ?'

बस्स ! त्या क्षणी शोभाच्या चेहऱ्यासमोरचा कॅमेरा हटला. हातात पेन आलं. तिच्या सौंदर्याचं जाहिरात प्रदर्शन संपलं आणि बुद्धीच्या सौंदर्याचं दर्शन घडायला सुरुवात झाली.

"वर्षभरातच क्लायंट्सच्या मर्जीनुसार आणि वस्तूनुसार लिहाव्या लागणाऱ्या हुकमी कॉपीरायटींगचा मला मनस्वी कंटाळा आला. गुडबाय करायला मी सरळ नरी हिरासमोर जाऊन उभी राहिले."

शोभाची कल्पकता आणि बुद्धिमत्ता ह्यांची ओळख त्या अनुभवी माणसाला पटली असावी. म्हणून त्यांनी तिला 'स्टारडस्ट'च्या संपादनाचं काम करतेस का म्हणून विचारलं. आणि 'स्टारडस्ट'पासून तिच्या संपादकीय कारकीर्दीला सुरुवात झाली.

"हो, आणि त्याचबरोबर 'स्टारडस्ट'नंही माझ्यापासून सुरुवात केली असं म्हणायला हरकत नाही. तेरा वर्षं झाली त्या गोष्टीला ! तेव्हा मी ऐन विशीत असले तरीसुद्धा मला स्टार्सचं बिलकुल वेड नव्हतं. चित्रपट तर मी कधी पाहतही नव्हते. त्यामुळे धर्मेंद्र म्हणजे 'कोणीतरी ग्रेट', 'एव्हरग्रीन देवानंद–हाय–तोबा !' असलं त्यांच्याविषयी बालीश प्रेम मला मुळीच नव्हतं."

त्यामुळेच तर शोभा स्टार्सना जमिनीवर–डस्टवर आणू शकली. आजवर ज्यांच्याविषयी केवळ गोड–गोड छापलं जाई, त्यांना ह्या पिंगट डोळ्यांच्या मांजरीनं बोचकारायला सुरुवात केली. ती त्यांच्या घरात डोकावली, बेडरूममध्ये डोकावली, त्यांच्या रंगवलेल्या चेहऱ्यावरचा मुखवटा तिनं मोठ्या खटघाळपणानं उडवून टाकला. एरवी लोकांच्या मनात देवासारखं, भक्तिभावाचं स्थान असलेले हे सितारे, तिनं त्यांची स्खलनशीलता, त्यांच्यातल्या त्रुटी लोकांना दाखवून ते तुमच्या–आमच्यासारखेच सामान्य आहेत हे दाखवून दिलं. आजवर असं कधी घडलं नव्हतं. 'निताज नॅटर', 'कोर्टमार्शल' ह्यासारख्या सदरांमधून त्यांच्या खाजगी गोष्टींची जाहीर चर्चा व्हायला लागली. लोकांनाही ह्या भेळपुरीसारख्या चटकदार चावट खाण्याची चटक लागली. 'स्टारडस्ट'नं आमाप लोकप्रियता मिळवली.

"एक गंमतीची गोष्ट म्हणजे मी स्वतः कधीही सिनेनटांच्या मुलाखतीला गेले नाही. कपभर चहा आणि चमचाभर बातचीत करून आले नाही. त्यांच्या ग्लॅमरस दुनियेकडे फिरकले नाही. सगळीच सूत्रं पडद्याआड राहूनच मी हलवली. आणि एक वेळ अशी आली की माझं मलाच वाटलं, दुसऱ्याची खिल्ली उडवण्याचा हा खेळ म्हणजे त्यांच्या आनंदावर घाव घालून स्वतःची तुंबडी भरण्यासारखा आहे. त्यात त्यांच्याइतकंच स्वतःचंही नुकसान आहे. मी माझीच निर्भत्सना करायला लागले. ह्याचा अर्थ मी एका रात्रीत साधुसंत झाले असा नाही, पण ती वाढत्या मॅच्युॲरिटीची खूण होती, असं म्हणायला हरकत नाही."

"मग काय पुन्हा नरी हिरासमोर गुडबाय?"

शोभा मनःपूर्वक हसली. "अगदी बरोब्बर! ज्या क्षणी फिल्मपत्रकारिता ही माझ्या बुद्धीला चालना देत नसल्यानं मी इथं फार काळ रमू शकणार नाही हे माझं मला कळून आलं, त्या क्षणी मी 'स्टारडस्ट' सोडायचा निर्णय घतला. पुन्हा त्यांनी पर्याय दिला, 'तू नवीन मासिकच का सुरू करत नाही?'"

आणि 'सोसायटी' चा जन्म झाला!

"'सोसायटी'ची सुरुवात एक स्त्री-मासिक म्हणून झाली. पण त्यातल्या गृहसजावट, सौंदर्यसाधना, खाद्यपदार्थकृती अशा चौकटीत माझं मासिक कोंबणं मला जड जायला लागलं. माझं विश्वच वेगळं पडतं ना! त्यामुळे 'सोसायटी'ची सुरुवातीची साचेबंद चौकट मोडून मी ते सर्वसमाजाभिमुख केलं. आणि तरी सांगते 'स्टारडस्ट', 'सोसायटी' चा काय किंवा कालपरवाच्या 'सेलिब्रिटी' चा पहिला अंक चाळताना माझी मलाच लाज वाटते! किती चुका त्यात!"

कलावंताचा अस्वस्थ आत्मा घेऊन जन्माला आलेली शोभा 'सोसायटी'-तही फार काळ रमणार नाही हे उघड होतं. म्हणून त्याला रामराम ठोकून 'सेलिब्रिटी' द्वारे आपली स्वायत्तता प्रस्थापित करताना जिव्हाळ्याच्या संबंधांची मोड-

तोड झाल्याच्या बातम्या फारशा खऱ्या नव्हेत. कुठलाही वियोग हा तसा सुखकारक नसतोच. पण 'सेलिब्रिटी' च्या यशानं तो भरून काढला.

"'सेलिब्रिटी'चा अर्थ सन्माननीय आणि लोकप्रिय ! तेव्हा 'सेलिब्रिटी'ला लोकप्रिय करण्याचा तुमचा हेतू होता की सन्माननीय व्यक्तींना लोकप्रिय ?"

ह्या प्रश्नावर शोभा हसून म्हणाली,

"तुमचा दुसरा तर्क अधिक खरा आहे. कारण मला प्रत्येक घटनेत माणूस दिसतो. मला माणसांबद्दल फार प्रेम वाटतं. अगदी रूक्ष, कंटाळवाणा माणूससुद्धा मला मोहात पाडतो, आणि तो तसा का असावा ह्याचा मी विचार करायला लागते. त्यामुळे अन्नातील भेसळ संशोधन असो की अंतराळ–संशोधन असो, मला त्यामागचा माणूस दिसतो. त्याच्या दृष्टिकोनातून मी सगळं बघते, मांडते. त्यामुळे अप्रसिद्ध व्यक्तींना लोकप्रिय करण्याचा माझा हेतू होताच !"

साहित्यात 'मुलाखत' हा खास प्रांत आहे. यशस्वी मुलाखत घेणं हे फार अवघड आहे शोभा किलाचंद ह्यांनी आजवर थेट कै. संजय गांधींपासून शरद जोशींपर्यंत अनेक गाजलेल्या मुलाखती घेतल्या आहेत आणि वाचकांच्या पसंतीची पावती मिळवली आहे पण यशस्वी पत्रकारिता म्हणजे निव्वळ लोकांशी गोड–गोड बोलून, साध्या सरळ मुलाखती घेणं नव्हे ! सामान्य माणसांच्या मनातल्या प्रश्नांचं प्रतिनिधित्व करीत कटू असली तरी सत्य परिस्थिती त्यांच्या नजरेसमोर आणणं, समाजातल्या भल्याबुऱ्याची नोंद त्याच्या जाणकार मनाला करून देणं हे पत्रकाराचं ब्रीद असतं–असावं. आणि त्याला जागणारी शोभा आडवेतिडवे प्रश्न विचारून मुलाखत देणाऱ्याला कोंडीत पकडण्यात, त्याच्या मनातलं नेमकं काढून घेण्यात एक्सपर्ट आहे. मुलाखत घेण्याची तिची एक खास खुबी आहे. मुलाखत देणाऱ्याची आणि संबंधित विषयाची तिनं पूर्वतयारी केलेली असते. अपवाद वगळता रेकॉर्डर हा तिचा साथी सोबत करीत असतोच. बरोबर प्रश्नावली असली तरी ती कडोसरीलाच ! मुलाखत देणाऱ्याला ती कधी पाहायला मिळणार नाही. मुलाखत वेळेवरच होईल ह्यावर तिचा कटाक्ष असतो. त्या माणसानं मुलाखत दोनदा रद्द केली तर उदार हस्ते माफी ! तिसऱ्यांदा ती त्याच्या वाटेकडे वळणार नाही.

"मुलाखत घेऊन झाल्यावर मी दोन दिवस त्या माणसाला विचार करायला अवधी देते. उत्स्फूर्तपणे तो एखादी गोष्ट बोलून गेला असेल आणि नंतर ते छापणं ठीक नव्हे, असं त्याला वाटलं तर त्यानं तसं जरूर कळवावं. मी त्याचा मान ठेवते. ते छापत नाही. पण जर का कोणी दादागिरी केली, हा असला प्रश्नच का विचारला ? मला अडचणीत का टाकलं ?– वगैरे, तर मग खलास ! 'माझ्या प्रश्नावर तू हे बोललास. मी ते आता जसंच्या तसं छापणार ! भले मग त्याचे काहीही परिणाम होवोत, मी पाहून घेईन.' –हे माझं निखालस उत्तर. आणि मी ते तस्संच छापतेही ! आधी उलटसुलट काहीतरी बोलायचं, मग गप्प बसायचं.

आणि छापून आल्यावर मी असं बोललोच नाही किंवा तिनं जादापणा करून स्वत:च्या मनानंच मुलाखतीत दडपलं, असली वक्तव्यं करायची ह्याचा मला फार राग येतो. आणि तुम्हाला सांगते, एरवी ज्यांच्याबद्दल आपल्याला आदर असतो, जी बोल्ड वाटतात तीच माणसं नेमकी असला भेकडपणा करतात ह्याचं आश्चर्य वाटतं. त्याउलट जयप्रकाशजींसारखा माणूस पाहा! त्यांच्या शेवटच्या आजारपणात मी त्यांची मुलाखत घेतली होती. त्यात त्यांनी कितीतरी वादग्रस्त विधानं केली होती, मी ती जशीच्या तशी छापली. त्यावेळी ते म्हणू शकत होते की, 'मी आजारी असताना काय काय बोललो ते मला आठवत नाही' किंवा 'शोभानं माझ्या विकल अवस्थेचा गैरफायदा घेतला' वगैरे. पण ते मुळातच सडेतोड आणि बिनधास्त होते."

"पण काय हो, तुमच्या असल्या बेडरपणाचं पर्यवसान शत्रुत्व निर्माण करण्यात, टीकाकारांच्या टीकेत किंवा कोर्टकज्ज्यामध्ये नाही का होत?"

"खूपदा होतं. त्या दृष्टीनं मला माझ्या काही मुलाखती चांगल्या आठवतात. 'स्टारडस्ट' च्या काळात तर पोलिसांच्या आरोपींच्या यादीत माझा फार वरचा नंबर होता. अलीकडे कै. संजय गांधी लोकसभेच्या निवडणुकीत पराभूत झाल्यानंतर ताबडतोब मुंबईला आले होते. तेव्हा मी खुशवंतसिंग ह्यांच्या ओळखीनं त्यांच्या सोबत डिनरपार्टी ठरवली. आम्ही जवळ जवळ तासभर एकत्र होतो. त्या काळात एका सामान्य भारतीय नागरिकाच्या मनात जे काही प्रश्न निर्माण झाले होते, ज्या शंका उत्पन्न झाल्या होत्या तेच मी त्यांना विचारत होते.

"मी पत्रकार आहे हे त्यांना ठाऊक होतं. तेव्हा मागाहून पश्चाताप होईल अशी उत्तरं त्यांनी द्यायचीच नव्हती. ती त्यांची जबाबदारी होती. दुसऱ्या दिवशी मी खुशवंतसिंगांना म्हटलं, मी हे सर्व छापणार आहे. तेव्हा ते म्हणाले, 'हां, हां. लिख लो, लेकिन कुछ बुरा मत लिखना!' मी म्हटलं, 'बुरा क्यूं लिखू? त्यांनी जी उत्तरं दिली ती मी छापणार!' त्यांना वाटलं मी P. R. O. Piece लिहीन. पण मला सत्त्याच्या पलीकडे जाऊन तशी तडजोड जमली नाही. मग नंतर त्यांनी स्पष्टीकरण केलं की त्या केवळ गप्पा होत्या, ती मुलाखत नव्हती आणि हिनं त्या छापून माझा विश्वासघात केला वगैरे. हे असं बऱ्याचदा होतं. मला आता त्याची सवय झालीय! अशीच दुसरी वादग्रस्त मुलाखत श्री. रामनाथ गोयंकाची! मुलाखतीनंतर प्रत्यक्ष भेटीत, टेलेक्स, पत्र, फोनवर त्यांचे माझे खूप वादंग झाले. पण तरीही मला त्या माणसाबद्दल खूप आदर आहे. जनता पार्टीच्या काळात जॉर्ज फर्नांडिस ह्यांनी मला फार चांगली मुलाखत दिली होती. तशीच 'अमूल' च्या डॉ. कॅरिअन ह्यांचीही!"

"एकीकडे तुम्ही शरद जोशींसारख्यांच्या मुलाखती घेत असता आणि दुसरीकडे रुकसाना सुलताना किंवा शालिनीताई पाटील..."

" रुकसाना सुलताना ही फार कलरफुल् आणि डायनॅमिक पर्सनॅलिटी आहे, अत्यंत आकर्षक ! मला तिची मुलाखत चांगली आठवते. आणि शालिनीताई पाटील स्वत: फार बुद्धिमान आहेत. त्यांना माध्यमांचं आकर्षण आहे. त्या खूपच सहकार्य करतात. वेगवेगळ्या पोझेसमधले, कपडचातले आकर्षक फोटोग्राफ्स त्या देतात. शिवाय त्यांच्या आयुष्यातल्या स्थित्यंतरामुळे असेल, पण त्यांच्याशी बोलणं, त्यांची मुलाखत घेणं हे फारच इंटरेस्टिंग ठरतं. दिलखुलास, खुसखुशीत बोलण्यामुळे त्या मुलाखत फारच उठावदार करतात. वास्तविक ' सेलिब्रिटी ' च्या प्रतिमेत किसान आंदोलनाचे प्रवर्तक शरद जोशी ह्यांची मुलाखत तितकी बसत नव्हती. त्यावेळी ते विशेष लोकप्रियही नव्हते. पण माझ्या मते त्यांचं कार्य एवढं मोलाचं होतं की मला त्यांना प्रकाशझोतात आणल्याशिवाय राहवेना. अशी समर्पित माणसं मुळात किती कमी असतात ! त्यांना, त्यांच्या कार्याला सर्वसामान्य लोकांच्या नजरेसमोर आणायचं नाहीतर कोणाला ? फिल्मस्टार्सना ?"

" पण आज त्यांचीच चलती आहे ना !"

" तेच तर वाईट आहे. म्हणून तर दीपक पराशर, सुरेश ओबेरॉय सारखे चुटपुट, ' मी प्रेसवर बहिष्कार टाकतो, पेपरवाल्यांनी माझी इमेज खराब केली.' असली धाडसी विधानं करतात. पण यांना मुळात इमेज नसतेच मुळी, तर ती खराब करण्याचा प्रश्नच कुठे येतो ?"

" स्वत:चा मोठेपणा वाढवण्याची ती एक टॅक्ट आहे !"

" खरंय ! आणि अशांना हल्ली निष्कारण महत्त्व मिळतंय. कारण फिल्म जगताचा इतका भयानक पगडा आज लोकांच्या मनावर आहे ! चित्रपटांनी आपल्या जगण्याची, विचारांची दिशाच आज बदलून टाकलीय. आपल्या नकळत सगळ्या क्षेत्रांवर ह्या चित्रपट संस्कृतीनं आक्रमण केलेलं आहे. दैनंदिन जीवनात आपल्याला ते दिसून येतं. एखाद्या छोटयाशा खेडयातसुद्धा अमिताभ हेअरकट्, जितेंद्र जॅकेट, हेमा मालिनी साडी तुम्हाला आढळेल ! चित्रपटांतल्या हाणामाऱ्या, खून, प्रेमप्रकरणं–सगळचांची नक्कल ! अगदी मी बालपणापासून पाहत आलेल्या गणपती, नवरात्रोत्सवात पण किती झपाटचानं बदल घडून येतोय ! ते डिस्को डान्स–डिस्को दांडियाँ वगैरे ! आणि हीच चित्रपट संस्कृती भारतीय संस्कृती म्हणून आज जगासमोर येतेय ही सगळचात खेदजनक गोष्ट आहे. अहो माझा आठ वर्षांचा मुलगा म्हणतो, पुढल्या जन्मी मी अमिताभ बच्चन होणार किंवा त्याचा मुलगा होणार ! म्हणजे त्याचं आयुष्यातलं अंतिम ध्येय हेच ! "

" फिल्मस्टार्सइतके जवळचे त्यांना कोणीच वाटत नाही. आज तेच त्यांचे आदर्श आहेत ! "

" अहो, इलेक्ट्रॉनिक्स युगातली ही मुलं निव्वळ फिल्मस आणि व्हिडीओ कल्चरवर पोसली जातायत. कल्पना करा की त्यांच्या मानसिक, बौद्धिक आणि

भावनिक वाढीवर किती भयंकर आघात होत असेल! माझ्या मुलांवरून सांगते, सतत ती चलत्चित्रं पाहून त्यांच्या मेंदूत एवढी एक्साईटमेंट वाढत जाते की त्यांना तशीच स्वप्नं पडतात. फिल्म, व्हिडिओ, कॅलक्युलेटर ह्या सगळ्यांनी त्यांच्या कानांची श्रवणशक्ती, डोळ्यांची ग्रहणशक्ती आणि मेंदूची विवेचनात्मक विचार-शक्ती साफ खलास करून टाकलीय. त्यांची कलात्मकता आणि त्यांचा स्वयंभूपणा दिवसेंदिवस नाहीसा होत चाललाय. त्यांचं वागणं फक्त प्रतिक्रियात्मक (Responsive) होत चाललंय."

"अहो, जिथे आपले राजकारणी लोकसुद्धा सिनेनटांची भ्रष्ट नक्कल करतात, तिथे त्या लहान मुलांनी सिनेनट, मॉडेल, क्रिकेटीअर्स अशा प्रकाशझोतातल्या व्यक्तींनाच आदर्शवत् मानलं तर त्यांचं काय चुकलं?"

आपल्या मुलांना आपल्या मनाप्रमाणे घडवण्यात आपण किती यशस्वी होऊ ह्याविषयी आजच्या सगळ्याच तरुण मातांप्रमाणे शोभा किलाचंदही साशंक आहेत. स्वाभाविक आहे! येत्या पंधरा वर्षांत केवळ एखादं दशक, शतक नव्हे तर चक्क हजार वर्षं बदलायची घडी येतेय. दोन हजार वर्षांचा काळ मागे पडलाय. पुढल्या दोन हजार वर्षांचा काळ सामोरा आहे आणि हा संक्रमणाचा–सामूहिक, कौटुंबिक, कलात्मक, सांस्कृतिक, राजकीय, वैज्ञानिक बदल घडून येण्याचा चित्त-थरारक काळ आहे. अशा वेळी आपण–विशेषतः स्त्रिया ह्या पुढल्या पिढीसाठी पायाचा दगड बनणार आहेत. ह्या काळात आपल्यावर अपरिमित जबाबदारी आहे. शोभा किलाचंद ह्यांना ह्याची पूर्ण जाणीव आहे. म्हणून त्या म्हणतात, "आपली पिढी ही आपल्या आधीच्या पिढीपेक्षा व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करणारी आहे, स्वत्वाची जाणीव झालेली आहे आणि तरीही आपल्या पुढच्या पिढ्यांइतकी स्वतंत्र आणि आत्मकेंद्रित नाही. आणि ह्या दोन्ही पिढ्यांमधलं अंतर जास्त प्रखर आणि दबाव आणणारं आहे. आज नव्हे, पण मोठेपणी माझ्या मुलांना हे निश्चितपणे ठरवावं लागेल की त्यांना व्यक्तिविकास हवा की कौटुंबिक सुखशांती हवी! दोन्ही एका वेळी मिळणं जवळजवळ अशक्यप्राय होत चाललंय. आपण कशी-तरी ही तारेवरची कसरत करतोय. पण आपल्यासारखी तडजोड, समजूत उगवत्या पिढीमध्ये असणं शक्य नाही."

विशेषतः शोभा किलाचंदसारख्या सर्वस्वी व्यक्तिगत स्वातंत्र्यावर भर देणाऱ्या मातेच्या मुलांच्या बाबतीत तर ते अधिकच कठीण आहे. कारण वयाच्या दुसऱ्या वर्षांपासून, कपडे निवडण्यापासून ते बाहेर फिरायला जाण्यापर्यंतचं स्वातंत्र्य मुलांना त्यांनी दिलेलं आहे.

"प्रेमबल अर्जुन रथ हाक्यो।
सबसे उंची प्रेमसगाई!"

ह्या तत्त्वाप्रमाणे मुलांना चॉकोलेट्सची आमिषं किंवा छडीचं भय न दाखवता

वाढवण्यावर त्यांचा कटाक्ष आहे. त्यांना मुलांशी बोबड्या बोलात बोलून चुचकारायला आवडत नाही. आदित्य आणि अवंतिकेला त्या अगदी मोठ्या माणसांप्रमाणे वागवतात.

"आणि मुलंसुद्धा माझ्याशी तितक्याच समजूतदारपणे वागतात. मुलाखतीच्या वेळी कधी ती माझ्याबरोबर असली तरी मला जराही त्रास देत नाहीत. एकटीच चित्रं रंगवत, संगीत ऐकत, पुस्तकं वाचत बसतात. घरी चल वगैरे हट्ट चुकूनही करत नाहीत. अगदी टेप्स, रेकॉर्डर, कॉर्ड वगैरे हातात देण्यापर्यंत त्यांना उत्साह असतो आणि लिहिण्याच्या बाबतीत तर मला मूड, सोयीस्कर वेळ, निवांतपणा वगैरे काही लागत नाही. रात्री मुलं झोपल्यावर किंवा चक्क दोन खांद्यांवरून दोघं ओळंबत असतानासुद्धा एकीकडे माझं लिखाण चालू असतं!"

फक्त लिखाण की लिखाणाशिवाय इतरही काही गोष्टींमध्ये शोभाला इंटरेस्ट आहे हे समजून घेण्यासाठी तिच्या छंदाविषयी विचारलं, तर गोड हसून ती म्हणाली, "मला चांगली पुरणपोळी करता येते, पेंटिंग, पुष्परचना करायला आवडतं असं सगळं सांगायला मला खूप आवडलं असतं. परंतु मला तसा कसलाही छंद नाही. थोडाफार पुस्तकं वाचण्याचा आणि हां, फिरण्याचा–देशविदेश–मला नाद आहे. दागिने आणि कपडे वगैरेंवर पैसे खर्च करण्यापेक्षा प्रवासाला जाणं मला अधिक आवडतं. 'जिव्याकरता जोयु भलु!' जास्त जगण्यापेक्षा जास्त जग बघणं माझ्या दृष्टीनं अधिक महत्त्वाचं! विशेषत: पत्रकारांनी तर खूपच प्रवास करायला हवा. जास्तीत जास्त लोकांना भेटायला हवं. मी परवा फ्रान्सहून आले. तिथे शॉपिंग सेंटर्स न धुंडाळता मी खेडोपाडचांतून फिरत होते. फ्रेंच कामचलाऊ येत असल्यानं लोकांत मिसळत होते!"

"तिथे मुलाखती घेण्याचा प्रयत्न नाही केला?"

"नाही! एक तर त्या लोकांना भारतातल्या छोट्याशा मासिकात आपला परिचय छापून यावा ह्याचं अप्रूप वाटत नाही. त्यांना मोठ्या पेपर्सचं आकर्षण! दुसरं म्हणजे त्यांना तेवढा वेळही नसतो. त्यांना त्यांच्या ठराविक एजन्सीतर्फे पेमेंट वगैरे करून गाठणं, पुन्हा ते रेकॉर्डर घेऊन जाणं, नीट मुलाखत होईल की नाही ह्याची काळजी करणं हे सगळंच फार बोअरींग असतं. ठरवलं तरी मी काही तिथे मुलाखती घेत नाही. आणि तुम्हीच सांगा, चोवीस तास जर माझ्या मनातला पत्रकार जागा राहिला तर मला कोणी मित्र–मैत्रीण मिळायचीच नाही. त्या माणसाला सतत धास्ती की आपण बोलतोय ते ही छापेल की काय, आणि माझ्या मनात हा काहीतरी धमाल बोलून चांगली कॉपी पुढच्या अंकासाठी देतोय की काय हा बेरकी विचार! म्हणजे मग बघायलाच नको! तसं मला रेगन वगैरेंसारख्या व्यक्तिमत्वांचं खास आकर्षण वाटतही नाही. हां, मला व्हिलन्सना भेटायला आवडतं. अयातुल्ला खोमेनी, गडाफी यासारख्यांना भेटायला मला नक्कीच आवडलं

असतं. त्याच त्या चिकण्या-चोपड्या, गोड गोड बोलणाऱ्या माणसांना भेटायला मला मुळीच आवडत नाही. बुद्धिमान, वादग्रस्त आणि वादळी व्यक्तिमत्वांच्या सहवासात मजा येते. एलिझाबेथ टेलर-रिचर्ड बर्टन ! हां, अंतुले पदच्युत झाल्यानंतर त्यांनी मला दिलेली मुलाखत मला फार आवडली. त्यांच्याकडे सांगण्यासारखंही खूप होतं !"

" पण पत्रकार म्हणून भारतात तुम्हाला पूर्ण स्वातंत्र्य आहे, असं तुम्हाला वाटतं ?"

" मला शंकाच आहे. पण त्याचबरोबर विदेशातल्या पत्रकारांपेक्षा आपल्या पत्रकारांना पैशांची कमतरता भासते. त्यांचे सगळ्या देशांत प्रतिनिधी असतात. त्यांना कायदेविषयक, प्रसिद्धी आणि व्यापारी मदत सहज मिळते. त्यामुळे उभं जग हे त्यांचं कार्यक्षेत्र असतं. आणि देशोदेशींच्या घडामोडींच्या बातमीपत्रांमुळे त्यांचं मासिक अधिक रंगतदार बनतं. त्यांना इतक्या सुविधा असतात की ते Investigative journalism अधिक चांगल्या प्रकारे करू शकतात. मला इच्छा असूनही 'सेलिब्रिटी' साठी ते करायला जमत नाही. कारण कोणत्याही 'स्टोरी'च्या ताज्या माहितीसाठी कॅमेरा आणि रेकॉर्डर गळचात अडकवून दुसऱ्या क्षणी विमानात पाय ठेवण्याइतकी सुलभता मला इथं नाही. तरीही मी सांगते, आपले काही पत्रकार-'संडे' चे संपादक एम. जे. अकबर, खुशवंतसिंग यांच्यासारखे-फार चांगलं काम करतात. अरुण शौरी पूर्वी मला फार आवडत, पण आता त्यांचं लिखाण फार रूटीन होत चाललंय !"

" काहींना बैठी पत्रकारिता करणारे म्हणून काहीसं हिणवलं जातं. त्यावर तुमचं मत ?"

" कोणीतरी एखादी घटना रिपोर्ट करणं हे जितकं महत्त्वाचं आहे, तितकंच त्याचं विवेचन आणि मुद्देसूद विवरणही अत्यंत महत्त्वाचं आहे. चार ओळींच्या घटनेचं गांभीर्य लोकांना केव्हा कळेल ? तर जेव्हा अशा प्रकारचं विवरण त्या घटनेबद्दल विविध कंगोऱ्यांतून तपशीलवार कोणीतरी करेल तेव्हाच ना ?"

" मला वाटतं ह्या बाबतीत 'महाराष्ट्र टाईम्स' चे संपादक श्री. गोविंद तळवलकर हे आदर्श उदाहरण आहे "

शोभा किलाचंदच्या व्यवसायातही इतर व्यवसायांप्रमाणे स्पर्धा आहे. स्पर्धेतील जेलसी आहे. लिखाणातली चढाओढ आहे. चढाओढीतलं पाय खेचणं आहे, आणि त्याचबरोबर परस्परांच्या कॉलम्समधून एकमेकांना इंट्रोडयूस करून खुशामत करण्याचं हुकमी तंत्रही आहे.

" हे सर्रास चालतं. माझ्यासारख्या स्पष्टवक्त्या बाईवर तर सर्रास शरसंधान चालतं. मी हाती मासिक असूनही प्रत्युत्तर देण्याच्या भानगडीत पडत नाही. पण माझे सहकारी पत्रकार-विशेषतः पुरुष पत्रकार-जेव्हा पत्रकारितेच्या बुद्धिमान

क्षेत्रात उतरलेली एक निर्बुद्ध मॉडेल म्हणून माझी अवहेलना करतात, तेव्हा ते मला फार झोंबतं ! मॉडेलिंगला बुद्धीची आवश्यकता नसली तरी त्याचा अर्थ असा नाही की सगळ्याच मॉडेल्स बुद्दू आहेत. ग्लॅमरस विश्वात वावरणाऱ्या बायका काय नेहमी मूर्खच असतात ? शबाना, स्मिता पाहा ! त्या काय बुद्धिमान नाहीत ? बाईची लायकी फक्त रूपावरूनच का ठरवली जाते ? तुम्ही मॉडेलिंगकडून पत्रकारितेकडे कशा वळलात ?–हा मला मोठा चीड आणणारा प्रश्न आहे. अरे, पुरुषाला कोणी असा प्रश्न विचारतं का ? मग बाईलाच का ? मग ह्या प्रश्नावर मला सतत सफाई द्यावी लागते की, अहो माझ्याकडे फक्त रूपच नाही, बुद्धी आहे, कर्तृत्व आहे, गुण आहेत. पण तरीही माझ्या सहकाऱ्यांचा असा ठाम विश्वास असतो की माझ्या रूपाचं भांडवल करूनच मी हे यश मिळवतेय ! माझ्या सौंदर्याचं कौतुक मी फार पूर्वीपासून ऐकतेय. पण ते असं माझ्या मार्गातली धोंड बनून जाईल असं नव्हतं वाटलं कधी !"

एकूण पुरुषांचा समजूतदारपणा शोभाच्या वाट्याला कमीच येतो असं म्हणायला हवं. कारण मुलांइतकाच नवराही समजूतदार आहे का ह्या प्रश्नावर तिनं ठामपणे सांगून टाकलं, " मुळीच नाही !"

" मग आयुष्यात करियरला तुम्ही प्राधान्य द्याल की मुलं, नवरा आणि कुटुंब ह्यांना ?"

यावर त्यांनी स्वच्छपणे सांगून टाकलं, " मुलांना म्हणाल तर निश्चित सर्वात जास्त प्राधान्य ! त्यांच्या तुलनेत कुटुंब आणि नवरा ह्यांना नाही मुलांची गोष्टच वेगळी आहे. त्यांचा आणि माझा भावनिक संबंध त्यांच्या आणि माझ्या जीवनाच्या अंतापर्यंत संपायचा नाहीं. आजही मी माझ्या आईला रोज भेटते, तिला हवीशी वाटते. तिचं माझं खूप पटतं. माझ्या प्रत्येक वागणुकीचं ती आंधळं समर्थन करीत नाही. पण प्रेमापोटी अनेक गोष्टी ती मला पोटतिडिकीनं समजावीत असते. काही गोष्टींपासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करीत असते. चुका दाखवत असते. आणि तरीही माझ्यावर मनापासून प्रेमही करीत असते. तसंच मलाही माझी मुलं कितीही मोठी झाली, तरी त्यांच्या बाबतीतली माझी कर्तव्यं संपली, गुंतवणूक संपली असं वाटणार नाही. मायलेकरांचा संबंध इतका बेगडी असत नाही. दिसामासागणिक त्यांच्यात होणारी प्रगती, त्यांचं बदलतं रूप, वर्तन हे सगळं निरखणं, त्यांच्यात रमणं ह्यासारखा दुसरा आनंद नाही !"

" हा आनंद आईवडिलांनी जोडीनं लुटायचा असतो. पण हल्लीच्या स्त्री–स्वातंत्र्याचा, स्त्रीमुक्ती–चळवळीचा मुलांच्या स्वास्थ्यावर आणि एकूणच कौटुंबिक स्वास्थ्यावर विपरित परिणाम होतोय असं नाही तुम्हाला वाटत ?"

माझ्या प्रश्नावर शोभानं चमकून मान वर केली. आपल्या गर्द तपकिरी धारदार नजरेनं काही क्षण मला निरखून पाहिलं. ज्यांत तिच्या कौटुंबिक विच्छे-

दाचा आणि दुसऱ्या घरोब्याचा उल्लेख आहे त्या 'फेमिना'तील लेखाचा आधार घेऊन मी हेतुपुरस्सर हा प्रश्न विचारतेय का ह्याची तिनं तपासणी केली आणि माझा निर्व्याजपणा पटल्यावर ती उद्‌गारली,

"हो ! असा परिणाम नक्कीच होतो. तुम्हाला सगळंच एका वेळी मिळू शकत नाही. आणि एकदा ठामपणे करिअर निवडली की कशा कशाचं मोल द्यावं लागेल सांगता येत नाही. अशा वेळी प्रत्येक दिवस हा त्या स्त्रीसाठी तडजोडीचा दिवस ठरतो. तिला दुःखी करून जातो. म्हणूनच प्रत्येक स्त्रीनं कोणताही व्यवसाय स्वीकारण्यापूर्वीच त्याची जाणीव ठेवायला हवी. आणि दिवसेंदिवस ही परिस्थिती अधिकाधिक विकट होत चाललीय ! आयुष्यातल्या विसाव्या वर्षी आपण जग बदलू शकू असा उदंड आशावाद असतो. पण माझ्यासारख्या पस्तीशीच्या घरात पोहोचलेल्या बाईला मात्र वेळ फार कमी राहिलाय, आणि आयुष्यातला महत्त्वाचा काही निर्णय घ्यायचा असेल तर तो आत्ताच–नाहीतर फार उशीर होईल हे जाणवतं. एका अशा टप्प्यावर आयुष्य येऊन थांबतं की नेमका कुठला मार्ग निवडावा हे नक्की ठरवता येत नाही. आणि अशा विस्फोटक अनुभवांतूनच माणूस अधिकाधिक अंतर्मुख बनत जातो, आत्ममंथन करायला लागतो !"

बोलता–बोलता शोभा खरोखरच विचारमग्न होऊन गेली. आणि मला वाटलं, खरोखर माणसाला मोठं करतात ते हे असे अनुभव. निव्वळ वय नव्हे ! श्रीमंती, ऐश आणि यश ह्यांचं अमृत ओठांना लावता–लावताच अशा अनुभवांचं हलाहलही ती पचवत असते. उच्च, खानदानी परंपरा आणि मधुबिंदुसारखे वेचलेले शहाणे क्षण ह्यांच्या संयोगातूनच आजची शोभा घडलीय.

एरवी अनलंकृत, अतिशय साधी तरीही आकर्षक वाटणारी ही तरुणी बोलायला लागत नाही तोवर 'S. K.' अशी ठळक सही करणारी शोभा किलाचंद वाटत नाही. खऱ्या अर्थानं कळत नाही.

इंग्रजीवरील तिचं विलक्षण प्रभुत्व, आणि तिचं आकर्षक व्यक्तिमत्व ह्यामुळे ती कोणावरही छाप पाडते, त्याला विश्वासात घेते आणि त्याच्या मनातलं काढून घेते.

एकदा तिच्या कार्यालयात काही कामासाठी गेले होते, तर ते साफ रिकामं ! ती एकटीच टेबलाशी बसून, हातावर हनुवटी तोलून लिखाणात बुडून गेलेली. माझ्या आश्चर्यचकित नजरेतले भाव अचूक ओळखून ती म्हणाली, "आज विशेष काम नाही, म्हणून सगळ्यांना छुट्टी ! सगळे समोर ऑपेरा हाऊसला 'सदमा'ला गेलेत. मला थोडे संदर्भ ग्रंथ चाळायचे आहेत म्हणून मी थांबलेय इथे !"

सहकाऱ्यांबरोबरची तिची ही वर्तणूक तिच्या स्वच्छ स्नेहाची साक्ष देते. कारण ती अभिमानानं सांगते, की मी माझ्या सहकाऱ्यांवर येण्याजाण्याचं, रजेचं कोणतंच बंधन ठेवलेलं नाही. आणि ह्याचा गैरफायदा घेण्याचं सोडाच, उलट वेळ

पडली तर दूर, आडबाजूला राहणारी ही मुलं–मुली माझ्यासाठी रात्री उशीरापर्यंत थांबतात. कामं पुरी करतात. आजपर्यंत कधीही माझ्या मासिकाच्या प्रसिद्धीला विलंब झालेला नाही. "

दुसऱ्याला ती असं सन्मानानं वागवते आणि स्वतः मान मिळवते. प्रसिद्धीमाध्यमात राहूनही ती प्रसिद्धीपासून दूर आहे, अलिप्त आहे. एकदा तिच्याशी सूर जमले की दुरावा संपवून ती चटकन जवळीक साधते आणि आपण एकेरीवर येतो.

तिच्या लिखाणात ती निर्भिड वाटली तरी प्रत्यक्षात ती खूपच सांभाळून आणि सावरून घेणारी आहे. स्वतःला आणि इतरांनाही ! लिखाणात ती स्पष्टवक्ती वाटली, बेडर वाटली तरी प्रत्यक्षात शालीन आणि गंभीर आहे.

'शोभा किलाचंद' हे अवघं आकर्षक व्यक्तिमत्व त्या तपकिरी डोळ्यांत पुरेपूर साठलेलं आहे–ज्यात सागराची अथांगता आहे, ज्याच्या गहनतेचा अंदाज कधीच कोणाला करता येणार नाही. म्हणूनच वाटतं, शब्दांतून लखलखीत तलवारीच्या पात्यासारखी दिसणारी शोभा किलाचंद प्रत्यक्षात आर्ततेच्या देठातून उमललेल्या लिलीच्या फुलासारखी मोहक दिसते. वेगळी वाटते. तिच्या आईच्याच शब्दात सांगायचं तर 'सगळ्यांच्यात शोभा निराळी आहे !'

ह्या तिच्या निरःलेपणाचा शोध घेताना, इतरांची रहस्यं सहजगत्या उलगडून टाकणाऱ्या बोलक्या शोभाचा स्वतःच्या मनाचा एक कोपरा मात्र इतका रहस्यमय राहून जातो की तो जाणून घ्यायला पुन्हा–पुन्हा तिला भेटत राहावं असं वाटतं !

माहेर : दिवाळी अंक : १९८३

एक विद्रोही व्यथा

सौ. माणिक वांद्रेकर

मुंबईनगरी ही अलंकृत, नटवी नगरी आहे. गिरणगावी वज्रटिकेपासून मरीन ड्राईव्हच्या रत्नजडित चंद्रहारपर्यंत आणि निआॅन साइन्सच्या बिंदीबाजुबंदांपासून ते पायाशी झांजणाऱ्या चंदेरी लाटांच्या तोरड्यांपर्यंत, नखशिखान्त नटणारी ही नगरी आहे. तिच्या लखलखीत मेखलेतला पाचू म्हणवून घेतो तो जुहूच्या हिरव्यागार वनश्रीनं नटलेला नितांतरमणीय परिसर! लक्ष्मीपुत्रांनी वसवलेल्या ह्या वैभवसंपन्न नगरात आहे एक टुमदार बंगला. सभोवती श्रावणसरी आणि अश्विनी उन्हं सारख्याच उत्कटतेनं झेलणारी गच्च झाडी! साखरझोपेत कानी पडणारी पक्ष्यांची गोड किलबिल आणि पहाटवाऱ्यासोबत येणारा फुलांचा मृदुमदिर गंध!

हे काही एखाद्या कथा–कादंबरीतील अवास्तव वर्णन नाही. एक प्रशांत घरकुलाचं वास्तव चित्रण आहे हे! मुंबईसारख्या एका गजबजलेल्या, दाट लोकवस्तीच्या ठिकाणचं हे सुख म्हणजे अगदी स्वर्गसुखाइतकंच स्वप्नील अन् दुर्लभ!

पण हा स्वप्नमहाल अवकाशातून अलगद टपकत नाही धरणीवर! त्यासाठी प्रयत्नांचा चिरा न् चिरा घडवावा लागतो. नशिबाच्या कच्च्या रेतीचुन्यावर घामाचं पाणी मारून मजबूत करावा लागतो. कल्पकतेच्या बोगनवेलीनं तो शोभिवंत करावा लागतो.

एखाद्या सर्जनशील कलावंतानं उभारलेल्या अशा वास्तूंचं आकर्षक रंगरूप डोळ्यांत ठसतं दुसऱ्याच्या, पण बांधणाऱ्याच्या मनाला मात्र त्याच्या व्यथावेदना सलत असतात. म्हणूनच तो ते स्वर्गसुख आंधळेपणानं भोगत नाही तर जाणिवेनं उपभोगतो. हे डोळस समाधानच माणसाला जगण्याची रास्त जाणीव करून देतं

आणि त्यातूनच भोगाला त्यागाचं, आसक्तीला विरक्तीचं आणि खंबीर मनाला तरल संवेदनशीलतेचं अस्तर लाभतं.

हे सगळं मी दुरून पाहिलं, अनुभवलं आणि वाटलं ह्या विद्रोही व्यथेची अधिक जवळून ओळख व्हायला हवी. व्यवहारात प्रत्येकजण अमूक एखाद्या नावानं ओळखलं जातं– तसं ह्या झिरझिरीत साडीतल्या, उंच, बाळसेदार, काहीशा गोऱ्या चेहऱ्याच्या पण तेजस्वी अन् पाणीदार डोळ्यांच्या ह्या बाईवर लेबल चिकटवायचंच झालं तर सांगता येईल त्यांचं नाव 'सौ. माणिक वांद्रेकर'! पण त्यांचं अंतरंग पाहिलं तर मी म्हणेन त्यांचं खरंखुरं नाव 'एक विद्रोही व्यथा'!

एक साधासा प्रश्न हं! एखाद्या सुखवस्तू घरातल्या सासुरवाशिणीनं काय करावं? चारचौघींसारखं चाकोरीबद्ध आयुष्य काढावं. पतीची तिन्हीत्रिकाळ मनोभावे सेवा करावी. फारच झालं तर स्वतःच्या नाजूक तनूला पेलवेल एवढंच त्याच्या व्यवसायाचं ओझं आपल्या अंगावर ठेवून त्याचा भार हलका करावा. मुलांचे खेळ, खाणं, अभ्यास ह्यांच्या कोष्टकात स्वतःचं वेळापत्रक बंदिस्त करावं. वडीलधारी, पै–पाहुणे ह्यांची बडदास्त राखत, स्वतःच्या उसन्या प्रतिष्ठेचा तोरा मिरवत घरंदाज गृहिणीपद मिरवावं, उभ्या जन्माचं सार्थक व्हावं, ते ह्या युगानुयुगाच्या घट्ट विणलेल्या कोषात!

पण नियतीनंच काहींच्या नशिबी आयुष्यभर तुटलेल्या कड्यावरून धावणंच लिहिलेलं असतं. कडेच्याच राजरस्त्यावर उतरून चालणं त्यांच्या ललाटी रेखलेलंच नसतं, त्याला कोण काय करणार?

माणिकताईंनी दोनशे भांडवलावर घराच्या गॅलरीत सुरू केलेल्या एका हस्तव्यवसायाचं रूपांतर आज करोडो रुपयांची उलाढाल करणाऱ्या तीन–चार फॅक्टऱ्यांच्या भव्य व्यवसायकेंद्रात झालंय, त्यामागं हीच आंतरिक प्रेरणा आहे. त्यामुळेच यशापयशाचे व्यवहारी हिशेब इथं लटके पडतात. इथं आर्थिक तुटीच्याच बाजूला, अमोल अनुभवांची अशी काही भक्कम जमा नोंदली गेली असेल की नफ्यातोट्याचे व्यवहारी ठोकताळे ढोबळ आणि फसवे ठरावेत.

सुखासीन जीवनाशी विद्रोह करून त्यांनी ज्या क्षणी ह्या खेळाचा सारीपाट मांडला, त्या क्षणी सुरू झाली 'एक विद्रोही व्यथा!'

"मी तुम्हाला काय विचारते?–की तुम्हाला माझ्या व्यवसायाची गोड–गोड, छान–छान 'Success Story' हवीय की माझ्या अनुभवांचं खरंखुरं वर्णन? कारण लोकांना नेहमीच काहीतरी चमचमीत हवं असतं. आमच्या नेत्रदीपक यशाचा आलेख वगैरे! पण त्यामागे केवढं महाभारत घडून गेलेलं असतं ह्याचा सहसा कोणी विचारच करीत नाही. म्हणून तुम्हाला विचारते."

मला खरं तर हसू आलं होतं. मुलाखत घ्यायला मी आले होते, प्रश्न मी

विचारायला हवे होते. त्याएवजी त्याच माझ्यावर प्रश्नांच्या फैरी झाडत होत्या. मनातला अवखळ विचार मनातच राखून, येणारं हसू मी ओठांआड दाबलं आणि अगदी गंभीर वगैरे चेहऱ्यानं सांगून टाकलं, "अहो, व्यावसायिक महिला ह्या नात्यानं मी तुमची मुलाखत घ्यायला आलेय, तेव्हा अर्थातच गोडगोड फिल्मी स्टाईलची मुलाखत अपेक्षित नाही हे ओघानं आलंच. तेव्हा तुम्हाला जे-जे काही सांगावंसं वाटेल ते मोकळेपणानं सांगून टाका."

"That's fine! अहो गेल्या दहा-बारा वर्षांत मी असे काही अनुभव पचवलेत की काय-काय सांगू? वयाच्या अठराव्या वर्षी माझं लग्न झालं. लगेच मुलगी झाली, नंतर मुलगा झाला, आणि साधारण ६६-६७ साली म्हणजे लग्नानंतर चार-पाच वर्षांनी मी ह्या व्यवसायाला सुरुवात केली. तेव्हापासून कशा-कशाला तोंड द्यावं लागलं! अगदी सुरुवातीला फॅन्टॅस्टिक आयडियाज् होत्या. आपण असं करू, तसं करू! तशा आयडियाज् अजूनही येतात, पण त्या कृतीत उतरवणं किती अवघड आहे, हे आता कळून चुकलंय. विशेषत: आपल्या देशात त्यात किती अडचणी उपस्थित होतात, त्याचा आता अनुभव येतोय. आणि यामुळे तुम्हाला सांगते, मी एवढी नाउमेद होऊन गेलेय की वाटतं एवढी दगदग, एवढी यातायात करूनही अखेर मी काय मिळवलं? माझ्या जाऊबाई, नणंदा, मैत्रिणी घरी बसून आराम करतायत. त्यांच्या कामाची आणि माझ्या कामाची गोळाबेरीज शेवटी एकच होते. मग मी हे सगळं कशासाठी केलं? का केलं?"

संथ सुरातील त्यांचा हा धारदार प्रश्न अशरश: काळीज कातरत गेला. त्यांच्या मनाच्या समाधानासाठी मी म्हटलं, "पण इतर बायकांच्या तुलनेत तुमच्या कर्तृत्वानं तुम्ही एवढी झेप घेतलीत. तुम्ही दिवसभर त्यात गुंतून राहताय. रात्री बिछान्यावर पाठ टेकताच, आजचा दिवस केवढा सार्थकी लागला असं वाटून गाढ झोप लागावी इतका दिवसाचा क्षण न् क्षण तुम्ही कामात वेचताय आणि शिवाय ह्यापासून आर्थिक प्राप्तीही उदंड आहे."

"पण पैशाअडक्याचं सुख असणं म्हणजे सर्व काही आहे असं नाही. ज्या पैशानं आपण अनेक सुखं उपभोगतो, तोच पैसा मिळवताना मला कितीतरी गोष्टींकडे पाठ फिरवावी लागली. मला मुलांच्या आयुष्याला माझ्या मनाप्रमाणे आकार द्यायचा होता, त्यांच्याकडे पूर्ण लक्ष देऊन त्यांना वाढवायचं होतं. कुठे जमलंय हे सगळं? तेच कशाला... आयुष्यात आपल्या कितीतरी साध्यासुध्या आवडी-निवडी, छंद असतात. वाचन, मैत्रिणी, दुपारची झोप... कितीतरी गोष्टींवर पाणी सोडावं लागलंय मला! गेल्या चौदा वर्षांतल्या एखाद्याही आडवारी मला नाही आठवत की मी आरामशीर घरी झोपलेय, भिशीला गेलेय, मैत्रिणींबरोबर गप्पागोष्टी केल्यात, पार्टीला किंवा पिक्चरला गेलेय! आयुष्यातल्या कितीतरी आनंदाच्या क्षणांना मी मुकलेय. आणि एवढं करून काय मिळवलं? तर बाहेर चार कामगार

दाराशी उभे राहून 'मुर्दाबाद !'–च्या घोषणा देतायत आणि घरात मुलांनी बोलून दाखवलं नाही तरी आतून कुठेतरी त्यांना इतर मुलांसारखं आईचं सुख आपल्याला मिळालं नाही, ही रुखरुख सलतेय. हेच ना ? मग ह्या सगळ्या त्यागाला काय किंमत राहिली ? आणि आपल्या इथे विशेषतः असं आहे की अपार मेहनत करून तुम्ही काहीही मिळवा, तुम्हाला एखाद्या ऑर्गनायझेशनचं पद किंवा विशिष्ट बहुमान प्राप्त झाला की तो माणूस लोकांच्या दृष्टीनं अक्षरशः गुन्हेगार ठरवला जातो. आपल्या देशातील कोणताही कारखानदार किंवा उद्योगधंद्याचा प्रमुख हा चोर आहे. सगळ्यांची पिळवणूक करणारा आहे, असंच एक चित्र रंगवलं जातं. त्याची तशी इमेजच तयार झालीय. मग गेल्या दहा–पंधरा वर्षांत या माणसानं किती कष्ट घेतले असतील, किती त्याग केला असेल, त्यानं किती धोका पत्करला असेल, आपल्या डोक्याची किती अक्कल खर्च केली असेल, आर्थिक बाजूनं किंवा इतर अनेक तऱ्हांनी त्याची किती ओढाताण झाली असेल ह्याचा कोणी विचारच करीत नाही.

" बस्स ! आत्ता हे लोक मजा मारतात ना, फॉरीनला जातात ना, उत्तम कपडेलत्ते वापरतात ना, भरपूर खाता–पितात ना, म्हणजे हे आम्हाला लुटतात, त्यांची ही सगळी मजा आमच्याच जिवावर चाललीय, अशी कामगारांची भावना ! आणि नेमकी हीच गोष्ट माझ्या मनाला लागते की अरे, एवढं भोगल्यावर मला वाटू नये का की थोडं सुख उपभोगावं ! अखेर एका ठराविक मर्यादेनंतर तुमच्याकडे एक गाडी असली काय, मोठ्ठा बंगला असला काय तेवढंच समाधान मिळणार ! काय फरक पडतो ?

" मला आठवतंय माधुरी, मी या बिझनेसला नुकतीच सुरुवात केली होती, तेव्हा घरातलं आवरून मी बारा–बारा तास वर्कशॉपमध्ये कामगारांच्या बरोबरीनं काम करायची आणि जेव्हा बससाठी रांगेत उभी राहायची तेव्हा माझे पाय अक्षरश. भरून यायचे. वाटायचं, कधीतरी निदान खूप थकल्यावर टॅक्सी करायला मिळावी एवढी तरी ऐपत येईल का आपल्यात ? नंतर अधूनमधून टॅक्सीचा खर्च परवडायला लागला. तेव्हा मनात यायचं, आपली स्वतःची, स्वतःसाठी कधीही वापरता येईल अशी हक्काची गाडी मिळायला हवी. म्हणजे पुन्हा अधिक कष्ट करणं आलं. इतकं स्वतःला ह्या व्यवसायात झोकून देऊन जे मिळवलं, त्याचं सुख किती अंगी लागेल ? त्यातून आज हे जे उभं केलंय..."

ते माझ्या डोळ्यांसमोर होतंच. ऑपेरा हाऊस ही मुंबईतील महागडी एरिया. तिथल्या एका नवीन बिल्डिंगमधल्या वरच्या मजल्यावर ऑफिस आणि तळाला आकर्षक फर्निचरची आधुनिक, एअर कंडिशण्ड शोरूम ! अतिशय कलात्मकतेनं सजवलेली ! कडेला देवाच्या तसबिरीपासून सेन्टरपीस आणि सोफा–सेट्सच्या आकर्षक मांडणीत अधेमधे हिरवीगार शोभिवंत झाडपेडं, देखण्या झुंब-

रांच्या मंद प्रकाशात, हेलकावणाऱ्या मोठमोठ्या पडद्यांच्या पार्श्वभूमीवर एक भलं-मोठं चकचकीत गोल मेज, समोर झुलती खुर्ची आणि त्यावरलं हे उमदं प्रसन्न व्यक्तिमत्व !

कलेला व्यवहाराच्या शिंपणानं उभारलेल्या वैभवाची मालकीण !

"मी फार बोलतेय का ? तुम्हाला काही बोलायला अवसरच देत नाही ना ?"

"छे ! छे ! तुम्ही बोलतच राहा. ठरीव ठशाच्या प्रश्नोत्तरांतून झाली असती एक स्टिरिओटाईप्ड मुलाखत ! इथे तुम्ही मनाच्या तळागाळातलं सर्वंच काही इतकं उत्कटपणे सांगताय की मन भारावून जातंय. माझ्या दहा प्रश्नांतूनही कदाचित जे साधलं नसतं, ते तुम्ही इतकं अलगद उलगडून सांगताय !"

"खरंच ! मलाही फार मोकळं मोकळं वाटतंय. अहो, नाही तर आम्ही हे सगळं सांगणार तरी कुठं ? कधी ? कोणाकडे ?"

"खरं आहे तुमचं ! पण काय हो, हा बिझनेस सुरू करताना, तुम्हाला त्यातल्या अडचणी, खाचाखोचांची कल्पना नाही आली ?"

"तशी जाणीव होती, पण एवढ्या अडचणी उभ्या राहतील, असं मात्र वाटलं नव्हतं हो कधी !"

"म्हणजे तुमच्या डोळ्यांसमोर फक्त धंद्यातून येणारं ऐश्वर्य, संपन्नता, मान-मरातब एवढंच होतं ?"

"तसं नेहमीच वाटतं. आत्तासुद्धा इतर ठिकाणी माझ्या ज्या मुलाखती छापून आल्यात, त्या तुम्हा वाचल्यात तर त्यात हेच आहे. माझ्या कर्तृत्वाचं रंगी-बेरंगी, देखणं चित्र ! पण त्यात रंग भरताना मला ज्या दिव्यातून जावं लागलंय...

"अहो, शेकडयांचे करोडो करणं म्हणजे अक्षरशः शून्यातून विश्व उभारणं आहे हो ! अवघ्या दोनशे रुपये भांडवलावर हा उद्योग मी घराच्या ओटीवर सुरू केला, तेव्हा माझ्या घरी त्याला केवढा विरोध होता ! कुठे आमचं हे शुद्ध घर ! आणि ही काय घरात चामडं घेऊन बसते ? सगळी बाटवा-बाटवी ! विरोध तर अगदी इथपर्यंत की आमच्या घरात हे सगळं चालायचंच नाही हे सगळं घेऊन कुठही बाहेर जा आणि मग करा काय वाट्टेल ते ! आता बाहेर जायचं म्हणजे पैसा हवा. मी म्हटलं, थोडे दिवस दिवस थांबा. माझी एक-दोन एक्झिबिशन्स होऊन जाऊ द्या, एकदा पैसे कमावले की मला तरी इथं एवढ्याशा जागेत काही करण्यात स्वारस्य आहे कुठं ? मला मोठी फॅक्टरीच टाकायचीय ! तेवढा वेळ धीर धरा. आणि त्यांचाही तसा दोष नव्हता. कारण, ह्या व्यवसायाला केवढं उज्ज्वल भवितव्य आहे, ह्याची त्यांना कल्पनाच नव्हती, त्याला ते तरी काय करशार ?"

"पण तुम्ही तरी स्वतः ह्या व्यवसायाच्या भविष्याबद्दल निःशंक होता का ? चामड्यासारख्या वस्तून तुमच मन कसं वेधलं ?"

" चामडं ही फार आकर्षक वस्तू आहे हो ! किती छान चमक आहे, मऊपणा आहे पाहा ! हवी तेवढी कलाकुसर त्यात करता येण्यासारखी आहे. "

" पण तेही कुणा येऱ्यागबाळचाचं काम नोहे ! तेथे पाहिजे जातीचे ! तुम्ही अशा कलावंतांच्या कुळीतल्याच का ? "

" हो ! मी अन् माझे मिस्टर, दोघंही ! माझे मिस्टर आर्किटेक्चरमधले गोल्डमेडालिस्ट आहेत. माझं लग्न झालं तेव्हा मी आर्किटेक्चर कॉलेजला होते. पण मध्यंतरी आर्किटेक्ट्सना फार वाईट दिवस आले होते. म्हणजे एखाद्या पर्सेंटसाठी जॉब इकडून तिकडे जायचे. आणि मुंबईत होता तरी कुठे एवढा स्कोप ? त्याच त्या बिल्डींग्ज दुरुस्त करण्यात काय सर्जनशीलता आहे ?—म्हणून त्या काळात माझ्या मिस्टरांनी आर्किटेक्चरचा छोटा क्लास सुरू केला होता. आता पंचवीस वर्षांनंतर त्या क्लासचं चांगलं कॉलेज झालंय आणि त्या ॲकॅडमी ऑफ आर्किटेक्चरचे ते आता डायरेक्टर आहेत.

" तर सांगायचं कारण की तिथे मी शिकायला जायची. त्यांची मी विद्यार्थिनी ! पुढे आम्ही दोघंही प्रेमात पडलो. लग्न केलं. तेव्हा मी होते अवघी अठरा वर्षांची ! आणि ते अठ्ठावीस वर्षांचे ! लग्नानंतर थोडे दिवस आम्ही इंग्लंडमध्ये होतो. ते तिकडे ट्रॉपिकल आर्किटेक्चर शिकत होते. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांना तिथं चांगली नोकरी मिळाली. आम्ही तिकडेच स्थायिक होण्याची बरीच शक्यता होती. पण आम्हाला तिथलं वातावरण आवडलं नाही. तिथे खूप काही असू दे—मोटारी, घरदार, पैसाअडका, पण आपल्या देशात जे स्वातंत्र्य असतं ते तिथं नसतं. अगदीच दुय्यम दर्जाची वागणूक ! म्हणून मग आम्ही परत आलो.

" परत आल्यावर काय झालं ?—मी संसाराच्या व्यापात पुरी अडकले. मला मुलं झाली. माझी तब्येतही बरी नसायची. त्याच काळात तुम्हाला सांगते, एकदा अचानक त्यांची खाजगी डायरी माझ्या हाती आली. त्यात त्यांनी लग्नापूर्वीच्या एका तारखेवर लिहून ठेवलं होतं—"

'मी ह्या मुलीशी का लग्न करतोय ? कारण मला सतत जाणवतं की इतरांपेक्षा ह्या मुलीत काही खास वेगळेपण आहे. तिच्यात कल्पकता आहे. ती मेहनती आहे. मला तर वाटतं की तिनं पॅरीसला वगैरे जावं. फर्निचरसंबंधी तिनं तिथं अभ्यास करावा. काहीतरी नवं शिकावं. आणि तिच्यात तो हुरहुन्नरी स्वभाव आहेही ! '

" म्हणजे बबा ! माझ्या वयाच्या अठराव्या वर्षी त्यांनी हे जजमेंट केलं होतं. वास्तविक तेव्हा माझ्यात तसं काहीच नव्हतं. त्यांच्या मानानं मी अगदीच सामान्य होते. त्यांच्यासाठी कितीतरी चांगल्या—चांगल्या मुली सांगून आल्या असतील किंवा काय असेल ! पण तरीही त्यांनी माझी निवड केली. ती डायरी वाचत असताना मला खरोखर स्वतःचा अभिमान वाटला. आणि डायरीतली पुढची पानं

चाळली आणि माझ डोळे खाडकन् उघडले. त्यांनी पुढे लिहिलं होतं–

'माझ्या तिच्याकडून खूप अपेक्षा होत्या. पण त्या काहीच पूर्ण होणार नाहीसं दिसतंय. मी फार निराश झालोय.'

"हे मी वाचलं आणि मला जाणवलं की–अरे ! खरंच त्यांची माझ्याकडून अशी काही अपेक्षा असेल, ह्याची आपल्याला काहीच कल्पना नाही !"

"पण रोजच्या त्यांच्या वागण्या–बोलण्यातून तुम्हाला तसं कधी काही जाणवलं नाही ?"

"मला नाही वाटलं तसं कधी ! आणि तुम्हाला ठाऊकच आहे, रोजच्या दैनंदिन जीवनात तसं जाणीवपूर्वक आपण काही करत नाही. किंवा बसून तसं कधी काही बोलत नाही. आज एवढ्या वर्षांनी आपण असं बोलू शकतो. पण जेव्हा गोष्टी घडत होत्या, माझं आजारपण चाललं होतं, तेव्हा ते काही असं सांगू शकत नव्हते की माझी तुझ्याकडून अशी काही अपेक्षा होती, तू काही ती पुरी करू शकत नाहीस, वगैरे. पण हे वाचलं आणि मला जाणवलं की खरोखर मी वेळ आणि बुद्धीचा अपव्यय चालवलेला आहे. त्यांच्या अपेक्षापूर्तीसाठी मला काहीतरी केलं पाहिजे. आणि मी ह्याला सुरुवात केली."

"तेव्हाच ही लेदर फर्निचरची कल्पना आकारास आली का ?"

"नाही ! त्याच्या आधी मी सिरॅमिक्स केलं होतं. हस्तकौशल्याच्या बऱ्याच वस्तू केल्या होत्या. टेक्सटाईल प्रिंटिंग केलं होतं. साडी पेंटींग केलं होतं. पण मला पक्कं ठाऊक होतं, की ह्या सगळ्या कला, कला म्हणून ठीक आहेत. व्यवसाय किंवा धंद्याच्या दृष्टीनं त्यांना काहीही भवितव्य नाही. तेव्हाच मला ह्या चामड्याच्या वस्तूंची कल्पना सुचली आणि ती मी अंमलात आणली. सुरुवातीला मी केसाळ कातडयांची कार्पेट्स करायला लागले. तसंच पर्सेस्, वॉल हँगिंग्ज अशा शोभेच्या वस्तू करायला लागले. एका एक्झिबिशनचा असा सगळा माल मी स्वत: माझ्या हातानं तयार केला हं ! खूप श्रम पडले. कोणाला वाटलं नाही की ह्या मालाला एवढा उठाव मिळेल ! पण मला कल्पना होतीच की मुंबईसारख्या गरम हवेच्या ठिकाणी असं प्रदर्शन करायचं म्हणजे त्याला 'सेट् बॅक' निश्चितपणे येणारच ! म्हणून मग धोरणीपणे मी ह्या वस्तूंचं प्रदर्शन दिल्लीत भरवायचं ठरवलं. दिल्लीत कडाक्याची थंडी असते. अगदी घरात शेगडया, वगैरे लावून बसावं लागतं. अशा कडाक्याच्या थंडीत दिल्लीला मी हे चामड्याच्या वस्तूंचं पहिलं एक्झिबिशन केलं. आणि तिथल्या लोकांनी ते अक्षरश: उचलून घेतलं. आमचा सगळा माल विकला गेला. एक पीसही उरला नाही. एकेक कार्पेट आम्ही तिथे दोन–अडीच हजाराला विकली. अशी साठ–सत्तर कार्पेट्स विकली गेली. एकेका कार्पेटसाठी वस्तुत: फक्त हजार–दीड हजार रुपये खर्च आला होता. म्हणजे आर्थिक फायदाही चांगला झाला. मग आम्हालाही हुरूप आला. आणि पहिल्याच प्रदर्शनात

एवढं भांडवल मिळाल्यावर वाटलं की आता महिना तीनशे रुपयांची एखादी स्वतंत्र जागाही आपल्याला परवडेल. तिथे काहीतरी उत्पादन करता येईल. ह्या हिशोबानं वांद्र्याला एका गॅरेजमध्ये आम्ही एक लहानशी जागा घेतली."

"तिथेही तुम्ही अशा शोभिवंत वस्तूच तयार करीत होता का?"

"नाही! नंतर मग आमचीही महत्त्वाकांक्षा जरा वाढली, आणि खरं सांगायचं तर मी स्वत: अशा एखाद्या व्यवसायाच्या शोधात होते की ज्यात मी माझ्या मिस्टरांनाही सहभागी करून घेईन. कारण माझ्याकडे कल्पना तर खूप होत्या. बायका खूप काही करतात, पण जेव्हा त्यात पुरुषाची साथ नसते ना तेव्हा त्याचं स्वरूप छोटं राहतं किंवा त्यांनी धाडसानं फार मोठी उडी घेतली, तर बऱ्याच गोष्टींचा त्यांना त्याग करावा लागतो. त्याशिवाय पति-पत्नी संघर्ष, स्पर्धा आणि थोडीफार जेलसी ह्यामुळे कटुताही निर्माण होते. त्यापेक्षा नवऱ्याच्या बरोबरीनं व्यवसाय केलेला चांगला असतो आणि मला तर मनापासून असं वाटतं की आमचा बिझनेस यशस्वी झालाय ह्याला कारण इथं स्त्री-पुरुषांच्या दोन भिन्न विचारसरणींचा ओघ एकमेकांत मिसळलेला आहे. इथं माझी कल्पकता आणि त्यांची कामातली संगतवार जुळणी ह्यांचा मनोहर मिलाफ झालेला आहे."

"ह्यालाच तर पतिपत्नींचं सहजीवन असं म्हणतात. पती थांबेल तिथून पत्नीनं सुरुवात करावी. एकमेकांवर कुरघोडी करू पाहतं ते पतिपत्नीचं नातंच नसतं. एकमेकांना पूरक ठरतं आणि स्वत:बरोबर साथीदारालाही यशोमंदिराकडे नेतं, तेच तर पतिपत्नीचं नातं!"

"छान! अगदी माझ्या मनातलंच बोललात तुम्ही! पण सांगू का? सुरुवातीला मी स्वत: हातानं चामडी वगैरे कापायची, सतत नवे-नवे प्रयोग करायची. त्यावेळी मिस्टरांची स्वतंत्र प्रॅक्टीस होती. ते फक्त त्यांच्या फावल्या वेळात मला मदत करायचे. पण तरीही ते मला मदत करतायत, असं कधी त्यांनी दर्शवलं नाही. त्यांना लाज वाटायची. ते म्हणायचे, 'तू सांगू नको हं कोणाला, मी तुला मदत करतो ते! चारचौघांत ते बरं दिसायचं नाही. मी आर्किटेक्ट आहे.' पण तरीही मी मागे लागायची. तुम्ही हे करा, मी ते काम करते. आपण दोघं मिळून असं करू. मी अक्षरश: त्यांना ह्या व्यवसायात खेचूनच आणलं असं म्हणायला हरकत नाही."

"मग ही एवढी यशस्वी ठरलेली लेदर फर्निचरची कल्पना कोणाची? तुमची की त्यांची?"

"ही कल्पना माझीच! मला तुम्हाला एक गोष्ट सांगावीशी वाटते की ह्या व्यवसायातल्या सगळ्या मूळ कल्पना माझ्या आहेत. नंतर त्या प्रत्यक्षात उतरवण्याचं प्लॅनिंग ते स्वत: करतात. बहुधा असं होतं की दहा कल्पना मला सुचतात. त्यातल्या पाचच प्रत्यक्षात उतरवता येतात आणि एखादी यशस्वी होते.

पण यशस्वी ठरलेल्या कल्पनांतून पुन्हा नवीन काहीतरी सुचतं.

" आता हे लेदर फर्निचरचंच म्हणाल तर इंग्लिश लोक इथे होते ना, तेव्हा त्यांच्याकडे जुन्या पद्धतीचं लेदर फर्निचर असायचं. त्यानंतर दहा–बारा वर्षांपूर्वी इटालीत ही मॉडर्न लेदर फर्निचरची कल्पना रुजली. तिथं जेव्हा असं लेदर फर्निचर लोकप्रिय झालं, फॅशनेबल झालं आणि नवीन–नवीन मॉडेल्स जेव्हा बाहेर पडायला लागली तेव्हा आर्किटेक्चर मॅगझिन्समध्ये नेहमी त्याची परीक्षणं, कलाकृती छापून यायला लागल्या. ते बघून वाटलं, आपणही इथं हे सुरू करावं. ते करण्यासाठी मग कारागीर शोधून काढायचे, त्यांना शिकवायचं. लेदरचं कटिंग कसं करायचं, मनाप्रमाणे आकार कसे द्यायचे, त्यासाठी चांगलं लेदर कसं मिळवायचं, असे अनंत उद्योग करावे लागले. आपल्याकडे तर असं लेदर तयारही करत नव्हते. आम्हीच काही टॅनरीस्टना कमावलेलं कातडं द्यायला भाग पाडलं. सुरुवातीला खुर्च्यांसाठी आम्ही मेंढ्यांची कातडी वापरली. अगदी मृदु असायची ती ! पण ती लवकर–लवकर फाटायला लागली. दोन–दोन वर्षांनी तक्रारी यायला लागल्या. हळूहळू आम्ही हे तंत्र अवगत करून घेतलं. मात्र त्यासाठी खूप वर्षांचं मोल द्यावं लागलं. "

" लेदर फर्निचर करण्यासाठी परदेशातील एक्स्पर्टस्ना मार्गदर्शनासाठी बोलावलं होतं का ?"

" नाही ! तशी काही जरुरी वाटली नाही. कारण आर्किटेक्चरमध्ये फर्निचर डिझायनिंग आणि इंटिरिअर डेकोरेशनचा एक भाग असतो आणि एखाद्या माणसाला त्यात रुची असेल, तर तो ज्ञान वाढवू शकतो. फर्निचर डिझायनिंगमध्ये माझ्या मिस्टरांना पहिल्यापासून इंटरेस्ट होता आणि त्यांचं हेच ज्ञान लेदर फर्निचर बनवण्याच्या कामी आमच्या उपयोगी पडलं. कारण हे लेदर फर्निचर म्हणजे म्हणजे लेदर टेक्नॉलॉजी आणि माझ्या मिस्टरांचं फर्निचर डिझाइनिंगचं ज्ञान ह्या दोहोंच्या एकत्रीकरणातून निर्माण झालेलं आहे. त्यामुळेच आम्ही ह्या व्यवसायातले उद्घाते (Pioneers) आहोत असं म्हणायला हरकत नाही. आमचं घोषवाक्यच आहे–'इतरांपेक्षा दहा पावलं पुढे !' म्हणूनच दिल्लीच्या प्रदर्शनानंतर आम्ही मुंबईत जे दुसरं प्रदर्शन भरवलं तेव्हा त्यात लगेच कार्पेटचा विभाग आम्ही कमी केला, फर्निचरचा वाढवला. हस्तव्यवसायापासून उत्पादनापर्यंत आणि शोभिवंत वस्तूंपासून फर्निचरपर्यंत अशा एकेक लाईन्स आम्ही शिफ्ट करत गेलो."

" गाडीचे सांधे बदलताना खडखडाट व्हायचाच. मग व्यवसायात असे बदल घडवून आणताना तुम्हाला कोणत्या अडचणी आल्या ? की सहजगत्या झालं सगळं ?"

" छे छे ! अहो, फर्निचर करताना तर नको जीव होऊन जायचा. सकाळी मिस्टर येऊन सगळ्या सूचना देऊन जायचे. मग दिवसभर त्या गॅरेजमध्ये मी

आणि फर्निचर करणारे दोन–तीन कारागीर खटपट करीत बसायचो. मग संध्याकाळी ते येऊन बघायचे आणि सांगायचे, तुम्ही इथं चुकलात, हा अँगल बरोबर नाही, हा कोच कंफर्टेबल वाटत नाही, फिनिशिंग चांगलं नाहीय. मग ते सगळं उसवायचं. पुन्हा करायचं. असं करता–करता हळूहळू कळायला लागलं."

"माल तर तुम्ही मोठ्या मेहनतीनं करत होतात, पण त्याच्या विक्रीचं काय ? मालाची जाहिरात हे तर बिझनेसचं मुख्य अंग !"

"काही नाही ! आमची सगळी विक्री आणि प्रसिद्धी सांगोवांगी व्हायची. म्हणजे एखाद्यानं असं फर्निचर विकत घेतलं की त्याचं पाहून दुसऱ्यानं यायचं. कित्येक वेळा तर असंही व्हायचं, 'अरे, ह्या नव्या स्टाईलच्या खुर्च्या दिसतायत ! खूप छान आहेत. कुठून घेतल्यात ?' मग घेणाऱ्यानं सांगायचं, 'ह्या खुर्च्या ना, आम्ही इटालीहून आयात केल्यात ?' 'अरे वा ! इथे नाही का मिळणार ?' 'छे ! छे ! इथं नाही मिळायच्या.' मग कोणीतरी त्यांना सांगायचं, त्या इटालिअन नाहीत. त्या इथूनच घेतल्यात वांद्रेकरांकडून. मग तेही आमचा पत्ता शोधत यायचे. असं करता करता अक्षरशः मोठमोठे बिझनेसमन, धनिक लोक आपल्या मर्सिडिस गाडचा घेऊन वांद्रचाच्या त्या खबदाडीत फर्निचर घ्यायला यायचे. ते पाहून मग इतरांनाही कुतुहल वाटायला लागलं की इथे काहीतरी विशेष चाललंय. आपणही पाहायला हवं. आमची खरी प्रसिद्धी असायची ती फक्त प्रदर्शनामार्फतच !"

"मग दिल्लीचं साध्यासुध्या वस्तूंचं प्रदर्शन आणि मुंबईचं चामडचाच्या फर्निचरचं प्रदर्शन ह्या दोन्हीत साधारण किती अंतर होतं ?"

"फक्त सहा ते सात महिन्यांचं !"

"एवढ्या थोडक्या काळात हे सगळं तयार झालं ?"

"हो तर ! कल्पना मनात शेकडचांनी होत्या. प्रश्न होता फक्त आपण किती झपाटचानं काम करतो हाच ! आणि मला अजूनही आठवतं, दिल्लीतल्या पहिल्या प्रदर्शनानंतर दुसऱ्याच वर्षी आम्ही तिथं नुसतं लेदर फर्निचरचं प्रदर्शन भरवलं तेव्हा त्या फर्निचरच्या डिझायनिंगपासून लाईट फिटिंगपर्यंत सगळं मी एकटीनं केलं होतं. आता प्रदर्शनाला दोन–तीन दिवसच राहिलेत, त्याच्या आत सगळं काम पुरं व्हायलाच पाहिजे, अशा वेळी रोज रात्री दोन–दोन वाजेपर्यंत जागून, स्वतःच्या हातानं मी सगळी कामं उरकलेली आहेत. कामासाठी मुंबई–पुण्याच्या वाऱ्या केलेल्या आहेत. त्यामुळे मला प्रत्येक डिपार्टमेंटमधलं काम माहिती आहे. कोणीही मला त्याबाबत काही शिकवू शकणार नाही. कारण त्या सगळचा कामांची प्रोसेस मला चांगली ठाऊक आहे. एका अर्थी हा सगळा अनुभव मला आता उपयोगी पडतो.

"म्हणूनच आता असं वाटायला लागतं की एवढं जीवतोड काम करून आपल्याला काहीच सुरक्षितता नाही. शेवटी शिव्याच मिळतात. आता बघा, नोकरीचा

पेशा पत्करलेल्या कारकुनापासून कामगारांपर्यंत सगळ्यांना नोकरी सोडल्यावर प्रॉव्हिडंड फंड मिळतो, ग्रॅच्युइटी मिळते. त्यांना आर्थिक स्थैर्य असतं. एखादा अभिनेता असेल तर त्याला पैशासोबत कीर्ती मिळते. निदान त्या क्षेत्रात असेपर्यंत तरी तो शिखरावर असतो किंवा खेळाडू असेल तर त्याला सोयी–सवलती असतात. त्याचे कितीतरी चाहते असतात. पण तेच आम्ही कितीही रक्ताचं पाणी केलं तरी शेवटी आमच्यावर एकच शिक्का– हे लोक आमच्या जिवावर मोठे झाले ! म्हणजे कामगार तेवढा कष्ट करतो, मालक मात्र करत नाही हीच धारणा ! म्हणून माझ्या मनात नेहमीच एक कल्पना येते की, सर्वच कारखान्यांमधे कामगारांच्या आणि मालकांच्या उत्पन्नातले काही पैसे सुरक्षितता म्हणून बाजूला टाकावे. जर धंदा तेजीत असेल तर ते पैसे एखाद्या गरजू संस्थेला देणगी म्हणून द्यावेत. आणि हा धंदा बुडित असेल तर अडचणीच्या वेळी मालकाला द्यावेत. म्हणजे धंद्यात खोट आली तर त्याचं अगदीच वस्त्रहरण व्हायची वेळ येऊ नये."

"सुदैवानं अशी वेळ तुमच्यावर आली नाही ! कारण ?"

"त्याला कारण आमची Originality ! मी माझ्या मुलांना नेहमी हेच सांगत असते. कोणतीही नवी लाईन तुम्हाला सुरू करायची असेल तर दुसऱ्यांनी तुडवलेल्या मार्गावरून तुम्ही जाता कामा नये. स्वतःचा मार्ग स्वतः शोधा ! मुलीला मी फर्निचर डिझाइनिंगच्या कोर्ससाठी परदेशी पाठवलं होतं. तिथून आल्यावर तिला एक फॅक्टरी काढून दिलीय. अमियाला, माझ्या मुलालाही कॉमर्स कॉलेजमध्ये शिक्षण घेत असताना लेदरच्या खरेदी–विक्रीची एक छोटी एजन्सी काढून दिलीय. पण तरी मी दोघांना सांगत असते, की तुम्ही तुमची अक्कल वापरून काहीतरी नव्याचा शोध घेतलात तरच तुम्ही झटपट यशस्वी व्हाल ! आणि जुन्यात जर यश मिळवायचं असेल तर अतिशय अभ्यासूपणे ती सिस्टीम कुठे फसलीय, त्यात कोणत्या चुका झाल्यात त्या सुधारून, इतरांच्या अनुभवांवरून तुम्हाला यश मिळवता येईल. मला स्वतःला असं second hand success आवडत नाही. आणि प्रत्यही माझ्या मनात एवढ्या कल्पना उसळत असतात की मला जुना मार्ग चोखाळायची खरोखर गरजच वाटत नाही."

"लेदर फर्निचरशिवाय आणखी नवं काही ग्राहकांना देण्याचा तुम्ही नंतर प्रयत्न केलात का ?"

"खूप प्रयोग केले ! ते यशस्वीही केले ! सध्या चांदीच्या फर्निचरला आम्ही सुरुवात केलीय. आपल्याकडे पूर्वी राजे–महाराजांकडे कसं चांदीच्या महिरपीतलं फर्निचर असायचं. त्याच्यावरून मला ही कल्पना सुचली. अरबी आखातातले शेख लोक म्हणजे राजेमहाराजेच ! त्यांना जगातल्या सगळ्यात महागड्या वस्तू हव्यात. इटालिअन फर्निचर तर काय सगळेच वापरतात, ते त्यांना नको. तेव्हा त्यांना आम्ही असं चांदीचं फर्निचर करून दिलं. दुबईच्या एका पॅलेसमध्ये चांदीच्या

महिरपीतील लेदरची दोन मोठी ड्रेसिंग टेबलं आम्ही प्रथम विकायला ठेवली. आणि त्यांना ती इतकी आवडली की पुढे तिथं तशा फर्निचरचं प्रदर्शन केलं तर दुसऱ्या दिवसापर्यंत नव्वद टक्के विक्री झाली. नंतर विकायला काही उरलंच नाही. तेहत्तीस लाखांची विक्री नुसती दुसऱ्या दिवशी झाली. आता तर त्याची मागणी इतकी वाढलीय की आता सॅनफ्रॅन्सिस्को, पॅरिस, मॉंटेकार्लो, हाँगकाँग सगळीकडे चांदीच्या फर्निचरची प्रदर्शनं होणार आहेत. त्यातलं पहिलं प्रदर्शन आता लंडनमध्ये व्हायचंय. "

"मला तुमचं खरोखर खूप कौतुक वाटतंय. अभिमान वाटतोय. ही स्थळं आम्ही केवळ नकाशात पाहतो अन् पेपरात त्यांची नावं वाचतो. तुम्ही तर चक्क तिथली फर्निचरची बाजारपेठच जिंकायला चाललात ! पण त्यासाठी करावा लागणारा सगळा माल इथून तुम्ही निर्यात करणार म्हणजे परदेशी चलनाच्या गंगाजळीत मोठीच भर ! तुम्हाला काही सवलती मिळणार आहेत का त्यासाठी ?"

"कुठल्या आल्यात सवलती ? अहो, इथून चांदी रवाना होणार एवढाच मुद्दा आपल्या सरकारनं विचारात घेतला. त्यामुळे अशा मालाच्या निर्यातीवरच बंदी ! खरं सांगते, मला इथे इतका वैताग आलाय. आज काय कामगार संपावर ! उद्या काय हा कायदाच बदलला ! इथून खिळे नाही पाठवता येणार, चांदी नाही पाठवता येणार ! सगळ्याला आपली नकारघंटाच ! खरं म्हणजे आपल्याकडे एवढे कलाकार आहेत ! त्यांची पारंपारिक कलाकुसर एवढी अप्रतिम आहे की तशी जगात शोधून सापडायची नाही. त्या कलाकुसरीला जी मागणी आहे तिचा पुरेपूर फायदा करून घ्यायला हवा ! ती कला निर्यात व्हायला हवी. त्याऐवजी होतं काय ! तर ती सगळी कलाकुसर असंख्य कायद्यांच्या चौकटीनं बंदिस्त केलेली ! कायदे कशासाठी ? तर फक्त चोरीमारी, लबाडी होऊ नये एवढाच उद्देश ! मग ज्यातून पळवाट नाही, असे कायदे डोकं लढवून जर सरकारनं केले तर ? पण ते नाही ! त्यामुळे आम्हाला अक्षरक्षः द्राविडी प्राणायाम करावा लागतो. चांदीची निर्यात होऊ शकत नाही, म्हणून परदेशात चांदी विकत घ्यायची, इथून कारागीर घेऊन जायचं. त्यांच्या प्रवासाचा, जाण्यायेण्याचा, खाण्यापिण्याचा खर्च करायचा, त्यांची बडदास्त ठेवायची. यानंतर जे फर्निचर तयार होईल ते विकायचं. त्यात पुन्हा इथं शेकडो कारागीर आहेत. एखादा चुकला तर दुसरा कसबी कारागीर त्याला शिकवू शकतो. तिथं इनमिन चार-पाच कारागीर न्यायचे. ते जे करतील ते खरं !"

"खरं म्हणजे तुम्हाला तोट्यात जातंय का हे सव्यापव्यय !"

"अगदीच तोट्यात जातं असं नाही म्हणता येणार. कारण तिथे कामगार चळवळी विशेष नाहीत, आणि इथून कंत्राटी कामगार नेल्यानं भांडणाचा काही प्रश्नच येत नाही. फक्त तिथं अडचण एकच असते. कोणताही कारखाना सुरू करताना

त्यात एक स्थानिक पार्टनर घ्यावा लागतो. आमच्या सुदैवानं आम्हाला जो पार्टनर मिळालाय तो फार मोठा माणूस आहे. पैशांचं त्याला विशेष काही नाही. दुबईत चांगल्या कलाव्यवसायाला उत्तेजन मिळावं एवढाच त्याचा उद्देश ! त्या दृष्टीनं आम्ही फार सुखी आहोत."

"परदेशापेक्षा आपल्याच देशात उद्योजकाला अगदी विदारक अनूभव येतात. असं तर तुम्हाला म्हणायचं नाही"

"मी हो म्हटलं तर तुम्हाला खटकेल कदाचित ! पण माझा नाईलाज आहे. मध्यमवर्गातून जे काही लोक स्वतंत्र उद्योगधंदा काढण्याचा प्रयत्न करतात, ज्यांच्याकडे काही कल्पना आहेत, त्या प्रत्यक्षात उतरवायला जे धडपडतात, त्यांना इथे हजार अडचणींना तोंड द्यावं लागतं. सुरुवातीला आपण त्या क्षेत्रात नवीन असतो. कायदेकानूंची आपल्याला माहिती नसते. इन्कमटॅक्स, सेल्सटॅक्सच्या हजार भानगडी असतात. आता तुम्हाला म्हणून एक गोष्ट सांगते. लघुउद्योजकाचा बिझनेस वर्षांला काही लाखांच्यावर असेल, तर एक्साईज ड्यूटी पडते, नाही तर पडत नाही. खरं पाहिलं तर आम्हाला एक्साईज डयूटी भरण्याची गरज नव्हती. तरीही आम्हाला 'कारण दाखवा' नोटीस ! तुम्ही एक्साईज ड्यूटी चुकवलीत, तुमच्यावर कारवाई का करू नये ? सुरुवातीला माणूस नवशिका असतो, त्याला अशी 'कारणे दाखवा' वगैरे नोटीस आली की घाबरायला होतं. मग आमची ही ऽ धावपळ ! कोणीतरी सल्लागार गाठायचा, त्याला व्हिजिटचे पैसे द्यायचे. त्याच्या व्हिजिट्सच्या वेळेला सगळे पेपर्स दाखवायचे. मग त्यानं ते सगळे हिशोब अशा रीतीनं मांडायचे की कागद एका खात्यातून दुसऱ्या खात्यात सरकले जावेत. म्हणजे बघा, आम्ही निर्दोषीच होतो, पण आमचं निर्दोषीपण नुसतं सिद्ध करण्यासाठी आम्हाला सतत दोन वर्षं मानसिक छळणूक सोसावी लागली, पाण्यासारखा पैसा खर्च करावा लागला. न केलेल्या गुन्ह्याची एवढी शिक्षा भोगावी लागली. आपल्या देशात हे असंच आहे. जिथं कुठे सरकारी संबंध येतो, तिथं हाच अनुभव ! आणि विशेष म्हणजे हे सगळं गृहीतच धरलं जातं. बिझनेस म्हटला की हे सगळं त्याबरोबर आलंच. पण मला पटत नाही हे ! सचोटीनं व्यवसाय करणाऱ्याच्या मार्गात असे अडथळे उत्पन्न केले की त्यालासुद्धा आपली नीतीमत्ता आणि सचोटी गुंडाळून ठेवावी लाबते नाईलाजानं ! त्यातून एखादा खमक्या बिझनेसमन असेल, तर तो सगळी केस स्वत: अभ्यासून टक्कर देतोही ह्या सगळ्याशी, पण आम्हाला तेवढी फुरसद नसते. एकदा उत्पादन मार्गी लागलं की, आम्ही मोकळे असा आमचा व्यवसाय नाहीय. आम्हाला सतत नवनव्या डिझाईन्सचा विचार करावा लागतो. रोजच्या रोज नवीन कल्पना लढवाव्या लागतात. आमच्या ग्राहकांशी आम्हाला सतत संपर्क राखावा लागतो. आम्हाला ह्या कारकुनी कामासाठी सवडच मिळत नाही. मग ते काम मागं पडतं. किंवा अचानकपणे चुकून आपण काहीतरी करून जातो, की लगेच नोटीस !

तुम्ही अजूनही पेपर्स सबमिट् केले नाहीत, तुम्ही ही चूक केलीय, तुम्ही कायद्याचं उल्लंघन केलंय, तुम्हाला पेनल्टी का लावू नये ? आपल्याला कायदा माहीत नाही, म्हणून काही कोणाची सहानुभूती नसते. त्यासाठी एखाद्या सल्लागाराची नेमणूक करावी, तर प्रत्येक खात्याच्या कामासाठी वेगवेगळी माणसं नेमायची, म्हणजे यासाठी धंद्याचं स्वरूपही एवढं मोठं हवं ना ! फार झगडावं लागतं हो !

" मला असे एकेक टोचणारे प्रसंग आठवात. एका वर्षी आमची एक लेदर गार्मेंट्सची Consignment परत आली. तिथं बाजारपेठ नव्हती किंवा काय झालं म्हणा ! त्यामुळे आम्हाला जवळपास तीन-साडेतीन लाखांचा फटका बसला. त्यामुळे कामगारांच्या आरोग्यनिधीसाठी जे पैसे भरावे लागतात, ते भरले गेले नाहीत. अर्थात नंतरच्या काळात आम्ही ते दंडासकट भरले. पण जे भरले गेले नाहीत, तेवढ्या काळासाठी आमच्यावर केस केली गेली. आम्हाला आधीच एवढा मोठ्ठा तोटा आलेला. त्यात ही केस ! आम्हाला असं तर म्हणता येत नव्हतं की आम्हाला हे पैसे भरता येत नाहीत, आम्ही ही फॅक्टरीच बंद करून टाकतो ! आपल्यावर एवढ्या कामगारांची जबाबदारी असते, त्यामुळे तशाही स्थितीत काम करून थोडे-थोडे पैसे कमावून, ते साठवून देणी द्यावी लागतात. आम्ही हळूहळू, हप्त्याहप्त्यानं पैसे भरतच होतो. तरीही आम्ही सांगितलं की आमचा हा पहिलाच गुन्हा आहे, आम्हाला माफ करा. तरीही त्यांनी केस मागे घ्यायला नकार दिला. आधी उत्पादन कसं वाढतंय ह्याची आम्हाला चिंता ! त्यात ह्या केसची तारीख पडली की दर वेळी कामधाम सोडून कोर्टात धाव घ्यायची. त्यावेळचा एक प्रसंग आठवला की आजही डोळ्यांत पाणी येतं माझ्या ! एवढा माझा अपमान झाला त्यावेळी, की वाटलं सगळं सोडून द्यावं ! कशासाठी करते हे सगळं मी ? फॅक्टरीच्या बाहेर उभं राहून जे कामगार 'मुर्दाबाद'च्या घोषणा देतायत, 'ह्यांचं वाटोळं होवो' म्हणतायत त्यांच्यासाठी ?

" त्यांच्या गराड्यातून बाहेर पडून कोर्टात गेले. तिथं जाईपर्यंत उशीर झाला होता. न्यायाधीश त्यांच्या चेंबरमध्ये बसले होते. फिर्यादीचा वकीलही बसला होता. मी आत पिटीशन द्यायला गेले की मला आज अमूक-अमूक कारणानं उशीर झालाय, पुढच्या वेळी मी वेळेवर येईन. मी आत गेले. न्यायधीशांसमोरच्या दोन खुर्च्या रिकाम्या होत्या. वकिलीणबाई एका खुर्चीवर बसल्या. मी पटकन् दुसऱ्या खुर्चीवर बसले. न्यायाधीश पटकन् म्हणाले, " तुम्ही गुन्हेगार आहात, तुम्ही उभ्या राहा. तुम्हाला कायदा माहीत नाही ? गुन्हेगारानं उभं राहायचं असतं." मी म्हटलं, " मी गुन्हेगार नाही." ते म्हणाले, " ते ठरवू आपण नंतर ! " माझ्या डोळ्यांत खळकन् पाणी आलं. मी साधीसुधी गृहिणी, जिनं घरी बसायचं, आराम करायचा, सगळीकडून मानमरातब घ्यायचा, तिनं असं कुठेतरी जाऊन, काहीतरी काम काढून स्वतःचा अपमान करून घ्यायचा ! काय अर्थ आहे ह्या सगळ्याला ?"

"मग अशा अनुभवानंतर हे सगळं सोडूनच द्यावं असं नाही कधी वाटत तुम्हाला?"

"आता ह्या स्टेजला असं असतं ना की आपली वीट सगळ्यात खालची असते. तिच्यावर सगळा डोलारा उभा असतो. ती काढताही येत नाही. त्यातूनही दुसरा तितकाच आव्हान देणारा पर्याय, मिळाला तर ठीक! मी पुष्कळदा विचार करते की मी वयस्कर होईन, आणि माझं शरीर मला साथ देईनासं होईल, त्या वेळेला आपण काय करावं! माझ्या मनात तरी काहीतरी समाजकार्य करावं असं आहे. म्हणजे असं काहीतरी काम की ज्यात माझा वेळ, माझं मन पूर्णपणे गुंतलं जाईल. आणि आपलं जीवन सार्थकी लागलं असं मला वाटेल. कारण तेच वय असं असतं की जेव्हा आपण आयुष्याकडे एका त्रयस्थाच्या भूमिकेतून बघू शकतो. खरोखर आज मी जे काम करते, त्याच्या तोडीचं असं कोणतंही विधायक कार्य मला मिळालं तर लागलीच मी सगळं सोडून देईन."

मनात एक शंकेखोर भुंगा उगाचच गुंजारव करून गेला. एवढी सामाजिक बांधिलकीची जाणीव आहे, तर त्यांच्या कारखान्यातून अपंग कामगारांना प्राधान्य का दिलं जात नाही? माझ्या चेहऱ्यावरचा प्रश्न आरशातच वाचावा, त्या सहजतेनं वाचत त्या म्हणाल्या,

"मध्यमवर्गीय माणसं शुद्ध हेतूनं व्यवसाय सुरू करतात, तेव्हा अनेक गोष्टींना आसरा देण्याची त्यांची इच्छा असते. त्यांच्या मनात अनेक कामगार कल्याण योजना असतात. मी सांगते, मी फॅक्टऱ्या काढल्या तेव्हा मी अशा अनेक योजना पुढे मांडायची. कारण कामगार आणि मालक यांचं नातं असं तेढीचं राहूच नये असं मला मनापासून वाटायचं! पण त्यावेळी कामगारांना विकत घेतलं जातंय, असा पद्धतशीर प्रचार केला जायचा. ते एक जाऊ दे! सुरुवातीला आपण अपंगांना किंवा अनाथ महिलांना, त्यांच्या योग्य काम देऊन एक आदर्श अशी संस्था बनवावी असं माझं स्वप्न होतं. काय झालं त्याचं? लोक चक्क आरोप करायला लागले की–'हं ऽ! ह्यांच्या काही भानगडी असतील, त्या लपवायला ही सोय चांगली!' किंवा 'अपंगांविषयी दयेचा ओघ, त्यांना नोकरीला लावून तुम्ही तुमच्याकडे वळवणार, स्वतःकडे मोठेपणा घेणार आणि नंतर त्यांचीच पिळवणूक करणार!' म्हणजे पाहा! चांगल्या चांगल्या गोष्टींना सुरुंग लावण्यात आपले लोक कसे पटाईत असतात? फार वैफल्य वाट्याला येतं पाहा!"

"म्हणजे एवढ्या अनुभवांतून गेल्यावर तुम्हाला कृतार्थता वाटण्याऐवजी वैफल्यच जास्त आलंय?"

"छे! छे! मला आयुष्य एवढ्या वेगळ्या ढंगानं अनुभवायला मिळालं, मी तुम्हाला जे सांगितले ते निराशजनक अनुभव! ह्याचा अर्थ माझं आयुष्यच वैफल्यग्रस्त आहे, असं मुळीच नाही. काय आहे, सर्जनशील मन हे नेहमीच भावना-

प्रधान असतं. ते निरनिराळे अनुभव पेलत असतं. त्यातूनच कधीकधी जी निराशा वाटयाला येते ना, ती पचवायला मन निरनिराळे मार्ग शोधत असतं. असे विफल विचार दाबून टाकणं, त्यावर काबू मिळवायचा सतत प्रयत्न करणं, हाच खरा मानवी स्वभाव आहे.

" अहो, साधा झोपडपट्टीतला माणूससुद्धा तशा भयंकर परिस्थितीत स्वतःचं सुख शोधण्याची धडपड करीत असतो. मग आपल्याला तर सुखाचे अनेक मार्ग खुले आहेत. आणि मुळात हातपाय गाळून बसण्याचा तर माझा स्वभावच नाही. खरं सांगते, माझा स्वभाव उदंड उत्साही आणि दुर्दम्य आशावादी आहे. अगदी सुरुवातीपासून, कोणतीही गोष्ट करायला घेतली, की ही शंभर टक्के यशस्वी होणार ह्या जबर आत्मविश्वासापोटी मी माझं उभं कौशल्य आणि बुद्धी पणाला लावणार ! मग पुढे प्रत्यक्षात अनुभव वेगळेच येतील, ती गोष्ट निराळी ! उलट मी म्हणेन की वयानुरूप, एवढे अनुभव पचवल्यानंतर आता हा माझ्यातला स्वप्नाळूपणा अतिउत्साहीपणा थोडा कमी झालाय. माझ्या उत्साहाला थोडा आवर घालायला मी आता शिकलेय. पण मला नेहमीच वाटतं की, हाच माझा उदंड उत्साह मला एवढं यश द्यायला कारण झालाय. "

" पण प्रत्येक यशाच्या मागे मानवी प्रयत्नांबरोबरच दैवाची जोड लागतेच ह्यावर तुमचा विश्वास आहे का ? "

" हो, नक्कीच आहे. कारण बिझनेसमध्ये इतके अटीतटीचे निर्णय घ्यावे लागतात ! तिथं क्षुल्लक चुकीलाही क्षमा नसते. अशा वेळी बिझनेसनमनची अचूक, अनुभवी नजर जितकी मोलाची तितकीच परमेश्वरावरची कृपादृष्टीही मोलाची ! माझे पती पूर्वी फार नास्तिक होते. एखादं मेजर ड्रॉईंग करायला देवळात गेले तर देवाला नमस्कार करत नसत. पण आता ते एवढे श्रद्धाळू झालेत की बस्स ! माझी स्वतःची तर गणपतीवर मनापासून श्रद्धा आहे. आमच्याकडे दरवर्षी सोवळ्याचा गणपती बसतो. अगदी परदेशवारी ठरवायची असली, तरी पहिले ते तीन दिवस मोकळे सोडायचे, गणपतीचे ! पॅरिसची लेदर फेअर दरवर्षी चुकते कारण नेमके त्या सुमारास गणपती येतात. मी अजूनही कडक श्रावणी सोमवार करते. दरवर्षी आम्ही सहकुटुंब अष्टविनायकाची यात्रा करतो. हल्लीच्या मुलांवर पाश्चात्य संस्कृतीचा एवढा प्रभाव आहे की त्यांना आपल्या संस्कृतीचं, संगीताचं, कलेचं, देवा-धर्माचं काहीच प्रेम वाटत नाही. पण मी आमच्या दोन्ही मुलांवर असे संस्कार केलेत की माझी खात्री आहे, कोणत्याही परिस्थितीत माझ्या मुलांचं पाऊल वाकडं पडायचं नाही. माझ्या मुलीनं कधीही परधर्मीयाशी विवाह केला नसता. आता तिचं लग्नही झालंय, त्यामुळे प्रश्नच नाही."

" तिनंही तुमच्याच पावलावर पाऊल ठेवून आपला जोडीदार निवडलाय का ?"

"थोडंफार तसंच म्हणायला हरकत नाही. क्रिकेटपटू दिलीप वेंगसरकर-बरोबर ती नुकतीच विवाहबद्ध झालीय. ते टाटामध्ये चांगल्या नोकरीवर आहेत. कलकत्त्याहून येताना विमानात त्यांची–तिची एकदा भेट झाली. ओळखदेख झाली. जेव्हा त्यांना कळलं की ती मराठी आहे, चांगल्या घरातली आहे, तेव्हा त्यांनी तिला मागणी घातली."

"माणिकताई, मघापासून मी तुम्हाला सतत काम करताना, ग्राहकांशी बोलताना, विचारविनिमय करताना पाहतेय. एक स्त्री म्हणून हा व्यवसाय करताना तुम्हाला काही बंधनं पडली नाहीत का कधी ?"

"आता तुम्ही मला काम करताना पाहिलंच, त्यावरून तुम्हाला कळेलच की अशी कोणतीही बंधनं मी स्वत:वर कधीही लादून घेतली नाहीत. तुम्हाला सांगते, सुरुवातीला मी चामडं मिळवायला धारावीच्या झोपडपट्टीत जायची. धारावीसारखी वस्ती म्हणजे काय ? आणि दहा वर्षांपूर्वी तर बघायलाच नको ! माझे मिस्टर-सुद्धा तिथं जायला कचरायचे. एवढी घाण आणि गलिच्छ वस्ती ! कोणी जायचंच नाही तिथे. तरी मी एकटी जायची. तिथले लोक नुसते टकामका बघत राहायचे. तरी मला कधीच काही वाटलं नाही. उलट मला वाटायचं, का जायचं नाही तिथे ? काय हरकत आहे ? आपल्याकडे लोक घाणेरड्या नजरेनं बघतात ! बघू देत ! एकदा नजरा सरावल्या की नाही बघायचे. नंतर तिथली पोरंबाळं धावत मागे यायची. पाहायची, ही बाई कुठे जाते ? काय करते ? हं ऽ, ही इथलं चामडं नेते हं ! सुरुवातीला कोणी तितकं लक्ष दिलं नाही. 'हं ऽ, ह्या श्रीमंतांच्या बायकांना काही उद्योगच नसतो, येतात आपल्या काहीतरी उद्योग करायला ! येईल थोडे दिवस मग थांबेल आपोआप यायची.' पण मी जातच राहिले. त्यांच्याकडून लेदर घेऊन काही वस्तू, गालिचे त्यांना करून दाखवले, तेव्हा ते टॅनरीवाले लोक थक्कच झाले. त्यांना नुसती कातडी कमवायची आणि विकायचीच माहिती ! त्यांचं काय–काय होऊ शकतं, ह्याचा त्यांनी कधी विचारही केला नव्हता. नंतर एकदा ते माझ्या वस्तूंचं प्रदर्शन पाहायला आले आणि त्यानंतर ते स्वत:च अशा वस्तु बनवायला लागले. मग मी ते सोडून दिलं."

"अशा अनुभवातून गेल्यामुळे, जुन्या पिढीतल्या लोकांचे बुरसटलेले विचार माझ्या मनाला पटतच नाहीत. बायकांनी सहसा घराबाहेर पडायचंच नाही. बायकांनी म्हणजे कसं कधीतरी बहिणीला, भावाला भेटायला जायचं. फारच झालं तर नोकरी करायला बाहेर पडायचं. स्वतंत्रपणे काही कामासाठी बाहेर पडायचं म्हणजे नुसती भटकंती ! त्यात काही अर्थ नाही. हे सगळे समजच मुळात निखालस चुकीचे आहेत."

"कबूल आहे. पण स्त्री म्हणून आपल्या काही हळव्या बाजू असतात. त्यामुळे एक स्त्री म्हणून आपण काही निर्णय घेतला आणि तो चुकला, असं

कधी झालंय का ? आणि अशा वेळी तुम्ही पती–पत्नी एकाच व्यवसायात असल्यामुळे काही वादावादीचे प्रसंग ?"

"येतात–येतात ! खूप येतात ! गेली दहा वर्षं लेदर गार्मेंट्सची फॅक्टरी चालू ठेवली होती, तेव्हा मिनिटा–मिनिटाला माझा आणि ह्यांचा वाद व्हायचा. हे म्हणायचे फॅक्टरी बंद कर. मी म्हणायची, चालू ठेवायची. खरं तर फार चांगली लाईन होती ती ! थंड प्रदेशात वापरात येण्याजोगे चामड्याचे कोट्स, जर्सीज, जर्कीन्स, जीन्स, स्लॅक्स वगैरे कपडे आम्ही तिथं तयार करत असू. ही फॅक्टरी उभी करण्यासाठी एवढा जीव ओतला होता ! एवढं तंत्र विकसित केलं होतं ! एवढे कामगार रोजगारावर होते ! पण हे सगळंच मातीमोल होणार होतं. केवळ आम्हाला वेळ नव्हता म्हणा किंवा कुठेतरी काहीतरी चुकत होतं म्हणा ! त्या धंद्यात एवढं अपयश येऊन फॅक्टरी बंद करणं आम्हाला भाग पडलं. तेव्हा मला अतिशय वाईट वाटलं. पण काय करणार ? सडलेला भाग कापावाच लागतो. त्या ठिकाणी माझ्या मनाचा कमकुवतपणा नडला म्हणायला हरकत नाही."

"पण तुमच्या तशा हळव्या स्वभावामुळेच व्यवसायाबरोबर तुमच्या संसारातही रूक्षपणा येऊ शकलेला नाही, असं नाही वाटत तुम्हाला ?"

"खरंय ! तुम्हाला सांगते, ज्या स्त्रीला व्यवसायाबरोबर संसारातही यशस्वी व्हायचं आहे, तिला प्रथम पतीच्या स्वभावाशी मिळतं–जुळतं घ्यायला जमलं पाहिजे. मी बाहेर कितीही यश मिळवलेलं असलं तरी त्यात माझ्या पतीचं सहकार्य सर्वांत मोलाचं ! आम्ही सर्व सुखदुःखं एकत्र भोगलीत, त्याची मला जाणीव आहे आणि अशी कृतज्ञ जाणीव ठेवणं ह्यातच स्त्रीचा मोठेपणा आहे. व्यवसायात जरी तुम्ही चार पावलं पतीपुढे चाललात तरी संसारात मात्र नेहमीच सावलीसारखं त्याच्यामागे राहिलं पाहिजे, असं मला वाटतं."

गप्पा मारता–मारता माणिकताईंनी एक लहानपणची गंमतीशीर हकीकत सांगितली. माणिकताईंना दोन बहिणी, एक भाऊ. भाऊ क्रिकेट खेळायचा म्हणून सगळे म्हणायचे त्याला खेळाडू ! मोठी बहीण आईच्या बरोबरीनं काम करायची म्हणून ती कामसू ! दुसरी हुशार, तिला म्हणायचे अभ्यासू ! माणिकताई शेंडेफळ ! ही नुसतीच नखरे करते, म्हणून ही ऐटू !

आज त्या यशस्वी उद्योजक म्हणून खरोखरच ऐटबाज, शानदार दिसतात. पण त्यांच्या वागण्या–बोलण्यात यशस्वी उद्योजकाचा तोरा, कृत्रिम सहजता, कोरडी सहानुभूती ह्यांचा लवलेश नाही. दीर्घ सहवासानंतरही ह्या मनस्वी स्त्रीचं मनावर ठसतं ते एका घरंदाज गृहिणीचं सोज्वळ, शालीन रूप !

माहेर : दिवाळी अंक १९८१

एक शुचिर्भूत समर्पण

डॉ. इंदु पटवर्धन

प्रजासत्ताक दिनाची मावळती संध्याकाळ. बोट क्लबवरील रोषणाई आसमंताला उजळवतेय. मुळामुठेच्या संगमाचं काळेशार पाणीही काठावरील रोषणाईनं रंगीबेरंगी झालंय नदीच्या अल्याड काठभर बंडगार्डनची गर्द झाडी ! सूर्याचे चुकार सोनेरी किरण त्या झाडीतून कुठं-कुठं विखुरलेले. नदीला वळसा घालून पुलावरून आमची गाडी कच्च्या सडकेवर येते आणि सगळं चित्रच पालटतं.

आता दोन्ही बाजूंना पुण्याच्या शहरी रूपाशी काहीसं विसंगत पण ठराविक दृश्य दिसतंय. रस्त्याकडेला किडुकमिडुक सामान विकणारे फेटेवाले बापये, लाकडाच्या फाट्या आणि मोळ्या डोक्यावर घेऊन जाणाऱ्या बायाबापड्या, त्यांच्यासोबत त्यांच्या पायापायात चालणारी, अंगाशी झटणारी त्यांची पोरंबाळं ! रस्त्याकडेला कुठं कौलारू घर, तर कुठं झोपड्या !

रस्ता अजूनही पुढं धावतोय. आणि हेही दृश्य मागे पडतं. माणसांची वर्दळ आता ओसरलेली असते. आता मिलिटरीच्या वसाहती, भलीमोठी ग्राऊंड्स, तालबद्ध पावलं टाकत चालणारे खाकी गणवेषधारीच फक्त दिसतायत.

आता गाडी गर्रकन वळण घेते आणि एकदम एका डोंगराआडून भलामोठा केशरी झगमगता सूर्याचा गोळा डोळ्यांसमोर ! डोळे दिपवणारा अन् निववणारा, सौभाग्यवतीच्या भाळी रेखलेल्या लालबुंद टिळ्यासारखा ! त्यानं छाया धरलेला तो प्रदेश म्हणे नुसती बरड जमीन-उघडीवाघडी पठारं अन् छोटी-छोटी असंख्य टेकाड ! कुठे लाल मातीचा अलवार गालीचा नाही की डोळ्यांना सुखवणारा हिरवळीचा मागमूस नाही भोवती सगळी रेताड जमीन. मधून वाहतुकीचा कच्चा रस्ता. रस्त्यालगत पाच-पंचवीस उंबरठा असलेली वस्ती. हाकेच्या अंतरावर पुण्या-

सारखं शहर आहे, हे सांगूनही खरं वाटू नय अशी गावरान !

पण रस्त्यावरून मात्र ट्रक्स, गाड्या आणि एस्टींची सतत ये–जा सुरू ! त्याला कारणही तसंच आहे. ह्याच रस्त्यावर पुढे देवाची आळंदी आहे. जिथं अखंड हरिनामाच्या गजरात असंख्य भाविकांची मनं भरून जातायत. जिथं कार्तिकीला हजारो यात्रिकांना वारीचं पुण्य गाठीशी लागतंय. जिथं 'जे खळांची व्यंकटी सांडो, तया सत्कर्मे रति वाढो, भूतां परस्परे पडो, मैत्र जीवांचे।'–अशी अमृतवाणी उच्चारणाऱ्या ज्ञानेश्वर माऊलीकडे, मायेच्या सावलीसाठी भक्तांची प्रचंड रीघ लागतेय. कारण आयुष्याच्या वाटेवरचे सगळेच पांथस्थ इथे ! कुणालाही स्वतःतल्या वटवृक्षाचा शोध लागत नाही हेच खरं !

तो शोध लागतो एखाद्यालाच ! अन् मग तो सरळ आळंदीकडे जाणाऱ्या रस्त्यावरून अवचित डावीकडे वळण घेतो. उजव्या हाताला सोनेरी काळसर प्रकाशात इंद्रायणी संथ वाहताना दिसत असते. रस्ता चढाव चढू लागतो. अचानक वरच्या बाजूला एका मंदिराचा कळस चमकताना दिसतो. आणि खालच्या खोऱ्यात एक दुर्मिळ दृश्य दिसतं. भोवतालच्या खडकाळ प्रदेशावर टिच्चून डोलणारी, कणसांच्या भारानं वाकलेली भातशेती, वाऱ्याशी मजेत दंगामस्ती करणारी सुबाभुळाची रोपं आणि भाजीचे हिरवेगार वाफे !

त्या टेकाडावरची अद्‌भुत दुनिया पाहून मन थक्क होतं. ही सारी कमाल बोटं झडलेल्या हातांची आहे, ह्यावर विश्वास बसायला वेळ लागतो. पण भोवतालची वस्ती तसा विचार करायला फारसा अवसरच देत नाही.

कारण गाडी थांबताक्षणी भोवती गलका होतो–'आईसाहेब आल्या ! आईसाहेब आल्या !'

होय, आमच्यासोबत त्यांच्या 'आईसाहेब' आलेल्या असतात. बरोबर आलेल्या पाहुण्यांकडे तसं कोणाचं लक्ष नसतं. सगळ्यांच्या आकर्षणाचा केन्द्रबिंदू आईसाहेबच असतात.

शुभ्रधवल साडीतल्या आईसाहेब पर्स खांद्याला लटकावून मंद हसत गाडीतून उतरतात. भोवती जमलेल्या पाच–पंचवीस पोरांतून काही धिटाईनं पुढं येतात. पटकन् त्यांच्या पायावर डोकं ठेवतात. भालदार-चोपदारांसारखी त्यांच्या भोवताली माणसं पटापट उभी राहतात. झडलेल्या हातांनी सलाम करतात. कोणी त्यांच्या हातातलं ओझं पुढं होऊन घेतात. तेवढ्यात त्यांच्या पायाला स्पर्श करून घेतात.

आईसाहेब मात्र शांतपणे सगळ्यांमधून वाट काढत मंदिराकडे वळतात. अक्कलकोट स्वामी प्रसन्न मुद्रेनं इथल्या माणसांवर, झाडापेडांवर, मुलाबाळांवर आशीर्वादाची उधळण करीतच असतात. देवळाच्या ओवरीतून पाझरणारे भजनाचे सूर स्वच्छ पटांगणातील लाल मातीवर, तिथल्या माणसांवर, वातावरणावर पसरत जातात. ते ऐकणाऱ्याला, पाहणाऱ्याला एका वेगळ्याच दुनियेत घेऊन जातात.

ही दुनिया सुदृढांची नाही. कुष्ठरोगपीडितांची आहे. ही दुनिया दुर्दैवी जिवांची आहे, पण दु:खितांची नाही. ही दुनिया आपल्या रोगाचं भांडवल करून त्यावर ऐदीपणानं जगणाऱ्या माणसांची नाही, कष्टकऱ्यांची आहे. माणसांनी आपल्यापासून तोडलेल्या माणसांचं हे बेट आहे. पण त्यांनाच अपार कणवेनं पोटाशी घेणाऱ्या आईसाहेबांची ही दुनिया आहे त्यांची स्वत:ची !

माणसांच्या ह्या बेटाचं नाव आहे 'आनंदग्राम'! आणि ह्या बेटावरच्या 'आईसाहेब' आहेत डॉक्टर इंदु पटवर्धन ! पण त्यांची एवढीच ओळख पुरेशी नाही. ती अधिक करून घ्यावी म्हणून तर हा वाकडचा वळणाच्या प्रवासाचा आटापिटा !

" एक स्त्री असूनही हे मानवतेचं महान कार्य हाती घेण्याचं धाडस तुम्ही केलंय म्हणूनच तुमची आयुष्यभराची धडपड आम्हाला जाणून घ्यायचीय." असं मी म्हणताच इदुताई हातातल्या सिगरेटचा खोल झुरका घेत संथपणे उद्‌गारल्या,

" तुम्ही 'माझ्या' बद्दल काही जाणून घ्यायला येणार आहात असं मला आधी कळलं असतं तर, मी तुम्हाला येथवर येण्याचे कष्ट घेऊच दिले नसते. तुम्ही माझ्या आनंदग्रामची ओळख करून द्या. माझ्यात असं विशेष काय आहे ? विशेष त्या माणसांत आहे, जे आपल्या रोगाशी सतत झगडा देत आनंदग्रामचं नंदनवन करण्यासाठी झटतायत. पाहा माझ्या माणसांनी ह्या रेताड जमिनीला कसं फुलवलंय ते ! इथली वीट न वीट इथल्या माणसांच्या कष्टापासून बनलीय. त्यांचं अन्नधान्य, कपडालत्ता प्रत्येक गोष्ट ते स्वत:ची स्वत: तयार करतात. कुष्ठरोगपीडित असूनही किती स्वयंपूर्ण आहेत माझी माणसं ! चला, मी तुम्हाला संस्थाच आधी दाखवते म्हणजे कल्पना येईल तुम्हाला !"

विणकाम विभागातल्या हातमागावर लाल काठाच्या हिरव्याकंच साड्या विणल्या जात होत्या. आपल्या अधू हातापायांनी खटके ओढण्यात कुष्टरोगी तल्लीन होऊन गेले होते. त्यांनी तयार केलेले गालीचे, हातमागाच्या छान-छान शबनम पिशव्या, डस्टर्स, चादरी, उशांचे अभ्रे, पेपर हँगिंग्ज, सारं व्यवस्थित टेबलावर मांडून ठेवलं होतं.

बाजूच्या खोलीत चर्मकारांनी केलेले बूट आणि चप्पल पाहून त्यांच्या झडलेल्या बोटांतील कसबाची कल्पना येत होती. ह्या चपलांना परदेशीही मागणी आहे अस इदुताई अभिमानानं सांगत होत्या.

त्याच्या बाजूलाच एक तरुण मुसलमान स्त्री हातात जेमतेम सुई पकडून, एकाग्रतेन टिकल्यांचं भरतकाम करण्यात रंगून गेली होती.

इंदुताई सांगत होत्या, " माझ्या आनंदग्राममध्ये हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन अशा सर्व धर्मांचे लोक आहेत. म्हणूनच आम्ही गणपती, दिवाळी, इद, ख्रिसमस-सर्वच सण उत्साहानं साजरे करतो हं !"

अशाच एका शेडमध्य तऱ्हेतऱ्हेच्या आकाराचे मातीचे दिवे, पणत्या तयार केलेल्या होत्या. दिवाळीत त्यांची खूप विक्री झाली होती. त्यातल्या काही उरल्या होत्या. तिथंच एका बाजूला लाकडी पाळणे, औत, बैलगाडचा, टेबल–खुर्च्या ह्या ऑर्डरीनुसार बनवल्या जात होत्या. एका इलेक्ट्रिशिअनचं रेडिओ, ट्रान्झिस्टर दुरुस्त करणंही चाललं होतं. रेशमांच्या किडचांची जोपासना करून त्यापासून रेशीम काढणं, मेंढचापासून लोकर काढणं, कुक्कुटपालन, गाई–म्हशींचे गोठे आणि तिथं होणारा दुग्धव्यवसाय, पिठाची चक्की...एक ना दोन !

तिथल्याच एका खोलीत भलामोठ्ठा हारा भरून वांगी-फलॉवर ठेवलेले, धान्य-धुन्य भरून ठेवलेलं. त्याच्यासमोर गोबरगॅस प्लँट.

पाहून खरोखरच आश्चर्य वाटत होतं की ह्या माणसांनी त्यांना शक्य होईल असं कोणतं काम करायचं बाकी ठेवलंय ? त्यांना रोगी–'महा' रोगी म्हणणाऱ्यांची कीव करावी लागेल.

जवळजवळ चारशे–पाचशे वस्तीचं हे गाव ! महात्माजींचं स्वप्न सत्यात उतरावं इतकं स्वयंपूर्ण ! स्वावलंबी अन् आनंदी ! आम्ही तिथं फिरत असताना संध्याकाळ टळून गेली होती. घराघरातून भाकऱ्या बडवल्या जात होत्या. कुठं बाहेरच्या ओटचावर बसून गप्पाष्टकं झडत होती. त्यांच्या रक्तानात्याचीही नसलेली काही अनाथ मुलं, बिनदिक्कत घरात शिरून पुढचात ताटली घेऊन बसत होती. इथं तुझं-माझं हे शब्द नव्हते. सर्व घराची दारं उघडी. पिवळचाधम्मक भिंतींची घरं आतून फरशांची आणि बाहेरून स्वच्छ सावरलेली. इथली स्वच्छता खरोखर वाखाणण्याजोगी ! इंदुताई म्हणत होत्या, " मी अशी अवचित इथे येईन ह्याची त्यांना कल्पनाही नसते. पण तरीही मला आवडत नाही म्हणून इथला कोणीही माणूस अस्वच्छ राहत नाही."

खरं होतं ते ! दैन्य होतं पण दारिद्र्य नव्हतं. कोणाच्याही चेहऱ्यावर लाचारी नव्हती. ओशाळवाणेपण नव्हतं. कारण इथला हात न् हात कष्ट करून श्रमांनी खातोय. ज्या बायका शेतावर काम करू शकत नाहीत, त्या सामायिक जेवणघरात अन्नपूर्णेचं काम करतात. त्यांची एवढीशी मुलंसुद्धा त्यांना कामात मदत करतात ! आम्ही गेलो तेव्हा तिथं बुंदीचे लाडू बनवणं चाललं होतं. जेवणघरात स्टीलच्या साठ–पासष्ट वाटचांचा संच पडला होता. माझ्या नजरेतलं प्रश्नचिन्ह ओळखून त्या म्हणाल्या, " कुणीतरी शेठनी त्या देणगीदाखल दिल्यात. आता पाहा, इथल्या चार–पाचशे माणसांत अशा वस्तूंनी भांडणं लागायची की नाही ?"

खरं होतं ते ! दान हे दात्याच्या समाधानासाठी नसावं, ते ग्रहण करणाऱ्याला समाधान देणारं असावं, ही साधी गोष्ट आपल्याला कळणार तरी केव्हा ? त्यांच्या उत्पादनातला माल विकत घेतल्यानं त्यांना अधिक समाधान लाभेल की, स्टीलच्या वाटीतल्या जेवणानं ? त्या प्रश्नाचं उत्तर ज्याचं त्यानं शोधायचंय.

आईसाहेबांना पाहून घराघरातील बायका–पुरुष बाहेर येत होते. 'अग बाई, आईसाहेब आल्याती !' –म्हणत माणसं लगबगीनं पुढ्यातील थाळा बाजूला सारून जेवता–जेवता उठत होती. आईसाहेब घराघरात जात होत्या. विचारपूस करीत होत्या. कोणाला तब्येत जपायला सांगत होत्या, तर तिथल्याच छोट्या हॉस्पिटलमधील जर्जर अवस्थेत अंथरुणाला खिळलेल्या एखाद्या रोग्याचा हात हातात घेऊन ध्यानपूर्वक त्याच्या जखमा पाहत होत्या वस्तीतल्या माणसा–माणसाच्या डोळ्यांत त्यांच्याविषयी ओथंबून आलेलं प्रेम पाहून मन हेलावून जात होतं.

तीन चढणीवर वसवलेली ही वस्ती पाहून आम्ही पुन्हा ऑफिससमोरच्या पटांगणात आलो. वस्तीवर लाईट्सचा उजेड होता तेवढाच ! टेकडीपलीकडे सगळा किर्रर्र काळोख !

समोरच्या देवळातून अजूनही भजनाचे सूर आसमंतात घुमत होते. मला नवल वाटलं. इथल्या सभामंडपात सिनेमाचा प्रोजेक्टर आहे, टेलिफोन आहे, रेडिओ आहे. करमणुकीची सर्व आधुनिक साधनं जवळ असतानासुद्धा ही भाबडी माणसं स्वतःचं एकाकी, दुःखी आयुष्य विसरून 'अवघाची संसार सुखाचा करीऽन' अशी आलापी देतायत. सामुदायिक भजनात रंगून जातायत. तिथपासून हाकेच्या अंतरावरील आळंदीत रंगून गेलेला भजनी मेळावाही मी पाहिलेला आहे. स्वतःतील अहंपणा जोपासत सविकल्प समाधीत जाणारी तिथली माणसं आणि ही माणसं ह्यात जमीन–अस्मानाचं अंतर आहे. अखेर माणसाला सुखाची स्थानंही स्वतःच निर्माण करावी लागतात. ती आपसूक दारी चालून नाही येत. भाविकपणे भजनात रंगलेल्या ह्या दुर्दैवी जिवांनी भजन–पूजन हे एक सुखाचं साधन बनवलं आहे. त्यांच्या हातापायांवरील जखमांसारख्याच तिथल्या उपेक्षित, कष्टप्रद, वेदनांकित जिण्याच्या जखमेवरच्या ह्या मलमपट्ट्या आहेत. अन् त्या करणारे दोन मृदु पण समर्थ हात आहेत– डॉक्टर इंदु पटवर्धनांचे !

"इंदूताई, ह्या लहानथोरांच्या 'आईसाहेब' होण्यापूर्वी तुम्ही काय करीत होता ? ह्यांच्याशी तुमचा नेमका संबंध कधीपासून आला ?"

"काय झालं, ह्यापूर्वी मी अंधांसाठी काम करीत होते. तशी मी बरीचशी भाविक आहे. त्यामुळे सोमवारी–गुरुवारी मी उपास करते आणि दानधर्म करते. त्या काळात अशी सोमवार–गुरुवारची गाडीतून येताना रस्त्यावरच्या भिकाऱ्यांना मी पाच रुपये-दहा रुपये द्यायची. त्याच सुमारास म्हणजे १९६५ साली जेव्हा बेगर्स ॲक्ट आला तेव्हा, त्या महारोगी भिकाऱ्यांची धरपकड सुरू झाली. त्यावेळी माझ्याकडे लाल गाडी होती. ती पाहून ते माझ्याकडे आले आणि म्हणाले, 'आईसाहेब, तुम्ही आम्हाला एवढी मदत करता. आम्हाला सध्या पकडून नेतात, तर त्याचा बंदोबस्त करा ना !' मला कळेना–काय करायचं, कोणाकडे जायचं ? त्यावेळी सोशल वेल्फेअर डिपार्टमेंटचे असिस्टंट डायरेक्टर एस्. टी. गोखले होते.

मी त्यांना म्हणाले, 'अरे शरद, तू हे काय करतोस ? का त्या निरपराध लोकांना पकडून नेतोस ?' तर त्यांनी मला चॅलेंज दिल्यासारखं केलं, 'इंदू, तू समाजकार्याच्या क्षेत्रात खूप काम केलेलं आहेस, सध्या अंधांसाठी काम करतेस, तर आता ह्या कुष्ठरोग्यांसाठीही काम करून पाहा. खडकी स्टेशनजवळ मुळा नदीच्या किनाऱ्यावर फुगेवाडी इथे जी एक लहानशी महारोग्यांची वसाहत आहे, तिथे तू जा. त्यांची व्यवस्था हाती घे. बघ जमतंय का !' मी म्हटलं, मी अजून अशा प्रकारचं काम काही केलेलं नाही. मला जमेल की नाही शंका आहे. देवाधर्माचं आपण काहीतरी करावं, गरीब माणसं हीच देवमाणसं असं समजून भिकाऱ्यांना आणि महारोग्यांना पैसे द्यायचे, ह्यापलीकडे माझा त्यांचा काही संबंधच आला नाही. मग मला हे काम कसं जमायचं ?—असा विचार करून परत आले.

" पण नंतर मात्र मी ह्या गोष्टीवर खूप विचार केला. काही झालं तरी हे गरीब लोक आहेत. तेव्हा त्यांना काहीतरी मदत ही केलीच पाहिजे. त्यासाठी आधी त्यांच्याविषयीची भीती, किळस मनातून जायला हवी. मग मी काय केलं ? दररोज फुगेवाडीला जायची. त्था लोकांच्यात मिसळायची. त्यांच्याशी गप्पा मारायची. माझी ही पद्धतच आहे. मी पुष्कळदा जेव्हा काम करते तेव्हा आधी त्या लोकांत जाऊन बसते, आणि त्यांची मनोवृत्ती समजावून घेते. नंतरच ठरवते की हे काम आपल्याला झेपेल की नाही ? जे काम मला पेलणार नाही, ते काम मी अंगावर घेणारच नाही. समाजकार्य दिखाऊपणासाठी मी कधीही केलेलं नाही. प्रत्येक ठिकाणी मी सच्चाईनं काम करते. मी कधीही आत्मस्तुती करीत नाही, तशी ती मी करणारही नाही "

"आत्ताच तुम्ही म्हणालात, की ह्या माणसांत काम करण्यापूर्वी तुम्ही त्यांची मनोवृत्ती समजावून घेता. सामान्यांच्या वृत्तीत आणि त्यांच्या वागण्यात काही फरक आढळतो का ?"

" निश्चितच ! ती माणसं जशी दिसतात, वागतात तशी ती नसतात. कडवटपणे वागणारी माणससुद्धा मूळची मनानं फार चांगली असतात. फ्रस्ट्रेशन खूप असतं ह्या लोकांमध्ये ! तेच मी आनंदग्रामच्या लोकांमध्येही पाहिलं. जगावेगळं जग आहे हे ! त्यांच्यात प्रेम आहे, माणुसकी आहे. तुमच्या—आमच्यात नसणारी कृतज्ञता त्यांच्यात फार आहे. त्यांच्यासाठी करणाऱ्या माणसावर ते एवढा विश्वास टाकतील की ते त्या माणसाच्या शब्दाबाहेर जाणार नाहीत. एक साधी गोष्ट सांगते त्यांना कुठून तरी कळलं की माझा पन्नासावा वाढदिवस आहे. त्यांनी मला बोलावलं आणि ही अंगठी दिली. मी त्यांना म्हटलं, मी दागदागिने वापरत नाही, मग तुम्ही ही का दिली मला ? ही अंगठी तुम्ही परत घ्या. आणि कोणतीही साधीशी वस्तू आणा. पण नाही मानलं त्यांनी ! एक सुंदर पांढरी साडीही दिली त्याच्यासोबत ! म्हणाले, आईसाहेब, तुम्हाला साडी आणि ही अंगठी घेतलीच पाहिजे ! मी म्हटलं,

दुसऱ्या कुणीही ही अंगठी मला दिली असती ना, तर मी ती वापरली नसती. आज तुम्ही दिलीय म्हणून घालते मी ! तर अशी ही माणसं ! मी नुसता शब्द टाकायचा अवकाश की झेलायला तयार !"

"सध्या इथे असणारे सगळे लोक फुगेवाडीच्या वसाहतीतले आहेत का ?"

"नाही ! फुगेवाडीत सुमारे एकशेवीस स्त्री पुरुष होते. त्यात आता बरीच भर पडली आहे. काही निघूनही गेलेत. फुगेवाडीतल्या लोकांचा उपजीविकेचा धंदा म्हणजे भीक मागणं ! त्यांचे ठरलेले वार होते. गुरुवारी दत्तमंदिराजवळ, सोमवारी सिटीमध्ये, शुक्रवारी खडकीला असे ते जागोजाग भीक मागत फिरायचे. सुरुवातीला पाच वर्षं मी तिथे फक्त जायची. रेशन, धान्य द्यायची. त्यांची सेवा करायची आणि यायची. खूपजणांनी टीका केली. म्हटलं, 'अहो काही करायचं ठरवलं तरी माझ्याकडे पैसा कुठं आहे ? जागा कुठं आहे ?' फुगेवाडीची जागा आमची नव्हती. त्यामुळे तिथे नुसती एखादी शेड बांधली तरी मालक स्वत: येऊन पाडून टाकायचे. त्यामुळे कोणतीही गोष्ट आमच्या हातून व्हायचीच नाही. काही मार्गच सुचत नव्हता. कोणतीही गोष्ट यशस्वी करायला ईश्वराचं साहाय्य लागतं ही गोष्ट मात्र खरी ! मी अक्कलकोटस्वामींची भक्त आहे. त्यांच्यामुळेच हे सर्व घडून आलं अशी माझी श्रद्धा आहे."

"म्हणून का तुम्ही आनंदग्राममध्ये त्यांचं देऊळ बांधलंय ?"

"अहो, तो तर एक किस्साच झाला. आनंदग्रामच्या लोकांनी हट्ट धरला की आम्हाला अक्कलकोट स्वामींचंच देऊळ हवं. आणि अचानक मला कुठून तरी ही मूर्ती मिळाली."

"मग महाराजांनी तुमची अडचण दूर केली का ?"

"हो ना ! १९६९ साली एके दिवशी सकाळी अचानक मला एक फोन आला. बोलणाऱ्यांनी सांगितलं, 'मी जॉन हॉवर्ड ! तुम्ही डॉ. पटवर्धन ना ? तुम्हीच कुष्ठरोगकेंद्र चालवता ना ? मला तुमची संस्था पाहायची आहे.' म्हटलं, 'तुम्ही उद्या येऊ शकता ?' ते म्हणाले, 'छे ! छे ! मला तेवढा वेळ नाही. तुम्ही तयार राहा. मी आत्ता टॅक्सीनं येतो.' मग मी त्यांना फुगेवाडीला नेलं. त्यांनी माझं काम पाहिलं आणि प्रश्न केला, 'What is your exact need ?' मी म्हटलं, 'मला जागा हवी.' तर ते म्हणाले, 'तुला जागेसाठी किती पैसे हवेत ?' मी थक्क झाले. ध्यानी नाही, मनी नाही आणि हे काय अचानक ? मी म्हटलं, 'मला एक लाख रुपये हवेत.' ते हसले. म्हणाले, 'तेवढे नाही, पण वीस हजार मात्र मी मिळवून देईन.' मी म्हटलं, 'चालेल. मला निदान हक्काची जागा तरी घेता येईल.' त्यांनी माझ्याकडून फॉर्म भरून घेतले. एक दिल्ली ऑफिसला पाठवला. एक माझ्या ऑफिसमध्ये रेकॉर्डला ठेवला आणि एक इंग्लंडला 'ऑक्सफॅम' ह्या धर्मादाय संस्थेला, जिथून ते आले होते तिथे पाठवायला सांगितलं."

"पण त्यांना तुमच्या संस्थेची माहिती कुणी दिली ?"

"तेच तर मला अजूनही कळत नाही की त्यांना माझं नाव कुणी सांगितलं, माझ्याविषयी काय सांगितलं. पुष्कळदा मी त्यांना विचारलं. मध्यंतरी इंग्लंडला जाऊन आले, तेव्हाही चौकशी केली. तर ते म्हणाले, 'तुम्हाला पैसे मिळाले ना ? मग तुम्हाला कशाला पाहिजे आम्हाला कुठून कळलं ते !' आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे अर्ज केल्यापासून बरोबर आठव्या दिवशी मला तार आली. उघडून बघते तर आनंदाची बातमी–'Oxfam has granted donation of 1111 Paunds.' महिन्याच्या आत माझ्या खात्यावर बँकेत १९,९५१ रुपये जमा झाले होते."

"मग तुम्ही ताबडतोब जागा घेतली असेल नाही ?"

"जागा मिळायला हवी ना ? तीच तर खरी गंमत आहे. मावळ, पुणे आणि आसपासचा सर्व भाग पिंजून काढला. जिथं–तिथं एक उत्तर– महारोग्यांसाठी जागा हवी, मग नाही मिळायची. पाण्याची लाईटची सोय असलेल्या इतक्या सुंदर जागा पाहिल्या. पण एकही मिळाली नाही. इंदुरीला तर एकाला ॲडव्हान्स दिले होते, तेही त्यानं परत केले नाहीत. सरकार-दरबारी खूप खेटे घातले. वानवडी-जवळ एक सरकारी जागा होती. ती पण नाही मिळाली. कात्रजच्या घाटाजवळ रिकामी जागा होती, तर सरकारकडून उत्तर आलं तिथं हाऊसिंग सोसायटी काढायची आहे. कोणी सांगायचे, तुम्हाला ही जागा मिळायची नाही, ती आधीच दुसऱ्या कोणाला तरी दिलीय. सातबाऱ्यावर पाहिलं तर काहीच नसायचं. मी आपली जागेसाठी वणवण भटकत होते आणि एके दिवशी मला ऑक्सफॅमकडून पत्र आलं– 'तुम्हाला दिलेले पैसे ऑक्सफॅमच्या बेंगलोर ऑफिसला परत पाठवून द्या. कारण तुम्ही त्यांचा अजून काहीच विनियोग केला नाही.' –मला फार वाईट वाटलं. वाटलं, हा तोंडचा घास हकनाक हातातून जातोय की काय ? ते दोन महिने माझ्यावर इतकं टेन्शन होतं की बस्स !

"सध्या साताऱ्याला असलेले चीफ ऑफिसर भोसले, त्यावेळी इथं होते. त्यांच्याशी सहज गप्पा मारताना मी म्हटलं, 'आनंदग्रामच्या जागेसाठी मी किती प्रयत्न करतेय. आता माझे मिळालेले पैसे परत जायची वेळ आलीय.' ते म्हणाले, 'दोन–तीन दिवस थांबा, मी माझ्या मित्रांना विचारून सांगतो.' त्यानंतर त्यांनी मला आळंदीजवळची ही जागा दाखवली. काहीच नव्हतं तिथे ! आता येताना तुम्ही भोवताली पाहिलीत ना, तशीच भकास अशी वैराण जागा ! पुष्कळ रानटी गवत माजलेलं. जागोजाग खड्डे ! अक्षरश: टेकडीवरचा उंचसखल प्रदेश ! मी माझ्या सहकाऱ्यांना जागा दाखवली. सगळ्यांनी मला वेड्यात काढलं. म्हणाले, ह्या जागेचा काय उपयोग ? एक दाणा इथं उगवायचा नाही. मी म्हटलं, मला एक संधी द्या. माझे पैसे परत जाण्यापेक्षा मी ही जागा घेऊन टाकते आणि ही मी अठरा एकर जागा घेतली."

"ही जागा जर एवढी खडकाळ होती, तर त्यावर ही एवढी शेती कशी झाली ? ही घरं कशी बांधली तुम्ही ?"

"फार परिश्रम घेतले आम्ही त्यासाठी ! मी माझ्याकडचे सगळे पैसे या जागेत घातले होते. त्यामुळे शेतकी खात्याच्या बुलडोझरसाठी मी प्रयत्न केला तेव्हा त्यांनी ताशी ऐंशी रुपये भाडं मागितलं. माझ्याकडचे पैसे संपलेले ! म्हटलं हे भाडं कुठून भरू ? शेवटी मिलिट्रीचा बुलडोझर मिळवला. आणि तुम्हाला सांगते, हा बुलडोझर ह्या डोंगराळ मुलुखात महिनाभर काम करीत होता. म्हणजे कल्पना करा, ती जमीन किती खडकाळ होती ! महिनाभर मी तिथं जाऊन बसायची आणि हे काम करून घ्यायची. तेवढेच पैसेही वाचले माझे ! त्या सुमारास 'ऑक्सफॅम'ला शंका आली की ह्या बाईनं एकदम पैसा उडवला की काय ? त्यांनी पुन्हा जॉन हॉवर्डना पाठवलं. ते एवढे चांगले होते, त्यांनी ही सगळी मुरुड जमीन पाहिली, घाणकचरा पाहिला आणि म्हणाले, 'आता ह्या इंदूला मी काय करू ! तिनं तर असली जमीन विकत घेतलीय आणि 'ऑक्सफॅम' तर सारखे रिपोर्टस् मागतेय. आता मी त्यांना काय कळवू ?' मी म्हटलं, 'माझ्याविषयी काही भलतंसलतं लिहू नका हं ! हा पावसाळा जाऊ दे. मग पाहा ऑक्टोबरमध्ये इथं तुम्हाला वेगळं चित्र दिसेल. ती जबाबदारी माझी ! मी तुमचे पैसे वाया जाऊ देणार नाही."

"बुलडोझरनं जमीन सपाट तर केलीत. पण इंदुताई, असं म्हणतात की एखादं का होईना पण घर पाहावं बांधून ! मग पैसा नसताना ही एवढी घरं तुम्ही कशी उभी केलीत ? त्यासाठी सिमेंट, विटा कुठून मिळवल्यात ?"

"अहो, आज तुम्हाला दिसतायत, तेवढी घरं काही मी एकदम बांधली नाहीत. हा विस्तार हळूहळू झाला. सुरुवातीला मी फक्त दोन मोठ्या शेड्स बांधल्या. त्यांचंच उद्घाटन १७ ऑक्टोबर १९७० साली त्या वेळचे केंद्रीय समाज-कल्याण मंत्री श्री. हनुमंतय्या ह्यांच्या हस्ते झालं. त्यातली एक शेड आम्ही अजून तशीच ठेवलीय. ती पाहा, समोरच आहे. या पाहून हवी तर !"

मी त्या शेडमध्ये गेले आणि त्याच पावली बाहेर आले. जेमतेम पुरुषभर उंचीचं घर ! लाकडी बांबूचे टेकू ! वर फोडलेल्या पिंपांचे पत्रे. भिती चुन्यानं आणि जमीन शेणानं सारवलेली. घरात पूर्वेकडे उघडणारी एक छोटीशी चौकोनी खिडकी ! कुठं ही टपरी आणि कुठं आज उभारलेली नमुनेदार घरकुलं ! मी पुन्हा जागेवर आले.

"फुगेवाडीतल्या लोकांनी कच्च्या मातीच्या विटा स्वत:च्या हातानं तयार केल्या. मग प्रश्न पडला, घरावर छपरं कशी करायची. हाताशी पैसा तर अजिबात नाही. मग मला एक कल्पना सुचली. मी तडक गेले पोलीस कमिशनरसाहेबांकडे ! म्हटलं, 'मला तुम्ही धाडीत पकडलेली, रिकामी, दारूची पिंपं द्या.' ते हसले व

म्हणाले, 'तू हातभट्टी तर लावणार नाहीस ना? मग जा घेऊन!' अशी पस्ती-सशे पिंपं मी घेऊन आले. आता ती एवढ्या लांब न्यायची म्हणजे ट्रकला किती भाडं द्यावं लागलं असतं! कारण एका ट्रकच्या फेरीत अवघी साठ पिंपं गेली असती. मग मी काय केलं. एके दिवशी दुपारी एक ते दोन माझ्या घरासमोरचा रस्ता दोन्ही बाजूंना माणसं उभी करून बंद करून टाकला आणि माझ्या आनंद-ग्रामच्या माणसांकडून ती पिपं फोडून, त्यावर रोलर फिरवून, त्याचे पत्रे सरळ करून टाकले आणि तीन ट्रक्समधून ते सगळे आनंदग्रामला पोहोचते केले. नशिब, इथे आजूबाजूला तेव्हा वस्ती नव्हती. कारण असा वास मारत होता त्या पिंपांना! मग त्याच्या पत्र्यांची आम्ही छपरं केली. जमिनी शेणानं सारवल्या."

"तेवढ्या जागेत तुम्ही फुगेवाडीच्या एकशेवीस लोकांना हलवलं?"

"सगळे नाही आले! फक्त ऐंशी लोकच आले! त्यातलेही आता फक्त चार-पाचच राहिलेत. बाकी सगळे नवे आहेत. बरेच जण घरी जातो, असं सांगून गेलेत. पण ते भीक मागतात किंवा दारू गाळतात असं कळलंय मला. बऱ्याच महारोगी भिकाऱ्यांना भीक मागायलाच आवडतं. कारण नुसता एका जागी बसून हात पसरला तरी भरपूर पैसे मिळतात. त्या लोकांना दोन धंदे फार प्रिय. भीक मागण्याचा आणि हातभट्टीची दारू गाळण्याचा! त्यात त्यांना भरपूर पैसा मिळतो. मुंबईत तर मुलुंड, बोरीवली, धारावी इथं अशा महारोग्यांच्या केवढ्या मोठ्या वस्त्या आहेत."

"एरवी महारोग्यांविषयी माणसांना केवढी किळस वाटते! मग त्यांनी तयार केलेली हातभट्टीची दारू चालते?"

"तेच तर मी लोकांना विचारते, की एरवी तुम्ही त्यांना अगदी जवळ उभं करीत नाही, मग त्यांनी तयार केलेली हातभट्टीची दारू कशी चालते तुम्हाला? ती काय शुद्ध होऊन येते की काय? त्याशिवाय हे लोक दिल्लीहून चोरटा तांदूळ घेऊन येतात आणि विकतात. फॉरीनचे कपडे, वस्तू विकतात. हे सर्व चालतं आपल्याला! पण समाजात वावरताना मात्र त्यांनी अगदी आपल्याजवळ येऊ नये, स्पर्श करू नये. मी साधा चौकीदार कुष्ठरोगी ठेवला, तर माझ्याकडे माणसं येईनात. ह्या गोष्टींचा माझ्या मनाला फार त्रास होतो. आणि खरं सांगायचं तर पैसा ही अशी गोष्ट आहे ना, की ती माणसाला आपल्या मागे कुठंही फरफटत नेते. इथल्यापेक्षा कमी कष्टात पैसा जास्त मिळतो म्हटल्यावर माणूस तिथंच जाणार. इथं सगळं शिस्तबद्ध जीवन आहे. इथं काम करायला लागतं. हजेरी द्यावी लागते. देवाची प्रार्थना म्हणावी लागते. टॅबलेट्स घ्याव्या लागतात. हे काही बाहेर करावं लागत नाही. एकेका माणसाला दिवसाला खर्च वजा जाता तीस ते पस्तीस रुपये मिळतात बाहेर! मग तो माणूस आमच्याकडे कशाला राहील? त्याला सांगून समजावून पाहायचं ह्याशिवाय दुसरा मार्ग नाही."

"त्यासाठी आपणही काहीतरी केलं पाहिजे. निदान अशा भिकाऱ्यांना भीक घालणं तरी टाळलं पाहिजे. आपण भीक घालतो, त्याचं कारण आपल्याला ती नक्की कुठे द्यावी, कोणाला द्यावी हे कळत नाही म्हणून ! भिकाऱ्याच्या थाळीत पाच पैसे टाकणे म्हणजे आपण जाता-जाता पदरात पुण्य पाडून घेण्याचा सर्वात सोपा मार्ग आहे. तेच पैसे साठवून कोणाच्या वाढदिवसानिमित्त, श्रद्धांजली म्हणून एखाद्या सेवाभावी संस्थेला अथवा कार्यकर्त्याला देणं हे जिकीरीचं आहे म्हणून आपण हा पुण्यसंचयाचा सोपा आणि सरळ मार्ग पत्करतो असं माझं स्पष्ट मत आहे."

"अगदी खरंय ! आणि आपण अशी भीक घालून त्यांच्या ऐदीपणाला उत्तेजनच देत असतो. पुष्कळदा माणसांना असं वाटतं, आपण अशा माणसांच्या हातातच पैसे द्यावे. माझी एक मैत्रीण तेवढ्यासाठी आवर्जून इथं येते. तसंच दादा वासवानी ! ते म्हणतात, आम्ही पैसे देणार नाही, जेवण घालू. अन्नदान हे श्रेष्ठदान आहे असं म्हणतात म्हणूनही असेल ! तर अशा एकेकाच्या सवयी असतात. मी सुद्धा एके काळी भीक घालत होते, ही अगदी सत्य गोष्ट आहे. तेव्हा मी त्यांना विचारायची की हे पैसे घेऊन तुम्ही काय करणार ? ते म्हणायचे, 'आईसाहेब, आम्ही जेवणासाठी खर्च करतो.' आज आम्हाला कळलं की त्यांना काम दिलं तर ते करू शकतात, आपलं पोट भरू शकतात. पण तेव्हा मला तरी तशी कल्पना नव्हती. आज मात्र मी भीक घालण्याच्या पूर्णपणे विरुद्ध आहे."

"संस्थेला स्वयंपूर्ण करण्यासाठी तुम्ही बरेच कष्ट वेचलेले दिसतायत."

"हो ! ह्या सगळ्या कल्पना माझ्या ! फुगेवाडीचे बरेचसे लोक शेतकरी कुटुंबातील होते. त्यामुळे शेतीचं काम हे त्यांचं घरचंच काम ! शेतीला पाणी हवं. इंद्रायणी नदी जवळच वाहतेय. तेव्हा आम्ही जलसिंचन योजना कार्यवाहीत आणण्याचं ठरवलं. पण अडचणी तरी कशा हात धुऊन मागे लागतात पाहा ! सुरुवातीला आळंदीच्या लोकांनी आम्हाला खूप त्रास दिला. म्हणायचे, हे धरण आमचं आहे, आमचं पाणी तुम्ही दूषित करता. मी म्हटलं, उलट तुमचंच दूषित पाणी आम्ही आमच्या वापरासाठी घेतोय. बऱ्याचदा जवळपासच्या लोकांनी आमची बांधकामं तोडली. अगदी नकोसा जीव केला. ते म्हणायचे, ही महारोग्यांची वस्ती इथून हलवा. शेवटी 'महाराष्ट्र टाईम्स' नं ह्यावर खास रिपोर्ट लिहिला, तेव्हा कुठं हे प्रकार कमी झाले. त्या सुमीला आमच्या शेतात रोपं तरारून आली आणि लोकांचं लक्ष आमच्या कामाकडे वळलं. एक गोष्ट मात्र खरी की मदतही खूपजणांनी केली. कलेक्टर, सरकारी अधिकारी, टाटा ट्रस्ट, ए. एच. वाडिया ट्रस्ट, परदेशी संस्था, परदेशी माणसं ह्या सर्वांनी हे चांगलं कार्य आहे म्हणून हातभार लावला. माझे सहकारीही फार चांगले आहेत. तेच कशाला, माझा मुलगा शेतीतज्ज्ञ आहे. तोसुद्धा ह्या कामात मला खूप मदत करतो. त्याचे मित्रसुद्धा कोणत्याही अडचणीच्या प्रसंगी माझ्या पाठीशी उभे राहतात. म्हणूनच मी कधीही हे काम 'मी' केलं असं

म्हणत नाही. अशी कामं एकटया-दुकटयानं होत नसतात. मला नेहमी वाटतं, स्वत:कडे मोठेपणा घेणं म्हणजे कामाचं महत्त्व कमी करण्यासारखं आहे. प्रत्येकाला त्याच्या कामाचं क्रेडिट मिळालं तरच लोक आपणहून माझ्याकडे येतील."

मी त्यांचं बोलणं लक्षपूर्वक ऐकत असताना त्यांनाही निरखून पाहत होते. साधी रंगीत काठाची सफेद साडी, हातात फक्त अंगठी. एरवी गळयात, कानात, हातात कोणताही अलंकार नाही. ह्या दिसतात तर अविवाहित, पण आत्ताच मुलाचा उल्लेख केला म्हणजे-

माझ्या मनातला संभ्रम त्यांनी अचूक ओळखला.

"मी मघाशी मुलगा म्हणाले ना, तो माझा दत्तक मुलगा आहे. विजय त्याचं नाव! सहा महिन्यांचा असताना मी त्याला दत्तक घेतला. आज तो चोवीस-पंचवीस वर्षांचा आहे. त्याच्यासाठी मी खूप कष्ट घेतले. त्याला चांगलं शिकवलं. आज त्या कष्टांचं चीज झालं असं मला वाटतं."

"पण तरुणपणीसुद्धा तुम्ही लग्नाचा विचार केला नाही का?"

"प्रसंग तर खूप आले, पण नाही मनात आलं कधी! मी लग्न केलं असतं तर माझ्या हातून एवढं काम झालंच नसतं असं मला वाटतं. मग मुलं होतात आणि आपण संसारात गुंतत जातो. मग 'आपण' ही संज्ञा येते. आपला संसार, आपली मुलं, आपला नवरा, आपल्या घरासाठी हे करावं-ते करावं अशी वृत्ती होते. दुसऱ्यासाठी करायला उसंत मिळत नाही. ते मला पटत नाही. पुढे काही वर्षांनी मला असं वाटलं की स्त्रीला आयुष्यात मातृत्वाची म्हणजे मुलाची तळमळ असते. तेवढयासाठी मी दत्तक घेतला. मला आयुष्यात दोनच गोष्टी फार आवडतात. मुलं आणि कुत्री!"

आनंदग्रामची पाच-पंचवीस मुलं ज्या नि:संकोचपणे त्यांच्याभोवती बागडत होती आणि भलीथोरली तीन-चार कुत्री ज्या तऱ्हेनं पायांत घोटाळत होती, त्यावरून ते दिसतच होतं.

"तुम्हाला लग्न करावंसं वाटलं नाही, पण तुमच्या आईवडिलांनी नाही का तुमच्यावर सक्ती केली कधी?"

"अखेर तुम्ही मला माझा भूतकाळ सांगायला लावता हं! मी जे मघापासून टाळतेय, ते तुम्ही कौशल्यानं काढून घेताय."

"पण ते न सांगण्याचं कारण?"

"कारण मला माझा भूतकाळ आता आठवतच नाही."

"हे म्हणणं खोटं! तुम्हाला ते सांगायचं नाहीय."

"काय सांगायचं त्यात? बालपणचं माझं आयुष्य मला आता आठवायचच नाही. कारण ते मी स्वेच्छेनं सोडलंय ना! त्याचं काय आता? जन्मानं मी जमखिंडी स्टेटची राजकन्या! पण आज तर सामान्य माणसाचं आयुष्य मी स्वीकारलंय.

गरीबांच्यात गरीबीनं राहतेय. तेव्हा आता मी अशी होते, तशी होते म्हणण्यात काय अर्थ आहे ? त्यामुळे त्याबद्दल मी कधी विचार करीत नाही. मला त्याची खंतही वाटत नाही. मला त्या ऐश्वर्याची स्वप्नंही पडत नाहीत. "

" पण ह्या ऐश्वर्यसंपन्न जीवनाकडे पाठ फिरवण्याची तुम्हाला इच्छा झाली ती काही अपरिहार्य परिस्थितीमुळे की नैसर्गिकपणे ? "

" काही परिस्थितीमुळे नाही. माझे वडील राजघराण्यातील आणि खरे राजे ! ते जरा जुन्या मताचे. त्यांना आम्ही दोनच मुलं ! मी आणि आमचे दादा ! मी बाबांची अत्यंत लाडकी ! त्यामुळे मला आईवडिलांनी कधीच कोणतं दुःख दिलं नाही. अठरा वर्षांपर्यंत त्यांनी मला अलम दुनियेतील कुठली गोष्ट मिळवून दिली नाही असं झालं नाही. अगदी इंग्लंडमधूनसुद्धा खेळ आणायचे ते ! माझं बालपण पॅलेसमध्ये गेलं. राजघराण्यातल्या माणसांना अशा काही गोष्टी शिकायला मिळतात, ज्या सामान्यांना सहजासहजी मिळत नाहीत. उदा. रायडींग, टेनिस, स्वीमिंग वगैरे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे आमच्या वडिलांनी आम्हाला 'पब्लिक स्कूल'मध्ये घातलं होतं. त्या वेळेला स्वातंत्र्याचं वातावरण होतं. त्याचा माझ्यावर खूप प्रभाव पडला. शिक्षणानं म्हणा किंवा भोवतालच्या बदलत्या परिस्थितीमुळे म्हणा, इतर लोक कसे वागतात आणि आपण कसे वागतो हा फरक जेव्हा जाणवायला लागला तेव्हा मी अस्वस्थ झाले. राजघराण्यात ऐश्वर्य असलं तरी काटेरी नियम असतात त्यांचे. शिस्त कडक असते. त्या मानानं सामान्यांचं जीवन खरोखर फार सुखी ! आपण आणि आपलं घर ! कोणताही शो नाही. आम्हाला शोसाठी अंगभर दागिने घालावे लागायचे. मला ते सगळे दागिने बघूनच त्याचा वीट आलाय. घर सोडल्या दिवसापासून मी अंगावर एकही दागिना घातलेला नाही. "

" म्हणजे ? तुम्ही हे एवढं ऐश्वर्यसंपन्न घर सोडून चक्क घराबाहेर पडलात ? का ? कशासाठी ? "

" मला करिअर करायची होती. डॉक्टर व्हायचं होतं. वडील जुन्या मतांचे ! आईसाहेब थोड्या तडजोड करणाऱ्या होत्या. वडिलांचं म्हणणं होतं, आता तुला लग्नच केलं पाहिजे. मला तर शिकायचं होतं. बाबांनी माझ्या पुढ्यात जवळजवळ ऐंशी लोकांचे फोटो टाकले होते. म्हणाले, 'ह्यातल्या कुठल्याही मुलाची तू निवड कर' त्यात इंजिनियर, आय. सी. एस. ऑफिसर, कॅप्टन, फॉरीन रिटर्नड्, इंग्लंडला राहणारे असे अनेक कर्तबगार मुलगे होते. मी म्हटलं, माझी इच्छाच नाही तर तुम्ही का जबरदस्ती करता ? माझा पाय वाकडा पडणार नाही, एवढी मी तुम्हाला हमी देते. ह्याच्यापलीकडे माझं काहीच म्हणणं नाही. त्यांचा एकच हट्ट ! तू लग्न कर ! मी म्हटलं, मला शिकायचंय, डॉक्टर व्हायचंय. ते म्हणाले, 'तू काय करणार पुढे ? तुझ्याकड विशेष शिक्षण नाही.' म्हटलं, बघू काय ईश्वराच्या मनात असेल ते होईल ! तर म्हणाले, 'एक लक्षात ठेव, तुला माझ्याकडून, संस्थाना-

कडून कोणतीही मदत मग मिळणार नाही. तुला स्वतःच्या पायावर उभं राहावं लागेल.' मी म्हटलं, हरकत नाही. मी बाबांना तसं लेखी लिहून दिलं की मला तुमचं काही नको. त्याच सुमारास आणखी काही घटना माझ्या मनाविरुद्ध घडल्या आणि नेसत्या वस्त्रानिशी मी त्यांच्या नकळत पॅलेस सोडला. राजवैभवाकडे निग्रहानं पाठ फिरवली. त्यानंतर मी कधीही मागे वळून पाहिलं नाही. सदैव पुढंच जात राहिले आणि ह्या स्टेजला आले. म्हणूनच मला आता ते 'राजकुमारी' हे विरूद मिरवायला आवडत नाही."

"पण पॅलेस सोडल्यावर तुमच्या उपजीविकेचं साधन ?"

"नोकरी ! सेंट कोलंबो स्कूलमध्ये महिना तीस रुपये पगारावर मी नोकरीला होते, शिक्षिका म्हणून ! अर्थात ते मॉंटेसरी कोर्स केल्यानंतर हं ! हा कोर्स मी अहमदाबादेत घेतला. तोही माझ्या स्वतःच्या पैशावर हं ! कुणापुढेही हात पसरला नाही. तिथल्या मुख्य अधीक्षकांना–सरलाबाईंना मी सांगितलं की, आज मी निव्वळ रस्त्यावर आहे. माझ्याकडे अजिबात पैसे नाहीत. अखेर शिकवण्या करून मी ते ट्रेनिंग घेतलं. तिथं मालवणकरांची फॅमिली होती. त्यांनी मला फार मदत केली. माझ्या मानलेल्या आई होत्या. त्यांनीही त्यावेळी खूप मदत केली. एक प्रसंगच सांगते तुम्हाला ! माझ्याजवळ पैसे नव्हते, जेमतेम पाच–सहा रुपये होते. एका फ्रेंडनं दहा रुपये दिले होते. जवळ एकूण पंधरा–सोळा रुपये ! मुंबईला तर जायचं होतं, स्थिरस्थावर व्हायचं होतं. एवढ्याशा पैशात कसं भागायचं ? मी डेक्कन क्वीनच्या रांगेत उभी होते. त्या काळात नोकराचं तिकिट दोन रुपये असायचं. म्हटलं, आता कोणातरी फर्स्ट क्लासच्या प्रवाशाला गाठायचं नि त्याची नोकर म्हणून दोन रुपयांचं तिकिट काढायचं. नेमकं पाहा, माझ्या नशिबानं रांगेत पी. एम. जोशी होते. म्हटलं, जोशीसाहेब, एक सव्हॅंटचं तिकिट काढा ना तुमच्यासोबत ! तर ते ओरडले, 'ए ऽ ताई, सव्हॅंटचं तिकिट मागतेस ? तुला लाज नाही वाटत ? चल माझ्याबरोबर !' मग त्यांनी माझं तिकिट काढलं. तेवढेच पैसे वाचले माझे ! असे कितीतरी विचित्र प्रसंग आले आयुष्यात ! अगदी उद्याचा गुजारा कसा...? अशासुद्धा वेळा आल्या. पण सगळ्या प्रसंगांतून सुटले मी ! एकच आहे, धैर्य हवं माणसात ! आणि तेही ईश्वरच देतो. माणसांच्या हातात काय आहे ? सगळी ईश्वरी कृपाच !"

"पण ईश्वरी कृपेला प्रयत्नांची जोड तर लागतेच ना ?"

"हो ना ! आता सेंट कोलंबोत नोकरी करत असतानाच ब्रिटिश रेडक्रॉसनं 'ऑक्युपेशनल थिअरपी'चा कोर्स सुरू केला होता. तिथं मला प्रवेश मिळाला. मी कंटाळलेच होते. म्हटलं, ठीक आहे. कोर्स मला रेडक्रॉसनंच दिला. पण माझ्याकडे त्यासाठी बेंगलोरला जायलाही पैसे नव्हते. विचार पडला की, आता काय करायचं? तेवढ्यात काय झालं सांगते. माझे वडील कडक असले तरी त्यांचं माझ्यावर प्रेम

होतंच ! त्या मायेपोटी, मी घरातून बाहेर पडले तरी ते सारखे माझ्या पहाऱ्यावर असायचे. मी काय करते, माझं कसं चाललंय वगैरे ! त्या वेळेला ते ताजमहाल हॉटेलमध्ये राहायचे. त्या सुमारास माझी तब्येत खूप खालावलेली होती. कारण. दिवसातून एकवेळा जेवण आणि एक कप चहा ह्यावर मी दिवस ढकलायची. जेवण म्हणजे काय ? आम्लेट नि एक ब्रेडचा तुकडा ! एक दिवस अचानक शाळेत आमचे पॅलेस सर्जन आले. मी एकदम धसकले. म्हटलं, हे कशाला आले ? मी क्लास सोडून सरळ बाहेर आले. म्हटलं, तुम्ही सांगितलं की काय मी कोण आहे म्हणून ? इथं कोणाला माहिती नाही माझी ओळख ! ते आम्हाला लहानपणापासून ओळखायचे. ते म्हणाले, 'मी कोणाला काही सांगितलं नाही. पण तू परत चल. ही तू काय अवस्था करून घेतलेस ?'

"मी म्हटलं, मला तुमचं काही नको. तुम्ही परत जा. ते म्हणाले, 'हे बघ, मी सरकारना न सांगता चोरून आलोय तुला भेटायला !' त्यांनी मला जबरदस्तीनं तपासलं. टी. बी. वगैरे नव्हता. ते म्हणाले, 'मी तुमच्यावर वडिलांसारखं प्रेम करतो. माझ्यासाठी तुम्हाला औषधं घेतली पाहिजेत.' त्यांनी भलीमोठी औषधांची यादी मला दिली. मी म्हणाले, 'माझ्याकडे पैसे नाहीत. तुम्ही मला आणून दिलीत, तर मी घेते !' थोडासा साळसूदपणा मी दाखवला. नाईलाज होता. नेसत्या वस्त्रानिशी बाहेर पडल्यामुळे कपडेही नव्हते माझ्याजवळ. बेंगलोरला वॉर सर्विसेस्‌वर जायला मी एकटीच तयार झाले होते, बाकी सर्वजण घाबरले होते. आणि निघण्याच्या तर सूचनाही आल्या होत्या. काय करायचं ह्या विचारात असताना पॅलेस सर्जननी खूपशी औषधं आणून दिली. मी ती औषधं घेतली आणि 'केम्स आणि कंपनी'त विकून टाकली. त्यांना जरा संशय आला, कारण कालच घेतलेली औषधं परत कशी आली ? पॅलेस सर्जननी त्यांच्याकडूनच विकत घेतली असावीत. कारण त्यांना लगेच कळलं की, मी ती परत केलीत आणि मला फक्त 'केम्स आणि कंपनी'च माहिती होती. मी कुठं फिरले होते त्यावेळी ? मग त्या आलेल्या पैशांतून एकशे बावीस रुपयांचं फर्स्ट क्लासचं बेंगलोरचं तिकिट काढलं. कपडे घेतले आणि निघाले, तर हा गृहस्थ स्टेशनवर पुन्हा हजर ! त्यांना माझी बित्तंबातमी कशी कळायची कोण जाणे ! म्हणाले, 'तुम्ही सगळी औषधं विकलीत ना ? ही घ्या पुन्हा ! ही मात्र विकू नका.' म्हणून म्हणते, माया कशी असते पाहा ! म्हणूनच माझी ओळख मी दाखवत नसे. खरोखरच मला मनापासून वाटतं की, लोकांनी मला इंदु पटवर्धन म्हणून ओळखावं. इतके प्रसंग आयुष्यात आले, ते जर सांगितले तर संबंधितांना दुःखच होईल. त्यावेळेससुद्धा वडिलांना दुखवू नये हा माझा उद्देश ! अगदी अलीकडे कुणीतरी मला राजकन्या म्हणून प्रसिद्धीस आणलं. त्यावेळी काही लोक मला म्हणालेसुद्धा, 'हे तू आम्हाला का बोलली नाहीस ?' म्हटलं, त्यात बोलण्याजोगं काय आहे ? सामान्यांसारखी आम्ही माणसं!

आणि जर मी त्या सर्वांवर पाणी सोडून बाहेर पडले, जर मी त्या प्रकारातली नाही तर मी स्वतला राजकन्या म्हणवून घेणं गैरशिस्त आहे. मला नाही वाटत कोणती राजकन्या पीडितांसाठी असं काम करेल? मी स्वीकारलेलं जीवनसुद्धा कित्येकांना आवडत नसे आणि तसंच मला नाही वाटत की माझी ओळख पाहून कोणी माझ्या कामाला मदत करीत असतील. ते सर्व आता भूतकाळात जमा झालंय."

"पण इंदुताई, ऐश्वर्यसंपन्न जीवनातून 'वार सर्विसेस्' मधलं खडतर काम तुमच्या अंगवळणी कसं पडलं?"

"काय आहे, एखादी गोष्ट करण्यापूर्वीच काय तो विचार करायचा असतो. माझ्यात प्रखर जिद्द आहे. त्यामुळे स्वीकारलेलं काम मी तडीस नेतेच. त्यामुळे बेंगलोरला कठीण असं ऑक्युपेशनल थिअरपीचं प्रशिक्षण होतं ते मी पार पाडलं. त्यात बेसिक ॲनाटॉमी, शिवणकाम, विणकाम, सुतारकाम वगैरेंचे छोट-मोठे कोर्सेस् आम्हाला दिले. नर्सिंग आम्हाला शिकवलं. हे सर्व क्लासेस् पुढे आम्हाला स्वत:ला चालवावे लागायचे. म्हणजे जर हात अधू झाला असेल, नस अडकली असेल, बोटं वाकडी झाली असतील तर त्यासाठी काय उपाययोजना करावी म्हणजे ती पुन्हा काम करतील हे शिकवलं जायचं. त्याशिवाय मी शोधपथकात होते. म्हणजे शत्रूच्या कॅंपमध्ये जाऊन आपले लोक किती आहेत, ते पाहून यायचं. दुसऱ्या महायुद्धात हे काम इंग्लिश लोकांसाठी करावं लागायचं, म्हणून मी ते शक्यतो टाळायची. नंतर माझी बर्मामध्ये बदली झाली. तिकडे जवानांवर प्राथमिक उपचार करण्याची वगैरे पडतील ती कामं मी केली. नंतर मी जावाला गेले. तिथल्या रेडक्रॉसच्या युनिटमध्ये दोन ब्रिटिश महिला आणि मी एकटीच भारतीय स्त्री होते. तिथे माझी ओळख लेडी माऊंटबॅटनशी झाली. माझ्या कामाचं खूप कौतुक केलं त्यांनी! मध्यंतरी जपानलाही जाऊन आले मी! सत्तेचाळीस साली माझे वडील वारले तेव्हा मी सिंगापूरला होते. तिथून मी परत आले आणि इथल्या निर्वासितांच्या कार्याला लागले. पण मला आपल्या माणसांचे हाल पाहवले नाहीत. माझ्या मनावर फार परिणाम झाला. दोन-तीन वर्षांनी मी तेही काम सोडलं. माझे दादा म्हणाले, 'तुम्हाला शिक्षण घ्यायचंय ना? मग नोकरी कशाला करीत बसला आहात? मी तुम्हाला लागेल ती मदत देतो.' मग मी वैद्यकीय शिक्षण घेतलं. ते घेत असताना अवघ्या एकोणतीसाव्या वर्षी दादाही वारले. अपार दु:ख झालं मला! हातातला घास हिसकावून घ्यावा तसं वाटलं अगदी! घर सोडल्यावर दादांनी मला खूप मदत केली होती. त्यांची राहणीही साधी होती एक साधा पायजमा आणि शर्ट घालून हिंडणारा माणूस होता तो! त्यांनाही राजवैभवाचा मोह नव्हता. आज दादा असते तर आनंदग्रामचं चित्र वेगळं दिसलं असतं. दादा गेल्यावर मात्र हे घर आलं ना माझ्या नावावर तेव्हा मी इथंच स्थायिक झाले!"

"तुमच्या जन्मजात ऐश्वर्याचा आनंदग्रामच्या कामाला काही फायदा होत

नाही का ?"

"आजपर्यंत आवर्जून अशी मदत कोणी दिली नाही आणि मीही मागितली नाही. पुढचं काही माहीत नाही. माझ्या आनंदग्रामसाठी जागोजाग जाऊन देणग्या गोळा करण्यात मला आनंदच वाटतो. कारण देणगीदार मला खूपच चांगला प्रतिसाद देतात. उदाहरणार्थ किर्लोस्कर ! त्यांना नाव लागत नाही, प्रसिद्धी लागत नाही. आजपर्यंत कोणत्याही किर्लोस्कर कंपनीनं मला परत पाठवलेलं नाही. गरवारेंकडून मात्र अजून प्रतिसाद मिळत नाही. माणसा-माणसातले नमुने सांगते. आनंदग्रामसाठी बॉल डान्सचा कार्यक्रम आम्ही घेतला. पुण्यातील एका गरीबीतून वर आलेल्या उद्योगपतीकडे गेले, जाहिरातीसाठी ! स्वत: उद्योगपती नव्हते. त्यांचा मुलगाही बाहेर आला नाही. प्रसिद्धी अधिकारी आले. म्हणाले, 'तुमचं कार्य फार चांगलं आहे. आम्हाला त्याची फार स्तुती करावीशी वाटते. पण आम्ही डान्सला पैसे देणार नाही.' मी म्हटलं, 'अहो, तिथं तुम्ही डान्स करणार नाही, मीही करणार नाही. ह्या कार्यक्रमातून जे पैसे मिळतील, हे आनंदग्रामसाठीच खर्च होतील !' पण नाही हो त्यांनी काही दिलं ! फार नाही, पण निदान दहा रुपये देणं एवढ्या मोठ्या उद्योगपतींना अवघड होतं का ? पुण्यातील एका प्रतिष्ठित डॉक्टरनं तर सरळ म्हटलं, 'म्हणजे तुम्ही भीक मागायला आलायत तर !' म्हटलं, 'हो ! आम्ही खूप मोठे भिकारी आहोत. पण आम्ही आमच्यासाठी नाही मागत, संस्थेसाठी मागतोय.' तरी त्यांनी हाकलून लावलं आम्हाला !"

"तुम्हाला क्लेशकारक नाही वाटत असे अनुभव ?"

"नाही ! आता मला असे नकार घ्यायचीही सवय झालीय. माझा कुठलाही कुष्ठरोगी माझ्यावर रागावला, त्यानं मला शिव्या दिल्या असं कळलं तरी मी म्हणते, माझी पाठ आता घट्ट झालीय, तुम्ही खुशाल रागवा माझ्यावर ! पण तुम्ही चांगले वागा. कोणीही भीक मागण्यासाठी संस्था सोडून गेलं की मला वाईट वाटतं. तुम्ही कोणत्याही उद्योगासाठी बाहेर पडा, मी मदत करीन तुम्हाला. पण वाईट धंद्याला लागू नका, असं माझं म्हणणं ! एकाला मी संस्थेतून निघून जा म्हणून सांगितलं. तो रागानं गेला आणि पुन्हा परत आला. म्हणाला, 'बाईबाहेब, चूक झाली. मी तुम्हाला रागावून बोललो. माफी करावी !' म्हटलं, तुला दहा वेळा सांगितलं की तू स्वच्छ राहा. तुझा ओटा, घर स्वच्छ ठेव. तू ऐकत नाहीस. मला गैरशिस्त खपत नाही. तर अशी ही माझी माणसं ! रागावली तरी लोभ करतात. अखेर कुणाच्या ललाटी दैवानं काय रेखलेलं असेल ते काही सांगता येणार नाही. पण एक गोष्ट मात्र खरी की आजचं माझं आयुष्य इतकं सुंदर आहे ! समाधानी...पूर्ण समाधानी ! कशाकशाची मला कमतरता नाही. माझ्या वडिलांची मला आठवण येते. ते नेहमी म्हणायचे, 'फार निग्रही आहे ही पोरगी ! ती सोन्याची माती करेल आणि मातीचं सोनं करील !'"

ह्यावर अधिक भाष्य करण्याची काही गरज आहे असं मला वाटतच नाही. डॉ. इंदु पटवर्धनांचं हे असं जगावेगळं जीवन ऐकायला मिळालं, जवळून पाहायला मिळालं. तो अनुभव एवढा विलक्षण होता की निवेदन संपलं तरी भानावर यायला काही क्षण लागले. आनंदग्रामची आठवण म्हणून आवर्जून मी तिथल्या बऱ्याच वस्तू खरेदी केल्या. ते बघून आईसाहेबांना आणि तिथल्या माणसांनाही खूप बरं वाटलं. आमची गाडी निघालेली पाहताच बाजूच्या मैदानातील झोपाळ्यांवर, घसरगुंडीवर खेळणारी बरीचशी मुलं पाखरांसारखी कोंडाळी करून गाडीभोवती उभी राहिली. इंदुताईंनी गाडी सुरू केली, त्यांच्या अंगावर नेल्यासारखी केली. ती पाखरं भुर्रकन उडाली. पुन्हा थोडं पुढं जाऊन हाच खेळ ! मला गंमत वाटली. हा त्यांचा बहुधा रोजचाच खेळ असावा. गाडीतही मुलं खच्चून भरलेली अर्ध्या वाटेपर्यंत आली. मग अनिच्छेनं उतरून गेली. आम्हाला निरोप द्यायला जवळ-जवळ निम्मं आनंदग्राम गेटपर्यंत फर्लांगभर चालत आलं होतं.

शेवटच्या वळणावर मी एकवार मागे वळून पाहिलं, असंख्य हात निरोपादाखल हलत होते.

एव्हाना काळोख गच्च झाला होता. उद्याच्या उषःकालाची स्वप्नं मिटल्या पापणीत घेऊन आनंदग्राम झोपी जात होतं.

परतताना आम्ही गप्प-गप्पच होतो. एका निर्जन ठिकाणी इंदुताईंनी गाडी थांबवली. म्हणाल्या, ह्या इथंच, इथल्या परिसरातल्या पाच-पन्नास लोकांनी माझी गाडी अडवली होती. अशाच मिट्ट काळोखात लाठ्याकाठ्या घेऊन मला मारायला धावले ते ! म्हणाले, 'ही वस्ती इथून हटवा नाहीतर तुम्हाला जीवे मारू !' मी सरळ गाडीतून उतरले. म्हटलं, मी तुमच्यासमोर आहे. काहीही करा. पण ही वस्ती मी हलवणार नाही. माझं धाडस पाहून वर उगारलेले हात वरमले. खाली आले."

समोरून एक टिटवी कर्कश ओरडत गेली. गाडीनं एक जोरदार हिसका दिला. माझ्या अंगावर त्या प्रसंगाच्या केवळ कल्पनेनंच सर्रकन् काटा आला.

गाडी पुन्हा हमरस्त्यावरून धावू लागली. डोंगराच्या कुशीतून सरपटत, पुलावरून तिनं एक सहजसं, झोकदार वळण घेतलं, अगदी इंदुताईंच्या जीवनासारखंच पल्लेदार !

बोट क्लबवरचे रंगीबेरंगी दिवे आता अधिकच उजळल्यासारखे वाटत होते.

माहेर : मार्च १९८२



एक बंजारन कलाकार

स्विटी थॉमस

डबलडेकर बसने डावीकडे कलतं वळण घेतलं की आसमंत निरखत असताना पुन्हा-पुन्हा ती अधांतरी तरंगणारी रंगीबेरंगी दिव्यांची त्रिकोणाकृती माळ नजरेसमोर यायची. अगदी खूप दूरवरूनसुद्धा ! मग त्या माळेच्या अधिक जवळ आलं की तशा रंगीबेरंगी माळांच्या असंख्य झुली सभोवार सोडलेल्या दिसायच्या. भल्या प्रचंड तंबूच्या आसमंतात नुसता झगमगाट ! तसा तर तो त्या मैदानावर अनेकवार दिसतो. पण ह्यातलं वैशिष्ट्य असं की बँडची क्वचित कानी पडणारी उत्तेजक धूनही त्या रंगीबेरंगी प्रकाशात दूधपाण्यागत मिसळून गेलेली. एरवीसारखा तिथं डिस्कोचा धडधडाट नाही की कोणाची शाब्दिक आतषबाजी नाही. हरे रामाचे सूर नाहीत की जनसमुदायाचा कोलाहल नाही.

मूळ तंबूपासून झगझगीत प्रवेशद्वारापर्यंत लांबच लांब पसरलेल्या रांगा ! अगदी महागडचा तिकिटांच्या खिडकीसमोरसुद्धा ! आणि प्रेक्षक समुदायात छोटचा-छोटचा जिन्स, फ्रॉक्स, मिडी-मॅक्सीतल्या बाहुला-बाहुल्यांची ही ऽ गर्दी ! अर्थात आईबाबांच्या किंवा ताईदादाच्या हातात आपली चिमुकली बोटं अडकवून गेटवरची जबडा उघडलेला वाघ, सोंड वर उचललेला हत्ती, झुपकेदार आयाळीचा सिंह ह्यांची भलीमोठी चित्रं भिरभिरत्या नजरेनं पाहणारी वानरसेना !

एकदा गुरख्यानं आत प्रवेश दिला की तिथल्या धूळमाखल्या लालचुटूक रुजाम्यावरून, दिव्यांच्या माळा सोडलेल्या आकर्षक छोटचा कुंडचा ओलांडून दुरंगी कापडातल्या खांबांना धक्के देत ही सगळी वानरसेना आत दुडदुडत खुर्च्या पटकावून पार ! मग त्यांच्यामागून धडपडत आत आलेल्या त्यांच्या आईवडिलांनी आपापली चिमुरडी शोधावी. पुढच्या रांगेतल्या मुलाला दडपून मागच्या रांगेत

स्वतःच्या जागेवर आणून बसवावं, तोच त्यांच्याभोवती घिरट्या घालणाऱ्या आणि पिपाणी–रंगीत टोप्या विकणाऱ्या किंवा आइस्क्रीम–वेफर्सवाल्या पोऱ्यांपासून त्यांची नजर दूर करण्याच्या प्रयत्नात असताना त्या चिमुरड्यानं झडप घालून घेतलेल्या आइस्क्रीम कपचा हिशोब निमूट चुकता करावा हे सगळं ओघानं आलंच !

मुलांचा ओरडा, विक्रेत्यांचा उच्चरव, पालकांची हाकाटी ह्यावर ताण करणारे वाघसिंहांच्या डरकाळ्यांचे किंवा हत्तींच्या चित्कारांचे आवाज त्या भल्यामोठ्या तंबूत चहूबाजूंनी अधूनमधून घुमत असतानाच बँडच्या तालावर कर्णमधुर संगीत सुरू होतं. आणि पावसाच्या हलक्या सरीनंसुद्धा वातावरणातली धूळ हलकेच खाली बसावी आणि पावसाचं निर्मळ संगीत रंगात यावं तसा इतर सगळा कोलाहल हलकेच विरून फक्त ते कर्णमधुर संगीत तेवढं त्या तंबूत गुंजत राहतं.

हळूहळू त्या संगीताची, त्या स्वरांची तीव्रता वाढते आणि गरगर गिरकी घेत ते सूर आपल्या व्याप्तीचं वर्तुळ वाढवत पार तंबूबाहेर पोहोचतात. त्या सुरांच्या वाढत्या वर्तुळात लखो लोकांची मनं खेचली जातात. क्षणोक्षणी उत्तेजित होत असतात. नजरेत उत्कंठा दाटून येत असते. पोरांपासून थोरापर्यंत साऱ्यांचे श्वास रोखून धरले जातात. कारण–

कारण काही क्षणांतच तिथं सर्कस सुरू होणार असते ! डोळ्यांचं पारणं फेडणारे चित्तथरारक खेळ हाताच्या अंतरावर प्रत्यक्षात घडणार असतात. एक अननुभूत उर्मी अवघ्यांच्या मनात दाटून येत असतानाच चकचकीत, आखूड पोषाखांतल्या कमनीय युवक–युवतींचा जथा शिस्तीनं आत येत, सलाम ठोकत भराभर विखुरला जातो. छोट्या शिड्यांवरून सरसर उंच छताला भिडलेल्या झुल्यावर चढतो आणि हात गुंतवून एका छोट्या दांडीवरून दुसऱ्या दांडीवर सफाईदार झोके घेताना हवेतल्या हवेत चार–पाच पलटी, वेलांट्या, वळसे घेण्याचा चित्ताकर्षक खेळ तिथे रंगात येतो. लहानांना ते खेळ दाखवायला आलेले थोरसुद्धा सान होऊन तेवढेच रंगतात.

सर्कस सुरू झाल्या क्षणापासून झपाट्यानं रंग भरत जाते. प्रेक्षकांचं चित्त क्षणभरही ढळू न देता, विचारांना अवकाश न देता, उत्सुकता वाढवत ती उच्च बिंदूपर्यंत पोहोचते...जेव्हा मृत्युगोलात दोन मोटरसायकल स्वार एकमेकांना चुकवत गरागरा घिरट्या घालत असतात...जेव्हा उघडी मोटरकार धाडकन पलीकडे हवेत उडत जाते...जेव्हा एका दोराला अडकवलेल्या आकड्यामध्ये आपली तोंडं अडकवून घेत, एकमेकींच्या हातात हात घालून एक चौफुला अधांतरी हवेत कितीतरी वेळ गरगर फिरत असतो...जेव्हा बोनलेस प्लॅस्टिक गर्ल आपला भरगच्च तगडा देह स्वतःच्या पायांत वेडावाकडा गुंतवून अंगाची मूठभर जुडी करत असते, जेव्हा धावत्या घोड्याच्या पाठीवर एक युवक आणि एक युवती तऱ्हेतऱ्हेच्या

कसरती करत असतात आणि जव्हा एक किरकोळसा रिंगमास्तर केवळ एका चाबकाच्या तालावर पाच-पंधरा हिंस्त्र श्वापदांना मनःपूत नाचवत असतो !

सर्कशीच्या रंगतीला उत्तरबिंदू ठाऊकच नसतो. उच्चबिंदूपर्यंत पोहोचलेली सर्कस जेव्हा संपते तेव्हा जणू स्वतःलाच नव्यानं जीवदान मिळाल्यागत सुटकेचा निश्वास साऱ्यांच्या उरातून सुटतो आणि हातापायांचा कंप आवरत असतानाच त्या चित्ताकर्षक खेळाचा 'ॲक्शन रिप्ले' मनःचक्षूंसमोर पुन्हा एकवार सुरू होतो.

हे काही तुमच्याच बाबतीत घडतं असं नाही. मी स्वतः सर्कस पाहून आले (बालहट्ट पुरविण्याच्या मिषानं नव्हे तर स्वतःच्या स्त्री-हट्टाचं कौतुक पुरविण्यासाठी) की त्या सर्कशीच्या 'ॲक्शन रिप्ले'त मी बराच काळ गुंतून राहते. चित्रपटातल्या हाणामारीला दाद न देणारी मी, पण ह्या धाडसी खेळांना आपसुकच टाळीची दाद मिळते.

वर्षामागून वर्षं उलटली पण सर्कसचं आकर्षण तिळमात्र कमी झालं नाही. अर्थात वय वाढलं तसं निष्पाप कुतूहल संपलं आणि जाणती उत्सुकता अंकुरली अन् 'अनोळखी पाऊलवाटे'च्या निमित्तानं वाढीला लागली. आणि ह्याही पाऊलवाटेच्या शोधाच्या प्रवासाला प्रारंभ झाला.

सर्कशीचं एक जगावेगळं जग आहे. पण ते आहे जत्रेतल्या दोन चेहरी लाकडी मुखवटयागत. समोर दिसणारं झगमगतं, सुस्वर, रसरंगीत असं एक जग आणि पाठीमागे डोकावलं तर नेमकं ह्याउलट पत्र्याच्या छपरीचं, दरिद्री, कळाहीन सुस्त जग ! काळाची कळ फिरली की लोकांसमोर त्यातलं झगमगतं जग येतं. दोन घटका त्यांना भान विसरायला लावून करमणूक करतं आणि पुन्हा आपल्या कोषात परततं. जेव्हा उभं जग कामाच्या धांदलीत घराबाहेर पडतं तेव्हा इथल्या सुस्त सकाळीला प्रारंभ होतो आणि जेव्हा बाहेरच्या जगाची श्रांत पावलं आपल्या घरकुलाकडे परतत असतात तेव्हा त्यांच्या करमणुकीसाठी ही चंचल, चपळ पावलं तंबूकडे उधळत असतात.

काळाची आणखी काही आवर्तनं पुरी झाली की पाठीवर बिऱ्हाड लादून जिप्सी जिंदगीचे हे पांथस्थ आपल्या घटकाभराच्या कर्मभूमीला सलाम ठोकत पुढची वाटचाल करायला लागतात. सोबत असतात फक्त तिथल्या काही भल्याबुऱ्या आठवणी आणि गाठीला बांधलेली पाचुंदाभर पुंजी ! ह्याच पाचुंदाभर पुंजीसाठी त्यांना किती लोकविलक्षण जीवन जगायला लागतं हे त्यांच्याच तोडानं ऐकण्यासारखं आहे.

मी स्वीटी थॉमसच्या दीडखणी घरकुलात प्रवेशले तेव्हा ती आतल्या अंगाला स्टोव्हवरील डाळीला फोडणी देण्याच्या तयारीत होती. त्या खमंग घमघमाटात ती बाहेर आली तेव्हा तिच्या खुमासदार रूपानं मी चकितच झाले. त्या कळाहीन विश्वात तिचं तारुण्य अधिकच उठावदार वाटत होतं.

जिच्या पत्रिकेत शुक्र बलवान असतो अशी स्त्री अत्यंत फेमिनाईन असते. स्वीटीच्या पत्रिकेतही असेच ग्रहयोग असावेत. इतके तिचे looks फेमिनाईन आहेत.

गोलगोबरा टिपिकल पंजाबी तोंडवळा, पुष्ट पण लवचिक शरीर, काळ्या घनदाट केसांवरील चमक, गोऱ्या मृदुमुलायम त्वचेवर गुलाबपाण्याचा सुगंधी शिडकावा केल्यासारखी अंगकांती, मुसमुशीत तारुण्याच्या जागोजाग मुक्त विखुरलेल्या रेशीमखुणा !

नाव शीतल आणि नजरेत तप्त ज्वालामुखीची फेक, नाव शांता आणि अशांतीचा महासागर, नाव सुरेखा आणि कुरूपतेच्या साक्षात आविष्कार असा विरोधाभास नेहमीच दृष्टीस पडतो. पण नाव स्विटी आणि नावाप्रमाणेच वागण्या-बोलण्यात, चालण्यात गोडवा असलेली स्विटी पाहिली की नाव सोनुबाई हाती कथलाचा वाळा ही म्हण चक्क लटकी पडते. तिच्याकडे पाहिलं की तारुण्य आणि स्त्रीत्व तिच्या रोमारोमातून कारंजासारखं उसळतंय असं वाटतं. तिच्या चमकदार, काळ्याभोर डोळ्यांतून निरागस भाव स्त्रवत असतात. बोलण्यातला हळुवारपणा, संथपणा आपल्या केवळ कानालाच नव्हे सर्वांगाला स्पर्शून जातो, बहरून टाकतो. मॅक्सीतली ही गुलाबकळी आपला अनपढ अशिक्षितपणा आपल्या सुबक, सुगंठित सौंदर्यानं अशा काही मिजाशीत झाकून टाकते की बस्स !

संस्कृत साहित्यातील अष्टनायिकांचं सौंदर्य घेऊन जन्माला आलेली ही स्विटी चक्क पाठीवर ओझं लादून बंजारन जिंदगी जगत गावोगाव भटकत फिरते. आपल्या नेत्रदीपक अदाकारीनं लाखो प्रेक्षकांच्या नेत्रांचं पारणं फेडत असते.

म्हणून तर अशा सुंदर स्त्रीदेहाची फुलबाग नाठाळ जनावरांकडून लुटली जाऊ नये म्हणून तिला स्वतःभोवती बंधनांची तटबंदी उभारावी लागते. मनातल्या हळुवारपणावर चिलखत चढवावं लागतं. डोळ्यांतल्या मादकतेला पापण्यांचे बंधारे घालावे लागतात. ओठांतील मधाळ शब्दांना अबोलीचं कुंपण घालावं लागतं आणि हे सर्व ती कसोशीनं करते. त्याची तिला आता इतकी सवय झालीय की कोणतीही प्रदर्शनीयता तिला जमता जमत नाही. भावनांची, शब्दांची किंवा अभिव्यक्तीची !

त्यामुळे तिला बोलतं करणं खूप कठीण जातं. चौकटीतल्या मैत्रीची नाती सांभाळणारी स्विटी मोकळ्या मैत्रीला म्हणून तर चटकन दाद देत नाही. तिला तिच्या कोषातून बाहेर आणून तिच्या मनात विश्वास, आपुलकी निर्माण होईपर्यंत गप्पांची रांगोळी अनेकवार रेखता-रेखता विस्कटते. पण मी सावरून धरते. स्वतंत्र जीवनाचा वाराच कधी चाखायला न मिळालेली स्विटी, ह्या अनोळख्या झुळुकेनंही म्हणून तर बावरून जाते पण एकदा तिची स्निग्धता पटली की बुजरेपणा संपतो, स्नेहभाव जागृत होतो आणि मग ती बोलायला लागते नव्हे चक्क बडबड करायला लागते. 'काय सांगू' ची आता 'किती किती सांगू' अशी भावावस्था होते आणि

मग माझ्याकडे फक्त श्रोत्याची भूमिका उरते.

सर्कशीचं जग हे सामान्यांना खरोखर दूरवरचं आणि अपरिचित ! त्यामुळे पहिलं कुतूहल म्हणजे इथं प्रवेश तरी कसा मिळत असेल हेच ! पण तिथे तर स्विटीसोबत तिची आई आणि भावंडंही दिसत होती. म्हणजे स्विटीसोबत तिचं घरही फिरतं की काय गावोगाव ?

माझ्या प्रश्नावर स्विटी खळखळून हसली. म्हणाली, " माझ्यासोबत घर नव्हे पण घरासोबत मात्र मी बालपणापासून फिरतेय. किंवा त्या सर्कशीच्या जगातच मी जन्म घेतलाय असं म्हणायला हरकत नाही. कारण माझ्या जन्माआधीपासून माझे आईवडील सर्कशीत काम करत होते. आम्ही मूळचे दिल्लीचे रहिवासी. माझी आई जेव्हा सर्कशीत काम करायची तेव्हा तिच्यासोबत माझी मोठी बहीणही काम करत असे. "

" मग ती बहीण तर इथं कुठं दिसत नाही ?"

" ती कशी दिसणार ? ती तर केव्हाच सर्कस सोडून गेली. लग्न झालं ना तिचं ! तिनं सर्कस सोडल्यानंतर मी सुरुवात केली. बालपणापासून सर्कसच्या तंबूबरोबर फिरून-फिरून बाकी लोक जे करत होते, त्यांचंच मी अनुकरण करायला लागले."

" पण सगळ्यांचेच आईवडील सर्कसमध्ये असतात का ? मी तर ऐकलं होतं, एकट्या-दुकट्या मुली बाहेरगावाहून इथे येतात."

" तू ऐकलंस ते खरंय. सर्कसमध्ये केरळमधल्या काही विशिष्ट गावांतून बऱ्याच मुली येतात. त्यांची इथं, कोणी ओळखीचा माणूस वर्णी लागतो. आणखी एक गंमत आहे बरं का ! काही विशिष्ट कुटुंबं एखाद्या कसरतीत प्रवीण असतात. मग त्या कुटुंबातल्या मुली पिढ्या न् पिढ्या सर्कसमध्ये त्याच त्या कसरती करतात. ह्या ओमनाला तू सायकलवरच्या कसरतीत पाहिलं होतंस. तिचं कुटुंब पिढ्या न् पिढ्या सर्कशीत आपलं सायकलपटुत्व दाखवत आलंय. "

" अच्छा ! म्हणजे इतर कलांसारखी सर्कसपटुत्वाची कलासुद्धा अशी परंपरागत असते का ?"

" तसं नेहमीच नाही ग होत. कधीकधी काही मुलींना शिकवूनसुद्धा तयार करतात. आता ह्या समोरच्या डबल कंपाऊंडमधल्या मुली, ज्या कंपनी गर्ल्स म्हणून ओळखल्या जातात, त्यांचा काही परंपरागत व्यवसाय नसतो. त्या मुलींना सर्कसचे मालक एखाद्या खेडेगावातून आणतात. तिचा करार सरळ तिच्या आई-वडिलांशी केला जातो. मग वर्ष-दोन वर्षं अथवा पाच वर्षांच्या करारनाम्यावर त्या राहतात. त्यांचे आईवडील लांब खेड्यात असतात. पण त्या मुली मात्र संपूर्णपणे मालकाच्या अखत्यारीत असतात. अगदी बालपणापासून ते जाणत्या वयाच्या मुलींना असं इथे आणलं जातं. मग त्यांचं खाणं-पिणं, कपडालत्ता. अगदी

साबू–तेलापर्यंतच्या छोट्या–मोठ्या गोष्टीसुद्धा मालकाकडून पुरवल्या जातात. त्यांच्या करमणुकीसाठी इथे टी. व्ही. आहेत, रेडिओ आहे, पुस्तकंसुद्धा आहेत. कॅरम–बुद्धिबळासारखे खेळ आहेत. त्यांना बाहेरही सिनेमा दाखवायला अथवा फिरायला नेलं जातं. त्यांची प्रॅक्टीस, विश्रांती, वैद्यकीय सोयी, सर्वांची काळजी व्यवस्थित घेतली जाते. फक्त इथे त्यांना काटेकोर बंदोबस्तात ठेवलं जातं. त्या स्वतंत्रपणे बाहेर हिंडू–फिरू शकत नाहीत. बाहेरच्या लोकांशी मोकळेपणानं बोलू शकत नाहीत. अगदी त्या त्यांच्या कंपाऊंडबाहेरही येऊ शकत नाहीत आणि त्या मुलींकडे इथल्या कोणत्याही पुरुषानं वाकड्या नजरेनं पाहिलं, त्यांची छेड काढली तर चोवीस तासांची नोटीस देऊन त्या माणसाला सर्कसबाहेर फेकण्यात येतं."

"मघाशी तू पुस्तकं वाचण्याचा उल्लेख केलास. पण तुम्ही तर लहानपणापासून सर्कसला वाहिलेल्या असता, सर्कसबरोबर गावोगाव भटकत असता, मग शाळेत केव्हा जाता ?"

"आम्ही कधी शाळा पाहिलीच नाही. प्रॅक्टीस करणार की अभ्यास करणार ? मग आम्हाला इथ शिकवायला शिक्षिका येते. ती जुजबी ज्ञान देऊन जाते."

"पण काय ग, चवथ्या वर्षांपासून बारा वर्षांपर्यंतच्या परकरी पोरीपर्यंत कोणत्याही वयाच्या मुली येथे येतात, त्या सर्वांनाच सर्कशीत ठेवून घेतलं जातं का ?"

"नाही ग ! इथं ट्रेनर असतात. ते त्या इच्छुक मुलींकडून काही कसरती करून घेतात आणि पाहतात ते ह्या मुलींना शिकवू शकतील की नाही ! आणि ही मुलगी कितपत शिकू शकेल ! दोन्ही दृष्टींनी लायक वाटली तर ठेवून घेतात. तिला जसा इंटरेस्ट असतो तशी ती शिकते. काहींना पैशांसाठी मजबुरीनं यावं लागतं. घरच्या जबाबदारीसाठी सर्कसमधलं जीवन न आवडूनसुद्धा पत्करावं लागतं. अशांना शिकण्यात काही रस नसतो. आम्हाला मात्र आमचे आईवडील करतात, इतर लोक करतात ते पाहून आपणही एखादा शो करावा, हजारो लोकांनी तो पाहावा, आपलं कौतुक करावं असं वाटायला लागतं. आजुबाजूचा माहौलच तसा असतो ना ! त्यामुळे आपोआपच इंटरेस्ट वाटायला लागतो. मी बॉटलवर्कमध्ये प्रवीण आहे. म्हणजे त्यात काय आहे, एका स्टँडवर चार बाटल्या ठेवलेल्या असतात, त्यावर एक स्टुल ठेवलेलं असतं. आणि त्यावर उभी राहून मी कसरती करते. हा आयटेम जेव्हा नसतो तेव्हा इतर आयटेममध्ये काम करते. तू तो अधांतरी चक्रावर घुमणारा चौफुला पाहिलास ना, त्यात होते मी !"

"स्विटी, तुमची कामं वेगवेगळी असतात, तसा पगारातही फरक पडतो का ?"

"अर्थातच ! जैसा काम वैसा दाम ! मला एक हजार रुपये महिना पगार मिळतो. तीनशे रुपयांपासून तीन हजार रुपयांपर्यंत इथे कामानुसार प्रत्येकाला पगार मिळतो. माझा भाऊ विदुषकाचं काम करतो. त्याला तसा पगार मिळतो. आमच्या अख्या कुटुंबाशी मालक कॉन्ट्रॅक्ट करतो. फक्त ट्रेनिंगच्या काळात मात्र आम्हाला पगार मिळत नाही. आम्ही त्या काळात फक्त जेवून-खाऊन असतो."

"काय ग एकदा ट्रेनिंग घेतलं की मग तुम्हाला प्रॅक्टीस करावी लागत नाही ?"

"असं काही नाही. आता ही ओमना सायकलिंगमध्ये प्रवीण आहे. तिला प्रॅक्टीसची जरूर लागत नाही. पण काही कसरतींना रोजच्या रोज प्रॅक्टीसची जरूर असते. त्यांना सकाळी पाचला उठून प्रॅक्टीस करावी लागते. मग आंघोळ, घरकाम, सगळं आटोपून शोच्या वेळेला तयार राहावं लागतं. तंबूत जाऊन ही सकाळची प्रॅक्टीस करताना सुरुवातीला आमच्याबरोबर ट्रेनर असतो. आता आम्ही स्वत:च करतो."

"एवढ्या शारीरिक कसरती करायच्या तर मग डायेटींग तितकंच का ?"

"छे ! छे ! आता पाहिलंस ना, कसा घीवाला खाना मी पकवतेय. खाण्या-पिण्याचं आम्हाला काहीच पथ्य नाही. उलट ताकदीसाठी चांगलं शक्तिवर्धक खाणं खावं लागतं. हां ! आता काही लोक जेवण जेवून शो करू शकत नाहीत. माझं पोट असं जड होत नाही. त्यामुळे जेवल्यानंतरसुद्धा शो करू शकते."

"तुमचा शो तर तीन वाजता, तोवर टाईमपास ?"

"ह्या खोलीभर पसरलेल्या भरतकामावरून तुझ्या लक्षात आलं असेल, मला स्वत:ला शिवणकामाचा, चादरी-तकियावर भरतकाम करण्याचा खूप शौक आहे."

"ते दिसतंच आहे. माझ्याशी गप्पा मारता-मारता चादरीचा एक कॉर्नर पुरा झाला तुझा !"

"भरतकामाचा आणखी एक फायदा सांगू का ? मैत्रिणींशी भरपूर गप्पा मारता येतात आणि वेळ कसा जातो समजतसुद्धा नाही. काहींना पुस्तकं वाचायचा नाद असतो, तर काही भटकायला जातात, पिक्चरला जातात. पण एक गोष्ट आहे कुठेही बाहेर भटकायला गेलं तरी तीनच्या आत मुक्कामावर पोहोचायलाच लागतं. कारण शो तीन वाजता सुरू होतो ना ! मग आपापल्या आयटेमच्या वेळेवर कपडे करून जय्यत तयार राहावं लागतं. अर्थात दर वेळी आपला आयटेम असेलच असं नाही."

"ते कोण ठरवतं ग ?"

"मालकच ! त्यांच्याकडून संपूर्ण प्रोग्राम तयार होऊन येतो. ते लोक सांगतात, ह्या आयटेमनंतर तुमचा आयटेम आहे. मग त्या वेळेला आपण तयार राहायचं. बस्स ! मग तो आयटेम ठेवायचा की नाही ते त्यांच्यावर ! पण आम्ही

होऊन बुट्टी मारू शकत नाही. तितकंच गंभीर आजारपण असल्याशिवाय आम्ही रजा घेऊ शकत नाही."

"दररोज तीन-तीन शो करून, इतकी शारीरिक मेहनत करून रात्री-अपरात्रीपर्यंत जागरण करून, तू थकत नाहीस का ?"

"छे ! अग, बालपणापासून हेच काम करतोय ना आम्ही ! आता त्याची सवय होऊन गेलीय. सुरुवातीला थोडा त्रास व्हायचा, पण शिकताना असा त्रास होणारच."

मी पुढे काही विचारण्यापूर्वी तिची आई म्हणाली, "ती सांगायला धजत नाही. पण खरं तर तिची रोज पाठ दुखते, थकवाही वाटतो. पण काय करणार ?"

"म्हणजे आजारी असतानाही काम करावं लागतं का ?"

"तशा तब्येतीच्या बारीकसारीक कुरबुरी चालायच्याच. पण केवळ कंटाळा आला, मूड नाही असं म्हणून काम टाळता येत नाही. अगदी क्षुल्लक चुकसुद्धा तिथे फार महागात पडते. हां, आता तब्येत फारच बिघडली तर आयटेममध्ये फेरफार करता येतो किंवा अचानक रद्द करता येतो. पण मग त्या दिवसाचा पे कट् ! ते कोणाला परवडणार ? आणि त्यातूनही वाटलं की आज शो करणं अगदीच अशक्य आहे तर बसतो स्वतःच्या छपरीत ! हो, उगाच गेलं जबरदस्तीनं आणि काही अपघात झालाच, तर संपूर्ण शोवर परिणाम व्हायचा ना ! पण मालकाकडूनच आपला आयटेम शोमध्य ठेवला गेला नाही तर मात्र त्या दिवसाचा पगार चालू राहतो. आणि खरं सांगू, तसं तीन शोमध्ये वीस-पंचवीस मिनिटांच्या कसरती करणं काही अवघड नसतं. कारण एखाद्या कसरतीवर आमची एवढी मास्टरी असते ! दुसरं म्हणजे एकदा आपलं काम आटोपलं की खुशाल आपल्या छपरीत येऊन पडावं ! कोणी दखल घेत नाही. आमच्या कॉन्ट्रॅक्टनुसार सहा व नऊचे दोन शो फक्त करायचे असतात. तीनचा शो हा कराराबाहेरचा ! त्याच्या-बद्दल पगाराच्या निम्मे पैसे एक्स्ट्रॉ मिळतात, ते कोण सोडणार ?"

"स्विटी, कोणताही पहिला अनुभव हा नेहमीच थ्रिलींग असतो. आपल्या आठवणीत ताजा राहतो. न विसरता येणाऱ्या गोष्टींच्या यादीत सर्वच पहिल्या-वहिल्या घटनांचा समावेश असतो. तुझा सर्कसमधला पहिलावहिला अनुभव...?"

"मला आता आठवतच नाही. कारण मी बालपणी केला ना तो शो ! माझ्या दादाला विचारा, त्यालाच आठवत असेल !"

"अहो, तिला तिचा पहिला शो नाही आठवत, पण मला चांगला आठवतोय. आधी ते बाटल्यांवरच्या कसरतीचं काम ! त्यामुळे सारख्या बाटल्या फोडीत राही. अश्शी घाबरली होती म्हणून सांगू ! अर्थात बरोबर उस्ताद बर होताच. पण शिकली असूनही तिला सारखं वाटत होतं, आपल्याला हे काम जमेल की नाही ? भगवानका नाम ले के आयटेम किया बस्स ! आखिर सहारा तो उस काही है ना?"

तिच्या भावाच्या होकारार्थी प्रश्नावर होकारार्थी उत्तर देतानाही अनेक प्रश्न मनात होतेच.

"स्विटी, तू जेव्हा मुंबईसारख्या ठिकाणी राहतेस, आमच्यासारख्या मुलींना बाहेर मोकळेपणानं हिंडता-फिरताना, नोकरीवर जाताना पाहतेस, तेव्हा तुला असं नाही का वाटत की आपण हे बंदिस्त जीवन सोडून ह्या तंबूबाहेर पडावं, बाहेरची मोकळी हवा चाखावी ?"

"जी गोष्ट आयुष्यात मिळण्यासारखी नाही हे पक्कं ठाऊक आहे, त्यासाठी झुरण्यात काय फायदा ? अभी तो इसी कामसे नाता जुड गया है ! जिथं आमचा तंबू लागतो तेच आमचं घर बनतं. अग तुला मजा सांगते, कधीकधी वर्षभर फिरण्याचा आम्हाला इतका कंटाळा येतो की वाटतं बस्स झालं ! सोडून द्यावं सर्कशीचं अस्थिर जग ! कुठेतरी नोकरी करून एका जागी राहावं ! नको ही बंजारन जिंदगी ! पण आम्हाला ह्या आयुष्याची आता इतकी सवय झालीय ! हे संघटित जीवन, श्वापदांचे चित्कार, तो शोरगुल...थोडे दिवस झाले की आम्हाला घर खायला येतं. घरात बसणं अशक्य होतं. त्या शांत जीवनाचंसुद्धा टेन्शन येतं. घरात ना फारसं काम, नाही धमाल ! आयुष्यात इतकी पोकळी निर्माण होते की आम्ही बेचैन होऊन पुन्हा सर्कशीच्या तंबूत हजर होतो. माझे वडील तर महिनाभराच्या सुट्टीसाठी गावाला यायचे आणि दोन दिवसांत परत जायचे आणि तुम्हाला वाटतं तितकं हे आयुष्य बंदिस्त नाही. विशेषतः आमच्यासाठी. कारण आमचे आईवडील, भावंडं आमच्या सोबत असतात. तेव्हा आम्हाला एकटेपण तसं जाणवत नाही. अगदी गावाहून आणलेल्या कंपनी गर्ल्सनासुद्धा तसा एकटेपणा जाणवत नसावा. कारण त्यांच्यासोबत शेकडो मुली राहत असतात. त्या एकमेकींना चांगली सोबत देतात."

"पण तुमचा बाहेरच्या जगाशी काहीच संपर्क नसतो, तर अशा एकांगी जिण्याचा कंटाळा येत नाही ?"

"तुमच्या तरी आयुष्यात बाहेर अशा किती उलाढाली होत असतात ? तीच-तीच माणसं तुम्हाला भेटत असतात. तीच ती घरातील, व्यवसायातील व आजुबाजूची चार माणसं तुम्हाला भेटतात, तेवढीच ना ? तुमचे जसे नातेवाईक असतात तसेच आम्हाला इथे एखादी ताई मिळते, एखादा अंकल मिळतो, आँटी मिळते. हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन सगळ्या जातिधर्मांचे लोक इथे एकत्रित राहतात. आम्ही सर्व मिळून आपापले सण साजरे करतो. घर सजवतो. हंसी-मजाक, खेलकूद करतो. अर्थात रोजचे शो सांभाळून हं ! अग तू इथे आणखी थोडी वेळ बसशील ना, तर तुलासुद्धा इथे इंटरेस्ट वाटायला लागेल !"

स्विटी जरी तिच्या व्यवसायाची फुलं फुलवीत होती तरी त्यांच्या काटचाची बोच मला ह्या व्यवसायतल्या जाणकारांकडून जाणवली होती. एका जाणकाराच्या

मते तर सर्कसमधल्या जनावरांचं आयुष्यसुद्धा ह्या मुलींच्या आयुष्यापेक्षा अधिक सुखाचं असतं. कारण एका जनावराच्या दुर्घटनेपायी नुकसान, हे किमान तीस–चाळीस हजारांच्या घरात जाणारं असतं. तेव्हा त्यांची काळजी स्वाभाविकपणे अधिक घतली जाते. बेशिस्तीच्या नावावर सर्कशीतल्या कोणत्याही व्यक्तीला चौवीस तासांच्या आत बाहेर फेकलं जातं. कायद्यानं त्यांना कोणतंही संरक्षण नसतं. इतकंच नव्हे तर जिवावरची धाडसी कामं करणाऱ्या कसरतपटूंचा विमासुद्धा उतरवला जात नाही.

"हे तितकंसं खरं नाही." स्विटी म्हणते, "अतोनात धाडसी कामं करणाऱ्यांचा फक्त विमा उतरवला जातो. किंवा कंपनी गर्ल्सना अपघात झाला तर त्याची जबाबदारी मालकावर असते. आम्हाला मात्र अपघात झाला आणि दुर्दैवानं त्यात हातपाय गमावला तर आमचं तकदीर! आणखी काय? आमचे आईबाप त्याला जबाबदार! आम्ही अंगठेबहाद्दर असल्यानं बाहेर आम्हाला नोकरी मिळणं शक्य नसतं. पण तरी आम्हाला तितकं काही असुरक्षित वाटत नाही. कारण इथली बहुतेक मुलं 'जॅक ऑफ ऑल ट्रेड्स' आहेत. ते इथले मेकॅनिक आहेत, म्युझिशियन्स आहेत. काहींना झुल्यावरच्या कामात रस असतो, मग तेही काम त्यांना शिकवलं जातं. कामानुसार वेगवेगळे पगार मिळतात. त्यामुळे प्राप्तीही वाढते. इथे सर्वांना वागणूक सारखी मिळते. फक्त कामानुसार वेतनात फरक पडतो. अधिक अनुभवी माणूस रिस्की कामं करतो. तितकं त्याला अधिक वेतन मिळतं, मानसन्मान लाभतो. कधीकधी दुसऱ्या सर्कसमधले लोक आमचं काम येऊन पाहतात आणि काम आवडलं तर अधिक पगारावर आम्हाला त्यांच्या सर्कशीत बोलावून घेतात. मग आम्ही तिथेसुद्धा जातो."

"काय ग स्विटी, मालकाशी तुम्ही कॉन्ट्रॅक्ट करता, त्याच्याकडून तुम्हाला तनखा मिळतो. त्यांच्याशी तुमचा संबंध असतो. मग तुमच्यासारख्या तरुण, सुंदर मुलींना काही धोका नसतो का? म्हणजे, चांगल्या पगाराच्या मोहात दुसरं काही नुकसान होण्याचा संभव नसतो का?"

"तसं वाटलं किंवा संशय आला तर थोडे दिवस काढून सोडून द्यायची ती सर्कस! पण खरं तर सांगायचं तर सर्कशीमध्ये अशा स्वैराचारावर फार कडक निर्बंध आहेत. बाहेरच्या लोकांना असं वाटतं की, आम्ही तोकड्या कपड्यांत, लाखो प्रेक्षकांसमोर कसरती करताना देहप्रदर्शन करतो, तेव्हा आम्ही कॅरॅक्टरनं ढिल्या असू. पण तसं नसतं हं! बाहेरचे लोक उलट चूपचाप हिंडू–फिरू शकतात, कोणाशीही मैत्री करू शकतात. इथे तर मालकाच्या माणसांचा कडक पहारा असतो. न जाणो मुलांशी हसता–बोलताना पाहिलं की, हो गयी छुट्टी! तशा आम्ही मुली-मुली मिळून नुकताच 'विधाता' पिक्चर पाहून आलो. ते चालतं. पण मुलांशी मोकळेपणानं बोलणं–चालणं बिलकूल चालत नाही. आणि आम्ही शो

करताना बिकीनीमध्ये वावरत असलो तरी आमच्या छपरीपासून आतल्या गेटमध्य उभं येऊन राहीपर्यंत अंगावर गाऊन असतो. आयटेमसाठी तंबूत पाऊल टाकताना फक्त तो गाऊन काढून ठेवतो, आयटेम संपवून तंबूबाहेर पडलो की लगेच पुन्हा तो अंगावर चढवतो. आणि बाहेरची माणसं तशी अनोळखी असतात. त्या ड्रेसमध्ये किंवा मेकअप्मध्ये तसा संकोच वाटत नाही."

स्विटीनं कडक पहाऱ्याचा उल्लेख केला तरी तो पहारा चुकवूनसुद्धा अधून-मधून इथे प्रेमीजनांच्या नजरांचा लपंडाव रंगतोय ते कसं काय ?

स्विटी म्हणते, "सगळेच कलाकार ऐन तारुण्याच्या भरातले. तेव्हा प्रीतीचा वसंत फुलणारच ! त्यामुळे अशा प्रेमविवाहांना इथे तोटा नाही. शोच्या वेळी कधीकधी दुसरे आयटेम्स करणाऱ्या तरुणाबरोबर मैत्री होते. त्यातूनच पुढे विवाहाची सनई वाजते. अर्थात इथे लग्न करण्याला मज्जाव आहे. लग्न आपल्या गावी जाऊनच करावं लागतं. अर्थात लग्न करून ते जोडपं पुन्हा इथे येऊन, सर्कशीतले कलाकार म्हणून काम करू शकतं. त्यांची मुलंबाळं इथेच वाढतात. अर्थात हल्ली मात्र बरेचसे लोक आपल्या मुलांना होस्टेलला पाठवतात अथवा गावाकडे ठेवतात. खूप वर्षं त्यांनी ह्या व्यवसायात काढली असल्यानं त्यांना ह्या भटक्या जीवनाचा उबग आलेला असतो. त्यांचा इंटरेस्ट संपला असल्यानं मुलांना तरी बाहेरच्या जगात वाढवावं असं त्यांना वाटतं. म्हणून ते आपल्या मुलांना सर्कसबाहेरच ठेवतात.

"स्विटी, बाकीच्यांचं ठीक आहे, पण तुझा काय विचार आहे ? इथलाच कोणी पटवलायस की अगदी चहा–पोहे देऊन रीतसर दाखवून घेणार आहेस ?"

"मी स्वत: अजून तरी इथला कोणी पटवलेला नाहीय. आई, भाऊ जो मुलगा बघतील त्याच्याशीच मी गावी जाऊन लग्न करीन. अर्थात सर्कसवालाच कोणी मिळाला तर पुन्हा हेच जीवन जगावं लागेल. सर्कसबाहेरच्या व्यवसायातला नवरा मिळाला तर मात्र सर्कस सोडून देईन. पण मी मात्र सर्कसबाहेरच्याच जगातला माणूस नवरा म्हणून पसंत करेन. मला बाहेरच्या जगात मोकळा श्वास घ्यायला अधिक आवडेल."

"पण काय ग स्विटी, बाहेरचे लोक सर्कसवाली मुलगी पसंत करतात की नाकारतात ?"

"नाकारतील कशाला ? उलट खुषीनं करतात !"

"काय म्हणतेस ?"

"हो ना ! एक तर सर्कसवाली मुलगी तब्येतीनं धडधाकट असते, कामसू असते, मेहनती असते. शिवाय बाहेरच्या मुली फ्री असतात. आम्ही तर जन्मापासून हे बंदिस्त जीवन जगत आलेल्या असतो, त्यामुळे बाहेरच्या जगातल्या प्रलोभनांची आम्हाला काही कल्पनाच नसते. त्यामुळे गाववाले तर सर्कसमधली मुलगी अगदी

बेस्ट समजतात."

आणि त्या तशा असतातही खरोखर! कारण बाहेरच्या जगात मोकळेपणानं फिरायचं त्यांनी ठरवलं तरी एखाद्या शहराची तोंडओळख होते न होते तोच तिथला मुक्काम संपायची वेळ येऊन ठेपते. तेव्हा फिरायचं ठरवलं तरी कंपनी गर्ल्सना सोबत मालकाची माणसं न्यावीच लागतात आणि इतर मुलींना त्यांचे वडील अथवा थोरला भाऊ वगैरे. एकूण काय, मोकळेपणा त्यांना जसा इथं मिळत नाही– तसाच बाहेरसुद्धा!

"पण तरीही आम्हाला सर्कशीत राहायला आवडतं. कारण एक तर भारतातली सगळी मोठमोठी शहरं आणि छोटी छोटी खेडी आम्हाला पाहायला मिळतात. कलकत्ता, मद्रास, उत्तर प्रदेश, दिल्ली, मुंबई, पाटणा, जयपूर इथली सगळी ठिकाणं पाहायला मिळतात. 'रॉयल सर्कस'मध्ये तर परदेशीसुद्धा जाण्याचा चान्स मिळतो. आणि तसं आमच्या इथल्या ह्या राहुटचांवर जाऊ नको, मुंबईत जागेची अडचण म्हणून आम्हाला अशा पत्र्यांच्या शेड्समध्ये दिवस काढावे लागतात. पण छोटचा छोटचा गावांतून राहायला भाडचानं चांगली घरं मिळतात. त्यात पाणी, लाईट वगैरेंच्यासुद्धा सोयी असतात. शिवाय त्या घरापासून सर्कसच्या तंबूपर्यंत जाण्यासाठी मोटारींची सोय केलेली असते. तिथल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांशी, जागेच्या मालकाशी आमची चांगली ओळख होते आणि सगळचात महत्त्वाचं म्हणजे आम्हाला आमच्या कामाचं फार समाधान मिळतं. एखाद्या आयटेममध्य आमचा खेळ खूप चांगला झाला की, त्याला उत्स्फूर्त टाळचा पडतात. कधी लोक प्रत्यक्ष भेटून आमचं कौतुक करतात. अखेर एका कलाकाराला यापेक्षा आणखी काय हवं असतं?"

"स्विटी, तू आत्ताच स्वतःला कलाकार म्हणालीस, पण तुला असं नाही का वाटत की इतक्या परिश्रमांनंतर, इतक्या धाडसी कर्तृत्वानंतरही तुम्हाला मिळणारा मानसन्मान हा एखाद्या चित्रपटातील अथवा नाटचक्षेत्रांतील कलावंतांच्या सन्मानापुढे अगदीच नगण्य ठरतो? त्यांच्याएवढी लोकप्रियता, प्रसिद्धी तुम्हाला लाभत नाही!"

"तसा कोणत्याही कलाकाराच्या सन्मानाचा विशिष्ट मानदंड तर नसतो. कलाकार हा शेवटी एक कलाकार असतो, त्याचं लहान–थोरपण त्याच्या कलेवर अवलंबून असतं. त्याच्या प्रसिद्धीवर ते अवलंबून नसतं आणि नसावं!

"आता आम्हाला विशेष कोणी भेटायला येत नाही किंवा आमची कोणी फारशी दखल घेत नाही हे खरंय. पण तीन तास आम्ही लाखो प्रेक्षकांना रिझवतो, एका जागी खिळवून ठेवतो, हे समाधान काय कमी आहे?"

"स्विटी, तू सुंदर आहेस. आजवर लाखो प्रेक्षकांनी तुला बिनधास्त कसरती करताना पाहिलं आहे. त्यातून एखाद्या चित्रपटाची ऑफर नाही का आली?"

माझ्या ह्या प्रश्नावर स्विटी काही उत्तर देणार तोच तिचा भाऊ म्हणाला,

"नुकतंच पंजाबमध्ये एका पिक्चरमध्ये ही काम करेल का म्हणून एका प्रोड्यूसरनं विचारलं होतं. पण तुम्हाला ठाऊकच आहे, चित्रपटांचं क्षेत्र हे फार बदनाम आहे. घरंदाज मुलींसाठी ही लाईन नाही. म्हणून आम्हीच तिला जाऊ दिलं नाही. पण तसं इथं तिच्यावर बऱ्याच वेळा शूटिंग झालेलं आहे. सर्कशीतला एखादा रिस्की आयटेम डायरेक्टरला हवा असेल तर ते रात्रीच्या शोनंतर इथे येऊन शूटींग करतात. त्या शूटींगचे पैसे वेगळे मिळतात. समजा एखादं रीळ खराब झालं आणि पुन्हा शूटींग करायची वेळ आली तर त्याचेही आणखी पैसे मागता येतात. पण सर्कसमध्ये असताना पिक्चरमध्ये काम करण्याची परवानगी नाही. करार संपल्यावर तुम्ही चित्रपटांतून काम करू शकता."

"तुला एवढ्या वर्षांच्या सर्कसमधल्या काळातले काही भलेबुरे प्रसंग आठवतात का?"

"अग, असे अनेक प्रसंग घडतात. किती लक्षात ठेवणार? कधी एखाद्या गावात आम्ही दंगेधोपे बघतो. मध्यंतरी मुंबईत केवढं मोठं चक्री वादळ झालं– त्यावेळी तर आम्ही जीव मुठीत घेऊन बसलो होतो. तेव्हा आमचं नुकसान झालं नाही, पण तंबूचं नुकसान फार झालं. एकदा आमच्यातला एक कलाकार झुल्यावरचे प्रयोग करीत असताना अचानक खाली पडला आणि त्याचा मणकाच मोडला. एकदा तर आमच्या ह्या 'जम्बो सर्कस'चा पाटण्याला झुल्यावरचा प्रयोग चालला असताना, आमच्या कलाकारानं वरून खाली सूर मारला तर प्रेक्षकांमधल्या एका माणसाला ते पाहून हॉर्ट ॲटॅक आला. मग तंबूत नुसता हलकल्लोळ! अर्थात शो चालूच राहिला. असंच आहे. धाडसी काम करताना कलाकाराच्या जिवावर जरी घेतलं तरी Show must go on!"

स्विटीच्या कथनाचा समारोप हा ह्या एका वाक्यात संपूर्ण सर्कस व्यवसायावर प्रकाशझोत टाकणाऱ्या मर्क्युरी लँपसारखा आहे. प्रयोग करतानाचा सावधपणा म्हणून तर तिच्या बोलण्यात डोकावत नसावा? शारीरिक कसरती इतक्याच सफाईनं शाब्दिक कसरती करणाऱ्या धोरणी स्विटीच्या ह्याही कलेला आपल्याला कौतुकानं टाळी द्यावीशी वाटली नाही तरच नवल!

माहेर: फेब्रुवारी १९८३

अस्मानी पऱ्यांच्या हृदयंगम परिसरात

नमिता आणि मेघा

बिकट वाट वहिवाट नसावी
धोपट मार्गा सोडू नको,
संसारामधी बैस आपुला
उगाच भटकत फिरू नको !

वाडवडिलांनी आपल्या पुत्रांसाठी तळमळीने दिलेला हा संदेश ! पुत्रांनी त्याचं पालन करणं दूरच राह्यलं, त्यांच्या पौत्रीसुद्धा हा संदेश धाब्यावर बसवून भटक्या आणि विमुक्त पेशात स्वेच्छेनं आणि धाडसानं आज प्रवेश करतायत, हे पाहून खरोखर गंमत वाटते. बरं ह्या असल्या कष्टप्रद आणि श्रमांचीच मागणी करणाऱ्या व्यवसायातील ह्या मुली तशाच धट्टयाकट्टया अंगयष्टीच्या, सुमार रूपाच्या आणि निर्बुद्ध असाव्यात की नाही ? तेही नाही !

ह्या अस्मानी पऱ्या अगदी पऱ्यांसारख्या आहेत. निदान माझ्यासमोर बसलेल्या तरी ! नमिता आणि मेघा–दोघी सख्ख्या बहिणी ! पण एकीच्या पावलाचे ठसे चाचपत दुसरीनंही ह्या क्षत्रात प्रवेश केलाय. दोघींची रूपं तर अशी देखणी की रस्त्यानं चालल्या तर चार–चौघांनी (आपल्या सोबत चालणाऱ्या बायकोची नजर चुकवून) हमखास वळून पाहावं ! त्यांचंच काय ! माझ्यासारखी मुलगीसुद्धा कौतुकानं पुन्हा पुन्हा वळून पाहील. रंगानं दोघीही गोऱ्यापान. नितळ अंगकांती. नमिताच्या टपोऱ्या डोळ्यांत हसरा चंचलपणा काठोकाठ भरलेला, तर मेघाचा गोल–गोड चेहरा पाहून वाटावं, जणू उंच उभ्या हिरव्याकंच देठावरचं गुलाबाचं अलवार फूलच ते !

ह्या अस्मानी पऱ्यांच्या गप्पा सुरू झाल्या अन् वाटायला लागलं की ह्या

मधुव्यात आकंठ बुडणार आपण ! क्वचित कधी त्यांचे चुरचुरीत अनुभव त्यांच्या तिखट शब्द बोलांतून ऐकताना वाटलं, आपण ह्या ठसकेबाज मधुव्यात घुमसटून तर नाही ना जाणार ?

विमानाच्या खिडकीच्या काचेला नाक लावून खाली पाहिलं की जसं हिरव्यागार वनश्रीचं, खेळण्यातल्यासारख्या घरांचं, नजर फिरवून टाकणाऱ्या दऱ्याखोऱ्यांचं विहंगम दृश्य दिसतं, अगदी तस्संच ह्या अस्मानी पऱ्यांच्या मनात डोकावलं की त्यांच्या व्यवसायाचं विलोभनीय दर्शन घडतं.

निळ्या नभोवितानात सदैव पंख लावून विहार करणाऱ्याह्या हवाईसुंदरींचं मनोगत जाणून घ्यावं ह्यासाठी मुद्दामच जरा खोचकपणे विचारलं, " ह्या व्यवसायातल्या खाचाखोचा, कष्ट, त्या विषयीचं जनमानसातील मत हे सर्व ठाऊक असूनसुद्धा तुम्ही स्वेच्छेनं हा व्यवसाय पत्करलात की तुम्हाला दुसऱ्या कुणी ' Flying Start ' दिला ? "

नमिता–आमचे वडील एअर इंडियात प्लॅनिंग ऑफिसर आहेत. त्यांनी आम्हाला ह्या क्षेत्रात प्रवेश मिळवून दिलाय, असं तुम्हाला म्हणायचं वाटतं ? तसं त्यांच्यामुळे आम्ही इथे आलो असं काही नाही हं ! उलट त्यांचा थोडासा विरोधच होता. कदाचित आम्ही अशा स्वैर जीवनाचा स्वीकार केल्यास स्वैराचारी होऊ ह्या भीतीनं असेल, ते आम्हाला परवानगी देत नव्हते. पण मला ह्या व्यवसायाची खूप आवड होती म्हणून मी हट्टानं हा व्यवसाय घेतला, आणि वडिलांची इच्छाही पूर्ण करायची म्हणून माझं एम. एस्सी. पर्यंतचं शिक्षणही पूर्ण केलं.

मेघा–आणि तसा आमच्या आईवडिलांचा आमच्यावर पूर्ण विश्वास आहे. तरीही माझ्या मात्र मनात नव्हतं एअरहॉस्टेस व्हायचं ! पण एकदा ह्या व्यवसायात शिरल्यावर मला जाणवलं, की ह्या व्यवसायामुळे, देशोदेशी फिरण्यामुळे केवढा स्मार्टनेस येतो ! किती स्वतंत्र आणि स्वावलंबी होतो आपण ! नाहीतर पूर्वी कोणीतरी कंपनी असली तरच बाहेर पडायची मी ! आत्ता मात्र कुठंही बाहेर जायचं असलं, तरी मी कोणी सोबत मिळतेय का ह्याची वाट पाहत बसत नाही.

नमिता–तुलाही हा अनुभव असेलच की ! मुलाखतीच्या किंवा आकाशवाणी, दूरदर्शनच्या कार्यक्रमांच्या निमित्तानं नेहमी तू ठिकठिकाणी जात असशील, संस्थांमधून फिरत असशील, तेव्हा दर वेळी काही तू सोबतीसाठी अडून बसू शकत नाहीस. आमचंही सुरुवातीला तेच झालं कारण प्रत्येक वेळी आमच्या ' क्रू ' मधल्या मुली बदलत असतात. त्यामुळे कोणाशीही दीर्घकाळची मैत्री असू शकत नाही. इतकंच काय पण कित्येकदा इतर मुलींशी तुमची ओळखही असेलच असं काही नाही. मग परदेशात मोकळ्या वेळात काय हॉटेलमध्ये कोंडून राहणार ? शॉपिंगसाठी वगैरे फिरावंच लागतं. मग मिळाली तर सोबतीनं नाहीतर एकटीनं हिंडायचं. म्हणजे सवतीचं स्वावलंबन होतं.

पण असं परदेशातील अनोळखी ठिकाणी एकटं-दुकटं फिरण्याची भीती नाही वाटत तुम्हाला ?

मेघा–कुठेही काही तसं धोकादायक नाही. आपण जर 'limit' मध्ये असलो, तर कुठेही वाईट अनुभव येत नाही. अगदी नैरोबीसारख्या ठिकाणीसुद्धा आम्ही एकटचादुकटचा फिरतो. फक्त तिथे संध्याकाळी सहाच्या आत परतावं, ते बरं असतं. मग कशाला रात्रीबेरात्री फिरायचं ?

नमिता–तशी बाहेर फिरताना काही पथ्यं पाळली म्हणजे झालं ! आता लंडनसारख्या ठिकाणी रात्री दहापर्यंत फिरलात तरी काही धास्ती नाही. पण कुवैतसारख्या ठिकाणी एकटं-दुकटं फिरणं सहसा टाळावं, किंवा लवकर लॉजवर परतावं. जास्त वेळ फिरत बसू नये.

का ? काही धोका असतो का ?

नमिता–छे : छे ! तसे ते अरब लोक काही करीत नाहीत. पण त्या धिप्पाड अरबांच्या नजरा एवढचा भीतीदायक असतात ! आणि त्याची तुम्हाला तशी सवय नसते ना !

तशा इथल्या लोकांच्या नजरा तरी कुठं एवढचा स्वच्छ असतात ? जरा कोणाची वाट पाहत स्टेशनवर नाहीतर बसस्टॉपवर उभे राहिलात की हजारजण वळून-वळून बघतील !

नमिता–मेघा–अगदी खरंच ! असे अनुभव काय कुठंही येऊ शकतात.

मेघा–आणि मी काय म्हणतेय, तुम्ही जर व्यवस्थित कपडचांत असाल तर तुमच्याकडे कधीही कोणी वाकडचा नजरेनं बघणार नाही. मी इतक्या ठिकाणी जाते, मला नाही आत्तापर्यंत असा वाईट अनुभव आला.

नमिता–काही वेळा काय होतं, काही मुली टाईट जीन्स, टाईट टीशर्टस्, लोनेकचे ब्लाऊज घालतात. मुळात अरब लोक जरा जास्तच सेक्सी असतात. त्यात तुम्ही असे उत्तान कपडे घातलेत आणि त्यांनी तुमच्याकडे बघितलं, तर तुम्ही त्यांना कशाला दोष देता ? शेवटी काही झालं तरी ते पुरुषच आहेत. आणि त्यांना उपभोगाचं स्वातंत्र्य नाही, सोय नाही. त्यामुळे अधिकच कुतुहल असतं. तुम्ही जर व्यवस्थित कपडचांत असाल तर कशाला कोण पाहील तुमच्याकडे ? तुमच्या appearance चाही प्रभाव पडतोच की दुसऱ्यावर !

आणि तशा तुम्ही दोघी एवढचा सुंदर आहात की तुमच्या सौंदर्याला दाद देणाऱ्याच्या रसिकतेला तुम्हाला माफ करावंच लागेल. हसू नका, चेष्टा नाही, अगदी खरंखुरं प्रांजळ मत सांगितलं मी ! पण तुमच्या नुसत्या 'सुंदर' असण्याला 'हवाईसुंदरी' हे विशेषण कसं काय लागलं ते मला जरा सांगता का ?

मेघा–आत्ताच तू म्हणालीस, आम्ही दोघी सुंदर आहोत त्यामुळे एअर इंडियाची पहिली अपेक्षा आम्ही पूर्ण केली होती. त्यांना सुंदर आणि स्मार्ट मुली

लागतात. मुख्य म्हणजे त्वचा नितळ असावी लागते. मुरमं, पुटकुळ्या, पुरळ वगैरे असलेल अजिबात चालत नाही. कारण मुरुम-पुटकुळ्या ह्या संसर्गजन्य असतात. आणि फॉरिनर्स तर अशा मुलींच्या हातून कोणताही पदार्थ घ्यायला सरळ नकार देतात.

नमिता-ह्या अटी पूर्ण झाल्या की नेहमीचंच संस्करण असतं. म्हणजे पदवीधर असणं, लेखी परीक्षा देणं, मुलाखतीत पास होणं वगैरे. शिवाय एअरहॉस्टेसचं इंग्रजी आणि हिंदी ह्या दोन भाषांवर विशेष प्रभुत्व असावं लागतं.

म्हणजे बंबईका हिंदी चालणार नाही ?

मेघा-नाही-नाही ! परकीय भाषांच्याही परीक्षा आम्हाला देता येतात. आणि उत्तीर्ण झाल्यावर एक्स्ट्रॉ अलाऊन्स मिळतो. पण त्या आल्याच पाहिजेत असं मात्र नाही. नंतर वेटींग लिस्टवरची प्रतीक्षा संपली की मेडिकलला निमंत्रण येतं. हे मेडिकल चेकअप्चं प्रकरण म्हणजे अफलातून प्रकार असतो. अगदी सर्वांगीण, संपूर्ण तपासणी ! फॅमिली हिस्ट्रीपर्यंत !

ती कशाला ?

नमिता-अग सतत प्रवाशांशी संबंध येतो ना ! मग समजा एखादीला काही संसर्गजन्य रोग असेल किंवा कसली ॲलर्जी असेल, आणि तिनं ती दडवून ठेवली, तर सतत संपर्कानं प्रवाशांतही तो रोग फैलावेल, म्हणून एअर इंडिया एवढं सावध असतं.

मेघा-एवढं सावध असतं की जरा डोकं दुखतं म्हणून सांगितलं तरी एखाद्या ठराविक सर्जनकडे पाठवतील. आता सर्दीपडसं आपण घरगुती औषधावर भागवतो ना ? तिथे तसं नाही चालायचं. ते डॉक्टर मग एवढ्या तपासण्या करतील, की अगदी नको वाटतं. एकदा मी ग्राऊंड ट्रेनिंगवर असताना सर्दीपडसं झालं तरी तशीच गेले, तर मला परत घरी पाठवलं आणि सांगितलं, तू पूर्ण बरं वाटल्याशिवाय इथे यायचं नाही. आणि ह्या मेडिकलच्या सगळ्या सोयीसवलती आम्हाला फुकट असतात हं !

हा ग्राऊंड ट्रेनिंग म्हणजे काय प्रकार आहे ग ?

मेघा-अवकाशात असताना काय करायचं ह्यांचं जमिनीवर दिलेलं ट्रेनिंग म्हणजे ग्राऊंड ट्रेनिंग ! अर्थात हे ट्रेनिंग ग्राऊंडवर नसतं. एअर इंडियाकडे दोन प्रकारची प्लेन्स आहेत ना ! ७४७ आणि ७०७ ! ७०७ म्हणजे छोटं विमान आणि ७४७ म्हणजे जंबो ! ती विमानं आतून कशी दिसतात, त्याची प्रतिकृती केलेली असते. तिथे आमचं तीन महिने ट्रेनिंग असतं. दर महिन्याला परीक्षाही असतात.

नमिता-Good Morning ! On behalf of Air India we welcome you on board. The Makalu will be flying to New york via Rome, Paris, London...

अरे ! अरे हे काय ! चक्क विमानात बसल्यासारखं वाटायला लागलं की !

नमिता–ऐकलीस अनाऊन्समेंट ? अशा अनाऊन्समेंट्स कशा द्यायच्या ? प्रवाशांशी कसं वागायचं ? मुख्यतः आणीबाणीत काय करायचं ? ...

म्हणजे विमान कोसळताना ?

मेघा–छेः छे ! मेजर इमर्जन्सीज नेहमी येतात असं नाही काही. कधीकधी छोट्यामोठ्या अडचणीही असतात. आता बघ, विमान जेव्हा उडत असतं ना तेव्हा आतमध्ये कृत्रिम वातावरण तयार केलेलं असतं. म्हणजे माणसाला जेवढी आवश्यकता असते, तेवढाच ऑक्सिजन असतो. पण जेव्हा ऑक्सिजन कमी होतो, अशा वेळी कृत्रिम ऑक्सिजन द्यावा लागतो. त्यासाठी मास्क, सिलिंडर्सची सोय करावी लागते. अर्थात अशी वेळ क्वचितच येते. कधीकधी एखाद्याला श्वासाचा त्रास होतो. कधी कोणाला हार्ट–अॅटॅकसुद्धा येऊ शकतो. काहीही घडू शकतं. मग ऑक्सिजन सिलिंडर कसं द्यायचं, किंवा प्रथमोपचार कसे करायचे त्याचं व्यवस्थित शिक्षण देतात.

नमिता–एखाद्या वेळी एअरक्राफ्टमध्ये धूर येतो. लगेच काही प्लेन उतरवता यत नाही. अशा वेळी घाबरून न जाता, अगोदर धूर कुठून येतो ते पाहावं लागतं. समजा एखाद्या पॅसेंजरच्या कपड्याला आग लागली, तर तुम्ही काय त्याच्यावर पाणी ओतू शकत नाही, की घेतली बादली, घातली आंघोळ आणि विझवली आग ! अशा वेळी त्याला ब्लँकेटमध्ये गुंटाळून एअरक्राफ्टमध्ये लोळवायचा. मग आग विझते. समजा पडद्याला आग लागली, तर वॉटर फायर एक्सटिंवीशरनं आग विझवायची. शॉर्ट सर्कीट होत असेल, तर लगेच स्विच ऑफ करायचं. असं काही घडतंच असं नाही. पण घडलं तर ? तुम्ही काय जमिनीवर नसता तातडीनं मदत मिळायला. म्हणूनच प्रसंगावधानाची अत्यंत जरूर असते. त्या जॉबसाठी म्हणूनच ट्रेनिंग असतं.

मेघा–अर्थात ग्राऊंड ट्रेनिंगचा फ्लाईटवर काही उपयोग नसतो. त्यासाठी ट्रेनिंग फ्लाईट्स हव्यात. प्रत्यक्ष काम केल्याशिवाय काय कळणार ? म्हणूनच चेकहोस्टेस असते. ती आम्हाला पहिल्यांदा ट्रेनिंग फ्लाईटवर घेऊन जाते. तिथे फर्स्ट क्लासमध्ये काय काम करायचं, इकॉनॉमीमध्ये कसं काम करायचं ते सगळं ती सांगते. नंतरच्या फ्लाईटला चेकहोस्टेस आमचं काम चेक करते. चुक झाली तर सुधारून देते. सात–आठ फ्लाईट्स झाल्यावर चेक-होस्टेसला वाटलं की ही स्वतःच्या जबाबदारीवर काम करू शकेल, हिला कोणाची मदत वगैरे लागणार नाही, तर ती चांगला रिपोर्ट लिहिते. मग 'सोलो फ्लाईट' मिळते.

अनिता : गंमत काय होते, ठाऊक आहे का ? 'सोलो फ्लाईट'मध्ये कोणी शिकवत नाही–हे कर, ते करू नको. त्यामुळे चूक झाली, तरी दडपून जाते. आणि आत्मविश्वास येतो. पण ट्रेनिंग चालू असताना, टेन्शनमुळे अगदी हमखास

आमच्या हातून चुका होतात.

मेघा–पण कॅटरिंगचा कोर्स केलेल्यांच्या हातून सहसा चुका होत नाहीत हं ! कारण आम्हाला ट्रेनिंगच्या काळात जे शिकवलं जातं, ते सगळं त्यांना आधीच माहिती असतं. म्हणजे आम्हाला फूडचे प्रकार, मीटचे प्रकार, वाईन्स कुठल्या सर्व्ह करायच्या त्यांचे प्रकार, कुठल्या मीलबरोबर कोणती वाईन जाते, चीजबरोबर कोणती वाईन जाते, हॉटडॉगबरोबर कोणती वाईन जाते, कोर्सेस्मधलं जेवण कसं सर्व्ह करायचं ह्याचं अगदी पद्धतशीर ट्रेनिंग देतात हं ! म्हणजे समजा एखाद्या पॅसेंजरनं डिटेलमध्ये ऑर्डर दिली नाही तरी आम्हाला लगेच कळायला हवं त्यानं काय मागितलंय. समजा एखाद्यानं 'स्क्रू ड्रायव्हर' सांगितला म्हणजे आपल्याला तो एकच माहिती असणार. म्हणूनच मिक्स ड्रिंक्स, कॉकटेल्स, चीजचे निरनिराळे प्रकार, सगळ्यांची बारकाईनं माहिती देतात. नाहीतर स्विस चीज मागितला की एअरहोस्टेस गोंधळायची, चौदा चीजमधला नेमका कोणता द्यायचा ?

नमिता–एवढंच काम नसतं हं आमचं ! ड्यूटीवर आल्यापासून कितीतरी बारीकसारीक गोष्टींची आम्हाला दखल घ्यावी लागते. केबिन–टॉयलेट्स स्वच्छ आहेत की नाही ते पाहायचं, सीटबेल्ट्स, लाईट्स लावायचे, विंडो शेड्स नीट लावायच्या, ज्यूस, स्वीट्स आणि औषधांची नीट व्यवस्था लावायची. नंतर पॅसेंजर्सचं स्वागत करायचं. प्लेन सुटताना फर्स्ट क्लासची एअर हॉस्टेस अनाऊन्समेंट करते. प्लेन कोणत्या रूटनं जाणार आहे, त्याचं पुढचं उतरण्याचं ठिकाण कोणतं असेल, मूव्ही कोणता दाखवला जाणार आहे, काय–काय सर्व्ह करणार आहेत, ही सगळी अनाऊन्समेंट पूर्ण झाली की टेक–ऑफच्या वेळी आम्ही जागेवर बसतो. बस्स ! त्यानंतर मात्र अक्षरशः पायाला भिंगरी लावून सतत कामात असतो आम्ही !

रागावू नका हं, स्पष्टच विचारते, तुम्ही पॅसेंजर्सना जेवण, वाईन वगैरे सर्व्ह करीत असता, त्यामुळे कधीतरी हेटाळणीनं तुम्हाला 'सोफिस्टिकेटेड वेट्रेस्' असंही संबोधलं जातं. एवढं शिक्षण घेऊनही आपल्याला व्यावसायिक प्रतिष्ठा नाही, ह्याची तुम्हाला कधी खंत वाटत नाही का ?

नमिता–आपण हा व्यवसाय करतोय म्हणून वाईट वाटत नाही. पण लोक असं बोलतात तेव्हा फार वाईट वाटतं. पण एकदा तुम्ही एखादा व्यवसाय स्वीकारलात की त्यातलं सगळंच बरंवाईट तुम्हाला स्वीकारावंच लागतं. अखेर एअर-इंडियातला ऑफिसर काय किंवा एअरहॉस्टेस काय, सगळेच त्या ऑर्गनायझेशनचे नोकरच ! फक्त प्रत्येकाच्या कामाचं स्वरूप वेगळं ! अशी व्यावसायिक गुलामगिरी तर तुम्ही–आम्ही सर्वच करतो !

नमिता–प्लस तुम्हाला जॉब सॅटिफॅक्शन असेल तर त्या गुलामगिरीतही तुम्हाला आनंदच वाटेल ! आणि तसं आपण आपल्या घरातल्या लोकांना नाही का

स्वयंपाक करून वाढत ? ते आपल्याला कमीपणाचं वाटतं थोडंच ? त्यात पाहुणे आले की आपण त्यांनाही आग्रहानं जेवू–खाऊ घालतोच ना ! तसंच समजायचं ! त्याशिवाय ह्या व्यवसायामुळे आम्हाला चारचौघांपेक्षा केवढं वेगळं जीवन वाटचाला येतं ! ते ग्लॅमर काय कमी आहे ? आम्ही कंपनीच्या खर्चानं जगभर प्रवास करतो वेळ मिळेल तेव्हा तिथली प्रेक्षणीय स्थळं पाहतो. एरवी आपल्यासारख्याला हे परवडणारं आहे ? आम्ही फाइव्ह स्टार हॉटेलमध्ये राहतो. परदेशी वस्तूं वापरतो. वेगवेगळचा देशांतील लोक, तिथलं वातावरण, चालीरीती कशा आहेत ते आम्हाला अनुभवायला मिळतं. मुख्य म्हणजे आम्हाला पगार भरपूर आहे. हे फायदे काय कमी महत्त्वाचे आहेत ?

मेघा–बऱ्याचदा लोक म्हणतात हं माधुरी, की ग्राऊंडवरील स्टुअर्डच्या आणि आमच्या कामाचं स्वरूप सारखं जाहे. मग ह्यांनाच तेवढा जास्त पगार का ? त्यांना हे कळत नाही की आम्ही डचूटीवर असतानाच्या इमर्जन्सीचा त्यात विचार केलेला असतो. केवढा धोका आहे ह्या जॉबमध्ये ! आम्ही काही पॅसेंजर्सना नुसत्या सर्व्ह करण्यापुरत्या नसतो काही ! आणीबाणीच्या काळात त्यांना धीर देण्यासाठीही असतो. खरं की नाही ? का ग ? तुला का हसू अग्लं ?

खरोखर सांगू का मनातलं ? मला बिरबलची गोष्ट आठवली. येऊ नये पण दुर्दैवानं इमर्जन्सीची वेळ आलीच तर तुम्हीसुद्धा प्रथम तुमचा जीव वाचवाल. एकदा जीव वाचला की मग काय होईल नोकरीचं ते होऊन जाऊ दे, असंच म्हणाल. अखेर प्रत्येकाला आपला जीव प्यारा ! मला नाही वाटत, तशीच वेळ आली तर स्वत:चा जीव सोडून दुसऱ्याचा जीव कोणी वाचवेल ?

मेघा–पण तशा इमर्जन्सीच्या काळात आम्हाला धास्तावूनही चालत नाही. नुसत्या काल्पनिक भीतीनं जर तुम्हीच चक्कर येऊन पॅसेंजरच्या अंगावर पडलात आणि तुम्हालाच ऑक्सिजन द्यायची वेळ आली तर त्या पॅसेंजर्सचा काय अवस्था होईल ? मग आमच्या ट्रेनिंगचा उपयोग का ?

असू दे ! मी तुझी गंमत केली. आता मात्र सिरियसली एक प्रश्न विचारते. माझ्या मनात एक शंका येतेय. एवढ्या ऐश्वर्यसंपन्न जीवनाची आपल्यासारख्या मध्यम परिस्थितीतल्या किंवा मेरिटमुळे गरीब घरातून आलेल्या मुलींना सवय नसते. मग एकदम एवढ्या सुखोपभोगानं अशा मुली स्वैराचारी होण्याचा धोका नसतो का ? त्यांच्या मानसिक अवस्थेत हा व्यवसाय स्वीकारल्यानंतर काही फरक पडतो असं तुम्हाला जाणवतं का ?

नमिता–असं होतं बऱ्याचदा ! समजा खालच्या स्तरातली, गरीब घरातली एखादी मुलगी एअरहॉस्टेस झाली, तर सुरुवातीलाच जवळजवळ हजार–दीड हजार पगार मिळतो. तिनं एवढा पैसा कधी पाहिलेलाच नसतो. मग घरी थोडेफार पैसे पाठवले तरी तिला उरलेल्या पैशांत भरपूर मजा करता येते. आम्ही एकवेळ पैसे

साठवतो, पण त्या हव्वे तस्से उधळतात. चैन करतात. त्यांना कोणतीच बंधनं राहत नाहीत. कधी अतिशय सनातनी घरातल्या मुली येतात. अशा बंधनांतील मुलींना इथे कल्पनातीत स्वातंत्र्य अनुभवायला मिळतं. तुम्ही मुंबई-पुण्यासारख्या ठिकाणी असाल तर आईवडील तुमची चौकशी करू शकतील, पण तुम्ही पॅरीस, रोम, लंडनसारख्या ठिकाणी काय करताय ह्याची आईवडिलांना थोडीच दाद लागणार आहे ? त्यामुळे अशा मुलीही बिघडण्याचा संभव असतो. कधीकधी अतिशय मॉडर्न घरातल्या मुली येतात. त्यांना कसलाच विधीनिषेध नसतो. त्या मग व्यसनाधीन, स्वैराचारी होण्याचा धोका असतो. सगळ्याच मुली बिघडतात असं मला म्हणायचं नाही, पण वातावरणाचा परिणाम म्हणून असं घडण्याचा संभव खूप असतो.

मेघा–पण त्यामुळे होतं काय माधुरी, लोकांना वाटतं की एक एअरहोस्टेस अशी आहे म्हणजे दुसरीही तशीच असणार ! तिच्या बॅकग्राऊंडचा तो स्वाभाविक विचार करीत नाही. तेवढी सवडही त्याला नसते. एखाद्याला पहिलीच एअरहोस्टेस अशी फ्लर्ट भेटली तर त्यानंतर त्याला भेटणाऱ्या कोणत्याही एअरहोस्टेसबद्दल त्याचं मत तेच राहणार ! अशानं आमचा व्यवसाय मात्रउ गाचच बदनाम होतो.

नमिता–आता माझ्याबद्दल मी तुला सांगते. मी कधीही कोणाला एअरहोस्टेस आहे म्हणून सांगत नाही. कुठे नोकरी करतेस असं कोणी विचारलं तर सांगते, एअरइंडियात आहे. तसं बोलण्यातून समजतंच की ही मुलगी नेहमी प्रवास करणारी, परदेशी जाणारी आहे. मग लोक विचारतात, तू तिथं कोण आहेस ? मगच मी सांगते की एअरहोस्टेस आहे. आणि खरंच सांगते, 'मी एअरहोस्टेस आहे' असं सांगितलं तर कोणीही माझ्या सांगण्यावर विश्वास ठेवत नाही. ते म्हणतात, तू तशी वाटत नाहीस. म्हणजे एअरहोस्टेसबद्दल असं मतच तयार झालंय की एअरहोस्टेस म्हणजे मॉडर्न, फ्लर्ट, लो–नेकचे टीशर्ट–टाईट जीन्स घालणाऱ्या ! एअरहोस्टेस साध्या, सोज्वळ असूच शकत नाहीत.

त्याला ठराविक मुलींचीच वागणूक कारणीभूत असेल का !

मेघा–मला तरी तसंच वाटतं. आता फ्लाईट्सवर आम्हाला साडीच नेसावी लागते. नियमाप्रमाणे ती कमरेच्यावर नेसावी लागते. पण ते नियम तंतोतंत कोण पाळणार ? मग काही मुली कमरेच्या एवढी खाली साडी नेसतील की बस्स ! किंवा कधी ब्लाऊझची बटणंच उघडी टाकायची. एखादंच लावायचं. पॅसेंजर्सना काय ? ते बघण्यातलंच सुख अनुभवणारच ! एखाद्या मुलीनं जरी असे कपडे केले, तरी त्यांना वाटतं सगळ्याच अशा उथळ ! त्याशिवाय फ्लाईटवर असताना आम्ही कोणतेही ड्रेस घालू शकतो. मग तिथं शरीरप्रदर्शनाला कोण अडवणार ? त्यामुळे काही पॅसेंजर्सना असं वाटतं, एअरहोस्टेस म्हणजे सहज मिळणारी गोष्ट आहे ! त्यांना बाहेर घेऊन जा, खाऊपिऊ घाला आणि मजा मारा ! शंभरातल्या एखाद–दोन जरी अशा असल्या आणि पॅसेंजर्सचा नेमका त्याच त्या मुलींशी संबंध आला,

तरी त्यांना वाटतं की सगळ्याच तशा आहेत. काही मुलींच्या स्वैर वागण्यानं चांगल्या एअरहोस्टेसेस्ची वाईट मुली म्हणून गणना होते आणि सगळा व्यवसायच बदनाम होतो. तेव्हा आम्हाला फार वाईट वाटतं.

नमिता–पण माधुरी, ह्या त्यांच्या वागण्यामागची मनःस्थितीही आपण लक्षात घ्यायला हवी. उगाच का कोणती मुलगी अशी स्वैर वागेल ? मला तरी तसं वाटत नाही. प्रत्येक मुलीचं ठराविक वयात लग्न झालंच पाहिजे, हे तुला पटतं ना ? समजा एखाद्या मुलीचं सत्तावीस–अठ्ठावीस वर्षांपर्यंत लग्न झालं नाही, तर ती मुलगी जरी काही दाखवणार नाही, तरी मनातून तिला वाटतंच असतं की आपलंही लग्न व्हावं, आपल्याला मुलंबाळं व्हावीत. समजा तिशी उलटेपर्यंत एखादीचं लग्न झालंच नाही तर भल्याबुऱ्या मार्गांनी ती दुसऱ्याचं लक्ष वेधण्याचा प्रयत्न करणारच ! मग कोणीतरी बघतंय ना आपल्याकडे, झालं तर ! तेवढ्यातच खूष ! मला स्वतःला तरी नेहमीच जाणवतं की फ्रस्ट्रेटेड मुलीच अशा असतात.

समजा काही–काही वेळा त्याच त्या फ्लाईटला त्याच त्या मुली असल्या आणि एखादा पॅसेंजर जर नेहमी त्याच ठराविक फ्लाईटनं ये–जा करणारा असला, तर असं एखादं लग्न जमतं का ?

मेघा–हो ! असं घडतं बऱ्याच वेळा ! कधीकधी एखादा पॅसेंजर प्रथमच विमानप्रवास करत असतो. आणि त्याला एखादी एअरहोस्टेस एवढी आवडते की तो तिला मागणी घालतो. सिंड्रेलाला राजकुमार भेटतो.

नमिता–मी एवढी स्वप्नाळू नाही. मी तर असंच समजते की असे मागणी घालणारे पॅसेंजर्सही त्याच लायकीचे असतात. मला एक सांग माधुरी, वर्षानुवर्षं एखाद्याच्या बरोबर राहूनही तो माणूस आपल्याला पूर्ण समजलाय असं मानणं मूर्खपणाचं असतं, मग आयुष्यभराचा जोडीदार निवडताना केवळ चार–आठ तासांतल्या परिचयात एखाद्या माणसाबद्दल मत बनवणं तुला पटतं ? म्हणूनच अशांनी लग्न करणं वेगळं आणि केवळ मजा मारण्याचा हेतू बाळगणं वेगळं !

समजा एखाद्या पॅसेंजरला एखाद्या एअरहोस्टेसनं विशेष प्रतिसाद दिला नाही तर तो चिडून छळणूक करतो का ? किंवा तिच्याविषयी खोट्यानाट्या तक्रारी करतो का ?

मेघा–असं क्वचितच घडतं. जर कधी एखादा पॅसेंजर सारखा बोलवायला लागला, त्रास द्यायला लागला तर आम्ही त्याच्याकडे लक्षच देत नाही. किंवा आम्ही मग पर्सरकडे तक्रार करतो की अमूक एक पॅसेंजर त्रास देतोय. आता त्या पॅसेंजरशी काही भांडता येत नाही किंवा तुला पुढल्या स्टेशनवर उतरून देऊ असंही सांगता येत नाही. पण एअर इंडियाचे पर्सर्स फारच चांगले आहेत. ते सांगतात, तू त्याच्याकडे जाऊच नको. मी बघतो काय करायचं ते ! मग तोच सर्विस देतो. त्यातूनही एखादा खडूस पॅसेंजर असेल, तर तो कंप्लेंट लिहितो. आम्हाला मग

एक्सप्लनेशनला बोलवतात. पण बहुतेक वेळा पर्सरलाही ठाऊक असतं काय झालंय ते ! त्याप्रमाणे तो त्याच्या रिपोर्टमध्ये लिहितो.

तुम्हाला असा कधी अनुभव आलाय का ?

नमिता–असा अनुभव नाही आला, पण पॅसेंजर्सचे अनुभव मात्र आम्ही खूप पचवलेत. त्याबद्दल मी आणि मेघा हवं तेवढं तुला सांगू शकू. काय ग मेघा ?

मेघा–हो, ना ! काही काही पॅसेंजर्स ना, आम्हाला अक्षरशः नोकरासारखे वागवतात. सारखं नाचवतील–केक आण, पाणी आण ...त्यांना एकच माहिती असतं की आपण पैसे दिलेत ते पुरेपूर वसूल करायचेत. त्या नादात एअरहोस्टेस ही माणूस आहे, आपण तिला किती नाचवतोय ह्याचासुद्धा विचार करणार नाहीत. आणि गंमत म्हणजे ही तथाकथित उच्चवर्गीय माणसं चक्क डिमांड करणार, 'ए ऽ कोक लाव–ए ऽ पाणी लाव !' विनंती नाही करणार की मृदु शब्दात बोलणार नाहीत. अस्सा राग येतो कधी कधी !

म्हणूनच मला वाटतं, तुमच्यावर अगदी खुल्लमखुल्ला टीका होते की, तुम्ही भारतीय प्रवाशांशी उद्धटपणानं वागता आणि फॉरिनर्सशी मात्र सलगीनं वागता ! एअर इंडिया दोघांकडूनही सारखेच पैसे घेत असते, मग एअरहोस्टेस अशा सापत्नभावानं का वागतात ?

मेघा–मी सांगते काय होतं ते !

नमिता–थांब, मीच सांगते तुला सगळं स्पष्टपणे ! एअर इंडियाचे प्रवासी सर्वसाधारणपणे कोण–कोण असतात ? बरेचसे मध्यपूर्वेकडे मजूर म्हणून जाणारे खालच्या वर्गातले लोक असतात. ते इतके गरीब आणि भित्रे असतात की भीतीनं अगदी गुपचुप बसून असतात. त्यांना भीती वाटते की एखादा ग्लास कोक आपण घेतला तरी त्याला पैसे पडतील. म्हणून ते बिचारे काहीच मागत नाहीत. बहुतेक वेळा पहिल्याच विमानप्रवासाच्या दडपणाखाली ते गुपचूप बसून असतात. त्यांना सर्व्ह करायला आम्हाला काहीच वाटत नाही. कारण ते मोलमजुरी करणारे आणि अगदीच गरीब असतात. तसंच नेहमी प्रवास करणारे सुखवस्तू, डिसेंट लोक असतात तेही विशेष त्रास देत नाहीत. पण हे जे मधले तथाकथित सोफिस्टिकेटड् प्रवासी असतात, तेच खूप त्रास देतात. मघाशी सांगितलं ना, तशी त्यांची प्रवासखर्च वसूल करून घेण्याची वृत्ती असते. त्यात एखाद–दुसरा अपवाद असेलही, पण बहुतेक सगळे तसेच !

मेघा–अग वसूल करण्याची ही वृत्ती एवढी हीनपणे बळावलेली असते की पहिल्यांदा आम्ही 'स्वीट्स' घेऊन जातो ना तर सुरुवातीचे पॅसेंजर्स चक्क मूठभर घेतील. मग पाठीमागच्यांना एखादंच चॉकोलेट मिळालं तर ते सरळ भांडायला उठतात. आम्ही एवढे पैसे भरलेत, आम्हाला आणखी गोळ्या द्या !

नमिता–आणि मागणार म्हणजे विनंती नाही करणार, ऑर्डर करणार–

हॉटेलमधल्या वेटरला करावी तशी ! तोच परदेशी प्रवासी असेल, तर दहा वेळा मागणारही नाही आणि मागितलं तरी इतकं विनम्रपणे विचारेल की बस्स !

मेघा–काही काही वेळा, कामाच्या गडबडीत आम्हाला ऑर्डर सर्व्ह करायला विसरायला होतं. भारतीय प्रवासी लगेच म्हणेल, 'हजार वेळा तुला सांगितलं तरी अजून पाणी आणलं नाही ?' जणू काही फार मोठा गुन्हाच केलाय. माझ्या मागच्या ट्रिपमध्ये एक गुजराथी बाई दोन नातवंडांबरोबर चालली होती. ती मुलं एवढी दमली होती की त्यांना काहीही नको होतं. पण ती केबिनमध्ये गेलं की, दरवेळी 'इनके लिए कुछ खानेको दो !'–करून ती माझा पिच्छा पुरवायची. त्यांना बळंबळं खायला लावायची. ती मुलं अक्षरशः 'नही नानी, हमे कुछ नही चाहिए' म्हणत ओरडत होती. तिच्या ह्या वसुलीचा मला अस्सा राग आला होता म्हणून सांगू !

नमिता–समजा रात्रीची फ्लाईट आहे हं माधुरी, तर पॅसेंजर्सना आम्ही नऊ वाजता जेवण सर्व्ह केलं तर आम्हाला जेवायला बारा वाजलेले असतात. आम्ही काही पॅसेंजर्सच्या आधी किंवा त्यांच्या बरोबरीनं जेवत नाही. सगळं आवरून आम्ही जेवायला बसतो तोच लगेच कोणीतरी तिथे टपकतं. तो भारतीय प्रवासी असेल तर आम्हाला जेवताना पाहूनही आम्हाला बोलवेल. पाच मिनिटांनीं यावं असा विचार काही तो करणार नाही. मागायचं असतं काय, तर बबीला नॅपकीन किंवा ग्लासभर पाणी ! वास्तविक पाच मिनिटांनी पाणी मिळालं तर फारसं बिघडेल असं काही नसतं. पण तरी तो मागेल. तोच जर परदेशी प्रवासी असेल तर मुळात पडदा लावलेला असला, तर तो केबिनमध्ये येणार नाही आणि आलाच तर तो सांगेल, अमूक एक वस्तू कुठे आहे ते सांग, मी ती घेईन. असं कुणी म्हटलं तर उठून द्यायलाही काही वाटत नाही.

मेघा–तूच सांग, सगळं घरातलं आवरून, भुकेभरीच आपण जेवायला बसलो आणि आपलं मूल हट्ट धरून बसलं की आई उठ आणि आत्ताच्या आत्ता मला अमुक वस्तू दे, तर तुम्हाला वाटतंच ना एक थोबाडीत द्यावी काटर्चांच्या !

नमिता–तरी आम्ही लगेच देतो.

काय ? काय देता ?

मेघा–च्–च् ! थोबाडीत नव्हे ग ! वस्तू काढून देतो. तर हे एकदा स्वतःसाठी काही घेऊन जातील, मग सांगतील माझ्या बेबीसाठी कोक दे. मग मला चीड येते. एकदाच मागायला काय झालं होतं ह्याला ?

नमिता–दुसऱ्यांचं पाहून तस्संच करण्याची आणखी एक प्रवृत्ती असते. म्हणजे आता समजा तुम्ही तिघी बसल्यात. त्यातल्या एकीनं कोक मागितला आणि मी तिला कोक दिला तर मेघा तिकडून बघत असते. त्यांना आणून दिल्यावर ती हळूच विचारेल, 'Can I have a coke ?' मग तिच्या बाजूचीला घ्यावासा

वाटेल. अग तिच्यासाठी आणला तेव्हाच नाही का मागायचा ? बरं, स्वत: उठून घ्यावा तेही नाही. ते म्हणजे अगदीच below dignity !

मेघा–आणि तुझ्याकडे तक्रार करणाऱ्या भारतीय प्रवाशांना विचार की तुम्हाला टॉयलेट वापरायची तरी माहिती आहे का ? एखादा भारतीय प्रवासी टॉयलेटमध्ये जाऊन आला की दुसऱ्या कोणालाही तिथं जावंसं वाटणार नाही. तो सगळं पाणी सांडून ठेवील. घाण करून ठेवील. तिथे टिश्यू पेपर, पाणी वगैरे सगळं असतं. पण तेवढे कष्ट कोण घेतोय ? तोच फॉरिनर गेला तर सगळं साफ करेल, मगच बाहेर येईल.

नमिता–भारतीय प्रवाशांच्या आडमुठेपणाचं एक उदाहरण सांगते हं मी तुला ! ज्या पॅसेंजर्सना एअर सिक् होतं ना, त्यांना मुद्दाम कडेची सीट देण्यात येते. हेतू हा की उलटी येते असं वाटलं की तो लगेच उठून क्लोकमध्ये जाईल. खिडकीतली जागा दिली, तर मधल्या दोन प्रवाशांना उठवून त्याला जावं लागेल. त्यावेळी अशाच एका पंजाबी पॅसेंजरला एअर-सिक् होतं म्हणून कडेची सीट दिली होती. चांगला शिकलासवरलेला पॅसेंजर होता. अन् म्हणे मला एअर-सिक होतं तर मला खिडकीचीच सीट दे. आता तूच सांग, एअर-क्राफ्ट म्हणजे काय एस. टी. आहे की तिथं खिडकीत बसून बाहेर डोकं काढून ओकेल ? मी किती समजावून सांगितलं तरी त्याचा आपला एकच हट्ट ! अशा वेळी राग नाही का येणार ? मग म्हणतात, आम्ही उद्धटपणे वागतो.

मेघा–अग ह्यांचे हट्ट तरी अक्षरश: एखाद्या लहान मुलासारखे असतात. एअरक्राफ्टमध्ये आम्ही ज्या इंग्लिश फिल्म्स दाखवतो त्या टेक्निकली खास तयार केलेल्या असतात. पंजाबी पॅसेंजर्स चिडतात की एअर इंडिया पंजाबी फिल्म्स का नाही दाखवत ? कोणी म्हणे हिंदी फिल्म्स दाखवा !

म्हणजे काय भारतातल्या चौदा भाषांतल्या फिल्म्स एअर–इंडिया दाखवणार का ?

नमिता–तुला एक अगदी साधी गोष्ट सांगते. वरच्या रॅकमध्ये किनई आम्ही ब्लँकेट्स ठेवलेली असतात. मुद्दाम आम्ही नेहमी सुरुवातीलाच सांगत असतो, की त्याच्यावर वजनदार सामान ठेवू नका, नंतर ब्लँकेट्स काढायला त्रास होईल. तरी ते अवजड सामान ठेवणार ! बरं जरूर लागेल तेव्हा ह्यांच्या प्रेमाच्या बायकांसाठी ते स्वत: काढावं, तेही नाही. ते एअरहोस्टेसनंच काढून दिलं पाहिजे एखादीनं दाद दिली नाही, तर दुसरीच्याकडून काढून घेतील. ह्या सामानांनी भरलेल्या बॅगांखालचं ब्लँकेट काढताना अक्षरश: वाटतं आपला हात तुटतोय की काय ! पण त्यावेळी मदत करायची दूरच राहिली, उलट अशा वेळी भारतीय प्रवासी आमची मजा बघेल !

मेघा–तेच जर फॉरीनरला सांगितलं की वरच्या रॅकमध्ये ब्लँकेट आहे, तर

तो मुकाटचानं ते काढून घेईल. आता तूच सांग, एखादा पॅसेंजर–मग तो भारतीय असो की परदेशी–जर तो आमच्याशी चांगला वागत असेल, आम्हाला त्रास देत नसेल तर आम्ही त्याच्याशी कशाला वाईट वागणार ?

खरं आहे. एखादी गोष्ट कर्तव्य म्हणून देणं वेगळं आणि जिव्हाळचानं देणं वेगळं ! समजा एखाद्यानं जोरात ऑर्डर करून कोक मागितला आणि एखाद्यानं गोड शब्दात मागितला, तर विनंती करणाऱ्याला तुम्ही हसून द्याल आणि दुसऱ्याच्या पुढचात तो आपटाल एवढाच फरक ! कोक दोघांनाही मिळेल.

नमिता–तेच आम्ही म्हणतो तुम्ही एअर होस्टेसबद्दल तक्रार करता पण तुम्ही त्यांच्याशी कसे वागता त्याचा कधी विचार करता का ? आम्ही खरोखर सगळचांशीच इतकं मिळून–मिसळून वागत असतो ! समजा एखाद्याच्या बरोबर लहान मूल असेल तर आम्ही त्याला सांभाळतो. एखादा प्रथमच विमानप्रवास करीत असेल आणि तो घाबरून गेला असेल तर त्याची आम्ही देखभाल करतो. आम्हीही अखेर माणसंच असतो. आम्हाला काही फॉरिनर्सची ऍलर्जी नसते. फक्त आमच्याशी जो चांगला वागेल, त्याच्याशी आम्ही चांगलेच वागणार. अग मजा सांगू ? एखादा तरुण स्मार्ट भारतीय प्रवासी असेल ना, तर त्याला वाटतं ही एअरहोस्टेस आपल्यावर लाईनच मारतेय ! त्यांना काय दुसरे धंदे नसतात लाईन मारण्याशिवाय ? तो एवढा शिष्टासारखा बसून असतो ! मग कोण जाणार ह्यांच्याशी बोलायला तूच सांग. पण तोच तरुण किंवा त्याच्या बाजूला बसलेला वृद्ध फॉरिनर बोलका असेल तर आम्ही मनसोक्त गप्पा मारतो त्याच्याशी ! बहुतेक फॉरिनर्स टूरिस्ट असतात. त्यांना भारतातला ताजमहाल आवडतो. इथली संस्कृती, इथलं निसर्गसौंदर्य, कुटुंबपद्धती, माणसामाणसांतले मैत्रीपूर्ण संबंध ह्याबद्दल ते खूप कौतुकानं भरभरून बोलतात. त्यांच्या देशाबद्दल ते आम्हाला सांगतात. आमचा मोकळा वेळ मजेत जातो.

प्रवाशांचे असे अनेक गंमतीदार किस्से तुम्ही सांगितलेत. कल्पना करा की त्यातलाच एखादा अकस्मात पिस्तूल घेऊन उठला आणि ओरडला, 'Hands up !'

मेघा–नको ग बाई ! तेवढा मात्र अनुभव यायला नको हं ! किती दिवस अडकून पडायला लागेल आणि काय–काय यातना होतील देव जाणे ! मागे मी पर्थहून सिडनीला गेले होते, तेव्हा आनंदमार्गीयांची चळवळ जोरात चालली होती. पण आम्हाला अगदी कडेकोट बंदोबस्तात ठेवलं होतं.

पण काय ग, ही मुलाखत देईपर्यंत तुम्हाला कधीही इमर्जन्सीचा प्रसंग अनुभवायला मिळालाच नाही का ?

नमिता–तसा अनुभव मिळाला असता ना तर तो तुला सांगायला आम्ही जिवंतच राहिलो नसतो. विमान अपघातात बहुधा जिवाला शंभर टक्के धोका असतो.

मग विमान सुटताना प्रार्थना वगैरे...?

मेघा–आम्ही नाही करत. 'टेक् ऑफ'च्या वेळेला बरेचजण अल्लाकडे दुव मागतात. क्रॉस करतात. पण आम्ही कधीच प्रार्थना करीत नाही. आमच्या मनातच येत नाही की ह्या फ्लाईटला अपघात झाला तर...?–तो होऊ नये म्हणून प्रार्थना करावी वगैरे ! फक्त दुबईच्या प्लेन क्रॅशनंतर आई देवापुढे सुपारी ठेवायला लावते.

का ? तुम्ही सापडला होता का त्यात ?

नमिता–मी सापडले नाही. पण सापडणार होते. त्या विमानात माझी ड्यूटी लावलेली होती. पण शुक्रवारी माझ्या बहिणीचं लग्न झालं. लगेच मला रविवारी सकाळची फ्लाईट दिली होती. ती मी करून आले. मला बरंही नव्हतं आणि घरातही पाहुणे जमले होते. म्हणून सोमवारच्या त्या दुबई फ्लाईटला मी निघत असताना आईनं अडवलं. मी म्हटलं, एक दिवसाची तर फ्लाईट आहे. सकाळी जाऊन संध्याकाळी येते. तर आई म्हणायला लागली बरं नसताना जायचं एवढं काही अडलेलं नाही. तू सिक् रिपोर्ट कर. मी तिचं ऐकलं. फ्लाईटवर गेले नाही आणि टेक ऑफ होताच ते विमान कोसळलं. मी सुदैवानं वाचले. म्हणून मग घरी खूप जंगी पार्टी दिली.

मेघा–नमिता वाचली, तरी दुसऱ्या मुलीचं मरण आलं होतं. ती गेलीच. मग त्या क्रॅशमध्ये एका मुलीला पिकअप्ला येणाऱ्या ड्रायव्हरनं हट्ट करून नेली. ती तर 'स्टॅण्ड बाय' ही नव्हती. पण ड्रायव्हर तिला म्हणायला लागला, तू अजून कन्फर्म झालेली नाहीस नोकरीत ! तू चल ! आणि ती नेमकी सापडली. तो ड्रायव्हर नंतर पश्चातापानं अक्षरशः लहान मुलासारखा रडत होता. म्हणाला, मी पुन्हा कोणालाही चल म्हणणार नाही. तशीच आणखी एक मुलगी होती. तिच्या घरी त्याच वेळी पार्टी चालली होती. तिचं युनिफॉर्म ठेवलेलं कपाट उघडत नव्हतं. तर सगळे तिला सांगायला लागले, नाहीतरी पार्टीला आता सगळे जमलेत, तू जाऊ नको. ती म्हणाली, हे कपाट जर उघडलं आत्ता, तर मी जाईन, नाहीतर नाही जाणार ! आणि तेवढ्यात कोणीतरी तिला ते कपाट उघडून दिलं. ती गेली आणि अपघातात सापडली.

नमिता–ह्या दुबई प्लेन क्रॅशनंतर आईनं मला खूप सांगितलं की नोकरी सोड ! पण म्हटलं हा अपघात झालाय, आता लगेच काही दुसरा होणार नाही. तू काळजी करू नकोस आणि लगेच दुसऱ्या दिवशी मी गेलेसुद्धा फ्लाईटवर ! त्या क्रॅशनंतर बऱ्याच मुलींनी सिक् रिपोर्ट केला. पण आम्ही मुळीच केला नाही. आम्हाला भीतीच वाटत नाही.

मेघा–आणि ज्या कोणाला भीती वाटत असेल, त्यांनी हा जॉब करूच नये. कारण जर प्रत्येक वेळी तुम्हाला, आपण हया प्लेनमधून जातोय, हे क्रॅश झालं तर ?– असं टेन्शन येणार असेल तर तुम्ही घेऊच नये हा जॉब ! कारण तुम्ही

सतत प्रवासात राहणार, तेवढा वेळ काय ह्याच ताणाखाली राहणार ? कुठेतरी आणि केव्हातरी आपण मरणारच ! त्या काल्पनिक भीतीपोटी तुम्हीच जर घाबरलात तर पॅसेंजरला तुम्ही काय धीर देणार ? त्यामुळे मनातून तुम्ही कितीही घाबरलात तरी तुम्हाला तसं दाखवता येत नाही. तेवढा धीटपणा हवाच !

नमिता–अग, मागे मी सिलोनच्या चक्रीवादळात सापडले होते, तेव्हासुद्धा कुठं घाबरले होते ? बरं का माधुरी, सर्व्हिस सुरू करायची म्हणून चॉकोलेट्स, चहा, कॉफी, सँडविचेस् ह्यांची जय्यत तयारो आम्ही केलेली होती. तेवढ्यात प्लेन वेगानं हेलकावे खायला लागलं. सगळी चहा–कॉफी सांडून गेली. वस्तू दणादण उधळल्या. आम्ही सीटबेल्ट्स लावायची सूचना केली. पण छे ! लोक एवढे भयंकर घाबरले होते की, कोणी रडायला लागलं, कोणी प्रार्थना म्हणायला लागलं. अगदी त्या वादळातून सुखरूप बाहेर पडलो तरी लोक जागचे हलेनात की एक शब्दही बोलेनात. एवढे भयंकर घाबरले होते !

मेघा–एक गोष्ट मात्र खरी आहे की एअर इंडिया ही सर्वात सुरक्षित विमानसेवा आहे. त्यांची एअरक्राफ्ट्स एवढी आधुनिक आहेत की 'टेक् ऑफ'-पूर्वीच्या तपासणीतच त्यांचे दोष कळून येतात आणि असे काही अपघात घडत नाहीत. म्हणून पॅसेंजर्स बहुधा एअर इंडियानंच प्रवास करणं पसंत करतात.

तुम्ही सतत अस्मानात उडत असता. तुमचे पाय विशेषतः मातृभूमीला कमी टेकतात. त्यामुळे तुम्हाला इथल्या समाजापासून सामाजिक–कौटुंबिक जीवनापासून दूर फेकलो गेलोय असं कधी वाटत नाही ? त्यातून असुरक्षिततेची भावना कधी मनात येत नाही ?

मेघा–असुरक्षित वाटत नाही फारसं ! पण आम्ही घरच्या सगळ्या सोहोळ्यांना–समारंभांना मात्र पारखे होतो. आम्हाला आवर्जून कोणत्याही लग्नाला, साखरपुड्याला जाता येत नाही. पिक्चर्स, ट्रिपचे प्रोग्रॅम्स आगाऊ ठरवता येत नाहीत. अशा वेळी आमच्या सोयीनंच दिवस ठरवले जातात. पण तरीही आठ–दहा दिवसांची फ्लाईट असेल तर आम्ही खूपच 'होम सिक्' होतो. अगदी फाईव्ह स्टार हॉटेलमधून आम्ही राहत, खात–पीत असलो तरीसुद्धा ! नंतर–नंतर घरचा वरणभात, कालवण-भात कधी जेवतोय असं वाटतं. अगदी माझी बहीण इथे आली होती ना राहायला, तेव्हा तिच्या मुलीचा मला खूप लळा लागला होता. तिला सोडून जाताना मला खूप वाईट वाटायचं. फ्लाईटवर असतानाही सारखी तिची आठवण यायची.

नमिता : विशेषतः घरी खूप नातेवाईक आलेले असतील आणि आम्ही फ्लाईटवर असलो की वाटतं, ते तिकडे मजा करतायत आणि आपण मात्र इथे सगळ्यांपासून दूर ! विशेषतः रात्रीची फ्लाईट असेल तर सगळे गाढ झोपलेले असतात आणि आपण मात्र डोळ्यांवरची झोप आवरत निघायची तयारी करत

असतो. तेव्हा मात्र वाटतं, कशाला हा जॉब घेतला आपण ! सुखातला जीव हकनाक दुःखात ! आपण बोलायचं आणि आपणच ऐकायचं ! सगळ्यांना झोपलेलं पाहिलं की दर वेळी मोह होतो, आपणही झोपून जावं ! पण एकदा घराबाहेर पडलं की मग मात्र तिथे रुळून जातो.

ह्या व्यवसायात तुमच्या झोपण्याच्या, खाण्यापिण्याच्या वेळेचं निश्चित टाईमटेबल नसतं. तुमचा आहार दर वेळी बदलतो. हवामानात सतत बदल घडत असतो. ह्याचा तुमच्या प्रकृतीवर परिणाम नाही होत ?

नमिता : सुरुवातीला खूप त्रास होतो नंतर हळूहळू सवय होत जाते. रात्री दोनची वगैरे फ्लाईट असेल तर बहुतेक रात्री झोप लागत नाही. कारण रात्री अकरा वाजता झोपून लगेच एक वाजता उठूच असं काही सांगता येत नाही. पिक-अप्ला येणारा ड्रायव्हर फार वेळ थांबतही नाही. त्या टेन्शननं झोप येत नाही. फ्लाईटवर सतत उभ्यानंच काम करावं लागतं. त्यामुळे खूप थकवा येतो. त्यातून बहुतेक पॅसेंजर्स गाढ झोपलेले असतात एखाददुसरा जागा असेल, तर आम्ही त्याच्याशी गप्पागोष्टी करतो आणि झोप उडवायचा प्रयत्न करतो. काही मुलींना बसल्या जागेवर पेंगायची सवय असते. मला मात्र ड्रेसमधल्या माणसानं झोपलेलं मुळीच आवडत नाही. 'ऑन ड्यूटी' असलेला, ड्रेसमधला पोलीस इन्स्पेक्टर झोपलेला आढळला, तर कसं विचित्र वाटेल, तसंच काहीतरी वाटतं.

मेघा : त्यामुळे होतं काय, प्लेन जेव्हा दुसऱ्या देशात पोहोचतं तिथं तिथल्या वेळेनुसार अगदी दिवस डोक्यावर आलेला असतो म्हणजे तिथं गेल्यावरही झोपावसं वाटत नाही. आणि झोपेला वाट्टेल तेव्हा ये म्हणून काही बोलावता येत नाही. ती तिच्या भारतीय वेळेनुसारच येणार ! त्यामुळेच एरवीसुद्धा रात्री दोनपर्यंत आम्हाला झोपच लागत नाही. भुकेचही तसच आहे. सगळ्यांची दुपारी एक वाजता जेवायची वेळ होते, तेव्हा माझी कॉफी प्यायची वेळ होते. जेवायची खरी भूक मला लागते ती दुपारी चार वाजता ! ती काही जेवणाची वेळ नसते. म्हणजे मी नुसतंच काहीतरी खाणार ! त्याचा परिणाम रात्रीच्या जेवणावर होतोच.

एकूण काय ? सगळ्या देशांचं मिळून तुमचं स्वतःचं एक टाईमटेबल तयार झालेलं आहे. पण ही कौतुकं लग्नापूर्वी चालतील. लग्नानंतर सासुरवाशीण म्हणून सासरची माणसं हे तुमचं अनिर्बंध जीवन खपवून घेतील, असं तुला वाटतं का ?

नमिता : त्यासाठी ज्या कुटुंबात आपण लग्न होऊन जाणार ते कुटुंब खूप फॉरवर्ड हवं. लग्नानंतरसुद्धा मी अजूनही दहा वाजता उठते. एखादी सासू म्हणेल, मी सहा वाजता उठते आणि ही काय दहा वाजेपर्यंत लोळते. पण माझ्या सासूबाईंना ठाऊक आहे, हिला सातला उठवलं तर हिचे डोळे अर्धवट झोपेनं नुसते तारवटलेले राहतात. त्यामुळे त्या मला कधीच उठवत नाहीत. हा त्यांचा मोठेपणा ! माझे पती मरीन इंजिनियर आहेत. त्यामुळे ते पण देशोदेशी फिरतात.

त्यांनाही समज आहे. पण माझ्या मतानं लग्नानंतर ही नोकरी सांभाळणं एकूण कठीणच आहे. आधीच ही कष्टप्रद नोकरी. त्यात दमून घरी आल्यावर घरात मीठ नाही, पीठ नाही, दळण संपलं किंवा नवऱ्यानं घरी आल्यावर ऑर्डर द्यावी–चांगला चमचमीत स्वयंपाक करून मला जेवायला घाल, म्हणजे त्या मुलीची वाटच लागायची. शिवाय मुलंबाळं झाल्यावर त्यांच्याजवळ राहायला नको का ?

मेघा : पण लग्नापूर्वी, हा जॉब करणं ह्यासारखा दुसरा आनंद नाही. केवढ्या स्वतंत्र मनोवृत्तीच्या होतो आपण ! प्रत्येक वेळी वडिलांचा, भावाचा, नवऱ्याचा आधार घेण्याची गरजच उरत नाही. बोलताना आपण स्त्री–स्वातंत्र्याच्या गप्पा मारतो. मग नवऱ्याशी बिलकूल वाद घालायचा नाही, कोणी सांगेल तसं आंधळं अनुकरण करायचं, ही स्त्रीमधील गुलामगिरी पूर्णपणे नष्ट होते. तरीही आमच्यातला हळुवारपणा टिकून राहतो. म्हणजे असं बघ, आम्हाला सगळ्याच अनोळखी पॅसेंजर्सशी अकृत्रिम स्नेहानं वागावं लागतं. एखादी नववधू चालली असेल तर तिला खुलवायचं. एखादा आपल्या नवजात बालकाला पाहायला चालला असेल तर त्याच्या जॉली मूडमध्ये सहभागी व्हायचं. एखाद्याचं कोणी आजारी असेल त्याला धीर द्यायचा, त्याचं सांत्वन करायचं. अग, नुसती चार माणसं आपल्या घरी पाहुणी आली, तर आपण त्यांची उस्तवार करताना कंटाळतो. मग आम्हाला एवढ्या लोकांची रोज उस्तवार करताना केवढं सोशिक व्हावं लागत असेल, त्याची तूच कल्पना कर. त्यामुळेच आम्ही खंबीर होतो पण हेकट राहत नाही. शालीन असतो पण बुजऱ्या राहत नाही. स्वतंत्र होतो, पण स्वैराचारी होत नाही.

किती नेटकेपणानं आपल्या व्यवसायाचं समर्थन केलं मेघा आणि नमितानं ! त्यात कुठेही गर्व नव्हता की दयेची याचना नव्हती. तिथं होतं फक्त निखळ, वस्तुनिष्ठ आत्मकथन !

ह्या हवाईसुंदरी जगभर मुक्त प्रवास करीत असल्या तरी त्या ना प्रवासातलं सुख अनुभवू शकत, ना मुक्ततेतला आनंद उपभोगू शकत. तरीही त्या स्वतःच्या धोकादायक आणि कष्टप्रद जीवनात समाधानी आहेत. कारण–

कारण निळ्या अस्मानात, सदैव पंख लावून उडणाऱ्या ह्या रंगीबेरंगी पोषाखातल्या अस्मानी पऱ्यांनी ,त्या आरस्पानी आभाळाकडूनच जगण्याची अनुभूती घेतलीय.

माहेर : सप्टेंबर १९८१

REFBK-0024596

उमेदीचे, बुद्धीचे, प्रतिभेचे गरुडपंख लाभलेल्या आणि त्या जोरावर अनोळखी पाऊलवाटांवर मार्गदर्शक खुणा उमटवणाऱ्या कर्तृत्ववान महिलांच्या या मुलाखती.

भिन्न क्षेत्रांतल्या, भिन्न थरांतल्या, भिन्नभाषिक महिलांचा यात समावेश आहे. त्यांच्या यशाचं गमक या मुलाखतींतून आपल्याला सापडेलच, पण त्याचबरोबर त्यांचे कष्ट, त्यांची जिद्द अशा अनोळखी पाऊलवाटेकडे वाटचाल करू इच्छिणाऱ्या अनेकांना स्फूर्तिदायक ठरेल !